म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव हरिविजय

४२६

९५

# हरिविजय कथासार

(पौराणिक)

# श्रीहरिविजय कथारस

आणि

## श्रीकृष्णाविषयीं ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या कुतर्कांचें खंडण.

प्रिय देशबंधुभगिनींच्या हितार्थ.

मूरकर

मंडळी

आवृत्ति दुसरी

सन १८८९

किंमत एक रुपया.

मुंबई,
जॉइन्ट-स्टॉक प्रिन्टिंग प्रेस.

हें पुस्तक 'मूरकर मंडळी' नें रजिस्टर करून सर्व प्रकारचे हक्क आपले स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

अलीकडे बहुतकरून कल्पित कादंबऱ्या व संगीत नाटकें यांचीं बरींच पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत. त्यांत आमचे सुशिक्षित लोक जर भारत, भागवतादि पुराणग्रथांतील बोधपर व मनोरंजक कथानकें सरळ गोष्टींच्या रूपानें लिहिण्याचें मनावर घेतील तर आमच्या थोडें शिकलेल्या स्त्रीपुरुषांस त्यांचा चांगला उपयोग होऊन तीं मनरंजनासही कारणीभूत होतील. हा विचार मनांत आणून श्रीमद्भागवतावरून श्रीधर कवीनें केलेल्या 'श्रीहरिविजय' ग्रंथाधारें आह्मीं हा "श्रीहरिविजय कथारस" ग्रंथ तयार केला आहे.

शिवाय आमच्या पुराणग्रंथांत कर्म, उपासना व ज्ञान हे ईश्वरप्राप्तीचे तीन्ही मार्ग सांगितले आहेत. परंतु, तीं सर्वच पुराणें गहन अशा संस्कृत भाषेंत आहेत. त्यांतूनही प्राचीन कविजनांच्या विशेष विद्वत्तेनें अनेक प्रकारचे अलंकार त्यांमध्यें असल्यामुळें, आमच्या सारख्या जड बुद्धीच्या मनुष्यांस हा ईश्वरपदप्राप्तीचा मार्ग अडतरसा होऊन गेला आहे. आतां, कांहीं अर्वाचीन कवींनीं केवळ परोपकारबुद्धीनें पुराणग्रंथांची गीर्वाणता काढून प्राकृतभाषेचें त्यास रूप दिल्यामुळें, त्यांत बराच सोपेपणा झाला आहे; तथापि तीही पद्यात्मक भाषा असल्यामुळें, आह्मांसारख्या अज्ञानांस तींत गहनपणा बराच वाटतो. सबब ज्यांतील अर्थबोध लहान मुलांस किंवा साधारण शिकलेल्या स्त्रियांस देखील व्हावा, अशा प्रकारें सर्व पुराणग्रंथ मराठी भाषेंत सरळ गोष्टींच्या

रूपानें तयार करून प्रिय देशबंधुभगिनींपुढें ठेवण्य
आह्मीं निश्चय केला आहे.

जोंपर्यंत आमच्या हिंदुलोकांस ख्रिस्ती लोक
विटाळ झाला नव्हता, तोंपर्यंत आमचे लें
आपले वेदशास्त्र, पुराणादि ग्रंथ पूज्य मानून तदनुरू
आचरण करून धर्मनिष्ठ असत. व त्यांच्या मन
आपल्या धर्माविषयीं किंवा कोणत्याही ग्रंथाविषयीं कोण
तीही शंका येत नसे. परंतु, जेव्हां ख्रिस्ती लोकांन
स्वधर्म वाढविण्याचा प्रयत्न हिंदुस्थानांत चालू केला,
तेव्हां अर्थातच त्यांनीं परधर्मनिंदा* करण्याची सुरवात
करून आमच्या लोकांच्या मनांत वेदशास्त्र, पुराणादि
ग्रंथांसंबंधी नानाप्रकारच्या कुत्सित शंका उत्पन्न केल्या.
पण, शेवटीं त्यांपासून ख्रिस्ती लोकांस विशेष फायदा न
होतां आमच्यांत प्रार्थनासमाज, ब्रह्मसमाज यां सारखे
कांहीं निराळे पंथ मात्र उत्पन्न झाले. आणि तेव्हां-
पासून ख्रिस्ती इत्यादि मतवाद्यांच्या आमच्या धर्मावर
ज्या शंका उत्पन्न झाल्या, त्यांत मुख्यत्वेंकरून श्रीकृ-
ष्णाविषयीं तर फारच कुतर्क निघाले आहेत.

श्रीधरादि कवींनीं पुराणग्रंथ लिहिण्यांत आपल्या
अनुपम बुद्धीचा व कविताशक्तीचा तर कळसच करून

---

*'मूर्तिपूजा' हा शब्द ख्रिस्तीलोकांनींच आमच्या 'देवपूजे'क-
डेस लाविला आहे. ख्रिस्तीलोकांस जर त्यांचें धर्मशास्त्र 'बैबल'
हें ईश्वरप्रणित आहे असें वाटतें, तर त्यांनीं खुशाल आपल्या पंथा-
नुयायी लोकांपुढें त्याचे पोवाडे गावे; याजविषयीं आमचें कांहीं ह्मणणें
नाहीं. परंतु तसें न करितां परधर्माची निंदा केल्यानें त्यांच्या
धर्माची प्रतिष्ठा वाढते असें ते समजतात; हें अगदीं वेडेपण होय.

मांडला आहे; परंतु, सांगण्यास दुःख वाटतें कीं, त्याचा वास्तविक अर्थ आमच्या अर्ध्या हळकुंडानें सगळें जग पिवळें करूं पहाणाऱ्या ख्रिस्ती लोकांच्या व त्यांच्या मतानें वागणाऱ्या सुधारकांच्या अल्प बुद्धींत न शिरतां आमच्या ईश्वरावतार श्रीकृष्णाविषयीं जे अनेक कुतर्क काढतात त्यांचें योग्य खंडण करून तो भागही ह्याच ग्रंथाचे शेवटीं निराळा घातला आहे. हें खंडण करण्यास आमचे प्रसिद्ध कै० वे० शा० सं० विष्णुबावा ब्रह्मचारी यांच्या 'वेदोक्तधर्मप्रकाशा'दि ग्रंथांची जी कांहीं आह्मांस मदत मिळाली, ती त्यांनीं आह्मां हिंदुलोकांवर एक मोठीच कृपा करून ठेविली आहे असें आह्मीं समजतों. तसेंच आमचे परमपूज्य व सन्माननीय मित्र रा० रा० बळवंतराव कृष्णाजी तिवरेकर, जी. आय. पी. रेल्वे, ऑडिट ऑफिस, गुडस डिपार्टमेन्टचे हेड क्लार्क यांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून जी कांहीं आम्हांस केवळ परोपकारबुद्धीनें ज्ञानद्वारें मदत केली, तिजबद्दल ही मंडळी त्यांचे फार आभार मानीत आहे.

आमचे विद्वान व लोकप्रिय **श्रीमंत महाराज सयाजीराव गायकवाड सरकारसाहेब** यांनीं कृपा करून या मंडळीस रुपये दोनशें बक्षीस देऊन पन्नास पुस्तकेंही विकत घेतलीं; याजबद्दल आम्हीं त्यांचे फार फार उपकार मानितों.

आतां शेवटीं आमचीं पुस्तकें लोकाश्रयास पात्र होवोत, अशी सर्वशक्तिमान परमेश्वरापाशीं आम्हीं अनन्यभावानें प्रार्थना करून ही प्रस्तावना पुरी करितों.

**मूरकर मंडळी.**

# विषयानुक्रमणिका.

—:o:—


| अध्याय. | | |
|---|---|---|
| १ | ग्रंथारंभ, दैत्यकुलोत्पत्ति व त्रास........... | [illegible] |
| २ | श्रीविष्णूची आज्ञा व देवकीपुत्रसंहार ....... | [illegible] |
| ३ | बळराम व कृष्ण जन्मकथन................ | [illegible] |
| ४ | श्रीकृष्णजातकवर्णन, महाबळभट—विटंबना व पूतनाअंत. ............... | १९ |
| ५ | शकटासुर व तृणावर्त वध. ............... | २७ |
| ६ | बाळलीला. ................................ | ३० |
| ७ | बाळलीला. ................................ | ३५ |
| ८ | बाळलीला. ................................ | ४३ |
| ९ | कुबेरपुत्रोद्धार, कृष्णलीला व नौकाक्रीडा..... | ५३ |
| १० | यमुना व ब्रह्मदेव गर्वहरण. ............... | ६६ |
| ११ | काळियामर्दन व अग्निभक्षण................ | ६८ |
| १२ | गोवर्धनोद्धारण व व्योमासुरवध इ०........ | ७५ |
| १३ | देवांतक, पितृद्रोही, जळासुर व असुरासुर वध. ....................... | ८० |
| १४ | अघासुर, धेनुकासुर इत्यादि वध ........... | ८३ |
| १५ | देवकीस कृष्णभेट व गोपीवस्त्रहरण. ........ | ९२ |
| १६ | गोकुळवासी ब्राह्मणगर्वहरण.......... .... | ९८ |
| १७ | रासक्रीडा ................................ | १०२ |

| ध्याय. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ८ | रोगमन व गोपीविलाप. | १०६ |
| १ | कंसवध. | ११२ |
| २० | कृष्ण, बळराम व सुदाम विद्याभ्यास | ११८ |
| २१ | उद्धवाचें गोकुळीं प्रयाण व शांतवन | ११९ |
| २२ | जरासंधपराभव व काळयवनवध. | १२१ |
| २३ | रुक्मिणीहरण. | १२७ |
| २४ | रुक्मिणीविवाह. | १३२ |
| २५ | स्यमंतकमणी व नारदगर्वपरिहार इ० | १३६ |
| २६ | मित्रविंदादि विवाह व पारिजातकाख्यान | १४४ |
| २७ | तारकासुर व शंबरासुर वध. | १४९ |
| २८ | अनिरुद्ध व उखा विवाह | १५६ |
| २९ | सुदामचरित्र | १६९ |
| ३० | कृष्णदान. | १७५ |
| ३१ | गरुड व भामा गर्वहरण | १८१ |
| ३२ | सुभद्राविवाह व नारदगर्वहरण इ० | १८९ |
| ३३ | जरासंधवध व भीमगर्वहरण इत्यादि | १९६ |
| ३४ | द्रौपदीलज्जारक्षण व शुकमुनिभेट | २०७ |
| ३५ | शिशुपाळ व वक्रदंत वध. | ३१० |
| ३६ | ग्रहणयात्रा, गोकुळजनभेट व ग्रंथसमाप्ति | २१३ |
| | कविता. | २२६ |
| | श्रीकृष्णाविषयीं ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या कुतर्कांचें खंडण | १—१४ |

२४

# मूरकर मंडळीची प्रार्थना.

———:o:———

हे स्वयंप्रकाशतेजोमय, ब्रह्मानंदा, निर्गुणा, निर्विकारा, मायाचक्रचालका, पुराणपुरुषा, रुक्मिणीपते श्रीहरि; तुला आमचा अनन्यभावें साष्टांगनमस्कार असो. तुझ्या इच्छामात्रेंकरून सकल जगाची उत्पत्ति, स्थिति व ल हीं होतात. तूं सर्व जग व्यापूनही वेगळा राहि आहेस. भक्तांचीं संकटें दूर करण्यास्तव जो गणपतीचें रूप घेतो व त्यांस बुद्धि देण्याकरितां जो सरस्वती बनतो तो तूंच आहेस; परंतु वास्तविक तुला आदि, मध्य व अंत नाहीं. भक्तांच्या संकटांचा नाश करून त्यांचे मनोरथ पूर्ण करण्याकरितां व दुष्टांस शासन करण्याकरितां तूंच युगायुगांतरीं अवतार धारण केलेस. तूं सर्व शक्तिमान, करुणासागर व बुद्धिदाता आहेस; ह्मणून तुलाच आह्मीं हीन, दीन, कुमति अनन्यभावें शरण येऊन ज्यांत तुझीं (श्रीहरीचीं) प्रेमळ अशीं चरित्रें वर्णिलीं आहेत असा हा श्रीधरकविकृत ओवीबद्ध "श्रीहरिविजय" ग्रंथ मराठी भाषेंत सरळ गोष्टींच्या रूपानें आह्मीं लिहिला होता, त्याच्या थोडक्याच अवकाशांत सर्व प्रती तुझ्या कृपेनें लोकाश्रय चांगला मिळून संपून गेल्या ह्मणून, त्याची आज दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रयत्न करीत आहों; तो तुझ्या कृपेनें शेवटास जाऊन सुफल होवो.

# श्रीहरिविजय कथासार.

## अध्याय १ ला.

### ग्रंथारंभ, दैत्यकुलोत्पत्ति व त्रास.

प्रथमारंभीं सर्व आदिदैवतांस, ऋषिश्रेष्ठांस व साधुसंतांस वंदन करून श्रीधरकवि ह्मणतात कीं, ज्याप्रमाणें रहाटाची माळ व तिचे मणी वरचेवर खालवर होतात, तद्वतच ही जगदिश्वराच्या मत्स्य, कूर्मादि अवतारांची माला आहे. ज्या ज्या वेळीं पृथ्वीवर साधुसंत, इतर जन आणि धर्म यांस पीडा होऊन दुष्टांचें प्राबल्य झालें, त्या त्या वेळीं देवानें मानवावतार धारण करून त्यांचा संहार केला; हें सर्वांस पुराणप्रसिद्ध असल्याचें विश्रुतच आहे. मागील ह्मणजे रामावतारीं, ज्या वेळीं रावणादि अनेक दुष्ट अशा राक्षसांचें प्राबल्य झालें, त्या वेळीं देवानें श्रीरामचंद्ररूप मानवावतार घेऊन अक्षौहिणी सैन्य बाळगणारा जो रावण त्याचा गर्वपरिहार वानरहस्तें करविला. त्यास कांहीं काळ गेला नाहीं तों, कंस, चाणूर, मुष्टिक, अघासुर, बकासुर, केशी, प्रलंब, शिशुपाळ, वक्रदंत, चैद्यनायक, भौमासुर, काळयवन इत्यादि अनेक दुष्ट राक्षस उन्मत्त होऊन गोब्राह्मणांचा संहार करूं लागले; यज्ञयागादि सत्कर्मांचा विध्वंस करूं लागले; धर्माचा पाडाव करूं लागले; तसेच दुर्योधनादि कौरव हेही धर्माविरुद्ध चालून पृथ्वीवर फार अनाचार

करूं लागले. अर्थात पृथ्वीवर ब्रह्महत्या, गोहत्या, स्त्रीहत्या व बालहत्यादि अनेक अघोर पातकें होऊन व यज्ञयागादि पुण्यकर्मांचा भंग होऊन धर्म रसातळास गेला. त्या वेळीं पृथ्वी गाईचें रूप धारण करून इंद्रादि देव, ऋषि इत्यादिकांसह ब्रह्मदेवास शरण गेली; तेव्हां त्यास दया आली. नंतर सर्वांस घेऊन ब्रह्मदेव क्षीरसागरतीरीं श्रीविष्णूजवळ गेले.

---

# अध्याय २ रा.

## श्रीविष्णूची आज्ञा व देवकीपुत्रसंहार.

ब्रह्मदेवानें नम्रतापूर्वक कर जोडून विष्णूची स्तुति केली कीं, "हे दयानिधे, सुरासुरवंद्या, त्रिजगत्प्रभो, हे जगदीशा, आह्मांस जर संकट प्राप्त झालें तर आह्मीं तुजवांचून कोणास बरें शरण जावें? कांकीं 'साधुसंरक्षणार्थाय संभवामि युगे युगे' असें तुझें वचन आहे. आणि तूं अनाथपालक व सज्जनसंरक्षक ह्मणवितोस, तेव्हां तुझ्या चरणावांचून आह्मांस दुसरें स्थळच नाहीं. ज्या वेळीं रावणादिकांपासून आह्मांस त्रास झाला, त्या वेळीं आह्मीं सर्व तुला शरण आलों; व त्वां रामावतार घेऊन आमचें रक्षण केलेंस. आतां कंसादि दैत्य प्रबळ होऊन त्यांनीं पृथ्वीवर आकांत मांडिला आहे. ऋषि आदिकरून जे विप्र त्या सर्वांचीं स्थानें व अनुष्ठानें त्यांनीं भ्रष्ट केलीं आणि रहाण्यासही स्थळ नाहीं ह्मणून सर्व ऋषि, देव व पृथ्वी इत्यादि आह्मीं सर्व मिळून आपणास शरण आलों आहों. आपण जर कृपा कराल, तरच आह्मांस सुख

होणार." अशी स्तुति केली. व अभयवचन काय मि-ळतें तें ऐकण्याकरितां सर्व स्वस्थ मनानें उभेच राहिले. इतक्यांत सागरांतून अशी वाणी निघाली कीं, "भक्तांनों, तुह्मीं स्वस्थ रहावें. आपण जें बोललां तें सर्व मीं ऐकलें. मी मानवावतार घेऊन सर्व दैत्यांचा संहार करीन; परंतु तुह्मांस आज्ञा करितों ती सर्वांनीं श्रवण करून त्या त्या प्रमाणें करावें. मी यादवकुळांत अवतार घेतों. तुह्मीं सर्व देवांनीं मजबरोबर यादव व्हावें; उपदेवांनीं गोपाळ व्हावें; ऋषींनीं गाई व्हावें; इंद्र, वायु, यम व अश्विनिकुमार यांनीं कुंती व माद्री यांच्या पोटीं अवतार घ्यावेत (पांडव व्हावें); बृहस्पतीनें द्रोणाचार्य होऊन पांडवांस विद्यादान द्यावें; पार्वतीनें द्रौपदी व्हावें; पांचाळाच्या घरीं अग्नीनें धृष्टद्युम्न व्हावें; लक्ष्मी इनें वैदर्भराजाच्या पोटीं येऊन रुक्मीण हें नांव घ्यावें; ह्मणजे मी सर्वांस साह्य करून एकंदर कार्यभाग करीन व दुष्टांचें पिष्ट करीन." हें अभिवचन ऐकतांच श्रीविष्णूची आज्ञा शिरसावंद्य करून सर्व आनंदानें आपापल्या स्थानाप्रत गेले.

इकडे गोकुळांत शूरसेन यादवाच्या पोटीं वसुदेव नां-वाचा पुत्र झाला. तो पुण्यवान, सुरूप व तेजःपुंज होता. तो मोठा झाल्यावर त्याचा विवाह मथुरेचा राजा उग्रसेन याची कन्या देवकी इशीं पूर्वसंचिताप्रमाणें ठरला; व मोठ्या तयारीनिशीं शूरसेन वसुदेवासह लग्नाकरितां मथुरेस आला. उग्रसेनराजाचा पुत्र कंस यानें ज्या वेळीं आ-पल्या बहिणीचा नवरा पाहिला, त्या वेळीं त्याच्या अप्रतिम गुणरूपावर तो फारच खुष झाला व त्या लग्नसमारंभा-संबंधी पुष्कळ श्रम आपण स्वतः घेऊन तो समारंभ फारच

चांगल्या रीतीनें त्यानें तडीस नेला. असा लग्नसमारंभ पूर्वी मथुरेंत कधींच झाला नव्हता. कंस आपल्या शालकाजवळ अहोरात्र उभाच राहून त्याच्या इच्छेप्रमाणें वागे. यामुळें उग्रसेनासही फारच आनंद होई. पुढें मोठ्या अलौकिक थाटानें ज्या वेळीं वसुदेवदेवकीची वरात निघाली, त्या वेळीं मंगलवाद्यें, रणवाद्यें वाजूं लागलीं; ठिकठिकाणीं उल्हाटयंत्राचे ( तोफांचे ) भडीमार चालविले व सर्वत्र सुवर्णपुष्पवृष्टि केली. आणखी चित्रविचित्र दारूकाम रस्त्यांतून सुटूं लागलें; व दीपिका तर त्या समारंभांत इतक्या कांहीं पुष्कळ होत्या कीं, ज्याची अकुंचित दृष्टि असेल त्यानेंही सुई शोधून घ्यावी. ज्या रथांत तीं वधुवरें होतीं, त्या रथाच्या घोड्यांचे वाग्दोरे कंसानें स्वतः आपल्या हातीं धरिले; आणि मागें पुढें हजारों रथ, हत्ती, घोडे, पालख्या यांची दाटी होती. त्यांतच अश्वारूढ असे मोठमोठे संस्थानिक व इतर सैन्यांतील मोठमोठे सेनापति होते व लक्षावधि पदाति होते. त्या दाटींत मुंगीलाही चालण्यास वाट उरली नाहीं. असा थाटानें समारंभ चालला असतां, आणि सर्व लोक अति आनंदोत्सवांत निमग्न असतां, अकस्मात् अशी आकाशवाणी झाली कीं, "अरे कंसासुरा, आपल्या ह्या बहिणीच्या लग्नसमारंभांत तूं मुख्य होऊन मोठ्या आनंदांत अगदीं निमग्न झाला आहेस; परंतु या देवकीच्या पोटीं जो आठवा पुत्र होईल तो तुझा प्राणहरण करणारा होईल." ही आकाशवाणी कंसानें ऐकतांच त्याचा सर्व सौख्यसागर शोषून जाऊन त्यास इतका राग आला कीं, त्यानें ते वाग्दोरे सोडून एकाएकीं रथाखालीं सशस्त्र उडी टाकिली; आणि त्या वधुवरांपुढें

तो आरक्त डोळे करून रथावर चढून काळासारखा उभा राहिला. त्या वेळीं तेथें सर्वांस फारच भय वाटलें. त्यानें तत्क्षणीं बहिणीची वेणी धरून व तिला आसडा देऊन रथाखालीं पाडिलें, व तिच्या मानेवर शस्त्र ठेवून बोलूं लागला, " अगे चांडाळणी, तुझ्या रूपाला अनुरूप असा तुला नवरा मिळावा ह्मणून मी अतिशय प्रयत्न केले व तसा रूपवान नवराही मिळविला, यामुळें मला फारच हर्ष होऊन त्या आनंदाच्या योगानें या तुझ्या लग्नसमारंभांत मीच मुख्य झालों; परंतु या इष्टकार्याचा परिणाम नष्ट ह्मणून अशा दुष्ट संकटाचें आतांच पिष्ट करून टाकावें ह्मणजे अरिष्टाचा संभव मुळींच राहणार नाहीं; मात्र एक बहिणीलाच मारल्याचा दोष लागेल ! परंतु 'आपलें कल्याण चिंतणारानें ज्या अडचणी त्यांत उद्भवतील त्यांचें निरसन करावें ' अशी नीति आहे; ह्मणून तुझा मी वधच करितों, ह्मणजे तुला संतति होईल कोठून ? " असें ह्मणून शस्त्रानें तिची मान तोडणार, तों भयग्रस्त देवकीनें विनंती केली कीं, " दादा, जो तूं महाकाळासही भिणारा नव्हेस, तो तूं आज यःकश्चित् आकाशवाणीला भ्यावेंसना ? असो. ही एक माझ्या प्रारब्धहीनत्वाचीच गोष्ट आहे. माझ्या लग्नाची तयारी मोठ्या उत्सुकतेनें तूं केलीस, त्याचप्रमाणें त्याचा अंतही जर तुझ्याच हातून होणार तर यांत ह्मणजे मला असंतोष आहे असें नाहीं. आणि तुझ्यापासून जें हें भय मला प्राप्त झालें आहे, त्यापासून रक्षण करण्यास विनंती करणें तीही तुलाच केली पाहिजे; कां कीं, तुजपुढें दुसऱ्याची मुळींच शक्ति नाहीं. ह्मणून या वेळीं तूं वेड्यासारखें कांहीं न भितां मला जीवदान द्यावें." कंस बोलला, 'हे प्रिय भगिनी,

तुझ्यावर किंवा तुझ्या नवऱ्यावर माझा रोष तिळमात्र नाहीं आणि शत्रुत्वही नाहीं; परंतु माझें मन जें भयग्रस्त झालें आहे, तें भय तुझा वध केल्यावांचून जाणेंच नाहीं; ह्मणून निरुपायानें तुझा प्राण मला घेतलाच पाहिजे.' कंसाचे आरक्त डोळे पाहून व आपलाही प्राण या वेळीं जाणार असें जाणून, वसुदेव बोलला कीं, 'अरे, स्त्रीहत्या हा दोष शास्त्रांत मोठा सांगितला आहे. तूं सुज्ञ असून हें असें नीच कर्म करावें हें फारच अयोग्य.' कंस ह्मणाला, 'शालका, ज्या योगानें मला लेशही भीति नाहीं, अशी जर गोष्ट तूं मला सांगशील, तर मी शपथपूर्वक सांगतों कीं, मी भगिनीचा वध कधींही करणार नाहीं. कारण कीं, मी निर्दय नाहीं; परंतु काय करावें ? असें केल्याशिवाय माझा उपायच नाहीं ह्मणून या घोर कर्मास मी प्रवृत्त झालों.' नंतर वसुदेव बोलला कीं, इच्या पोटीं जी संतति होईल ती तूं घ्यावीस; ह्मणजे तुला भीति राहिली नाहीं. कंसासुर बोलला, मी तर घेईनच, परंतु तुह्मींही विश्वासानें व संतोषानें ती मला द्यावी; ह्मणजे मोठ्या आनंदानें मी तुमच्या प्राणांचें रक्षण करितों. याप्रमाणें कंसास तें वचन मान्य होऊन त्या उभयतांचें वचन घेतलें. तसेंच कित्येकांनीं सांगितलें त्यावरही भरवंसा ठेवून देवकीस त्यानें जीवदान दिलें, आणि एका दैत्यास बोलावून आज्ञा केली कीं, या उभयतांच्या पायांत बिड्या ठोकून यांस बंदीशाळेंत ठेव आणि देवकी गरोदर झाल्यावर प्रहरा प्रहराची मला वर्दी देत जा. याप्रमाणें बंदोबस्त करून व मागांतूनच त्या उभयतांस बंदीशाळेंत पाठवून, त्या समारंभाचा निध्वंस करून आपण घरीं गेला.

कंस हा उग्रसेनाचा मुलगा असतां, हा राक्षस कसा झाला ही लोकशंका निवारण करण्यास त्याची मूळकथा अशी आहे कीं, उग्रसेनाच्या स्त्रिला अरण्यांत नेऊन एका राक्षसानें तिला बलात्कारें भोगिली होती; ह्मणून तिच्या पोटीं हा चांडाळ दैत्यरूपी कंस झाला.

उत्साह भंग होऊन सर्व दुःखभरित होत्साते आपापल्या स्थानीं गेले व उदास अंतःकरणानें कंसही राजवाड्यांत जाऊन स्तब्ध बसला. इकडे वसुदेव देवकीस कारागृहांत ठेवून द्वारें बंद केल्यावर उभयतां स्वस्थ मनानें आनंदांत निमग्न झालीं. वसुदेव बोलला, प्रिये, आतांच पाहिलंसना, काय भयंकर प्रसंग तुझ्या जिवावर आला होता तो? जो काळाचेंही ऐकून मन फिरविणारा नव्हे, अशा दुष्ट कंसानें माझ्या वचनावर विश्वास ठेवून तुझा जीव वांचविला; ह्मणून त्या जगन्नियंत्याचेच मोठे आभार मानले पाहिजेत. त्यावर देवकी ह्मणाली, ‘प्राणपते, पतिसन्मुख बंधुहस्तानें माझा प्राण जर आज जाता, तर जिवाचें सार्थकच झालें असतें. परंतु हें संकट आपण आपल्या दृष्टीनें पाहण्याचा प्रसंग चुकविला व आपलाही प्राण वांचविला यांतच मला मोठा आनंद आहे.’ वसुदेव बोलला कीं, प्रिये, ‘वेळ चुकली कीं काळ चुकला’ ही प्रसिद्ध ह्मण सर्वांस ठाऊक आहे. ज्या जगदिशानें ही मरणाची वेळ चुकविली, तो ईश्वर पुढें यत्किंचितूही संकट येऊं देणार नाहीं; हें पूर्णपणें समजलें पाहिजे. आतां आपण स्वस्थांतःकरणानें प्राप्त काळांत सुखानें काळक्रमण करूं. याप्रमाणें कांहीं काळ त्यांनीं बंदीशाळेंत लोटला. इतक्यांत पूर्वसंचिताप्रमाणें देवकी गरोदर राहिली. त्या वेळीं उभयतांच्या चित्तांत फारच खेद झाला.

कंसासुर आपल्या बहिणीच्या समाचारासाठीं बंदीशाळेंत नेहमी येत असे. पुढें एके दिवशीं नियमित काळीं ती प्रसूत होऊन पुत्र झाला. त्याचें रूप पाहून उभयतांसही मूर्च्छा आली. इतक्यांत वसुदेव मूर्च्छा सांवरून तिला बोलला, प्राणप्रिये, शुद्धीवर ये; व आतां मोह सोडून दे.' झाड जगलें तर फळें' या न्यायावर सांप्रत आपण लक्ष देऊन, जो आपला युक्त विचार तो करूं. नंतर ती बोलली, ह्या न्यायापेक्षां 'पतीची आज्ञा प्रमाण हेंच स्त्रियांचें निदान' या वचनावर मी लक्ष देतें. आपण आतां जो कार्यभाग करणें तो करावा. असें ह्मणून ती स्फुंदस्फुंदून रडूं लागली.

इकडे वसुदेवानें दरवाजाजवळ येऊन जो द्वाररक्षक होता त्यास हांक मारून सांगितलें कीं, बाबा, कंसासुरास जाऊन देवकीस पुत्र झाला आहे तो तुला बघावयास वसुदेव बोलावितो ह्मणून सांग. त्यानें तत्क्षणीं धांवत धांवत जाऊन हें वर्त्तमान कंसास कळाविलें. तो भयाभित व क्रोधानें संतप्त होऊन बंदीशाळेंत आला. तेथें कंसाची मुद्रा भयंकर न दिसतां आनंदभरित दिसल्यानें, त्या उभयतांस संतोष होऊन हा पुत्र आपणास पचेल अशी थोडी आशा उत्पन्न झाली. कंस येतांच त्यानें देवकीस क्षेम विचारलें. तेव्हां देवकी ह्मणाली, क्षेमाचें तुला आतां कशास विचारणें हवें ? प्राणपतीनें तुला कां बोलाविलें आहे, हें तूं जाणतच आहेस; असें बोलून तें बालक त्याच्या हातांत दिलें व आपण फारच रडूं लागली. कंसानें तिचें शांतवन केलें व विनंती केली कीं, प्रिय भगिनी, तुझें हें बाळ मारावें याच हेतूनें मी येथें येत होतों, असा अर्थ नाहीं; फक्त तुझी प्रकृति पाहण्याकरितां नेहमीं येत असें ! ( बालकाच्या रूपा-

कडे पाहून व त्याचे मुके घेऊन) हा घे आपला पुत्र; तुझा तुला अक्षयी असो. असें बोलून संतुष्ट मनानें तो राजवाड्यांत निघून गेला.

हें वर्तमान इंद्रास समजून तो नारदास बोलला कीं, महाराज, परमेश्वरानें अवतार घेण्याचा निश्चय सांगून, उपदेव व ऋषि या सर्वांस अवतार घेण्यास सांगितलें; परंतु कंसासुराच्या हातून भयंकर पातकें झाल्यावांचून ही गोष्ट सिद्धीस जाणार नाहीं. ह्मणून कंसाचें मन फिरवून त्याच्या हातानें बालहत्या करवाव्या ह्मणजे पातकसंचय होईल. हें ऐकून नारद कंसाकडे गेला. त्यानें नारदाचें मोठें आदरातिथ्य करून षोडशोपचारें पूजन केलें व आपण हस्तद्वय जोडून पुढें उभा राहिला. असें पाहून नारद बोलला कीं, कंसासुरा, तुझ्यासारखा प्रतापि मी कोणीच पाहिला नाहीं. सर्व गोष्टींनें तूं निर्भय वागतोस. वाहवा! सार्वभौमा, वैभव असावें तर असेंच असावें! तेव्हां कंस बोलला, महाराज, आपल्या कृपेनें मी सतत धन्य आहें; परंतु 'चितासम नास्ति शरीरशोषणं' अशी अवस्था माझी आहे. त्या आकाशवाणीनें माझें रात्रंदिवस चित्त भ्रमण होत आहे. नारद बोलला, राजा, त्याविषयीं तर तूं सर्व बंदोबस्त ठेविला आहेस व त्याप्रमाणें देवकीच्या प्रथम पुत्राचा संहार केलाच असशील! कंस ह्मणाला, महाराज, माझा शत्रु तिचा आठवा पुत्र; मग मी निरर्थक सात अर्भकांचा संहार कशासाठीं करावा? नारद बोलला, अरे, ज्या ठिकाणीं ज्ञान विशेष असतें, त्या स्थळीं अज्ञानानें वास केलेलाच असतो; ह्मणून तुझ्या चित्तांत हा मोठाच भ्रम झाला आहे. अरे, तूं या प्रथम मुलापासून आठवा तो

आपला शत्रु गणला असशील, व तसेंही कदाचित् असेल; परंतु जर उलटें मोजीत आलें तर त्यापासून आठवेपण पहिल्यावरही येते. ह्मणून एकंदर बालकें मारल्याशिवाय कालत्रयींही तुला निर्भयत्व प्राप्त होणार नाहीं!

कंसास हें भाषण चातकमुखीं मेघबिंदुवत् वाटून तो सविनय ह्मणाला, महाराज, मी वृथा या भ्रमचक्रांत मोहपाशग्रंथीमुळें पडून आपल्या जीविताच्या नाशास प्रवृत्त झालों होतों; परंतु समुद्राच्या मध्यभागीं जसा एखादा बुडत असतां अकस्मात तेथें नौका उत्पन्न होऊन त्याला वर घ्यावें, यासारिखें मला आज झालें. व माझी खात्री झाली कीं, आतां मी या दुःखसागरांतून पार पडून पैलतीरावर जाईन. आपल्याच चरणाची शपथ वाहून मी प्रतिज्ञा करितों कीं, वांचविलेलें पोर आतांच जाऊन मारून नंतर तिचे सर्व पुत्र मारून मी निर्भय होईन. हें ऐकून आपलें कार्य झालें असें मानून आनंदानें नारद परत इंद्रसभेंत आला व सर्व झालेला वृत्तांत सांगून सर्वांस सुखी करिता झाला. नारद जातांच काळासारिखा संतप्त झालेला कंस बंदिशाळेप्रत जाण्यास निघाला.

कंसाची येण्याची ही वेळ नसतां अवेळींच तो आला असें पाहून, वसुदेवदेवकीचें चित्त भयग्रस्त झालें. इतक्यांत कंसानें देवकीजवळील मूल आपल्या मांडीवर घेतलें व तो तिच्याजवळ आपल्या मनांतील कपटभाव न जाणवितां बसला. आणि बाळास कुरवाळूं लागला व मुके घेऊं लागला. कंस ह्मणाला, ताई, तुझ्या मुलावर माझा लोभ फार आहे; ह्मणून यास पहाण्यास मी वरचे-

वर येतो! त्या मुलाच्या अंगास कठोरपणानें कंसाचे हात लागतात, असें पाहून देवकी ह्मणाली, दादा, असेरे काय करितोस? तुझे हात त्याला लागणार नाहींत काय? वसुदेव पुढें येऊन तें पोर त्यापासून स्नेहानें घेऊं लागला; परंतु त्याचा हात हिसडून कंस त्या पोरास ह्मणाला, अरे लुच्चा, पुढील आठव्यापासून पहिला तूं आठवा होऊन माझा प्राण घेणार होतास काय? अरे दुष्टा! असें बोलून तो बंदीशाळेबाहेर जेथें पोरें आपटून मारण्याकरितां एक शिळा पूर्वीच ठेविली होती, तेथें येऊन त्या पोरास गरगरां फिरविलें; त्या वेळीं देवकी ह्मणाली, दादा, असारे कसा त्या पोरास फिरवितोस? त्यास भोंवळ येणार नाहीं काय? कंस ह्मणाला, चांडाळांनों, तुह्मीं माझें मन मोहून माझा प्राण घेणार होतां. आतां मी या पोरास आपटूनच मारितों. खबरदार जवळ याल तर, नाहीं तर तुमचीही तीच दशा होईल. आपल्या पुत्रास जीवदान द्यावें ह्मणून देवकीनें कंसाची बहुत विनवणी केली; परंतु त्या निष्ठुरास तिळमात्रही दया न येतां त्यानें त्या बालकास त्या शिळेवर आपटून छिन्नभिन्न केलें व लागलाच तो राजवाड्यात निघून गेला.

देवकीचे सहा पुत्र अशाच रीतीनें त्या चांडाळानें आपटून मारले व तेणेंकरून वसुदेवदेवकीस पराकाष्ठेचें दुःख झालें; परंतु करतात काय? कंसासुरानें येणारा प्रळय जाणून आपल्याजवळ महान् प्रबळ दैत्यांचा संग्रह केला व त्यांस मोठमोठ्या हुद्यांवर नेमिले व त्यांच्या हस्तें गाई, ब्राह्मण, ऋषि इत्यादिकांस पिडा देण्याचा क्रम जारी चालविला. कंसापासूनही अनेक बालहत्या व

अघोर पातकें झालीं. हें पाहून देव, ऋषि इत्यादिकांस फारच आनंद झाला व आतां मात्र परमात्मा लवकरच अवतार धारण करील अशी त्यांची खात्री झाली.

---

## अध्याय २ रा.

### बळराम व कृष्णजन्मकथन.

मागील अध्यायांत बालहत्येचा वृत्तांत झाला. पुढें कंसाकडून गाई, ब्राह्मण, ऋषि यांस फारच पीडा होऊं लागली. यज्ञयागादि महाकर्मांचा भंग होऊन महत्पाप झालें. धर्म रसातळास गेला. त्या वेळीं श्रीविष्णूनें शेषास देवकीच्या उदरीं अवतरण्याची व लक्ष्मीस भीमकगृहीं अवतरण्याची आज्ञा केली. तेव्हां शेष बोलला कीं, महाराज, रामावतारीं आपणासमागमें मला फारच कष्ट झाले; ह्मणून ह्या अवतारीं कनिष्ठपणाचें नातें मला देण्याची क्षमा करावी! नंतर श्रीविष्णु हास्य करून बोलले, तूं आज्ञा मान्य कर आणि देवकीच्या उदरीं जा; मग तेथून तुला योगमायाबळानें गोकुळांत वसुदेवपत्नी, रोहिणी, कंसाच्या धाकानें जाऊन राहिली आहे, तिच्या उदरांत घालीन. याप्रमाणें तुला जेष्ठ बंधु करून लागलाच मी देवकीच्या उदरांत येतों. मग आपण बालक्रीडेंत नानाप्रकारचे खेळ गोकुळांत खेळूं; व खेळांतच अनेक दुष्टांचें मर्दन करून साधुजनांचें रक्षण करूं. या आज्ञेप्रमाणें शेषानें देवकीच्या पोटीं अवतार धारण केला. तिला सहा महिने झाले, तेव्हां तिचें रूप व तेज लोकोत्तर दिसूं लागल्यावरून कंसास फारच भीति वाटून,

याचा माझ्या हातून कधीं संहार होईल अशी आशा करूं लागला.

इकडे वसुदेव देवकी तर दुःखसागरांत गटंगळ्या खाऊं लागलीं. इतक्यांत योगमायेनें गर्भाशयांत शिरून तो गर्भ तेथून काढिला व गोकुळांत रोहिणीच्या उदरीं नेऊन घातला. कंसास तर क्षणोक्षणीं बंदीशाळेंतील बातमी कळत होती. त्यास बंदीशाळेच्या रक्षकानें जाऊन सांगितलें कीं, देवकीचा गर्भ एकाएकीं जिराला. तसेंच देवकीनें एकाएकीं जागृत झाल्यावर असा प्रकार पाहून व हर्षयुक्त खेद मानून तीं उभयतां स्वस्थ राहिलीं. कारण त्यापासून त्यांस विशेष हित नव्हतें. परंतु कंस तर अंतर्यामीं परमानंद पावला. व कीं, आतां आपण निर्भय झालों! कारण, गर्भ एकाएकीं जिरणें हें सामान्य नव्हे. आपल्या दर्पानेंच असें झालें, असें त्यास वाटलें! तथापि बंदीशाळेंत जाऊन साक्षात्कारें आपल्याला दुःख झालें असें दर्शवून प्रत्यक्ष खरा प्रकार अवलोकन केला.

इकडे गोकुळांत रोहिणी निद्रिस्त असतां, योगमायेनें तिच्या उदरीं गर्भ घातला; तें तिला बिलकूल समजलें नाहीं. ज्या वेळीं ती जागृत झाली, त्या वेळीं तिनें हें अवलोकन करितांच, सलज्ज होऊन उदर वस्त्रानें झांकूं लागली; परंतु सहा महिन्यांचा गर्भ झांकतो कसा? ह्मणून ती गोष्ट बाहेर फुटतांच त्याबद्दल लोकांत वाईट चर्चा चालली. शेवटीं नंदानें तर असा निश्चय केला कीं, तिला घरांतून बाहेर घालवून द्यावी. आणि असें करणार, तों आकाशवाणी झाली कीं, 'रोहिणी ही महासती आहे. इच्या गर्भाविषयीं जो कोणी वाईट गोष्ट मनांत आणील व तसें दुसऱ्यास सांगेल त्याची जिव्हा छे-

दन होईल. नंदा, इला बाहेर न घालवितां, घरांत ठेवून उत्तम प्रकारें इचें प्रतिपालन करावें;' ह्या आज्ञेवरून नंदानें संतुष्ट होऊन पूर्वीचा बेत रहित केला. पुढें तो गर्भ यथाकाळीं वाढून, नियमित दिवशीं प्रसूत होऊन रोहिणीस दैदिप्यमान पुत्र झाला; तेव्हां त्याचें नांव बलिभद्र ठेवून नंदानें मोठा मंगलोत्सव केला. गोकुळांत या जन्मदिवशीं सुचिन्हें व मथुरेंत दुःश्चिन्हें झालीं.

नंतर, देवकी आठव्यानें गरोदर राहिली, हें वर्त्तमान कंसाला समजतांच तो भयानें इतका व्याप्त झाला कीं, त्या आठव्याशिवाय त्याला कधींही कांहीं आठवूं नये. या गोष्टीस बरेच दिवस लोटले. पुढें त्यानें एका दासीला विचारलें कीं, देवकीचा आठवा पुत्र उत्पन्न होण्यास अझून किती दिवस उरले आहेत ? तेव्हां ती ह्मणाली, नवमास भरण्याला थोडासा अवकाश आहे. असें ऐकतांच कंस भयानें श्रमिष्ट होऊन बंदिशाळेंत आला व देवकीसमोर उभा राहिला. त्या वेळीं ती आनंदरूप दिसत होती. तिची नासाग्रीं दृष्टि असून सर्व तिला कृष्णरूप दिसत होतें. कंस देवकीपुढें उभा होता, पण जसा इंद्रापुढें भिकारी, सूर्यासमोर काजवा, अग्निपुढें गवत, वासुकीपुढें उंदीर, किंवा सिंहापुढें कोल्हा त्याप्रमाणें तो तिच्या समोर दिसत होता. तो कंस कांहीं वेळपर्यंत तिजकडे एकसारखा पहात होता, पण त्याला स्त्रिची आकृति दिसेना. परम दैदिप्यमान, सुदर्शनादि आयुधें धारण केलीं आहेत अशी चतुर्भुज श्रीनारायणमूर्त्ति पाहिली; त्या बरोबर कंसाची सुरकुंडी वळली. हातांतील शस्त्रें गळून पडलीं, व मध्येंच भयानें हांक फोडीत, थरथर कांपत, अडखळत, धडपडत

असा तो पिशाच्याप्रमाणें आपल्या घरीं गेला. तेथेंही सर्व त्याला कृष्णरूप दिसे. त्यानें शस्त्रें घेतलीं, पण तींही कृष्णरूप दिसल्यामुळें रागानें जमिनीवर आपटलीं; व तो दांत ओंठ खाऊन मोठ्यानें ह्मणाला, मला आठव्यानें व्यापिलें. त्याला मी सगळाच गिळीन, नाहीं तर ठार मारीन. अशा स्थितींत कंस असतां, जे कोणी त्याजकडे येत ते त्याला कृष्णरूप दिसत; तेव्हां तो रागानें गरगर डोळे फिरवी व त्यांस मारावयास धांवे.

इकडे गोकुळांत यशोदेच्या उदरीं योगमायेनें अवतार घेतला. व मथुरेंतील बंदीशाळेंत देवकीच्या उदरीं श्रीविष्णूनें अवतार घेतला. यथाकाळीं दोघीही प्रसूत झाल्या. यशोदेस कन्या व देवकीस पुत्र झाला. देवकी निद्रिस्त असतां कोणत्याही जनरीतीच्या वेदनेशिवाय श्रीकृष्णाचा अवतार श्रावण वद्य ८ रोजीं मध्यरात्रीं रोहिणी नक्षत्रीं झाला. तेव्हां सर्व देवांनीं जय शब्द उच्चारून अत्यानंद प्रदर्शित केला. देवकीनें अकस्मात् जागृत होऊन ती श्रीकृष्णमूर्त्ति पाहिली. व लागलेंच वसुदेवास जागृत करून उभयतां त्या रूपास पाहत भ्रम व उल्हाससमुद्रांत ब्रह्मानंदनौकेंत बसलीं आहेत, व भोंवतीं पाहतात तों त्यांस ती बंदीशाळा न दिसतां एक सुशोभित राजवाडा दिसला; व जागोजाग सेवकजन उभे आहेत असें पाहिलें. आकर्णनयन, हास्यवदन, हिऱ्यासारखे दांत, कुरळ केश, हातपाय गोंडस व कोटि सूर्यासारखा ज्याचा प्रकाश, असें कृष्णाचें रूप पाहून उभयतांसही वाटलें कीं, हा खरोखर परमात्मा आपल्या पोटीं अवतरला आहे इतक्यांत भय वाटून वसुदेव ह्मणाला, प्रिये, हें रत्न आपल्यास पचणार कोठून?

कंसास हें वर्त्तमान समजल्यावर तो काळासारखा यास ग्रासण्यास येईल. हीं अक्षरें ऐकतांच देवकीनें निर्भय मनानें तत्क्षणीं एक भयंकर आरोळी मारून ह्मटलें कीं, 'त्या चांडाळास मी आतांच मारितें. तुह्मांस त्याचें भय कां? आतांच मी त्याचें कंदन करून देव, ऋषि इत्यादिकांचें रक्षण करीन. त्या चांडाळ दुर्योधनास मारून मद्भक्त पांडव यांस रक्षीन. तूं मला कंसाची भीति दाखवितोस काय?' तेव्हां वसुदेव ह्मणाला, प्रिये, कंसास मारण्याची व पांडवांस तारण्याची गोष्ट तर लांबच राहिली; पण तूं किंचित् हळू बोल. जर तुझे हे शब्द रक्षकांनीं ऐकिले, तर आतांच आपल्या सर्वांच्या प्राणावर येऊन मोठा अनर्थ होईल. हें ऐकून कृष्णानें कांहींसें जाणतें रूप घेऊन आपल्या मातापितरांस सांगितलें कीं, श्रीविष्णुअवतार ह्मणतात तो मी तुमच्या पोटीं आलों आहें; व यापेक्षांही आपला शब्द मोठ्यानें जरी आला, तथापि त्याची कांहींच भीति नाहीं; व तो कोणास ऐकूंही जाणार नाहीं. परंतु अवतारचरित्राप्रमाणें कृत्य केलें पाहिजे ह्मणून, सांगतों त्याप्रमाणें तुह्मीं मनांत कोणतेंही भय न आणितां करावें. ज्या दुष्टाच्या मनांत माझा घात करण्याचा निश्चय, त्याच्या नगरांत मी एक क्षणही राहूं इच्छित नाहीं; ह्मणून तुह्मीं मला गोकुळांत नेऊन नंदगृहीं त्याची पत्नी यशोदा तिला जी मुलगी झाली आहे, ती याच वेळीं इकडे आणावी व मला तिचे ऐवजीं तेथें नेऊन ठेवावें. माझ्या कृपेनें या कृत्यास येणाऱ्या सर्व अडचणी व भय हीं नाहींशीं होतील.

यमुना तुडुंब भरली होती. मध्यरात्रीचा समय असून एक सारखा पाऊस पडतच होता. बंदीखान्यास

कुलुपें होतीं व रक्षकांचा खडा पहारा. इतक्या संकटांतून कसें निभावून जातां येईल, अशा अनेक कल्पना प्रथम वसुदेवाच्या मनांत आल्या. परंतु ज्या ईश्वराच्या नाममात्रें करून दुस्तर भवसागरही तरला जातो व भवबंधनही तुटतें, तो प्रत्यक्ष हातांत असतां यमुना नदी उतरून पार जाण्याचें व यःकश्चित कुलुपें व बिड्या तुटण्याचें संकट कां पडणार आहे? असें त्यानें नंतर देवकीस दर्शविलें. तिलाही ईश्वरकृपेनें ज्ञान होऊन संतोषानें तें कार्य करण्यास तिनें सांगतांच वसुदेव श्रीकृष्णास घेऊन जों उठला तों, पायांतील बिडी तुटून खालीं पडली. कांहींसा पुढें गेला तों, कुलुपें गळून दरवाजे खाडकन उघडले. आणखी पुढें गेला तों, शेषानें आपला फणा श्रीकृष्णाच्या मस्तकावर पर्जन्यरक्षणार्थ धरला. जेव्हां तो यमुना नदींतून चालला व कृष्णाच्या पायास पाणी लागूं नये ह्मणून त्यास जों जों वर वर उचलून धरी, तों तों यमुना नदी आपल्या उदकास श्रीकृष्णाच्या अलभ्य पदांचा स्पर्श व्हावा ह्मणून अधिकाधिकच वर येऊं लागली. वसुदेवाच्या गळ्यापर्यंत पाणी लागल्यामुळें तो मोठ्या संकटांत पडला; तेव्हां आकाशवाणी झाली कीं, 'वसुदेवा, कृष्णाचे पाय पाण्यास लागूं दे; ह्मणजे सर्व यथास्थित होईल.' त्याप्रमाणें करितांच यमुना दुभंग होऊन वसुदेवापुढें एक पायवाट झाली. त्या वाटेनें निर्भयांतःकरणानें गोकुळांत नंदगृहीं जाऊन त्यानें तेथें यशोदेजवळ कृष्णास ठेविलें व तिजजवळची कन्या (माया) घेऊन परत मथुरेंत बंदिशाळेंत आला; तों पूर्वीप्रमाणें त्याच्या पायांत बिड्या व दरवाज्यांस कुलुपें इत्यादि त्यानें पाहिलीं.

इतकें होत आहे तों प्रातःकाळ झाला. इकडे बं-

दिशाळेंत कन्येच्या रडण्याचा आवाज ऐकतांच व त्यामुळें सावध झालेल्या सेवकांस, आणखी हें वसुदेवाकडूनही समजतांच त्यांनीं धांवत धांवत राजवाड्यांत जाऊन कंसास हें वर्त्तमान कळविलें. तें ऐकतांच त्यास मोठी भीति वाटली; कांकीं, उत्तरोत्तर आठवा त्याच्या मनांतच खिळला होता.

इकडे यशोदा ज्या वेळीं गरोदर होती, त्या वेळीं ज्योतिषांनीं, हिच्या पोटीं ईश्वरीअवतार होईल, अशी सुचना त्यांनीं सुचिन्हांवरून केली होती; ह्मणून सर्व मंगलोत्साहाची नंदानें तयारीच ठेवून जागरणास कित्येक दासदासींची योजना करून आपणही जागत बसला होता. परंतु सर्वांस झोंप लागली, आणि वसुदेव यशोदेजवळ पुत्रास ठेवून तिजजवळील कन्या घेऊन गेल्यानंतर ते सर्व जागे झाले. यशोदेस आपल्यास पुत्र झालला पाहून मोठा आनंद वाटला. व हें वाहेर समजतांच सर्वांनीं आपला आनंद दर्शविला. नंद हा गोकुळांतील एक मोठा सर्वमान्य पाटील असे; त्या योगानें त्याची मान्यता गोकुळांत व मथुरेंत चांगली होती.

सेवकांकडून देवकीस कन्या झाल्याचें वर्त्तमान ऐकून कंसास कांहींसें आश्चर्य वाटलें. परंतु जसा गर्भ जिरला त्याप्रमाणें आपल्या ऐश्वर्यतेजामुळें हें असेंही होऊं शकेल, असें त्यास वाटून तो बंदिशाळेंत आला. नंतर ती मुलगी निर्दयतेनें देवकीच्या हातांतून ओढून तिला शिळेवर आपटून मारण्याकरितां बंदिशाळेबाहेर नेली. देवकीच्या पायांत जरी जड बिड्या होत्या, तरी ती तशीच रडत हळू हळू कंसाजवळ जाऊन त्याच्या हातास बिलगून ह्मणाली,

दादा, तुला मुलीपासून मुळींच भीति नाहीं; आणि मुलांपेक्षां मुलींवर बायकांचें मन कसें असतें, तें सर्व तूं जाणतोस; यासाठीं कृपा करून ही मुलगी मला दान दे. कंस बोलला, चांडाळणी, या सर्व पोरांपेक्षां तूंच माझ्या प्राणाची गिऱ्हाईक आहेस. मला मरण आलें तरी तुला कांहीं भीति नाहीं; परंतु माझी मला फार काळजी आहे. या करितां, मी या पोरीस मारल्याशिवाय कधींही ठेवणार नाहीं; आणि जर तूं या वेळीं पलीकडे न झालीस, तर तुझाही शिरच्छेद केल्याशिवाय रहाणार नाहीं. चालती हो! तेव्हां देवकी निरुपायानें मागें सरली. नंतर कंस त्या कन्येला गरगरां फिरवून शिळेवर जों आपटणार, तों त्याच्या हातांतून ती निसटून आकाशांत विजेसारखी कडकडत गेली; आणि आकाशवाणीनें बोलली कीं, 'अरे शतमूर्खा, तूं आतां शहाणा हो. कोणाच्या घातास प्रवृत्त होऊं नको. तुझा शत्रु गोकुळांत अनंत कोटि सूर्यप्रभेसारखा वाढत आहे व जशी मी तुझ्या हातून वांचलें, अशाच रीतीनें तुझ्या कोणत्याही उपायानें तो मरणार नाहीं; पण तुझ्या जीवित्वाचा नाश तो करील.' हें ऐकतांच, कंस भयाभित होऊन कोणास कांहीं न बोलतां घरीं गेला.

---

# अध्याय ४ था.

## श्रीकृष्णजातकवर्णन, महाबळभटविटंबना व पूतनाअंत.

नंदास पुत्र झाला, या वर्त्तमानानें तेहतीस कोटि देवांस महा हर्ष होऊन ते सर्व त्यास गुप्तरूपें भेटून गेले. मथुरा

व गोकुळवासी बहुत जन गोकुळांत नंदगृहीं येऊन उत्साहानें पुत्रास भेटले. नंदानें मुलाचा मोठाच उत्साह बारा दिवसपर्यंत केला व याचकजन सुखी केले. ज्या दिवशीं जन्म झाला, त्या दिवशीं गोकुळांत पर्जन्यवृष्टि; मथुरेंत रक्तवृष्टि; गोकुळांत भारद्वाजशब्द व मथुरेंत उलूक व भालू यांचे शब्द झाले. गोकुळांतील वाळलेले वृक्ष प्रफुल्लित झाले, व मथुरेंतील फळानें भरलेले सुंदर वृक्ष वाऱ्यानें मोडून जमीनदोस्त झाले. त्यामुळें कंसाचें मन निरंतर सचिंत होऊन, जणू त्यास वेडच लागल्यासारखें झालें.

मुलाचें जातकवर्णन ऐकावें, असें नंदास वाटून त्यानें एक विस्तीर्ण मंडप उभारून मोठमोठ्या संभावितांस बोलाविलें, व सहस्रावधि बायकाही बोलाविल्या. तसेंच गांवोगांवाहून, ही बातमी ऐकल्यामुळें बहुत मंडळीही आली. त्या नंदाच्या पूर्वभाग्यामुळें सर्व देव विमानारूढ होऊन तेथें आले. गणगंधर्वही तें जातक ऐकण्यास आले. गर्गमुनि नंदाचे कुळगुरु, यांनीं या समाजांत मुख्यस्थानीं बसून खालीं लिहिल्याप्रमाणें मुलाचें जातक वर्णन केलें.

गर्गमुनि ह्मणाले, “या मुलाचा जन्मकाळ असा उत्तम आहे कीं, तो काळ सुजनांस आल्हादरूपी व दुर्जनांस काळरूपी होणार. यास मारण्याकरितां एक राक्षसी येईल, व ती ह्याजकडून विषयुक्त स्तनपान करवील; परंतु हा तिचाच प्राण घेईल. हा मुलगा खेळत असतां अकस्मात् वायूनें उडून जाईल, व बहुत राक्षस मारून परत येईल. हा खेळत असतां, एक दैत्य गाडा होऊन

याच्या अंगावर येईल; त्या दैत्यास हा मारील. हा खेळत असतां, दोन वृक्षांजवळ जाईल; व पाय लागतांच ते वृक्ष पडून त्यांतून दोन गंधर्व निघून त्यांचा उद्धार होईल. काळिया सर्पाचें हा मर्दन करील. नंदास अजगरापासून सोडवील. गोवर्धन पर्वत उचलून वज्र-धारापर्जन्य टाळील, व सारें गोकुळ रक्षील; त्या वेळीं इंद्राचा गर्व परिहार होऊन तो यास शरण येईल. एका वेळीं मोठा अग्नि लागेल, व या मुलास याच्या खेळगड्यां-सह त्यांत कोंडील; परंतु त्या वेळीं हा बारा गांवें अग्नि भक्षण करून सर्वांस सोडवील. मेलेला पुत्र सजीव क-रून आपल्या गुरूस देऊन हा त्यास संतोषवील. याच्या हस्तें असंख्य असुरांचा संहार होऊन, शेवटीं कंसासुराचे प्राण हरण करून तेहतीस कोटि देवांस त्रासांतून हा सो-डवील; व सर्व जनांस सुख देईल. हा मुलगा एक मुख्य व सोळा हजार सात बायका करील. स्वभक्त पां-डवांचें रक्षण करून हा मुलगा, दुर्योधन, दुःशासन, शिशुपाळ, वक्रदंतादि दुष्टांचा वध करील. हा मुलगा एक्या अडचणीच्या प्रसंगीं समुद्रांत एक नगरी वसवील. ह्याच्या हातून लहानपणींच अशीं मोठमोठीं कृत्यें घड-तील; व हा शेवटीं सर्व गोकुळ उद्धरून नेईल."

हें ऐकून सर्व मंडळी अत्यानंदभरित होऊन टाळ्या पिटूं लागली. इकडे कृष्ण स्तनपान करीत होता; त्यानें गर्गमुनीकडे पाहून हास्यवदन केलें. ती खूण जाणून गर्गमुनीनें उठून विनंती केली कीं, देवादिकांस जें वर्णन होणारें नव्हे, तें जातक म्यां काय वर्णावें? परंतु आपण मला तो अधिकारच दिला, तेव्हां ब्रह्मदेवासही जें अवर्ण-

नीय तें माझ्याच मुखांतून वदविलें व असें वर्णन आपण मान्य केलें यावरून मला अत्यानंद झाला.

इकडे मथुरेकडील वर्त्तमान असें कीं, कन्या निसटून गगनांत गेली त्या दिवसापासून कंसाचें मन धाकानें असें व्यापिलें कीं, त्याला ध्यानीं, मनीं, स्वप्नीं 'आठवा' दिसूं लागला. शेवटीं त्यानें एक मोठी सभा करून पृथ्वींतील महा बलाढ्य असुर व कित्येक नागारिक जन त्या सभेस बोलाविले. व सर्वांस विनंती केली कीं, प्रजेस सुख राजानें द्यावें; व प्रजेनें राजा सुखी ठेवण्याविषयीं झटावें. मला तर आकाशवाणीचा निजध्यास लागला आहे. जो कोणी खरा स्वामीभक्त असेल, त्यानें कोणत्याही रीतीनें गोकुळांत जाऊन माझा वैरी शोधून जिवें मारावा. ह्मणजे माझा हा जीव मला दान दिल्यासारखें होईल व त्याची मजकडून कशी सेवा होईल याविषयीं मी आतां कांहींच बोलत नाहीं. अशीं दीन वचनें ऐकतांच एक बलाढ्य महाबळ नामक दैत्य उठून, त्यानें या कृत्याचा अंगिकार केला; व ब्राह्मणरूपानें हें कार्य साधण्याची प्रतिज्ञा केली. मग त्या रूपानें त्यानें गोकुळांत जाऊन ज्योतिषाचा आव घातला, व घरोघर फिरून आपल्या नादास बऱ्याच बायका व पुरुष लाविले. कित्येक नंदाचे ओळखीचे व हितचिंतक होते, त्यांनीं त्या महाबळभटास नंदाच्या घरीं नेलें. त्या वेळीं जरी नंद घरीं नव्हता, तथापि यशोदेनें भटजींचें चांगलें आगतस्वागत करून कृष्णाचें जन्मटिपण त्याच्या हातांत दिलें; व त्यांत जें जातकवर्णन केलें आहे, तें पाहण्याविषयीं विनंती केल्यावरून तो भट कृष्णाचें जातक सांगूं लागला.

"ह्या मुलाच्या जन्मनक्षत्रावरून हा शहाणा, चतुर, आणि प्रतापी होईल यांत संशय नाहीं. हा आपल्या सामर्थ्यानें अनेक राक्षस व राक्षसिणी मारील. देवादिकांस न होणारीं कृत्यें हा क्षणमात्रें करील. मथुरावासी जनांस दु:ख, व गोकुळवासी यांस सुख देईल; हें नि:संशय आहे. हा कित्येक राजांचा गर्व परिहार करील. अष्टनायकाशिवाय हा सोळा हजार स्त्रिया वरील. व संतति, संपत्ति यांचा अनुभव यास फारच येईल." या सर्व गोष्टी गर्गमुनीस अनुसरून महाबळभटजीनें सांगितल्या. आणि पुढें कपाळास आठी घालून व कांहीं वेळ स्तब्ध राहून बोलला कीं, जनहो, येथपर्यंत गर्गमुनि कोठेंच चुकले नाहींत; परंतु पुढें एक गोष्ट सांगावयाची राहिली. ती रहावी कशी? या गोष्टीचा विचार करितां, नानाप्रकारें तर्क ध्यानांत येतात. तुमचें मन कदाचित् दुखवेल ह्मणून त्यांनीं सांगितली नसेल असा तर्क करावा, तर तो संभवत नाहीं. कारण कीं 'आलें उरूस तें न चुकवावें गुरूस' असें शास्त्र आहे; त्याप्रमाणें करणें त्यांस उचित होतें. व दुसरें असें कीं, ते सूज्ञ आहेत; कोणत्याही अन्य प्रकारें ते दर्शवितील. परंतु त्यांनीं ही मोठी गोष्ट अगदींच कां गाळली, याबद्दल तर्क करण्यास मी लाचार असून, नसती पंचाईत आपल्या अंगावर घेण्यासही मी इच्छित नाहीं! ह्मणून मीही इतकेंच पुरें करितों!! असें ह्मणून जाण्याचे तयारींत होता; इतक्यांत सर्वांच्या विनंतीवरून तो वेषधारी महाबळभट आणखी पुढें सांगूं लागला, "या मुलाचे कांहीं ठिकाणीं ग्रह उलटे सुलटे आले आहेत; यामुळें हा चोर व शिंदळ होईल. कपटी फार होईल. सगळ्या गोकु-

ळांतील स्त्रिया भ्रष्ट करील. आतां या कृत्यासही भीतीची गरज नाहीं; परंतु हा मुलगा स्वकुळघातकी होऊन सर्वांचा संहार करील. यासाठीं या पोरास मनांत दया न आणितां खाड्यांत पुरा, अगर महासागरांत बुडवा, नाहींपेक्षां अन्य युक्तीनें याचा संहार करावा; न केला तर तुह्मांस हें पोर पुढें घातक होईल."

महाबळभटजींच्या तोंडांतून 'पुरा' 'बुडवा' व 'संहार करा' अशीं अक्षरें निघतांच असा चमत्कार झाला कीं, सर्व घरांतील संसारी निर्जीव वस्तूंस जीवित्व आलें. प्रथम लाटणें येऊन त्यानें शेंपन्नास प्रहार त्याच्या कपाळावर केले. नंतर पोळपाट येऊन धाडकन मस्तकावर बसला. उखळी येऊन कंबर दडपूं लागली. सुपें, रोवळ्या, मडकीं, भांडीं यांचा भडभडां प्रहार त्याच्या अंगावर होऊन, त्याची तडतडां आंतडीं तुटूं लागलीं. ताह्मनें येऊन फडफडां तोंडांत मारूं लागलीं. सुया व दाभणें सर्वांग टोंचूं लागलीं व मुसळानें तर गुदद्वारांत प्रवेश करण्याचा क्रम चालविला. असा त्यास विव्हळ करून भ्रमित केला, त्या व्यथेंत तो चहूंकडे धांवत असतां धोत्रही फिटूं लागलें; तथापि प्रहार बंद होईनात. शेवटीं राक्षसाचें रूप धरून त्यानें कृष्णास साष्टांग नमस्कार घातला; आणि लोकांसही विनंती केली कीं, कृष्णास मारण्याच्या हेतूनें मी कंसाज्ञेनें येथें आलों होतों; आतां कृपा करून तुह्मी मला सोडवा. इतकें झालें तथापि त्याचा मार बंद होईना. तेव्हां सर्वांस आश्चर्य वाटलें. इतक्यांत कृष्णाकडे पाहून त्याची स्तुति केली, व कृत अपराधाची क्षमा मागितल्यावरून त्याचा मार आपोआप बंद झाला. या

दैत्यास कृष्णानें जिवंत सोडण्याचें कारण इतकेंच कीं, गोकुळांत शत्रू काळासारखा वाढत आहे, ही बातमी कंसास कळावी.

महाबळभट तेथून सुटतांच तसाच कंसाकडे गेला; व त्यास झालेला वृत्तांत सांगून खाल्लेला मारही दाखविला. तेव्हां कंस भयानें व्यापला. तें पाहून पूतना राक्षसिणीनें कृष्णास स्त्रीरूपानें मारण्याचें पतकरून, उत्तम रूपानें नटून ती गोकुळांत गेली; व आपले स्तन विषानें भरून अनुमानानें तेथील चांगलीं चांगलीं बरींच पोरें मारिलीं. तिच्या रूपावरून व कोमलपणावरून ही ह्मणजे वेषधारी आहे, असें कोणासच त्या वेळीं भासलें नाहीं. अशी ती पुतनाबाई नंदगृहीं आली. तेथें तिचें लावण्य रूप पाहून ही कोणीतरी स्वर्गींची देवांगना असेल असें वाटून, यशोदेनें तिचा चांगला आदरसत्कार केला व विचारितांच, तिनें सांगितलें कीं, यशोदाबाई, आह्मीं स्वर्गिच्याच राहणार. व आपला पुत्र कृष्ण, जो परब्रह्मअवतार, तोही आह्मांतलाच. तेव्हां आपणांस आमची ओळख कोठून? ( कृष्णाकडे पाहून ) बाळा, अरे ओळख विसरलास काय? अरे इकडे ये. असें ह्मणत आहे तों, कृष्णानें तिजकडे पाहून हास्यवदन केलें. मग काय एकच टाळी झाली! सर्वांनीं कृष्णास बोलाविलें; परंतु त्यानें तिकडे दुर्लक्ष दर्शवून, त्या पुतनेकडेसच ध्यान ठेवून आपल्या आईच्या कडेवरून तिजकडे उडी घेतली. तेव्हां यशोदेनें तिच्याजवळ कृष्णास दिलें आणि ह्मटलें कीं, कृष्ण तुमचाच खरा. आपण क्षणभर तरी घ्यावा. नंतर, अरे मुला, तुला आमा पाहिजे काय? असें ह्मणून

ती आपला पदर काढीत आहे तों, कृष्णानें तिची चोळी फाडून स्तनास मुख लाविलें; आणि विष शोषण्यास आरंभ केला. ती वज्रमिठी आहे, असें पुतनेनें मनांत जाणलें आणि ह्मटलें, कृष्णा, एवढा कांरे हावरा झालास कीं स्तनापासून सुटतच नाहींस? अरे, कांहीं तरी माया? कृष्णानें विष शोषून रक्त शोषलें असें पाहून, अंगास आळे पिळे देऊन व तोंड वेडेंवांकडें करून त्यास सोडवूं लागली; परंतु तो सुटतो कसा? कित्येक गौळणिनींही त्यास सोडविण्याचा यत्न केला; परंतु तो सर्व व्यर्थ गेला. यशोदा पुढें येऊन तिणें कृष्णास हात घालून ह्मटलें कीं, हा वेड्या लबाडा, दुसरीचा कांरे आमा प्यावा? मजजवळ ये, मी तुला देतें. परंतु तो सुटेना असें पाहून, भयानें सर्व चकित झाले. नंद मथुरेस गेला होता. मुख्य मुख्य पाटील कुळकर्णी हेही तेथें नसल्यानें सर्वांस भय वाटलें. इतक्यांत इनें राक्षसीरूप घेऊन कृष्णस्तुति केली कीं, तूं परब्रह्म अवतार, तुझ्या हस्तें सर्व सृष्टीचा लय होणार, त्या तुला मारण्यासाठीं मी आलें; परंतु देवा, आतां मला जीवदान दे. तथापि तो सुटेना असें पाहून त्याचे पाय धरून सोडवूं लागली, आणि अकस्मात् गगनांत उडाली. त्या वेळीं सर्वांस भीति वाटली. इतक्यांत पुन. खालीं कोसळली, तेव्हां सर्वांनीं तो देह पाहिला; आणि कृष्ण तिच्या उरावर स्तनपान करीत आहे असेंही दिसलें. त्या वेळीं पुतनेच्या भयानें कृष्णाजवळ जाण्याची प्रथम कोणाची छाती होईना. शेवटीं यशोदा आली, आणि तिच्यासमागमें च्यार बळकट गवळीही भीत भीत आले. ती मेली असें पाहून, य-

शोदेनें तो कृष्ण वर उचलतांच सहज सुटून आला; व सर्वांस आनंद झाला.

इतक्या अवकाशांत मथुरेहून नंदही आला. त्यास हें भयंकर वर्त्तमान सांगितलें. त्या वेळीं सर्वांनीं अनुमान केलें कीं, पूर्वीं महाबळदैत्यविटंबन झालें, व आतां या राक्षसिणीचे प्राण हरण झाले. हीं दोनही कृत्यें गर्गमुनीच्या भविष्याप्रमाणें उतरलीं. मग त्या पुतनेच्या देहाचीं खंडें करून तो देह जाळून टाकिला. तेव्हां त्या प्रेताचा इतका सुवास सर्वत्र सुटला कीं, त्या योगानें सर्वांचीं घ्राणेंद्रियें तृप्त झालीं. पण ती दुष्ट राक्षसीण असल्यामुळें तिच्या प्रेतास दुर्गंध सुटावा; तसें न होतां सुगंध कां सुटला? याचें कारण असें आहे कीं, साक्षात् श्रीकृष्ण भगवान् तिच्या शरिरावर खेळत होता व प्राणांतसमयीं तोच तिच्या हृदयांत भरलेला होता. यास्तव सुवास सुटल्याचें नवल मानावयास नको.

---

# अध्याय ५ वा.

## शकटासुर व तृणावर्त वध.

पुतनेस मारल्याचा वृत्तांत ऐकून कंस तर फारच घाबरला. तो ज्याच्या त्याच्या अंगावर जाई, व मारावयास धांवे.

एके दिवशीं शकटासुर नांवाचा दैत्य कंसाकडून कृष्णवधार्थ गोकुळांत आला. तेव्हां कृष्ण आंगणांत खेळत होता; तो दैत्य एका गाड्याच्या वेषानें कृष्णाचा चुराडा करण्याकरितां त्याच्या अंगावर धांवला. तो समो-

रून येत आहे असें पाहून, कृष्णानें त्याला एक लाथ मारिली; त्यासरसा त्याचा देह शतचूर्ण होऊन सहस्रावधि योजनें लांब जाऊन पडला.

तसेंच एके दिवशीं कृष्ण घराबाहेर खेळत असतां, कंसाकडून आलेला तृणावर्त राक्षस वाऱ्याच्या रूपानें गोकुळावर आला. तेणेंकरून हें गोकुळ आतां आकाशांत जातें किंवा होतें तरी काय? असें सर्वांस वाटलें. सर्वांनीं आपापले दरवाजे लाविले. यशोदा कृष्णास आंगण्यांतून घरांत आणण्यास बाहेर गेली, तों त्या दैत्यानें कृष्णास वरच्यावर गगनांत उडविलें. त्याच्या मनांत असें होतें कीं, परभारें हें पोर कंसास नेऊन द्यावें; परंतु वर जातांच, तृणावर्ताचे खऱ्या रूपाप्रमाणें कृष्णानेंही विराटरूप घेऊन त्याचा वध केला व आपण हळूच आंगणांत येऊन पडला. सर्व ठिकाणीं कृष्णास शोधूं लागले; इतक्यांत वाराही शांत झाला. त्या वेळीं पहातात तों कृष्ण तर आंगण्यांतच खेळत आहे. नंतर त्यास घेऊन यशोदा घरांत गेली. पुष्कळ बायकांनीं चाली प्रमाणें कृष्णमुखावरून निंबलोण उतरलें. यशोदेनें तर त्याला आपल्या पोटाशीं धरिला व कित्येक केलेले नवस फेडले.

एके वेळीं यशोदा कृष्णास पाळण्यांत घालून झोंके देत असतां, रामायणाच्या ओंव्या ह्मणत बसली होती. तेव्हां रावणानें सीता नेली, असें अनुसंधान आलें. ही ओवी ऐकतांच कृष्णानें पाळण्यांत उभें राहून आवेशानें ह्मटलें कीं, कोठें आहे तो रावण? धनुष्य आणून दे; आतांच त्याचा वध करितों व माझ्या बिभीषण भक्तास राज्यावर बसवितों. हें ऐकून यशोदा मूर्च्छित पडली.

कांहीं वेळानें सावध होऊन तिला कित्येक संशय कृष्णाच्या अवताराविषयीं आले; परंतु मायाजाळाच्या भ्रांतींत पुनः गर्क होऊन आपला कृष्ण पाळण्यांत निजला होता तसाच आहे असें पाहून, त्याच्या तोंडावरून हात फिरविला.

एके दिवशीं यशोदा कृष्णाविषयीं विचार करीत असतां, हें अवतारी रत्न आपणास पचेल काय? असा विचार तिच्या मनांत येऊन, ती कृष्णमुखाकडे पाहूं लागली. इतक्यांत कृष्णानें जांभई दिली; तों त्याच्या तोंडांत सप्त पाताळें, सप्त सागर, सप्त महासागर; ब्रह्मा, विष्णु आदिकरून सकल तेहतीस कोटि देव; तसेंच कंस, चाणूर यांस रामकृष्ण त्यांच्या सिंहासनावर चढून मारीत आहेत, असें पाहून ती मूर्च्छित पडली. परंतु पुनः सावध होऊन कृष्णाकडे पूर्ववत पाहिलें तों, जे तिच्या मनांत अवचट विचाराचे तरंग आले होते, ते सर्व गेले. नंतर तिनें त्याचा मुका घेऊन तोंड कुरवाळिलें.

एकदां कृष्ण रडत असतां यशोदेनें त्याला कडेवर घेऊन नीलभुमिकेकडे नेलें. तेथें येतांच तो कडेवरून खालीं उतरला, हें तिनें पाहिलें; पण तो एका बाजूला जाऊन बसला, इकडे तिचें लक्ष नव्हतें. कांहीं वेळानें ती त्याला तेथें शोधूं लागली; पण तो जवळ असतांही तिला दिसेना. कारण, त्या भुमीचा व कृष्णाचा रंग अगदीं एकसारखा होता. नंतर तिनें आपल्या दुसऱ्याही मंदिरांत शोध केला; पण कोठेंही आढळेना. तेव्हां ती फार शोक करूं लागली. पुष्कळ गोपाळ, गोपी यांनींही सगळें गोकुळ धुंडाळलें पण व्यर्थ. त्या

वेळीं नंद कोठें बाहेर गेला होता तो घरीं आला. त्याला कृष्ण कोठें नाहींसा झाला हें समजतांच फारच दुःख झालें. आतां हा खचित आपल्याला कांहीं बोलेल, असें जाणून यशोदेनें जीव देण्याचा निश्चय केला. इतक्यांत कृष्ण नीलभुमिकेकडून धांवत आला; हें पाहून सर्वांस आनंद झाला.

---

# अध्याय ६ वा.

## बाळलीला.

मागील अध्यायांत तृणावर्त व शकटासुरवध वर्णन झालें. पुढें बळराम व कृष्ण रांगूंचालूं लागले; त्या वेळीं नंदानें मोठा उत्साह केला. ते चांगले चालूं लागल्यानंतर, खेळाकरितां सवंगडी गोपाळ मिळवून प्रथम गौळणीच्या घरीं जाऊन तेथें दहींदुधाच्या चोऱ्या कराव्या; असा कृष्णानें निश्चय केला. या कृत्याला बळरामाचा रुकार येईना. तेव्हां त्यास नकळत कृष्णानें एकदां रात्रीं एका गौळणीकडे जाऊन गोपाळांसह दहीं दूध भक्षण केलें. हीच पहिली चोरी. ती गवळण जागी होऊन, कृष्णास तेथेंच तिनें पकडलें. परंतु सर्व गोपाळ पळाले. कृष्णाच्या तोंडांत दूध असतां त्यास तिनें अडविलें, तेव्हां दुधाची गुळणी त्यानें तिच्या डोळ्यावर टाकिली; त्याबरोबर ती डोळे चोळूं लागली. त्या वेळीं तिचे हात अर्थातच कृष्णापासून सुटले. अशी संधि साधून कृष्ण तेथून पळाला; व धांवत जाऊन आपल्या सोबत्यांस मिळाला.

तेथून ते सर्व दुसऱ्या एका गौळणीच्या घरीं जाऊन यथेच्छ दहीं, दूध, लोणी भक्षण केल्यानंतर सर्व दरवाजे लावलेले असतां बाहेर पडले. आणि एक लोण्याचें गाडगें तिच्या सुनेच्या आंथरुणाजवळ आणून ठेविलें. व थोडेसें लोणी कृष्णानें तिच्या तोंडास लावून आपण रस्त्यावर उभा राहिला. पहाटेस जेव्हां सासूनें उठून दिवा लाविला, त्या वेळीं घरांत सर्व विरजणाची दाणादाण करून टाकलेली व त्यांत दूध दह्यांचा लेशही नाहीं असें तिला आढळलें. तिनें दिवा घेऊन दरवाजे पाहिले; परंतु ते सर्व लावलेलेच होते. त्याच वेळीं सुनेजवळ एक गाडगें पाहून व इणेंच हें खाल्लें असा तर्क करून, सासूनें निद्रिस्थ असतांच तिला लत्ताप्रहार केला; व एकसारखी ती तिला बडवूं लागली. तितक्यांत सुनेनें कृष्ण दाराशीं उभा आहे असें पाहून दीनपणानें विनंती केली कीं, देवा, मला रे हा छळ कां? हें ऐकून कृष्णास दया आली; व तो तिच्या सासूस ह्मणाला, अग थेरडे, तुझ्या दूध दह्याचा चोर कांहीं तुझी सून नव्हे; तो मी आहें! तिची प्राज्ञा काय आहे कीं, ती तेथें हात लावील. मी एके दिवशीं तिची थट्टा केली ह्मणून तिनें मला शिव्या दिल्या होत्या. तो सूड उगविण्याकरितां, हें कर्म मीं करून तिजवर आणलें आहे. हें ऐकतांच सुनेला सोडून कृष्णास धरण्याकरितां सासूनें धांव मारिली; तों कृष्ण पळून गेला.

एके दिवशीं उजाडतांच कृष्णानें एका गौळणीकडे जाऊन तिच्या घरांतील सर्व गोरस भक्षण केला व सर्व गाडग्यांत विंचू भरून ठेविले. सकाळीं गवळण उठून एक मोठें दह्यांचें गाडगें ताक करण्यासाठीं एका मोठ्या डेऱ्यांत ओतिलें.

ओततांना सहस्त्रावधि विंचू तिचे अंगास डसले; आणि ती त्या वेदनेनें मूर्च्छित पडली. तेव्हां घरांतील मनुष्यांची धांवाधांव झाली, व ते कांहीं उपाय करूं लागले. इतक्यांत पांच चार विंचू हातीं घेऊन कृष्ण बाहेर उभा राहून बोलला कीं, अगे गवळणी, तूं आपला प्राण जरी दिलास, तथापि हे विंचू उतरणार नाहींत. जर मी सांगेन तसें ऐकशील तर आतां सर्व नीट होईल. हें भाषण एका पोरीनें कबूल केलें. तेव्हां कृष्णानें त्या म्हातारीकडे कृपादृष्टीनें पाहतांच, एकंदर त्या वेदना कमी झाल्या. ही शांतता झाल्यावर कबूल केलेल्या तिच्या सुनेस कृष्ण आपल्याबरोबर खेळावयास उघडपणें मागूं लागला. त्या वेळीं ती म्हातारी त्याच्या पाठीस लागली; इतक्यांत कृष्ण तेथून पळाला.

एक्या पहाटेस कृष्णास आंथरूणावरच ठेवून यशोदा घरांत येऊन ताक करूं लागली. परंतु डेऱ्याचा आवाज ऐकतांच, कृष्ण तेथें जाऊन यशोदेच्या हातची रवी धरून रडूं लागला. आईनें विचारितांच, कृष्ण बोलला कीं, जर तूं मला मी मागेन ती वस्तू देणार, तर या डेऱ्यांत जो आवाज होतो तो दे. यशोदा म्हणाली, मुला, भलताचरे काय हा छंद? त्यांतला आवाज मी कसा देऊं? कांहीं तरी वस्तु सांग; म्हणजे ती देतां येईल. नंतर कृष्ण बोलला, तर मग आकाशांतील सूर्य चंद्र दे. हें ऐकून यशोदेनें कृष्णाचा मुका घेऊन म्हटलें कीं, अरे बाळा लाडक्या, चंद्र, सूर्य खालीं आणणें हें मनुष्यांच्या हातांत नाहीं. अरे, आपण मनुष्यें नारे? उगी रहा; रडूं नको. मी तुला आतां लोणी निघालें म्हणजे खाशील तितकें देईन.

कृष्ण ह्मणाला, तूं अशीच खोटारी आई आहेस; तूं मला कधींही पोटभर लोणी देतच नाहींस! आतां तुला जो सूर्य खालीं येत नाहीं तो पहा मी कसा आणतों!! तूं डोळे मीट, उघडूं मात्र नको. तिनें डोळे मिटले, तों असहनीय सूर्यप्रकाश पडला. यशोदा तर लागलीच मूर्च्छित पडली. ती हरिकृपेनें उठतांच तिनें कृष्ण जवळच पाहिला; तेव्हां ती त्यास ह्मणाली, बाळा, तूं परब्रह्म अवतार आहेस. तुझी मी आई असें ह्मणण्यासही मला लाज वाटते. अरे, आतां केवढारे प्रकाश पडला होता? मला तुझें फारच भय वाटलें. कृष्ण बोलला, आई, तूं निजली होतीस त्या वेळीं चंद्र सूर्य हे दोघेही माझ्याबरोबर खेळत होते. त्यांनीं तर मला तुझा निरोप सांगितला कीं, त्यांनीं नेहमी येऊन मजबरोबर खेळावें; अशी तूं त्यांस आज्ञा केली आहेस. असें ऐकून यशोदेनें पुनः मायाजाळांत गुंतून, कृष्णास पोटाशीं धरून प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें.

एके दिवशीं एक गोपी यमुनेवर पाणी आणावया करितां गेली असतां, कृष्णानें तिच्या घरांत शिरून लोणी भक्षण करण्याचा सपाटा चालविला; इतक्यांत ती गोपी घरांत आली आणि कृष्णास पाहून ह्मणाली, 'कोणरे हा चोर लोणी खात आहे?' हें ऐकून कृष्ण ह्मणाला, 'अगे, चोर ह्मणतेस कोणाला? तूंच चोरटी आहेस. सर्व कांहीं माझें आहे. हें लोणी देखील माझें आहे; तें मी खात असतां तूं मला विचारणारीण कोण?' त्यावर गोपी ह्मणाली, कृष्णा, हें घर माझें आहे; तें तुला जसें काय ठाऊकच नाहीं वाटतें. तें ऐकून कृष्ण ह्मणाला, अगे, हें शरीर दे-

खील आपलें नाहीं तर घरदार कोठून असणार? याप्रमाणें ऐकतांच त्या गोपीनें विचार केला कीं, कृष्ण जें कांहीं आतां बोलला तें अक्षरशः खरें आहें; यांत बिलकूल संशय नाहीं. एक ईश्वर कायतो सत्य; बाकी जें दिसतें तें नाशिवंत आहे. याप्रमाणें ती विचारांत गुंग होऊन गेली. थोडा वेळ झाल्यावर ती पुन्हा ह्मणाली, कृष्णा, हें घर माझें नाहीं हें मी समजलें; पण तें आहें कोणाचें तें तूं सांग बरें? तेव्हां कृष्ण ह्मणाला, अगे, तें माझें आहें! कशावरून ह्मणशील तर ऐक. आकाशाखालीं जितकीं घरें अथवा जें कांहीं आहे तें सर्व माझें आहें!! हें ऐकून ती गोपी हंसूं लागली व ह्मणाली, वहावारे वहावा, संपादणी बरीच करतोस; पण आतां तुपाच्या मडक्यांत हात कां घातला आहेस? कृष्ण ह्मणाला, त्यांत मुंग्या पडल्या आहेत त्या मी काढून टाकतों! नंतर तिनें विचारलें, कृष्णा, जेव्हां मुलें रात्रीं निजलेलीं असतात तेव्हां त्यांच्या त्यांच्या घरीं जाऊन त्यांना चिमटे कां घेतोस? कृष्ण ह्मणाला, उद्यां गाई चारावयास याल किंवा नाहीं अथवा यावयाचें असल्यास केव्हां याल, हें विचारावयाचें असतें; ह्मणून त्यांना चिमटे घेऊन जागे करतों! याप्रमाणें बोलत असतां कृष्ण चटकन पळून गेला. तेव्हां ती गोपीही कृष्णाचें दर्शन घ्यावें ह्मणून यशोदेकडे आली. बाह्यात्कारें, ती जशी काय कृष्णाचें गाऱ्हाणें सांगावयास आली आहे, असें दाखवी. त्याचप्रमाणें दुसऱ्या पुष्कळ गोपींनीं येऊन यशोदेजवळ कृष्णाचीं अनेक गाऱ्हाणीं सांगितलीं.

---

आं.

# अध्याय ७ वा.

## बाळलीला.

मागील अध्यायांत बालक्रीडेच्या कित्येक गोष्टींचें लेखन झालें; व पुढेंही तोच कथाभाग आहे. एके दिवशीं कृष्णानें सर्व गोपाळ एकत्र करून, जो कोणी आपला शत्रु असेल त्याचा सूड घ्यावा असा बेत केला. त्यानंतर अमुक गवळणीनें आपणास छळिलें आहे असें ध्यानांत आणून, कृष्ण त्या गवळणीच्या घरांत गुप्तरूपानें गेला. व जेथें तीं उभयतां निजलीं होतीं, तेथें जाऊन त्यानें नवऱ्याच्या दाढीशीं बायकोची वेणी बांधली; आणि आपण बाहेर पडला. पहाटेस जेव्हां ती गवळण उठूं लागली, तेव्हां नवऱ्याच्या दाढीस आंचका बसला. तो ह्मणाला, मी सत्तर वर्षांचा वृद्ध झालों तरी माझी तूं थट्टा वीस वर्षांच्या तरुणासारखी करतेस. अग, ही कुठें बायकांनीं थट्टा करावी? सोड लवकर. बायको ह्मणाली, ह्या वृद्धपणाला शोभेल असें तरीं कांहीं बोला. आपणच माझी वेणी अडकविली आणि आतां तिकडूनच जळली थट्टा होत आहे. आतां लवकर कशीतरी सोडा आणि मला घरधंद्याला लागूं द्या. शेवटीं त्यांचीं भाषणें निकरावर आलीं आणि दोघेंही हिसकाहिसक करूं लागलीं; परंतु ती गांठ कांहीं केल्यानें सुटेना. मग त्यांनीं फारच लज्जित होऊन शस्त्रप्रयोगही केला; तथापि ती त्यांस सुटली नाहीं. इतक्यांत उजाडलें. मग तीं उभयतां निरुपायामुळें एकांतांतून लोकांतांत आलीं. त्यांची अशी अवस्था पाहून शेंकडों मनुष्यें तेथें मौज पहाण्यास जमलीं. मग त्यांत जो

उठला तो कारभारी होऊन, त्या गांठीची हिसकाहिसक करूं लागला. त्या तमासगीर मंडळींत कृष्णही आपल्या सवंगड्यांसह येऊन गम्मत पहात होता. त्यानें सर्वांस त्रास व दुःख झालेलें पाहून सदय मन केलें. तो पुढें येऊन ह्मणाला, अग बायांनों, तुह्मीं सगळ्या मंडळींनीं हिसकाहिसक चालवून त्या बिचाऱ्या नवराबायकोचा फजिता मात्र मांडला आहे. कोण्या एखाद्या देवास किंवा साधूस यांनीं छळलें तर नाहींना? किंवा यांच्याकडून एखादा नवस तर फेडायाचा राहिला नसेलना? त्याची अगोदर आठवण करा. मला सांगाल तर मीही कांहीं पाहतों! यावरून सगळ्यांनीं एक ठराव करून कृष्णास पुढें आणिलें. त्यानें प्रथम उभयतांची मन मानेल तशी थट्टा करून, नंतर त्यांस आकाशाकडे तोंड करून उभें राहण्यास सांगितलें. नंतर कृष्णानें कांहीं शब्द देवस्तुति केल्यासारखे करून त्या उभयतांकडून वदविलें कीं, इतःपर आह्मीं कोणास छळणार नाहीं; व पोरांची तर गोष्टच काढणार नाहीं. त्यानंतर कृष्णानें त्यांवर कृपादृष्टीनें पाहतांच ती गांठ सुटून, उभयतां सलज्ज होऊन घरांत पळून गेलीं. मग कित्येक लोक कृष्णाची स्तुति करूं लागले.

कोणे एके दिवशीं प्रातःकाळीं एका गवळणीच्या घरीं कृष्ण जाऊन डोळे चोळीत उभा राहिला. तें पाहून ती गवळण ह्मणाली, लबाडा, सकाळींच रे कां येथें आलास? कांहीं खटला तर आणला नाहींसना? कृष्ण बोलला, अग, मी रात्रीं कोठें गेलों होतों; तेथें सर्व रात्र जागरण झालें. असाच घरीं गेलों, तर आई लाल डोळे पाहून रागावेल ह्मणून येथें आलों आहे. जर तूं थोडें अंगावरील दूध डो-

ळ्यांत घालावयास देशील, तर तुझे मजवर फारच उपकार होतील. गवळण ह्मणाली, बाबा एवढीच गोष्ट जर असेल तर याच वेळीं मी सहस्र कामें ठेवून हें काम अगत्य पहिल्यानें करितें; पण तुह्मी फारच प्रख्यात खोड्याळ आहां. तूं येथें आलास हें तुझ्या आईस ठाऊक आहे-ना? नाहींतर आतांच माझ्या येथें घोळ पडेल. कृष्ण बोलला, अग, तूं निर्धास्त ऐस. क्षणएक येथें पडून आतांच घरीं जातों. हें कृष्णाचें भाषण ऐकून ती बिचारी गवळण एकीकडे जाऊन एका लहान भांड्यांत आपला स्तन पिळूं लागली. हें पाहून कृष्ण बोलला, अग, असें दूध माझ्या उपयोगीं नाहीं. वैद्यशास्त्रांत असें आहे कीं, जें दूध स्त्रिच्या अंगावरील काढून डोळ्यांत घालावयाचें, तें स्वहस्तेंच जर मिळेल तरच त्याचा चांगला गुण; नाहींपेक्षां कांहीं नाहीं; ह्मणून इकडे ये, मी आपल्या हातानें तुझ्या स्तनाचें दूध पिळून घेतों! मजवर उलटे तुझेच उपकार होणार, मग तुला काय? कृष्णाचें हें बोलणें ऐकतांच ती त्याचे पाठीस लागली. तेव्हां कृष्ण आंगण्यांत जाऊन ह्मणाला कीं, जर तुझ्या स्तनास दुसऱ्याचा हात लागता ना, तर तें मीं तुझ्याच हातून घेतलें असतें; पण जर तेथें तुझ्या भ्रताराच्या हस्तानें मर्दन होत आहे, तर मी हात लावल्यास काय चिंता? ह्या शब्दावर ती गवळण कृष्णाच्या अंगावर धोंडे घेऊन धांवली; तेव्हां कृष्णानें तेथून पलायन केलें.

एकदां गोकुळांतील एका गवळ्यानें देवास नवस केला. ज्या कार्याकरितां तो नवस बोलला, तें कार्य ईश्वरकृपेनें सिद्धीस गेलें. आतां नवस फेडला पाहिजे ह्मणून, त्यानें

आपल्या स्त्रीस सांगितलें कीं, मला ब्राह्मणभोजन घालावयाचें आहे; तर आतांपासून तूप सांठवून ठेवीत जा. हें पतिवचन ऐकून तिनें पुष्कळ तूप सांचविलें खरें, पण त्याला न कळवितां एक घागरभर तूप शेजारणीच्या घरांत ठेविलें. कांहीं दिवस लोटल्यावर गवळ्यानें मोठा उत्सव केला व देवाचा नवस फेडला. त्या वेळीं त्यानें पुष्कळ ब्राह्मणांस भोजन दिलें; व सांचविलेलें तूप व दुसरे आणलेलें साहित्य संपविलें. हें सर्व कृष्णाला ठाऊक होतें; ह्मणून त्यानें गोपाळांसह त्या शेजारणीच्या घरांत जाऊन तें चोरून ठेविलेलें घागरभर तूप भक्षण केलें व नवस सिद्धीस नेला. दुसऱ्या दिवशीं ती घरधनीण आपली तुपाची घागर शेजारणीजवळ मागूं लागली. तेव्हां ती घरांत ठेविलेल्या ठिकाणीं पाहूं लागली; पण कोठेंही दृष्टीस पडेना. शिक्यासह ज्या घागरीचा कृष्णानें कोठेंच मागमूस राहूं दिला नाहीं, ती तिला तेथें कोठली सांपडावयाला? नंतर ती शेजारीण तिला ह्मणाली, बाई, मीं घरांत पुष्कळ ठिकाणीं शोधलें; परंतु तुमची तुपाची घागर कोठें दिसत नाहीं. बरें कृष्णावर आळ घ्यावा, तर माझें सर्व गोरस आहे व तुमचीच घागर नाहीं; ह्मणून मला मोठें आश्चर्य वाटतें! हें ऐकून ती ह्मणाली, असें जर आहे, तर घागर खचित तुझ्यावांचून गेली नाहीं. तूंच कोठें दुसरीकडे लपवून ठेविली असशील. असें ऐकतांच शेजारणीनें पुष्कळ शपथा घेऊन सांगितलें कीं, तुपाची घागर माझ्या घरीं होती, ती कशी नाहींशी झाली हें मला मुळींच माहीत नाहीं. शेवटीं त्या गौळणीनें विचार केला कीं, जर हिजबरोबर भांडावें, तर ही गोष्ट

नवऱ्याच्या कानीं जाईल. मग तो अद्वातद्वा बोलेल व मारही देईल. असा विचार करून ती शेजारणीस ह्मणाली, बाई, माझें तूप गेलें तर जाऊं दे. तें कृष्णार्पण झालें; पण तूं इतकें तरी कर कीं, ही गोष्ट माझ्या नवऱ्याच्या कानावर घालूं नको. असें ह्मणून ती आपल्या घरीं गेली.

गोकुळांतील एक दंपत्य आपल्या दहीदुधाचें फारच काळजीनें जतन करीत असे. हें जाणून कृष्णानें तीं उभयतां निद्रिस्थ असतां सर्व गोरस भक्षण केलें व बिछान्यावर त्यांच्यामध्यें एक मुंगूस सोडून घरचा रस्ता धरला. तें मुंगूस दोघांमध्यें उकरूं लागलें; तेव्हां तीं उभयतां भयाभित होऊन हांक फोडीत उठलीं व वस्त्रें न सांवरतां बाहेर आलीं. तीं ह्मणूं लागली कीं, आमच्या उरावर एक भूत बसलें होतें; त्याला पाहून आह्मीं जीव घेऊन पळालों. असें तीं सांगत आहेत तों तेथें लोकांची पुष्कळ गर्दी जमली. दिवे लावले, पंचाक्षरी आले; ते लांबूनच अंगारे फुंकूं लागले; पण कोणीही खोलींत जाईना. शेवटीं दोघे चौघे त्या खोलींत शिरले; त्यांनीं त्या मुंगुसास धरून बाहेर आणलें. त्याला पाहून सर्व गदगदां हंसूं लागले. कोणी ह्मणाले, आज सकाळीं कृष्ण मुंगूस खांकेंत घेऊन गल्लोगल्लीं हिंडत होता; त्यानें तर हा येथें आणून सोडला नाहींना? कोणी ह्मणाले, तो कृष्ण मोठा नष्ट; त्याची करणी अचाट; सगळीं गोकुळांतील पोरें त्यानें चावट केलीं. नंतर सर्व आपापल्या घरीं गेले.

एकदां गोकुळांतील गोपी कृष्णाच्या अनेक खोड्या यशोदाबाईस सांगत असतां, ती कृष्णाच्या तोंडाकडे पाहून हंसूं लागली. तेव्हां कृष्ण ह्मणाला, मी ब्रह्मानंद,

सर्वातीत, निर्मळ आहे; मला ह्या गोपी धाकटा बाळ असें ह्मणतात. यांच्या एक एक खोड्या तुला मी किती सांगूं? या मला हृदयाजवळ धरून कुसकरतात, चुंबन देतात व अनेक कुचेष्टा शिकवितात. या सगळयाजणीं एके ठिकाणीं जमतात व नग्न होऊन माझ्या सभोंवतीं नाचतात व ह्मणतात, कृष्णा, मोठा असतास तर बरें होतें! हें ऐकून त्या गोपी लटकाच क्रोध आणून ह्मणाल्या, यशोदाबाई, आपल्याला पुत्राचे बोल ऐकून मोठें कौतुक वाटतें; परंतु हा परम नष्ट व अनाचारी आहे. नसतेंच आळ आह्मांवर घेतो. हा पुढें खचित बहुतांचीं घरें बुडवील. हंसतां हंसतां हा ब्रह्मांड कांखेंत लपवील व एका क्षणांत सप्तसमुद्र नखाग्रांत जिरवील. याच्या एक एक गोष्टी लिहिल्या असतां सगळी पृथ्वीही पुरणार नाहीं. याला आह्मीं सहज एकदां विचारलें, कृष्णा, तुला कसलीरे नवरी पाहिजे? तेव्हां हा ह्मणाला, जिच्या इच्छामात्रें करून ब्रह्मांडाच्या गति होतात; जी परब्रह्मींची मूळस्फूर्ति; ब्रह्मा, विष्णु, महेष, इंद्र, चंद्र, सूर्य आदिकरून सर्व बाहुलीं जी एकाच सूत्रानें नाचविते तीच माझी नोवरी होय. नंतर दुसरी गौळण ह्मणाली, हा कृष्ण काल माझ्या घरीं आला व दह्यादुधाचीं शिंकीं पाहूं लागला; पण मी लपविलीं होतीं ह्मणून तीं याला दिसलीं नाहींत. तेव्हां हा ह्मणाला, अगे, समुद्रांत शंखासुर वेद घेऊन लपला, तेव्हां मी मच्छ अवतार घेऊन त्या दुष्ट दैत्याचा नाश केला व वेद पृथ्वीवर प्रगट केले; त्या मजपुढें दहीं, लोणी कोठें लपवाल? मग दुसरी गोपी ह्मणाली, एकदां मी दधिमंथन करीत असतां कृष्ण मजकडे

आला व बोलला, अशा प्रकारचें मंथन माझ्या मनास येत नाहीं. मागें मी कूर्मावतार घेतला, त्या वेळीं मंदराचलाची रवी व त्याला वासुकीची बिरडी केली; ती एका बाजूनें देवांनीं व दुसऱ्या बाजूनें राक्षसांनीं धरली होती. पण मंदराचल खालीं पाताळांत जाऊं लागला असें पाहून, मी कूर्म होऊन पाठीवर पर्वतास उचलून धरलें. अशा रीतीनें समुद्रमंथन केलें व चौदा रत्नें हेंच नवनीत काढलें. जसें तुह्मीं आपल्या बालकांला दूध पाजतां तसेंच मी देवांस अमृत पाजलें. मींच मोहिनीचें रूप घेतलें होतें. नंतर ती गोपी म्हणाली, यशोदाबाई आणखी तुह्मांला सांगतें, एकदां मी यमुनेवर पाणी भरीत असतां व मला घागर उचलत नाहींशी पाहून हा ह्मणाला, अगे, तुह्मीं गवळणी अशा कशा? हलकी घागरही उचलवत नाहीं. मी वराह अवतार घेऊन पृथ्वी कशी उचलली? मींच हिरण्याक्ष दैत्याचा नाश केला. ज्याप्रमाणें तुह्मीं फळें, कांकड्या चिरितां, त्याप्रमाणें मी नरसिंह होऊन हिरण्यकशिपु राक्षसास चिरून ठार मारला व माझ्या प्रल्हादभक्ताचें रक्षण केलें. अहो यशोदाबाई, एकदां मी आपल्या पतीचे चरण धूत असतां हा कृष्ण हळूच येऊन ह्मणाला, असेंच बळीनें माझे पाय धुतले. त्यानें मला त्रिपादभूमि दान दिली. त्या वेळीं मीं जें विराटरूप घेतलें होतें तें बळीच्यानें पाहवेना. शेवटीं त्यानें मला आपलें शरीर अर्पण केलें. मग मी त्याला रसातळीं स्थापिला व त्याचें अद्याप द्वाररक्षण करीत आहें. मींच परशुराम, राम हे अवतार घेतले; तोच मी गोकुळांत अवतरलों आहें. मी कंसाचा नाश करीन; चाणूर, मुष्टिक, अघासुर इत्यादि राक्षसांस ठार करीन; सोळा

हजार स्त्रियांस वरीन; दुष्टांचें हनन व भक्तांचें रक्षण करीन. पुढें कलंकी अवतार घेऊन म्लेंच्छांचा संहार करीन. माझे अवतार किती झाले, ह्याची शेषालाही गणती नाहीं. मी आद्य, अचल, अरूप, निष्कलंक, निर्विकार, निर्मळ, ब्रह्मानंद, अच्युत, अनंत आहें. मी नामरूपातीत व गुणागुणरहित आहें. सर्व करून अकर्ता आहें. मी सर्वांचें निजमूळ असतां लोक काम, क्रोधादि षड्रिपूंस वश होऊन मला विसरले. मृगनाभींत कस्तुरी आहे, पण ती कोठें आहे हें त्याला दिसत नाहीं; त्याचप्रमाणें मी सर्वांजवळ आहें, पण लोकांना समजत नाहीं. ती गोपी आणखी म्हणाली, यशोदाबाई, तुह्मांला खरेंच सांगतें, हा हरी मोठा नाटकी आहे. अचाट गोष्टी सांगतो. पूर्वींचे ईश्वरावतार माझेच असें बोलतो. रांजणांतलें पाणी पहातांच याला भय वाटतें, तर हा प्रळयसमुद्रांत मत्स्य कसा झाला असेल? निजवावयाचे वेळीं जर याची कोणीं पाठ थापटली, तर हळू थापटा असें ह्मणणारा; यानें पाठीवर मंदराचल कसा धरला असेल? चेंडू उचलवत नाहीं, तो ह्मणे मी दाढेवर धरा धरली; हें कसें संभवतें? आंगड्याचा बंद सोडतांना माझीं नखें दुखतात असें ह्मणणारा; यानें दैत्याला नखानें कसें फाडलें असावें? ऊंस ज्याच्यानें मोडवत नाहीं, तो हा ह्मणतो, मी परशुरामाचें धनुष्य मोडलें. जो बागुलबावाच्या भयानें लांब लांब पळतो, तो रावणास कसा मारील? तर याचें सर्व भाषण मृगजळाप्रमाणें खोटें होय. हा आमचें दहीं दूध राहूं देत नाहीं. याच्यामुळें आह्मांस गोकुळ सोडून जावें लागेल. अशा अनेक गौळणी कृष्णाचीं गाऱ्हाणीं यशोदेजवळ सांगूं लागल्या.

# अध्याय ८ वा.

## बाळलीला.

आपल्याजवळ कृष्णाविषयीं गौळणीच्या अतर्क्य, अग्राह्य व असंभाव्य अशा अनेक कागाळ्या येतात; व त्याकरितां आपल्यास फारच त्रास पडून मुलगा खोड्याळ ठरतो; यास उपाय तरी काय करावा? ह्या विचारांत एके दिवशीं यशोदा स्तब्ध बसली असतां, पुराणाची वेळ झाली; तेंव्हां तेथें ती कृष्णास घेऊन बसली. पुराणांत अशी गोष्ट निघाली कीं, जर गणपतीचें व्रत केलें तर निपुत्रिक स्त्रियेस सुगुणसंपन्न असा पुत्र होतो. आणि दुर्गुणी मुलाच्या आईनें जर हें व्रत केलें, तर तो मुलगा सुगुणी होतो. असें ऐकून यशोदेनें गजाननव्रत करण्याचें मनांत आणून उपाध्याकडून त्या व्रताचा निश्चय ठरविला. मग ती कृष्णास बोलली, कृष्णा, तुझ्यासाठीं मी हें व्रत करणार. तो गणपती विद्येचा व सद्गुणांचा दाताच आहे; तो तुला चांगला करील. कृष्ण बोलला, खरेंचग आई, हा वांकड्या सोंडेचा देव चांगला आहे. माझ्या ऐकण्यांत तसेंच आलें आहे! आई बोलली, मुला, व्रत करून ज्या देवाजवळ क्षमा मागणार, त्या देवाच्याच थट्टेला त्वां आतांपासूनच प्रारंभ केला आहेस. कृष्ण बोलला, आई, जसें तुह्मीं माझीं वडील; तुह्मांस मी कांहीं वेडेंवाकडें बोललों, तर मी लेंकरूं ह्मणून माझा राग येत नाहीं; तसेंच देव हा आपला मायबाप, त्यास आपण लेंकरांनीं कसेंहो बोललों, तथापि राग येईल असें कधींही होणार नाहीं ! हें भाषण ऐकतांच यशोदेची खात्री झाली कीं, ही

बुद्धि कांहीं सामान्य मनुष्याची नव्हे. हा परमेश्वर अवतारच आहे. इतक्यांत पुनः मायेनें भ्रमित होऊन कृष्णाचें चुंबन घेतलें. कृष्णानें देवांची पूजा मी करीन असें आईस सांगितल्यावर, तिणें त्याचे फारच लाड केले.

यशोदेनें व्रतास आरंभ केला व मोठ्या खर्चानें उत्सवसमारंभ केला. ही पूजा एकसारखी आठ दिवस चालली होती. त्या वेळीं कृष्णानें आईजवळ निवांत बसून ही पूजा केली. आईस बरें वाटावें, व तिचा विश्वास देवावर बसावा, याकरितां कृष्णानें प्रौढपणा धरून खोड्या करणें कांहीं दिवस अगदीं सोडून दिलें. यशोदेनेंही अशा कारितांच तें व्रत समाप्त करण्याचें काम एक महिन्याच्या लांबणीवर घातलें. पुढें कृष्ण चांगला गुणी झाला असें पाहून, बहुत ब्राह्मण बोलावून त्या व्रताची समाप्ति केली. त्या दिवशीं गणपतीचें प्रिय पक्वान्न मोदक (लाडू) करवून त्याची पूजाही फार चांगल्या रीतीनें केली. एक सहस्र लाडवांचा नैवेद्य गणपतीस समर्पण करावा ह्मणून यशोदेनें एक हारा भरून लाडू मंदिरांत नेले; व सर्वांस देवघरांतून बाहेर लाविलें. परंतु, कांहीं वस्तु घरांत विसरल्यामुळें कृष्णास आंत ठेवून ती घरांत गेली; तों कृष्णानें ही संधि पाहून ते सर्व लाडू एकदम गट्ट केले! आई आल्यावर तो हारा रिकामा पाहून, कृष्णाच्यानें तर एवढे लाडू खावणार नाहींत; तसेंच देवही खाणार नाहीं आणि लाडू तर गेले; अशा जरी कित्येक गोष्टी तिच्या मनांत आल्या, तथापि ती भ्रांतिपाशांत पडली आणि कृष्णास बोलली कीं, अरे, या पाटींतील लाडू रे काय झाले? खरें बोल. कृष्ण ह्मणाला,

आई, तूं बाहेर गेलीस न गेलीस, इतक्यांत एक छुबा उंदरावर बसून कित्येक मंडळी बरोबर घेऊन आला; आणि त्याणें ते लाडू आपण खाल्ले व सर्वत्रांसही वांटले! मी त्यास, मला आई मारील, तुह्मीं खाऊं नका, अशा रीतीनें बहुत प्रकारें बोललों; परंतु तो बोलला कीं, माझें नांव गणपती, हे सर्व मजकरितांच आहेत. आईस सांग कीं, गणपतीनें ते लाडू खाल्ले. आणि इतक्यावर जर तुझ्या आईनें तुला मारिलें, तर मी सोडवीन; असेंही त्याणें सांगितलें. यशोदा बोलली, अरे लबाडा, तुला तुझा गणपती सोडविणार, तर ही मी तुला आतांच मारितें; येऊं दे सोडवायाला तुझा गणपती. कृष्ण हें ऐकतांच रडूं लागला. त्यानें रडण्याकरितां आपलें तोंड उघडिलें, तेव्हां त्याच्या तोंडाकडे यशोदेच्यानें पहावेना. तिनें तोंडांत विराटस्वरूप व त्यापासून सर्व अवतार पाहिले. कौरव, पांडव, गवळणी, गवळी, देव, दैत्य, ऋषि, व मोठमोठे सैन्यासह राजे तोंडांत आहेत; कंसास कृष्ण मारीत आहे; गोपी गोपाळांसह कृष्ण निराळेच जागेंत खेळत आहे; ब्रह्मा, विष्णु व महादेव हात जोडून उभे आहेत; चंद्र सूर्य तर नेत्रतेजांत बुचकळ्याच देत आहेत; असें स्वरूप पाहील्यावरून यशोदा घाबरून निचेष्टित पडली. मग कृष्णानें तिला सावध करून असा चमत्कार दाखविला कीं, लक्षावधि गणपति येऊन मोदक मोठ्या रुचीनें खात आहेत. हें पाहून यशोदा फारच घाबरली. इतक्यांत त्यांतून एका गणपतीनें यशोदेस सांगितलें कीं, मी तर मंगलमूर्ति खरा; पण माझी मंगलमूर्ति कृष्ण आहे. त्यास गुण मीं काय आणावा? हें ऐकून तिला कांहींशी भीति

वाटून स्तब्ध राहिली; आणि कृष्णावरून निंबलोण केलें. मग कृष्ण ह्मणाला, सगळें खरें; देवानें लाडू खाल्ले, व ब्राह्मणाकरितां तर ते केलेच आहेत; पण मला भूक लागली आहे त्याचें काय करणार? नंतर यशोदेनें कृष्णास आंत नेलें; आणि सर्व ब्राह्मणांस मोदकभोजन घालून कृष्णासही भरविलें.

एकदां कृष्ण व बळराम हे उभयतां आंगणांत खेळत होते; तेव्हां कृष्ण हातांत माती घेऊन खाऊं लागला. तें पाहून बळरामानें यशोदेस सांगितलें कीं, आई, कृष्ण अंगणांत माती खात आहे. मग तिनें हातांत शिपटी (काठी) घेतली व कृष्णाजवळ येऊन त्याला दटावून ह्मणाली, कांरे माती खाल्लीस? उघड बघूं तुझें तोंड? नाहींतर मारतें आतां! तेव्हां कृष्ण, आई मारील या भीतीस्तव ह्मणाला, आई, त्वां मला मारावें ह्मणून हा बळराम लटकेंच सांगतो; पहा माझ्या तोंडांत. असें ह्मणून कृष्णानें आपलें तोंड उघडलें, तों त्यांत यशोदेला सर्व ब्रह्मांडाची रचना दृष्टीस पडली. तेव्हां तिची, हा पूर्णब्रह्मावतार आहे, अशी खात्री झाली.

एके दिवशीं कृष्णानें खेळत असतां, स्फटिकभुमींत आपलें प्रतिबिंब पाहिलें; व 'तें मला काढून दे' ह्मणून तो आईजवळ हट्ट घेऊन बसला. त्याला यशोदेनें नानाप्रकारें समजावून सांगितलें कीं, तें (प्रतिबिंब) कधींही हातीं यावयाचें नाहीं. पण कांहीं केल्या तो ऐकेना व जमिनीवर गडबडां लोळूं लागला. शेवटीं तिनें त्याला उचलून पाळण्यांत घातलें व ह्मटलें, बाळा कृष्णा, घटकाभर स्वस्थ नीज. तेव्हां तो ह्मणाला, माते, निजस्वरूपीं

मीच आहें. नंतर ती ह्मणाली, बाळा, उगाच तूं रडूं नको. मजबरोबर गोड गोड गोष्टी बोल पाहूं. त्यावर तो म्हणाला, गोष्टी सांगावयाला मला कोठेंच दुजेपण दिसत नाहीं. याप्रमाणें कृष्ण रडत रडत सांगे, पण कांहीं केल्या उगी राहीना; तेव्हां यशोदा त्यास पाळण्यांत रडतच ठेवून आपल्या घरकामास लागली.

त्याच दिवशीं यशोदेजवळ बहुत गवळणी जमल्या असतां, कृष्ण अधिकच रडूं लागला. त्यास समजाविण्याकरितां पुष्कळ इलाज केले; परंतु तो कांहींकेल्या ऐकेना. शेवटीं सर्व गवळणी त्यास घेऊं लागल्या; परंतु कोणाजवळ जाईना. ज्या वेळीं राधेनें कृष्णास बोलाविलें, त्या वेळीं कृष्णानें हास्यमुख केलें व तो तिजजवळ गेला. यशोदेनेंही तिला सांगितलें कीं, कृष्णास आपल्या घरीं घेऊन जा. दोन घटकांनीं घेऊन ये. तें ऐकून राधेनें कृष्णास घरीं नेलें.

कृष्ण व राधा हीं उभयतां एका खोलींत बसलीं असतां, कृष्णरूपाकडे पाहून राधेस कामवासना झाली. ती बोलली, देवा, जर तूं मोठा असतास तर माझी इच्छा तृप्त करतास. तिची ही इच्छा जाणून कृष्णानें मोठें रूप घेतलें. मग त्या ब्रह्मानंदास काय विचारावें? उभयतां मनाप्रमाणें विषयसुखांत क्रीडत असतां, अकस्मात तिचा नवरा अनया बाहेरून आला; व कवाड बंद पाहून त्यानें तें ठोकून एकदम हांक मारिली. ती हांक ऐकतांच राधेनें घाबरून कृष्णास लहान होण्याविषयीं विनंती केली. तेव्हां कृष्ण बोलला, लहानाचें मोठें हें कधीं तरी कोणी होईलच; पण मोठ्याचें लहान होणें कठीण! हें ऐकून राधा खिन्न मनानें समोर दीन वदन करून उभी राहिली,

नवरा तर दरवाजा उघडण्याची जलदी करूं लागला; तरीही दार उघडीत नाहीं असें पाहून, 'कोण्या याराला रांडे आंत घेऊन बसली आहेस? आतां दरवाजा फोडून तुह्मां उभयतांस मारितों.' असें भाषण कृष्णानें ऐकल्यावर आपण लहान रूप घेतलें. तेव्हां राधा त्यास दहींभात भरवीत बसली. आणि ओरडून नवऱ्यास सांगितलें कीं, 'कृष्णास मी भरवीत आहें; क्षणभर दम धरा ह्मणजे मी त्यास आंचवून कडी उघडतें.' नंतर राधेनें कित्येक चिमकुलीं भांडीं व खेळणीं तेथें मांडून कृष्णास आंचवल्या सारखें केलें. तिकडे अनया निरुपायानें स्तब्ध उभाच होता. नंतर त्यास दरवाजा उघडतांच, तो संशयी मनानें क्रोधसंतप्त होत्साता मोठ्या आवेशानें घरांत आला. परंतु राधेच्या कडेवर कृष्ण पाहून त्याचेंही मन मोहानें द्रवलें, आणि कृष्णाचे मुके घेऊन बायकोसमागमें त्यास यशोदेजवळ पोहोंचविला; आणि नित्य कृष्णास जेवायास आणण्याची त्यानें राधेस ताकीद दिली. त्याप्रमाणें कृष्ण अनयाच्या घरीं नित्य येऊन व मोठा होऊन राधेला भोग देत असे; परंतु ही गोष्ट बाहेर कोणासच ठाऊक नव्हती.

एके दिवशीं कित्येक गौळणींनीं यशोदेकडे जाऊन तिला सांगितलें कीं, राधेच्या घरीं कृष्ण मोठा होतो; व तीं उभयतां विषयक्रीडा करितात. यशोदेनें न्यायाच्या जोरानें सर्वांस सांगितलें कीं, अशी वेड्यासारखी गोष्ट बोलून माझ्या मुलाविषयीं कागाळ्या आणूं नका. सर्व गवळणींस तर असें ह्मणून लावून दिल्या; परंतु त्या दिवसापासून कृष्णास राधेकडे पाठविण्याचें बंद केलें; व

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

राधेनेंही कामाखेरीज आपल्या घरीं येऊं नये अशी तिला ताकीद दिली. त्यांच्या वियोगास फार दिवस झाले, असें एके दिवशीं राधेनें कृष्णास त्याच्या घरावरून जातां-येतां खिन्न मुद्रेनें जाणविलें.

एके दिवशीं सकाळीं राधा नंदाच्या घरावरून यमुनातीरावर पाणी भरण्याकरितां जात होती. त्या वेळीं यशोदेनें एक एक भरणा कृष्णाच्या हातांत द्यावा, तो घेऊन त्यानें एक एका गाईच्या दुधानें भरून परत तिजजवळ द्यावा, आणि तो दुधानें भरलेला भरणा तिनें घरांत नेऊन मोठ्या डेऱ्यांत ओतावा. ज्या गाईला कृष्णाचा हस्तस्पर्श होई ती अमर्याद दूध देई. त्यामुळें भरणा झटकन भरल्यावर तो दुग्धधारा भराभर आपल्या तोंडांत घेई. हें पाहून एकदां यशोदेनें ह्मटलें, कृष्णा, हें असें काय करतोस? तेव्हां तो म्हणाला, आई, भरणा तर भरला व आतां धारा न काढल्यास गाईचा पान्हा आंखडेल ह्मणून दुग्धधारा काढून आपल्याच मुखांत मी घेतों. हें ऐकून यशोदा घरांत गेली. नंतर कृष्ण भरणा हातीं घेऊन जो द्वाराकडे पहातो तों, तिकडे राधा उभी आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तिला पाहून तो इतका मोहित होऊन गेला कीं, गाईचें दोहन करावयाचें सोडून तो बैलाखालीं भरणा घेऊन बसला व दूध काढूं लागला. इतक्यांत यशोदा आली व तें पाहून कृष्णास म्हणाली, अरे, हें तूं काय करतोस? असें ऐकतांच कृष्ण राधेकडे पहात व वृषभाचा वृषण ओढीत बोलला, आई, गाईचें मी दूध काढतों नी दुसरें काय? हा पहा भरणा भरला; ठेव हा घरांत नेऊन. हें ऐकून यशोदा ह्मणाली, अरे,

पण ज्याचें दूध तूं काढतोस तो बैल आहेना? तेव्हां, गाई नसून हा बैलच आहे; असें पाहून कृष्ण ह्मणाला, आई, तूं कांहीं तरी देवाचा नवस चुकलीस खचित; ह्मणून या गाईच्या चार स्तनांचा एक स्तन आतांच्या आतांच झाला! असें तो सांगत आहे, इतक्यांत यशोदेची दृष्टि दाराजवळ राधेकडे गेली; व कृष्णास ह्मणाली, तुझें मन ठिकाणीं नाहीं. मग ही गाय आहे किंवा बैल आहे, हें कोठून समजणार? मग ती राधेला ह्मणाली, पाण्याची घागर घेऊन येथेंग तूं कां उभी? असें ऐकतांच राधा मुकाट्यानें यमुनेवर गेली व पाणी भरून आपल्या घरीं आली.

एकदां कृष्ण गोपाळांसह राधेच्या द्वारीं जाऊन उभा राहिला. इतक्यांत राधा दधिमंथनासाठीं ओसरीवर आली. ती हरीला पाहून इतकी मोहित झाली कीं, दधिमंथन करावयाचें विसरून रित्या डेऱ्यांतच रवी घालून घुसळूं लागली. पण जेव्हां तो डेरा खडबड वाजूं लागला, तेव्हां राधेची ह्मातारी सासू धांवत येऊन ह्मणाली, अग, तुझे डोळे फुटले व कानही गेले कीं काय? रिता डेरा उगीच कां घुसळतेस? असें ऐकून राधा ह्मणाली, सासूबाई, डेरा धड आहे कीं फुटलेला हें मी घुसळून पहातें. इतक्यांत त्या ह्मातारीनें कृष्णास पाहिलें व राधेला ह्मटलें, अग, तो कृष्ण तुझ्या दृष्टीजवळ आहे; तेव्हां तुझें मन कोठून स्थीर असेल? नंतर ह्मातारी कृष्णास ह्मणाली, तूंरे येथें उभा कां? हें ऐकून कृष्ण ह्मणाला, अग थेरडे, आह्मीं ब्रिदींत खेळतों; तूं आह्मांला काय ह्मणून बोलतेस? असें बोलून तो तोंड वांकडें करून तिला वेडावूं लागला.

हें पाहतांच ह्मातारी त्याला धरण्याकरितां रागानें धांवली, इतक्यांत तो पळून गेला.

एकदां राधा व कित्येक गवळणी दारावरून गेल्या असें पाहून, कृष्ण आईची दृष्टि चुकवून राधेमागें हळूच धांवत गेला; व त्यांस यमुनातटीं गांठलें. तेथें मोठा होऊन त्या सर्व गवळणींशीं त्याणें थट्टा आरंभिली. तो त्या सर्व मंडळींशीं थट्टेंत निमग्न आहे तों, यशोदेस कोणीं कृष्ण यमुनेवर गेल्याची बातमी सांगितली. ती तेथें लगबगीनें गेली; परंतु, परब्रह्मरूप कृष्ण त्यास मानव यशोदेनें काय करावयाचें? ती येण्यापूर्वींच कृष्ण लहान होऊन राधेचें लुगडें ओढून 'माझा चेंडू दे, चेंडू दे' असें मोठमोठ्यानें बोलून रडत होता. त्याला यशोदेनें विचारिलें कीं, लबाडा, तूं कां रे येथें आलास? कृष्ण बोलला कीं, आई, माझा चेंडू या राधेनें आपल्या घराजवळच घेतला, त्यासाठीं मी तिचें नानाप्रकारें आर्जव करीत आहें, तथापि ती तो देत नाहीं!! राधा बोलली, यशोदाबाई, हा लबाड बोलतो. याची आमची आज किती दिवस झाले भेटच नाहीं. यशोदा ह्मणाली कीं, अग तुह्मीं गवळणीच मोठ्या कंवटाळिणी आहां. तुह्मींच अपराध करून माझ्या मुलाच्या कागाळ्या आणतां. कृष्ण ह्मणाला, आई, जेव्हां तूं आलीस कीं नाहीं, तेव्हां या राधेनें चेंडू आपल्या चोळींत लपविला. यशोदेनें तिजकडून चोळी सोडविली. त्या वेळीं कृष्ण टाळ्या पिटून हंसूं लागला. परंतु तेथें न सांपडल्यामुळें कृष्णास आई बोलली कीं, लबाडा, तूंच खोटें बोलतोस; तुलाच शिक्षा केली पाहिजे. कृष्ण बोलला, इच्या चोळींत सांपडला

नाहीं; कां कीं तो इणें लुगड्यांत ठेविला असेल. जर इच्याजवळ चेंडू नच सांपडला, तर मी खोटें बोललों खरा. आतां इचें लुगडें फेड! यशोदेनें राधेचें लुगडें झटकतांच चेंडू खालीं पडला. तो पडतांच कृष्ण आनंदानें टाळ्या पिटूं लागला. यशोदा राधेवर रागावली व त्या सर्व गवळणी अगदीं थक्क झाल्या. नंतर यशोदा कृष्णास घेऊन घरीं गेली. कृष्णानें राधेस खुणाविलें कीं, मी तुझा आहें; मी तुला कधींही अंतर देणार नाहीं. यशोदेनें कृष्णास घरीं आणल्यावर त्यावरून मीठ मोहऱ्या उतरल्या.

एके वेळीं दिवसाचाच कृष्ण एके गवळणीच्या घरांत शिरला. आणि लोणी एकटाच खात आहे, तों घरची मालकीण पाण्याला गेली होती तिणें यास बसलेला पाहतांच हळूच मागून येऊन हातीं धरिला; आणि ह्मटलें, अरे लबाडा, नित्य अशा तूं खोड्या करून आह्मींच खोटें बोलतों असा उलटा दोष आह्मांवर लावतोस. पण आतां तुला मुद्यावरच धरिला आहे; आतां तूं जाशील कोठें? चल आतांच तुला यशोदेकडे नेतें. कृष्ण ह्मणाला, आईकडे नेणार त्यापेक्षां तूंच दोन तोंडांत मार, आणि मला सोड. पुन्हा मी तुझ्या वाटेस कधींही जाणार नाहीं. ती बोलली कीं, ही गोष्ट आतां व्हावयाची नाहीं. तुला थेट तेथें पोहोंचविल्याशिवाय ठेवीत नाहीं. कृष्ण बोलला, आतां तूं कशाला इतकी मेहनत घेतेस? तुझ्या सुनेसच माझ्याबरोबर देईनास? नंतर ती गवळण कृष्णास घेऊन यशोदेकडे चालली. वाटेंत पुष्कळ गवळणी मिळाल्या. त्याही नंदगृहीं निघाल्या. व कित्येक गवळीही गेले. आपल्या सुटकेविषयीं कृष्णानें त्या सर्वांचे बहुत

आर्जव केले; परंतु ते सर्व व्यर्थ गेले. असें पाहून कृष्णानें अशी माया दाखविली कीं, तेणेंकरून सर्व चकित झाले. ह्मणजे जिकडे तिकडे कृष्णच कृष्ण झाले. प्रत्येक गवळणीच्या हातांत एक एक कृष्ण. सर्वच यशोदेकडे फिर्यादी आल्या असून, सर्व कृष्णांच्या मुखांस लोणी लागलेलें; व प्रत्येक गवळणीच्या हातांत एक एक गाडगें आहे. इकडे आंगण्यांत कृष्ण गोपाळांबरोबर विटीदांडू खेळतच आहे. दुसरे कित्येक नंदाचे आप्त आले; त्या त्या सर्वांच्या हातांतही एकेक कृष्ण आहेच. यशोदेच्या मांडीवरही कृष्ण. असें सर्व कृष्णमय पाहून सर्वांच्या मनाचा कांहीं चमत्कारिक ग्रह झाला. आणि सर्व गवळणी आश्चर्यभरित होऊन आपापल्या घरीं निघून गेल्या.

---

## अध्याय ९ वा.

### कुबेरपुत्रोद्धार, कृष्णलीला व नौकाक्रीडा.

एके दिवशीं यशोदा कृष्णास घेऊन बसली असतां, घरांतील चुलीवर दूध तापत ठेविलें होतें, तें उतल्याचा वास आला. त्यासरसी यशोदा लगबगीनें कृष्णास खालीं ठेवून आपण आंत जाऊन पहाते तों, दूध सर्व फुकट गेलें. कांहीं वेळानें ती बाहेर आली. त्या अवकाशांत कृष्णानें सर्व दुभत्याचीं भांडीं उपडी घालून ठेविलीं. हें कृष्णाचें कृत्य पाहून यशोदेस फारच राग आला. आणि त्यास बांधून ठेवावा ह्या हेतूनें, दोऱ्यांनीं त्यास ती उखळाशीं बांधूं लागली. परंतु त्रैलोक्यांतही यास कोणी बांधण्यास समर्थ नाहीं; हा विचार न करतां ती त्यास बांधूं लागली.

पण दोऱ्या पुरेनात. शेवटीं रागानें घरांतील एकंदर दोऱ्या काढल्या, तथापि कार्य होईना; ह्मणून श्रमित झाली. हें पाहून कृष्णानें ती शेवटचीच दोरी पुरविली. यशोदेनें या रीतीनें कृष्णास बांधून गच्च गांठ दिली व आपण घरांत गेली.

इकडे कृष्ण, जवळ कोणी नाहीं असें पाहून रांगत रांगत त्या उखळीसुद्धां आंगण्यांत गेला. तेथें दोन मोठे वृक्ष होते. त्यामधून तें उखळ जातांच त्याच्या धक्का त्या दोन्ही वृक्षांस लागून, ते उन्मळून खालीं पडले; आणि त्यांतून दोन दैदिप्यमान पुरुष उत्पन्न होऊन कृष्णासमोर हात जोडून उभे राहिले. इकडे मोठा ध्वनि झाला, असें ऐकतांच यशोदा बाहेर येऊन पाहते तों दोन झाडें पडून कृष्णापुढें दोन पुरुष हात जोडून उभे आहेत; असें पाहून ती स्तब्ध राहिली.

त्या वृक्षांतून जे दोन पुरुष निघाले, त्यांनीं कृष्णास विनंती केली कीं, महाराज, आह्मीं मणिग्रीव व नळकुबेर नांवांचे दोन उन्मत्त गंधर्व होतों. आह्मांस अति गर्व झाल्यामुळें नारद ऋषीचाही एक वेळ आह्मांकडून अपमान झाला; त्या वेळीं त्यांनीं आह्मांस 'वृक्ष व्हाल' असा शाप दिला. परंतु आह्मीं शरण गेल्यावर, 'जेव्हां कृष्णास त्याची यशोदा माता बांधील व त्याच्या पायांचा धक्का त्या वृक्षांस लागेल त्या वेळीं पूर्व देह पावाल' असा त्यांनीं उःशाप दिला. त्याप्रमाणें आज आह्मीं आपल्या मातुश्रीदेखत पावन झालों. इतकें बोलून त्यांनीं स्वस्थळीं जाण्यास कृष्णाची आज्ञा मागितली; व कृष्णानेंही उजवा हात उचलून मानेनें खुणाविलें. त्यासरसे दोघे-

ही गंधर्व यशोदेस व कृष्णास साष्टांग नमस्कार करून दिव्य विमानांतून स्वर्गास गेले. यशोदेचें मन या वेळेस असें कांहीं झालें कीं, तिजला कांहींच सुचेना. हस्तपादादि अवयवांची गतिही राहिली. असें पाहून कृष्णानें तिजकडे पाहिलें तों यशोदा पुनः पूर्वस्थितीवर येऊन मायाजाळांत गुंतल्यासारखी झाली. आणि कृष्णास कांही तरी अपाय झाला असेल, ते केवढे मोठे पुरुष आले होते, त्यांणीं काय या मुलास केलें असेल, तें पहाण्याकरितां जवळ आली. कृष्णास कांहीं लागलें नाहीं, असें पाहून त्यास आंत घेऊन गेली. मग त्याजकडून देवास नमस्कार करविला व त्याजवरून मीठ मोहऱ्या ओंवाळून टाकल्या.

एके दिवशीं सकाळीं कृष्णानें देवघरांत खेळत असतां, देव्हाऱ्यांतील सगळे शाळिग्राम तोंडांत घालून गिळून टाकले. इतक्यांत नंद स्नान करून आला व देवपूजेस बसला; पण देव्हाऱ्यांत पहातो तों एकही शाळिग्राम नाहीं. मग तो तसाच उठला व यशोदेजवळ येऊन तिला विचारूं लागला कीं, देव्हाऱ्यांत आज एकही शाळिग्राम दिसत नाहीं; ते कोणीं नेले? हें ऐकून ती त्याला ह्मणाली, कृष्ण तिकडे आज खेळत होता; त्यानेंच ते कोठें तरी लपविले असावे. त्याच्याजवळ मागा म्हणजे तो देईल. त्यावरून तो कृष्णाचें प्रेमानें चुंबन घेऊन व त्याला उचलून घेऊन म्हणाला, बाळा, शाळिग्राम कोठें ठेविलेस? आणून दे हं. तें ऐकून कृष्ण ह्मणाला, मला शाळिग्राम ठाऊक नाहींत. मजवर आळ घेऊं नका. मी सर्वातित, अकर्त्ता आहें; करणें, न करणें हें मजपाशीं

नाहीं. तेव्हां नंद ह्मणाला, मी शाळिग्रामपूजा केल्याशिवाय कधींही अन्न घेणार नाहीं. मग कृष्णानेंही त्याचा दृढ निश्चय पाहून आपलें तोंड उघडिलें; त्यांत नंदाला असंख्य शाळिग्राम, सूर्य, शक्ति, गणपति, शंकर हीं सर्व दाखविलीं; तेणेंकरून तो आनंदित होऊन देहभान विसरला. कांहीं वेळानें कृष्णानें त्याच्यावर मायेचें आवरण घातलें व त्याचे सगळे शाळिग्राम दिले. ते घेऊन नंदानें देवपूजा केली व कृष्णासह भोजन केलें.

एके रात्रीं सर्व गोपाळ चोरीस निघाले. त्या वेळीं सर्वांनीं कृष्णावर रुसवा करून विनंती केली कीं, ज्या त्या वेळीं आह्मांस श्रम व मार सोसावा लागतो; व तूं आपला गारोड्यासारखा पळून जातोस. ह्मणून आह्मीं तुझ्या समागमें येतच नाहीं. परंतु कृष्णानें सर्वांचें समाधान करून त्यांस माध्यान्हीस एका गवळणीकडे नेलें; आणि सर्व कवाडे बंद असतां गोपाळांस डोळे मिटण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सर्वांनीं करतांच, जेथें दुभत्याचीं भांडीं होतीं तेथें आपण सर्व गोपाळ आहों असें सर्वांनीं पाहिलें. मग मोठ्या आनंदानें यथेच्छ दूध, दहीं, ताक, लोणी, व साई इत्यादि खाऊन ढेंकर दिले; व पुनः डोळे मिटण्यास सांगून एकंदर मंडळी रस्त्यावर जाऊन उभी राहिली. त्या वेळीं कृष्णाचा एक परम मित्र पेंदा या नांवाचा होता. त्याच्या मनांत कृष्ण डोळे मिटण्यास सांगितल्यावर मग काय कपट करितो तें आपण पहावें, असें येऊन येतेवेळीं किंचित डोळे उघडे ठेविले. तेव्हां वरकड सर्व बाहेर गेले व तो मात्र आंत राहिला. इतक्यांत कांहीं आवाज ऐकून गवळणी जाग्या झाल्या, तों त्यांणीं पेंद्यास दुभत्याच्या खोलींत पाहून

सर्व मिळून त्यास मारूं लागल्या. त्या वेळीं कृष्णस्मरण करितांच तो मंडळींत बाहेर आला.

इकडे गवळणींनीं, दुधादह्यांचीं भांडीं सर्व फोडून छिन्नभिन्न केलीं आहेत व गोरसही जिकडे तिकडे उडविलें आहे असें पाहून, तेवढ्या रात्रीं मडक्याच्या खापऱ्या हातांत घेऊन त्या नंदाकडे फिर्यादी आल्या. मध्यरात्रीचा समय असून सर्व लोक सुस्त निजलेले, अशा संधीस गवळणी नंदगृहीं आल्या; असें पाहून पहारेकऱ्यांनीं नंदास व यशोदेस उठवून त्यांची दाद लाविली. त्या सर्वांची फिर्याद ऐकल्यावर नंदानें कृष्ण पाहिला तों आंथरूणावर आहे! तसेंच कित्येक सेवकांकडून गोपाळ, पेंदा इत्यादि सर्वांचा शोध त्यांच्या घरांत करविला, तों तेही सर्व घरींच आहेत; असें ऐकून त्या गवळणींचा त्यानें निषेध केला. नंतर कित्येक लोकांनिशीं नंद त्या गवळणींकडे गेला, व पहातो तों दारांस कुलुपें लागलीं आहेत. नंतर आंत जाऊन पहातात तों, सर्व भांडीं जेथच्या तेथें बरोबर असून सर्वांत दूध, दहीं, लोणी, गच्च भरलेलें आहे. तेव्हां त्या खापऱ्या अर्थात दुसऱ्या मडक्याच्या फोडून कृष्णाच्या अंगीं लबाडी लावावी याचकरितां गौळणींनीं आणल्या असें झालें. पेंद्यास मारलें असें त्यांनीं सांगितलें होतें; परंतु पेंद्यानें ह्मटलें कीं, मी काल रात्रौ मुळींच घराबाहेर पडलों नाहीं! तशांत त्याच्या घरच्या मनुष्यांनीं देखील तशीच साक्ष दिली. तेव्हां सर्वच ह्मणणें खोटें पडलें. तेव्हां गवळणी घाबरल्यासारख्या होऊन नंदास शरण आल्या. त्यानें त्यांस चांगला उपदेश केला. नंतर तो आपल्या घरीं आला.

पुढें एके दिवशीं कृष्ण एका गवळणीच्या घरीं जाऊन चोरून दहीं खाऊं लागला. इतक्यांत ती बाहेरून घरांत आली व कृष्णास पाहून ह्मणाली, बरा आतां सांपडलास! असें ह्मणून तिनें त्यास दधिपात्रासह यशोदेजवळ आणिलें, आणि ह्मटलें, यशोदाबाई, ह्या तुमच्या कृष्णानें बहुत वेळां गोरस खाल्लें; व ह्यास धरावें ह्मणून मी पुष्कळ दिवस जपत होतें; पण तो सांपडला नाहीं; तो आज मुद्यासह धरून आणिला आहे. हें ऐकून यशोदा त्याला बोलली, कृष्णा, काय हें केलेंस? तेव्हां कृष्ण ह्मणाला, माते, ही गवळण, अगदीं खोटें बोलते. यशोदा ह्मणाली, पण तुझ्या तोंडाला दहीं माखलें आहे, त्यावरून तूं खचित गोरस खाल्लें असावेंस. हें ऐकून तो ह्मणाला, आई, मी तुला खरेंच सांगतों, मी मार्गांत खेळत असतां बहुत गोपाळ आले; त्यांनीं मला चोरी करावयास येतोस काय ह्मणून विचारलें. पण जेव्हां मी येत नाहीं असें सांगितलें, तेव्हां त्यांनीं मला बळेंच हिच्या घरीं ओढून नेलें. तेथें गेल्यावर गोपाळांनीं सर्व गोरस भक्षण केला, व मी लांब उभा राहून उगाच पहात होतों; इतक्यांत ही गवळण घरांत आली. तिला पाहून सर्व गोपाळ पळून गेले. मग हिनें माझ्या तोंडाला दहीं फांसलें, व दटावून मडकें हातीं दिलें व ओढीत ओढीत मला येथें घेऊन आली! असें बोलत असतां, त्यानें आपलें दह्यानें भरलेलें तोंड मातेच्या पदराला पुसलें; व तिच्या गळ्याला मिठी मारली. तें पाहून ती गोपिका गदगदां हंसत घरीं निघून गेली; व मनांत म्हणूं लागली, हरीची लीला ब्रह्मादिकांना कळावयाची नाहीं ती मला कोठून कळणार?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

एके दिवशीं प्रातःकाळींच कृष्ण उठला व आईजवळ दूध प्यावयास मागूं लागला. तेव्हा यशोदा त्यास म्हणाली, बाळा, आज रविवार आहे; ह्यास्तव प्रथम खंडेरायाला दुधाचा नैवेद्य दाखविल्याशिवाय तें ( दूध ) उष्टें करूं नये; केलेंच तर तें तीव्र दैवत आपल्यावर कोपेल. तेव्हां कृष्णानें खंडेराय कोठें आहे म्हणून विचारिलें असतां, यशोदा त्याला म्हणाली, तो देव्हाऱ्यांत आहे; जाऊन पहा. असें ऐकतांच तो देव्हाऱ्याजवळ आला व आईस हांक मारून म्हणाला, माते, तूं खंडेराय देवाचें मोठें सत्व सांगतेस; तर ह्या लहानशा दोरीनें हे सगळे देव कसे बरें म्यां अडकवून ठेविले आहेत? आतां तुझा देव माझें काय करिल ? असें ह्मणून लागलाच तो सर्व दूध नैवेद्य दाखविल्यापूर्वीं प्याला.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं कृष्ण उठला व आईस म्हणाला, मला कडेवर घे; माझी मान वांकडी झाली आहे व दोन्ही डोळे दुखताहेत! तें ऐकून तिनें कृष्णाला कडेवर घेऊन म्हटलें, बाळा, काल तुला नैवेद्य दाखविण्यापूर्वीं दूध पिऊं नको म्हणून सांगितलेलें त्वां ऐकिलें नाहीं; पण उलट खंडेरायाची थट्टा केलीस. ह्मणून त्याचा तुजवर कोप झाला. आतां मी काय करूं! असें बोलून तिनें देव्हाऱ्याजवळ येऊन प्रार्थना केली कीं, हे खंडेराया, माझ्या हरीला कृपा करून बरा कर. नंतर देवाचा अंगारा कृष्णाच्या कपाळीं लावला. इतक्यांत तेथें म्हाळसापति ( खंडेराय ) साक्षात प्रगट होऊन यशोदेला म्हणाला, तुझें अपार पुण्य म्हणून हा त्रैलोक्यनाथ हरी तुझ्या उदरीं आला. आम्हीं सर्व दैवतें याच्या अंगभूत

आहोंत; ह्मणून यालाच तूं अनन्यभावानें शरण जाऊन भज. तेणेंकरून आम्हीं सर्व देव तृप्त होऊं. असें बोलून तो तात्काळ गुप्त झाला.

एके दिवशी कृष्ण यशोदेला ह्मणाला, आई, आधीं मला जेवायाला वाढ. तेव्हां ती ह्मणाली, तान्हया, मी अगोदर देवपूजा करून देवाला नैवेद्य दाखवितें; व मग तुला वाढतें बरें? तें ऐकून कृष्ण बोलला, तुझे देव आहेत तरी किती? त्यावर ती ह्मणाली, खंडेराव महाखडतर दैवत आहे; देवी महातीव्र आहे; गणपति ज्याचें आरंभीं नांव घेतलें असतां पावतो ; असे अनेक आहेत. हें ऐकून कृष्ण गदगदां हंसून ह्मणाला, तूं ह्या सगळ्या देवांस पुजतेस त्यापेक्षां एका देवाधिदेवाला कां भजत नाहींस? तेव्हां ती म्हणाली, तो परमात्मा आम्हांला कसा बरें दिसेल? असें ऐकतांच कृष्णानें तिला चतुर्भुज नारायणरूप दाखविलें. तें पाहून तिनें त्यांस साष्टांग नमस्कार केला. पुढें त्यानें पहिल्याप्रमाणें बाळरूप धरलें; व यशोदाही पूर्ववत मायाजाळांत गुंतली.

पुढें एके दिवशीं श्रीहरीनें देव्हाऱ्यांतील सर्व दैवतांस बोलावून त्यांकडून आपल्या मातेला सांगविलें कीं, 'प्रथम कृष्णाला जेवूं घाल व मग आमची पूजा करून नैवेद्य दाखीव; म्हणजे आम्हीं सर्व तृप्त होऊं.' असें जेव्हां यशोदेनें ऐकिलें, तेव्हां ती सप्रेमें तटस्थ झाली.

एकदां कृष्ण ओसरीवर खेळत असतां यशोदा म्हणाली, मुरारी, लवकर ये व दुग्धपान कर. तेव्हां तो म्हणाला, मला दूध प्यायाला नको. त्यावर ती म्हणाली, बाळा, बळीराम बाहेर गेला आहे तों लवकर ये व दूध

पी; नाहीं तर तो आपला वांटा मागेल. नंतर तो म्हणाला, माते, दूध प्याल्यानें काय होतें तें मला सांग. तेव्हां ती बोलली, शेंडी मोठी होते व काळें अंग गोरें होतें! हें ऐकून कृष्ण हंसला व म्हणाला, आज याची प्रचीत पहातों. असें म्हणून त्यानें दुधाची वाटी तोंडाला लाविली. नंतर एका हातानें शेंडी धरून व अंगाकडे पाहून तो बोलला, माते, माझी शेंडी वाढली नाहीं व काळें अंग जसें आहे तसेंच आहे. तेव्हां ती म्हणाली, बाळा, तुझी शेंडी आतांच एकदम मोठी कशी होईल? हळू हळू मोठी होईल. असें मातेचें भाषण ऐकून कृष्ण हंसूं लागला.

एकदां बळराम व कृष्ण खेळत असतां राम म्हणाला, अरे कृष्णा, तुला ठाऊक नाहीं असें एक मी सांगतों ऐक. आईनें कोंडा देऊन तुला पोसणें घेतलें आहे. कशावरून हें खरें म्हणून विचारशील, तर पहा. तुझीं आईबापें गोरी व त्यांचाच जर तूं पुत्र असतास, तर त्यांच्यासारखा गोरा असतास. पण तूं अगदीं काळा आहेस; यावरून तुला पोसणें घेतलें आहे असें नाहीं कां वाटत? असें ऐकतांच कृष्ण स्फुंदस्फुंदून रडूं लागला. हें दुरून यशोदेनें पाहिलें. मग जवळ येऊन त्याला हृदयीं धरलें आणि आपल्या पदरानें त्याचे अश्रु पुसून विचारलें, बाळा, तुला कोण काय बोललें? तेव्हां कृष्ण म्हणाला, आई, दादा मला कोंडा देऊन त्वां पोसणा घेतलेला म्हणतो. असें ऐकून यशोदा म्हणाली, बाळा, तूं माझ्याच उदरीं जन्मला आहेस बरें. तुला चिडवावें म्हणून हा बळराम उगाच कांहीं बरी बोलतो. असें सांगून तिनें त्याचें चुंबन घेतलें व घरांत नेलें.

एकदां कृष्ण लवकरच निजून उठला व एका गोपीच्या घरीं गेला. ती घरांत नाहीं असें पाहून, तिच्या सगळ्या गाई सोडून रानांत हांकून लावल्या; आणि त्यांच्या जागीं सगळे बैल बांधून ठेविले. इतक्यांत गोपी माघस्नानास गेली होती ती आली; व घाईघाईनें भरणा घेऊन धारा काढावयास सरसावली. पण सर्वच बैल आहेत असें तिला दिसून आलें; तेव्हां तिला वाटलें कीं, कृष्णाशिवाय दुसऱ्या कोणीं ही करणी केली नाहीं! नंतर ती यशोदेकडे येऊन गाऱ्हाणें सांगू लागली. त्या वेळीं यशोदेनें हातांत वेताटी ( काठी ) घेतली व गोविंदास मारावयास धांवली. असें पाहून तो पळत सुटला व ती त्याच्यामागें लागली. इतक्यांत वाटेनें नंद येत होता, त्याला तिनें कृष्णाला धरावयास सांगितलें. त्यावरून त्यानें कृष्णाला धरलें व हृदयाजवळ उचलून घेऊन चुंबन घेतलें. इतक्यांत यशोदा जवळ येऊन म्हणाली, याला सोडूं नका; यानें अनंत खोड्या करून सगळ्या गोकुळांतील गौळणींना फार पिडिलें आहे. याला शिक्षाच केली पाहिजे. असें मातेचें भाषण ऐकून कृष्ण नंदास ह्मणाला, बाबा, त्या लबाड गौळणी मजवर नसतेच आळ घेतात व लटकींच गाऱ्हाणीं आईला येऊन सांगतात; तीं हिला खरीं वाटतात. मग ही मला मारावयाला धांवते; पण त्यांचा खोटसाळपणा कळत नाहीं. हें त्याचें भाषण ऐकून नंद व यशोदा हंसूं लागलीं व कृष्णासह घरीं आलीं.

एके दिवशीं बळीराम हरीबरोबर खेळत होता. उभयतांनीं गोपाळ सारखेसारखे वांटून घेतले होते. खेळतां खेळतां डाव कृष्णावर आला असें पाहून, त्यानें ब-

ळिरामाकडील दोन गोपाळांच्या शेंड्या बांधून त्यांना झाडावर लोंबत ठेविलें व आपण लपून बसला. इकडे त्या गोपाळांनीं तरफडून ओरड केली, ती ऐकून बळिरामानें त्यांच्या शेंड्या सोडल्या व त्यांना झाडावरून उतरलें. नंतर खेळ आटोपून सर्वजण आपापल्या घरीं गेले. तेव्हां त्या गोपाळांनीं आपापल्या आईला कृष्णाच्या खोडीविषयीं सांगितलें. मग त्या लागल्याच यशोदेजवळ येऊन गाऱ्हाणीं सांगूं लागल्या कीं, कृष्णानें आमच्या मुलांच्या शेंड्या बांधून त्यांना झाडांना अडकवून ठेविलें. तेव्हां यशोदा कृष्णास म्हणाली, बाळा, तुझ्या खोड्या नित्य किती सोसाव्या ? आतां एखादें शास्त्र तरी शीक, म्हणजे शहाणा होशील. मग कृष्ण म्हणाला, मला कोणतें शास्त्र शिकविणार ? यशोदा म्हणाली, देवाचें शास्त्र; तें शिकलें असतां देव मुक्ति देतो. हें ऐकून कृष्ण म्हणाला, असेंच जर आहे, तर ती मुक्ति मला नको; ती तुलाच असो. मी कधीं चोरी सोडणार नाहीं ! त्यावर यशोदा म्हणाली, बाळा, असेंरे काय म्हणतोस ? चोरी करणार नाहीं अशी शपथ घे पाहूं. तेव्हां कृष्ण म्हणाला, आई, तुझीच शपथ; मी गोरसावांचून चोरी करणार नाहीं ! असें ऐकून यशोदा कौतुकानें हंसूं लागली.

एके रात्रीं कृष्ण एका गवळणीकडे जाऊन सर्व निद्रिस्थ आहेत असें पाहून, तिच्या सुनेशीं व्यभिचारकर्म करूं लागला. बांगड्यांचा आवाज ऐकून ती म्हातारी गवळण जागी झाली ; आणि तिनें सुनेच्या व्यभिचाराविषयीं मनांत आणिलें. मग तिनें हळू हळू अंधारांतून त्या अंथरुणावर जाऊन कृष्णास हातीं धरिलें; आणि यथेच्छ

ताडण करून बांधून ठेविलें. कृष्णानें तिचे फारच आर्जव केले; परंतु तिणें त्यास सोडलें नाहीं. तिणें सांगितलें कीं, एक तुह्मीं तरी अपराधी ; नाहींपेक्षां आम्हीं तरी अपराधी होऊन गोकुळांतून निघून जाऊं. नंतर प्रात:-काळ झाल्यावर एका हातांत आपल्या सुनेस व दुसऱ्या हातांत कृष्णास धरून लगबगीनें चावडीवर चालली. वाटेंत शेंकडों गवळी व गवळणी तिच्यामागें जमल्या. त्या सर्वांस वाटलें कीं, ही म्हातारी गवळण आपल्या मुलास व सुनेस घेऊन चावडीवर कां चालली आहेत ? इकडे या गवळणीस वाटलें कीं, आपली आज फजिती झाली तरी चिंता नाहीं; पण एवढ्या मंडळीसमक्ष कृष्ण अपराधी आहे अशी खात्री एक वेळ यशोदेची होऊं द्या. अशा थाटानें ती ह्मातारी यशोदेजवळ जाऊन उभी राहिली. तिला यशोदेनें विचारिलें कीं, कां बाई, तुझ्या मुलानें व सुनेनें काय तुझा अपराध केला कीं त्यांस तूं चावडीवर आणिलेंस? म्हातारी म्हणाली, हा माझा मुलगा नव्हे. हा तुमचाच चोरटा व छिनाल कृष्ण आहे. आज-च्या माझ्या फजितीवरही लक्ष न देतां, माझ्या सुनेशीं व्य-भिचारकर्म करीत असतां धरून दोघांसही मीं येथें आ-णिलीं आहेत. हें ऐकून शेकडों मनुष्यें त्या ठिकाणीं जीं जमलीं होतीं, त्यांस आश्चर्य वाटलें. आणि कित्येकांनीं तिला बरीच फजीत केल्यावर, यशोदा ह्मणाली कीं, बाई, आतां मात्र तुमची पराकाष्ठाच झाली. अग, हा कृष्ण न-व्हे, तुझा मुलगाच आहे; हें आतां तुला चौघांदेखत आ-णखी दाखवितें. असें म्हणून कृष्णास आंतून हांक मारून तिच्यापुढें उभा केला. त्या वेळीं ती म्हातारी आपल्या

हातीं धरलेल्या कृष्णाकडे पाहूं लागली; तेव्हां तिलाही तो तिचाच मुलगा व दुसऱ्या हातीं तिचीच सून दिसली. मुलास नंदानें विचारतांच त्याणें सांगितलें कीं, महाराज, मी आपल्या बायकोशीं रात्रौ रममाण असतां, माझ्या आईनें, 'कृष्ण कृष्ण' म्हणून मला धरून बडविलें; व रात्रभर बांधून ठेवून सकाळीं मला या फजितीस पात्र केलें! पुढें असेंही म्हणाला कीं, आपल्याजवळ जर मथुरेहून अशी राजाची आज्ञा आली असेल कीं, नवऱ्यानें आपल्या बायकोशीं संग करूं नये; तर मात्र मी अपराधी खरा!! इतकी फाजिती झाल्यावर ती म्हातारी गवळण निमूटपणें खालीं मान घालून, यशोदेच्या पायांवर मस्तक ठेवून घरीं चालती झाली.

एके दिवशीं कृष्णाच्या मनांत असें आलें कीं, गवळणींसह नौकेंत बसून जलक्रीडा करावी. म्हणून यमुनातीरावर कित्येक तरुण व सुंदर गोपी जमवून, त्यांसह एका नौकेजवळ तो गेला. परंतु तेथें नावाडी नव्हता, यासाठीं कृष्णानेंच तें कृत्य स्वतावर घेऊन गोपींस आंत बसवून नाव पाण्यांत लोटली. ती नौका मध्यभागीं गेल्यावर अकस्मात् मोठा वारा सुटून पाण्याचा भयंकर उसाळा चालला. तेव्हां सर्वांनीं घाबरून नानाप्रकारें देवांचीं आर्जवयुक्त गाणीं म्हटलीं व सर्वांस आश्वासनही कृष्णानें दिलें; तथापि जेव्हां गोपींनीं घाबरून आकांत मांडला, तेव्हां कृष्ण बोलला कीं, पहा, भयंकर अडचणीचा प्रसंग जर प्राप्त झाला, तर मनुष्यानें आपल्या लज्जेचाही त्याग केला पाहिजे. तोच समय हा आहे. ह्मणून तुम्हीं सर्व गोपींनीं आपलीं लुगडीं फेडून व चोळ्याही काढून नावेच्या फुटक्या भागांत भराव्या; ह्मणजे सर्व अरिष्ट टळेल. गो-

पींनीं विनंती केली कीं, महाराज, आपणच विघ्नकर्ते व हर्ते; व आपलें वचन मोडील असा प्राणी या त्रिभुवनांत नाहीं. मग आमची कथा काय? आम्हीं हात वर करून उभ्या राहतों. आणि आपण आपल्या इच्छेप्रमाणें पाहिजे तर स्वहस्तें आमचीं वस्त्रें सोडून घ्यावीं. लज्जा हरण करणें किंवा राखणें हीं दोन्हीं आपणाकडेसच आहेत. असें ह्मणतांच कृष्णानें कृपादृष्टीनें पाहिलें, तों वायु शांत होऊन नौका क्षणांत तीरास येऊन लागली. तेव्हां सर्व गवळणी उतरून अगाध कृष्णलीला गात घरोघर गेल्या.

---

## अध्याय १० वा.

### यमुना व ब्रह्मदेव गर्वहरण.

कृष्णानें सवंगडी जमवून नित्य नवे नवे डाव योजून तितकेही खेळावे; व गोपाळांचीं मनें खुप राखावीं. तेंसेंच सर्व खेळगड्यांच्या शिदोऱ्या एके ठिकाणीं करून सर्वांसह मोठ्या स्वादानें खाव्या. एके दिवशीं गोपाळ यमुनेच्या तटाकीं खेळत असतां, कृष्णाचा आवडता मित्र पेंदा यास तहान लागल्यामुळें तो यमुनेवर येऊन, पाणी पीत असतां पाण्याचा खळखळाट ऐकून त्यास वाटलें कीं, पाणी हें निर्जीव असून आपल्यापेक्षां शब्द अधिक मोठ्यानें करितें! तर आपणही त्यास हटवूं, असें ह्मणून त्या आवाजासारखी आपण सर्व सोबत्यांस विसरून हुंबरी घालूं लागला. त्यास फार वेळ झाला ह्मणून, त्याच्या शोधास कृष्णानें कित्येक गोपाळ पाठविले. तेही येऊन पेंद्याबरो-

र हुंबरी घालूं लागले. हें पाहून राहिलेल्या संवगड्यां-नेशीं कृष्ण तेथें आला. तोही त्यांसमागमें हुंबरी घालूं ला-गला. अशी हुंबरी फार वेळ चालली. पण अशीच कांहीं वेळ चालेल तर सर्वांचे प्राण जातील, असें कृष्णास वाटून त्यानें आपल्या मुरलीचा मंजुळ ध्वनि केला. तो ऐकतांच यमु-नेचें पाणी अगदीं स्थिर झालें. तेव्हां हें कृत्य आपण हुंबरीनें केलें, असें सर्व गोपाळांस वाटून ते आनंदानें निघून गेले.

एके वेळीं ब्रह्मदेवास असें वाटलें कीं, श्रीकृष्ण हा पूर्ण अवतार आहे किंवा कसें याची परीक्षा पहावी. मग ज्या वनांत कृष्ण, गाई, गोप व वांसरें गेलीं होतीं, त्या वनांत तो गेला; व संधी पाहून, ते गोप, गाई, वांसरें इत्यादि सर्वांस त्यानें सत्यलोकास नेऊन ठेविलें. इकडे कृष्ण त्या जागेजवळ येऊन पहातो तों गाई, गोपाळ यां-पैकीं कोणीच तेथें नाहीं. तेव्हां हें कृत्य ब्रह्मदेवानें केलें असें जाणून, कृष्णानें जितकें नेलेलें तितकें नूतन निर्माण केलें; व नेहमीप्रमाणें गोपाळांसह न्याहाऱ्या खा-ऊन झाल्यावर गोपाळ व गाई घरोघर लावाव्या. या रीतीनें एक संवत्सर लोटला. ब्रह्मदेवास हें सर्व कळलें. मग त्याणें नंदाच्या घरीं येऊन कृष्णचरणीं मस्तक ठेवून त्याच्या हस्तगत सर्व गोपाळ व गाई केल्या.

एकाएकीं ब्रह्मदेव येऊन कृष्णाच्या पायां पडला या-वरून, व त्यानें आणलेले गोपाळ सत्यलोकांतील आपली बरदास्त ठेवल्याच्या व मिष्टान्नाच्या गोष्टी सांगत त्या ऐ-कून, नंद व यशोदा भ्रमसागरांत पडलीं. इतक्यांत नूतन उत्पन्न केलेले गोपाळ व गाई सर्व एकाएकीं गुप्त झाले, नंतर ब्रह्मदेवानें नंदयशोदेस हें सर्व वर्त्तमान सांगितलें.

---

# अध्याय ११ वा.

## कालियामर्दन व अग्निभक्षण.

एके दिवशीं कृष्ण आपल्या गोपाळांसह यमुनेवर खेळत असतां, दोनप्रहरची वेळ होऊन खेळाच्या श्रमानें गोपाळ तृषित झाले. परंतु कृष्णानें सर्वांस सांगितलें कीं, या यमुनेंत एक दुष्ट कालियासर्प रहातो ह्मणून तें पाणी पिऊं नका; प्यालेत तर अनर्थास कारण होईल. कित्येकांनीं या वचनावर भरंवसा ठेविला आणि कित्येकांस वाटलें कीं, आपलीं सर्व संकटें कृष्णच परिहार करणार; तेव्हां आपणास त्याची काळजी कशास पाहिजे? अशा विचारानें त्यांणीं तें प्राशन केलें. तें मुखांत जातांच लागलेच ते गतप्राण झाले. त्यांच्या समाचारास कृष्ण संवगड्यांसह तेथें आला; आणि आपल्या संवगड्यांचीं या प्रमाणें अवस्था पाहून त्यास क्रोध आला. जरी हे गोपाळ आपलें न ऐकतां पाणी प्याले, तथापि माझ्या भक्तांस कालियानें मारावें कसें? या करितां कृष्णानें कालियाचा सूड उगविण्याचा निश्चय केला; आणि पितांबराची कांस मारून कळंबाच्या झाडावर चढून डोहांत उडी टाकण्याची तयारी केली. हें पाहून सर्व गोपाळांनीं त्याच्या सभोंवतीं मिळून विनंती केली कीं, कृष्णा, असें तूं साहसकर्म करूं नको. एक तर तूं मरशील व आह्मांला अंतरशील. आणखी तुझ्या आईबापांचाही आह्मांस शब्द लागेल. कृष्ण ह्मणाला, कोणतीच गोष्ट विपरीत होणार नाहीं. तुह्मीं मला जाऊं द्या. मी आतांच जाऊन त्या दुष्टाचा संहार करून परत येतों. कृष्ण वारंवार मोठाच नेट करितो असें जाणून सर्वांनीं त्यास

घट्ट मिठ्या मारिल्या. परंतु कृष्ण, परमात्मा त्यास या गोपाळांची धरण्याची शक्ति ती काय? त्याणें जोरानें आपली मुक्तता करून त्या कळंबाच्या झाडावर चढल्यावर आपल्या गळ्यांतील माळ सांवरून धरिली. गोपाळांनींही झाडावर चढून व कृष्णास धरण्याचा निरुपाय पाहून कृष्णास शेवटची विनंती केली कीं, गड्या, गेले ते तर मुक्तच झाले; परंतु आह्मींही तुजवरून आपला प्राण ओंवाळून टाकतों. परंतु आतां तूं हें भयंकर कर्म न करितां परत चल व आह्मांस यश दे. कृष्णानें हें कांहींच न ऐकतां त्या भयंकर डोहामध्यें उडी टाकिली. गोपाळांनीं हें पहातांच रडून मोठा हलकल्लोळ केला. कित्येकांनीं आपलीं मस्तकें जमिनीवर आपटलीं व कित्येकांनीं मोठाच शोक केला. याप्रमाणें कित्येक तेथेंच राहिले व कित्येकांनीं शहरांत जाऊन नंद, यशोदा, बळिराम इत्यादिकांस यमुनातीरीं आणिलें. तेव्हां तेथें इतकी गर्दी झाली कीं, गोकुळांतील सर्व पुरुष व बायका ज्यांस हें वर्तमान कळलें, तीं सर्व तेथें आलीं व एकच दुःखाची आरोळी झाली. यशोदा आपलें वक्षस्थळ बडवून ह्मणाली कीं, लाडक्या कृष्णा, तुझें आईपण मला अगदीं शोभत नाहीं. मजपासून तुला वारंवार ताडण झालें ह्मणून, किंवा माझ्या वाईट शब्दांवरून राग येऊन तूं हें अघोर कर्म केलें असशील; परंतु खचित सांगतें कीं, या वेळेस माझा अपराध क्षमा कर. फिरून तुझ्या अंगास मी बोटही लावणार नाहीं. नंद बोलला, माझ्या कृष्णा, तूं देवाचा अवतार. अनेक अलौकिक असे प्रकार मला दाखविलेस. आणि मी यःकश्चित् गोकुळाचा पाटील तुझा बाप ह्मणवितों,

ह्मणून तुला वाईट वाटून हें कर्म केलेंस असें मला वाटतें; पण आतां मजवर दया करून एक वेळ भेट दे. गोपाळ बोलले, हे भगवंता, तुझी माया व लीला न जाणतां आह्मीं हीन जात गवळट यांणीं तुजजवळ खेळावें; व खेळतां खेळतां तुला मारिलेंही असेल; यासाठीं आह्मांस तूं टाकून गेलास. अरे, आमच्या मैत्रीची कांहींच तुला आठवण नाहींशी झाली काय? बरें, तूं एक वेळ आह्मांस क्षमा कर. फिरून आह्मीं तुझा मान राखूं. गवळणी बोलूं लागल्या, अरे कृष्णनाथा, आह्मीं यःकश्चित् गवळणींनीं तुजवर नानाप्रकारचीं बाळंटें घेतलीं व तुझ्या आईजवळ चहाड्या सांगितल्या, त्यासाठीं आह्मांवर राग धरला असशील; तर तूं एक वेळ आम्हांस भेट मात्र द्यावी. तुझी पुनः कधींच आह्मीं गोष्ट बोलणार नाहीं. सर्वांची प्रार्थना झाल्यावर बळरामानें सप्रेम प्रार्थना केली कीं, गोपालकृष्णा, तुझ्यासमागमें मी कांहीं खेळ खेळण्यास आपली संमती न दिल्यामुळें, तूं मजवर इतका रुष्ट झालास काय? तुझीं आईबापें दीनवदन होत्सातीं येथें रडत आहेत; कारण, तुजखेरीज त्यांस दुसऱ्या कोणाचीच आशा नाहीं; आणि तुझ्या संगती खेळणारे बाळगोपाळ येथें कसे म्लानवदन होऊन उभे आहेत? अरे सर्वांचीच दृष्टि त्या पाण्यावर लागली आहे. तुझे गुण, तुझी लीला, तुझी कीर्त्ति व तुझें अवतारचरित्र हें कोणीच जाणत नाहीं; परंतु बांधवा, आतां अंत कोणाचाच न पाहतां, आपण अवतार कोणत्या कारणासाठीं घेतला आहे, याचा तरी विचार करावा. कंस, चाणूर, मुष्टिक आदिकरून दुष्ट राक्षस अति उन्मत्त झाले आहेत. सद्भक्त ही संधि लक्षून तुझा

स्तव करीत आहेत. तात्पर्य आपणांस अजून पुष्कळ कृत्यें करावयाचीं आहेत; तेव्हां आतां विलंब न लावितां वर येऊन सर्वांचें दुःख दूर करावें. बळराम हे असें मार्मिक शब्द बोलत होता; परंतु सर्वांस ती नुसती प्रार्थनाच वाटली आणि सर्वांचें कान त्याच्या स्तुतीकडे व डोळे पाण्याकडे होते. ही प्रार्थना संपत आहे, इतक्यांत पाण्यास एक वेळ उसाळा येऊन त्यांतून रक्ताचा लोट बाहेर आला. सर्वांनीं तो रक्तप्रवाह पाहतांच, हा काय चमत्कार आहे हें बळिरामाशिवाय कोणाच्याच मनांत न येतां कृष्णाच्या मरणाची सर्वांस कल्पना येऊन दुःखाची एकच आरोळी झाली. बळरामानें सर्वांस सांगितलें कीं, आतां आपलें काम झालें. तुम्ही मजवर विश्वास ठेवून स्वस्थ असा. बळरामाच्या या वचनावर विश्वास ठेवून एकंदर मनुष्यें त्याच स्थळीं दुःखानें व्याप्त झालीं. बळरामाच्या मार्मिक भाषणावर कोणाचेंच लक्ष गेलें नाहीं.

आतां डोहांतील वृत्तांत असा झाला कीं, ज्या वेळीं कृष्णानें उडी टाकिली त्यासरसा तो कालियागृहीं गेला. त्याचें रूप पहातांच मुरली असलेली व कोटी सूर्यासारखी प्रभा पाहून नागकन्या अति लुब्ध झाल्या. आणि त्यास मोठ्या मानानें बसवून आगतस्वागत केलें व आपण कोण व या घोरस्थळीं येण्याचें कारण कोणतें ह्मणून विचारिलें. कृष्ण बोलला कीं, मी गोकुळांतील एका गवळ्याचा पोर आहे. माझे सवंगडी या डोहाचें पाणी पिऊन मृत्यु पावले; त्याचा सूड उगविण्याकरितां मी येथें आलों आहे. नागकन्यांनीं हात जोडून विनंती केली कीं, आपलें अल्प वय आहे व आपण या दुष्ट सर्पाचा

प्रताप न जाणतां अशी हाव धरून येथें आलां असाल; परंतु हा हेतु सोडून आपण आल्या मार्गानें काळमुखीं न पडतां मागें जाऊन आपल्या मातापितरांस भेटावें. कदाचित् परत जाण्यास आपल्यास संकट व भीति वाटत असल्यास, आह्मांतील एक आपल्यासमागमें येऊन आपल्यास वर पोंचवील. आपल्या लावण्यरूपाच्या दर्शनानें आज आमचें खरोखर जन्मसाफल्य झालें असें जाणून, आपला जीव दुःखांत न पडावा याकरितां ही विनंती करितों. आपली इच्छा असल्यास येथील कांहीं उत्तम वस्तूही आपल्यास देतों. तेव्हां कृष्णानें त्यांस सांगितलें कीं, माझे संवगडी मेलेले जर तुह्मीं जीवंत करीत असाल, तर मात्र मी आल्या मार्गानें परत जातों; कारण, मला दुसरी इच्छाच नाहीं. मग बिचारा काळिया राहिना कां जीवंत! परंतु जर अशी गोष्ट न होईल, तर त्याशीं युद्ध करून त्याचा प्राण घेतल्याशिवाय मी येथून जाणार नाहीं. नागकन्या ह्मणाल्या कीं, ती गोष्ट काळाच्या तर काय परंतु ब्रह्मदेवाच्याही हातीं नाहीं. एक परमेश्वर मात्र ती करील. आणि आपण मोठमोठ्यांनीं बोलतां, या शब्दाच्या आवाजानें जर तो चांडाळ उठला तर आपली विपत्ति आह्मांस आतांच पहावी लागेल; याकरितां हा नाद सोडा. याजवर कृष्णानें कांहींच उत्तर न करितां आपला वेणू वाजविला. तो ध्वनि ऐकतांच काळिया मोठ्या क्रोधानें पुढें आला; परंतु कृष्णाची गोजिरवाणी, सांवळी मूर्त्ति पहातांच त्याची दुष्ट बुद्धि जाऊन त्यास मोठ्या नम्रपणानें विचारितो कीं, मुला, तूं कोण आहेस व येथें कां आलास? आणि तूं मोठा पराक्रमी व

साहसी दिसतोस! तुला मारण्यासाठीं मी बाहेर आलों, परंतु मला तुझ तारण्याची बुद्धि झाली आहे; ह्मणून माझ्या घरची जी तुला प्रिय वस्तु पाहिजे ती घेऊन आल्या मार्गानें जा. मी तुला स्वतः वर नेऊन पोंचवितों. कृष्ण बोलला कीं, मला आवडती वस्तु देण्याचें तुझ्या स्वाधीन काय आहे? आतां तुलाच मी काय देतों तें पहा! काळिया हे शब्द ऐकतांच काळासारखा खवळून मोठ्यानें फुत्कारून कृष्णावर धांवून आला; परंतु त्या मुरलीच्या मोहक ध्वनीनें मोहित व भ्रमित होऊन भलत्याच दिशेस जाऊं लागला. शेवटीं मोठ्या त्वेषानें त्यानें कृष्णाच्या अंगास वेढे घातले. तेव्हां कृष्णानें आपलें अंग फुगविलें, त्यासरसे सगळे अंगांतील मणी विगलित होऊन व तो गर्भगलित होऊन तोंडानें गरळ वमूं लागला. त्याच्या श्वासोश्वासानें पाणी उष्ण झालें, व तो कासावीस झाला. त्या वेळीं कृष्णानें उडी मारून त्याच्या मस्तकीं आरोहण केलें. आणि लागलाच एक पाय मस्तकावर व एक पाय पुच्छावर दिला. नंतर आपली मुरली सुस्वर वाजवीत त्याणें तांडवनृत्य आरंभिलें. त्या वेळीं मात्र काळियाचे पंचप्राण व्याकुळ होऊं लागले. अशी आपल्या पतीची अव्यवस्था पाहून नागपत्न्यांनीं आपल्या हातांत पंचारती घेऊन मोठ्या प्रेमानें कृष्णास ओंवाळिलें; व विनंती केली कीं, देवा, तूं परमेश्वर असतां तुला यःकश्चित् मानून आह्मीं आपल्या पतीची तुजजवळ प्रतिष्ठा वर्णन केली; परंतु परिणामीं पतिप्राण कासावीस झाला असें पाहून विशेष वर्णन न करितां प्रथम येवढीच प्रार्थना करितों कीं, आमच्या पतीस प्राणदान व आह्मांस चुडेदान

द्यावें. कृष्णास त्यांची दीन वाणी ऐकून दया आली; व कालियास सोडिला. तो मोकळा होतांच कृष्णचरणीं मस्तक ठेवून आज्ञेची वाट पाहूं लागला. कृष्णानें त्यास तेथून एका दुसऱ्या स्थळीं जाण्याची आज्ञा केली. व ज्या गरुडाच्या भयानें कालिया यमुनाडोहांत लपून होता त्यापासूनही त्याचें भय दूर केलें. नंतर कालियावर बसून कृष्ण जळाबाहेर आला.

इकडे यशोदा, नंद, बळराम, गोप, गोपी व गोकुळांतील लोक हीं सर्व मोठा शोक करून कृष्णाची वाट पहात होतीं; यांपैकीं एकटा बळराम मात्र जागा होता, बाकीच्या सर्वांस दुःखनिद्रेनें व्यापिलें. इतक्यांत पाण्यांतून मुरलीचा मंजूळ ध्वनि श्रवणीं पडतांच, कृष्णाचें आगमन ओळखून त्यानें सर्वांस सावध करून उठविलें; तों कृष्ण भुजंगावर तांडवनृत्य करीत आहे, मुखानें मुरली वाजवीत आहे आणि नागपत्न्या कृष्णस्तुति करीत आहेत असें सर्वांनीं पाहिलें. मग ज्याप्रमाणें कमलाभोंवतीं भ्रमर जमतात, त्याप्रमाणें गोपाळांनीं प्रथम कृष्णास वेष्टिलें; आणि ते ह्मणूं लागले, अरे, खालीं उतर; तो साप तुला चावेल. तुझ्या मुरलीच्या ध्वनीनें तो भुलला आहे; तों उडी टाकून आमचे कडे ये. कृष्णानें सर्वांस सांगितलें कीं, तुह्मीं स्वस्थ येऊन मला भेटावें; याला कांहीं एक भिऊं नका. हा कालिया आपला आहे. यानंतर कृष्णास सर्व भेटले. गवळणींनीं चरणीं मस्तकें ठेविलीं. यशोदा ह्मणाली, कृष्णा, अरे तुला भेटण्याकरितां माझे बाहु स्फुरण पावत आहेत. हें प्रेमवाक्य ऐकून कृष्णानें खालीं उडी टाकून आईबापांस कडकडून भेटल्यावर बळरामाच्या गळ्यास

मिठी मारिली. आणि काळियागृहाचें वर्त्तमान सर्वांस सांगितलें. तें ऐकत व आनंदांत डुल्लत सर्व जन त्या रात्रीं तेथेंच राहिले.

तीन प्रहर रात्रीच्या सुमारास कित्येक उठून गोकुळांत जाण्याची तयारी करितात, तों चहूंकडून मोठा अग्नि लागून आपण आंत सांपडलों आहों, असें पाहून सर्वांस भीतीनें उठविलें. आणि गोकुळांत जाण्यास कोठूनच मार्ग नाहीं असें पाहून सर्व कृष्णास शरण जाऊन ह्मणाले, हे सर्वेश्वरा, तूं भक्तभयनाशक व करुणासागर आहेस. आह्मीं पामरांनीं तुझे अनंत गुण काय वर्णावे? नंतर कृष्णानें सर्वांस डोळे मिटण्यास सांगितलें. तसें करतांच विशाळ मुख पसरून कृष्णानें बारा गांवें अग्नि गिळून मार्ग मोकळा केला. त्या वाटेनें सर्व जन आनंदानें घरीं आले. कृष्णानें काळियास व त्याच्या स्त्रियांस आशीर्वाद देऊन सांगितलेल्या ठिकाणीं पाठवून दिलें.

---

# अध्याय १२ वा.

## गोवर्धनोद्धारण व व्योमासुरवध इ०

एकदां गोकुळांत नानाप्रकारचीं दुःश्चिन्हें व्हावयास लागलीं. अग्नि लागले; अवर्षण पडलें; तेव्हां याचें कारण काय असें कृष्णानें विचारिलें असतां सर्वांनीं सांगितलें कीं, ह्या सर्व अरिष्टांचा कर्त्ता इंद्र आहे. त्यास प्रति वर्षीं आपण वनांत जाऊन नैवेद्य अर्पण करीत असतों. ह्या वर्षीं ती वेळ चुकून कांहीं दिवस गेले आहेत; ह्मणून हीं दुःश्चिन्हें होतात. कृष्ण आपल्या सव-

गड्यांसहवर्त्तमान खेळत असतां, कितीएक संवगड्यांनीं येऊन कृष्णास सांगितलें कीं, आज घरोघरच्या बायका पक्कान्नें करण्याच्या उद्योगांत आहेत; आणि तुझी आईही करंज्या, लाडू इत्यादि पदार्थांचे हारेच्या हारे तयार करवीत आहे. कृष्णानें हें लागलेंच जाऊन आईस विचारिलें. तेव्हां तिनें सांगितलें कीं, उद्यां वनभोजन इंद्रास अर्पण करण्यास वार्षिक सांप्रदायाप्रमाणें सर्वांस रानांत जाणें आहे. कृष्णानें विनंती केली कीं, गोवर्धन पर्वतापासून आपल्यास व आपल्या सर्व जनावरांस फार हित होतें; ह्मणून इंद्रापेक्षां त्या पर्वतासच नैवेद्य समर्पण करावा, व आपण तेथेंच जेवावें हें मला चांगलें दिसतें. या वेळीं तेथें जितकी मंडळी होती, तितक्यांस ही गोष्ट चांगली वाटून सर्वांनीं त्याप्रमाणें बेत ठरविला. कृष्णानें लागलीच ही गोष्ट घरोघर सर्वांस कळविली. त्याप्रमाणें सर्वांनीं दुसरे दिवशीं अरण्यांत जाऊन गोवर्धनपर्वतास नैवेद्य दाखवून यथेच्छ भोजन केलें. ही गोष्ट इंद्रास कळल्यावर त्यास फारच राग आला. व त्यानें मेघांस वज्रधारेसारखा पाऊस गोकुळावर पाडण्याची आज्ञा केली.

इकडे कृष्ण, बळराम, नंद, यशोदा आणि इतर ग्रामवासी बायका व पुरुष अत्यानंदानें भोजनोत्तर विडे खात बसले असतां एकाएकीं इतका मोठा पाऊस कोसळला कीं, वस्त्रप्रावर्णें तर सर्व भिजलीं; परंतु अशी धास्ती पडली कीं, हीं सर्व मनुष्यें व एकंदर गोकुळ आतां वाहून जाईल कीं काय? या वेळीं कृष्ण व बळराम यांस पर्जन्यापासून कांहीं अपाय होऊं नये, याकरितां सर्वांनीं आपापल्या अंगानें आच्छादन केलें. कृष्णानें हें सर्व इंद्राचें कपट

म्हणून सर्व संवगड्यांस सांगितलें कीं, जर तुह्मी मला साह्य कराल तर आपण हा गोवर्धनपर्वत वर उचलून त्याखालीं सर्व आश्रयास बसूं; ह्मणजे सर्व विघ्न टळेल. हें ऐकतांच सर्व लोकांनीं आपापल्या काठ्या डोंगरांत रोंव-ल्या व कृष्णानेंही आपली करंगळी लाविली. याप्रमाणें तो मोठा पर्वत सर्वांनीं आपल्या मस्तकावर सांवरून धरिला. बाहेर पाऊस तर पूर्वीप्रमाणें पडतच होता. असा कांहीं वेळ गेल्यावर सर्व गोकुळांतील पुरुष, बायका व मुलें त्या पर्वताखालीं सुखानें बसून आपलीं वस्त्रें वाळवून आनंदानें काळक्रमण करीत आहेत. तेव्हां मोठ्या नेटानें आपल्या काठ्यांचे टेंके सर्व गोपाळांनीं दिले असून कृष्णानें आपली एक करंगळी मात्र पर्वतास लाविली आहे; असें पाहून गो-पाळ बोलले कीं, कृष्णा, आह्मी मात्र श्रमानें मरत आहों; आणि तूं आपला निर्धास्त उभाच आहेस! उगाच करंगळी-चा टेका तरी कशाला देतोस? ती आपली घे काढून! हें ऐकून कृष्णानें आपली करंगळी पर्वतापासून हळूच सोडल्या-सारखी केली, तों लागलाच पर्वत खालीं पडूं लागला; व सर्वांचे प्राण कासावीस झाले. नंतर सर्वांनीं कृष्णास नमस्कार करून प्रार्थना केल्यावर कृष्णानें पर्वत पुनः वर धरिला. मग इंद्रास फारच राग येऊन त्याणें सात दिवस अहोरात्र ही पर्जन्यवृष्टि तशीच चालविली. त्या योगानें जरी हीं सर्व मंडळी पर्वताखालीं निर्भय राहिली, तरी गोकुळाची अगदीं दाणादाण झाली. गोकुळाची बातमी यांस व यांची गोकुळास कळेना.

अशी पराकाष्ठा केल्यानेंही आपलें कांहींच चालत नाहीं; कारण, गोपाळ व कृष्ण वगैरे मंडळी आनंदानें सात दिवस-

पर्यंत नित्य नवे नवे पदार्थ करून भक्षण करीत आहेत; पर्जन्याचा एक थेंबही त्यांच्या अंगास उपद्रव करीत नाहीं; तशांत गोकुळांतही देवानें बंदोबस्त ठेविल्यामुळें सर्वत्र स्वस्थता राहिली; असें पाहून, इंद्र स्वतः इतर देवांसहवर्त्तमान कृष्णास शरण आला आणि त्याच्या चरणावर मस्तक ठेवून आपल्या कृतापराधाची त्यानें क्षमा मागितली. तो ह्मणाला, हे जगन्नायका, तुझा पराक्रम न जाणतां मीं हें कर्म केलें. नंतर यशोदा, राम व नंद आदिकरून मंडळीस इंद्रानें सांगितलें कीं, तुह्मांस देवांपासूनही भय नाहीं. मग कंसाची व इतरांची तर कथा काय? यशोदे, हा तुमच्या पोटीं परब्रह्मअवतारच आला आहे. असें बोलून ती अवेळीं झालेली पर्जन्यवृष्टि नाहींशी केली. नंतर गोपी, गोप, व मातापितरांसहवर्त्तमान बळराम व कृष्ण गोकुळांत गेले.

कंसास तर रात्रंदिवस कृष्णाची मोठीच धास्ती पडली होती. एकदां त्याणें व्योमासुर नांवाचा एक प्रबळ दैत्य कृष्णवधार्थ पाठविला. तो एका गोपाळाचें रूप घेऊन जेथें बळराम, कृष्ण व गोपाळ खेळत होते त्याच मेळ्यांत आला व सर्वांशीं स्नेहानें वागून खेळूं लागला. तो शरिरानें चांगला दांडगा असल्यामुळें, त्याणें एकामागून एक अशा सर्व गोपाळांचे डाव आपल्यावर आणून एकेकास खांद्यावर बसवून त्यास एका भयानक प्रचंड पर्वताच्या गुहेंत एक जागा करून ठेविली होती, त्या ठिकाणीं नेऊन ठेवी. अशा प्रकारें त्या दैत्यानें बहुतेक गोपाळ, गाई आणि वांसरें त्या स्थळीं नेऊन ठेविलीं. हा सर्व प्रकार बळरामानें अवलोकन करून कृष्णास सांगितलें कीं, हा दैत्य

आहे, गोपाळ नव्हे. कृष्णानेंही तें जाणलेंच होतें; परंतु उगी-च मौज पहात होता. जेव्हां त्याणें बहुतेक गोपाळ लांब-विले, त्या वेळीं कृष्णानें त्याशीं खेळतांना त्यावर डाव आणून त्याजवर घोडी घेतली. आणि त्या दैत्यास तो ब-राच लांब गेल्यावर विचारिलें कीं, अरे चोरा, माझे गोपा-ळ व गाई कोठें ठेविल्या आहेस त्या मला दाखीव. तेव्हां त्याणें लागलेंच कृष्णास खालीं उतरून आपलें दैत्यरूप प्रगट केलें. कृष्णानें तत्क्षणींच त्याच्या मस्तकावर एक मुष्टिप्रहार करून त्यास मूर्छित केलें. इतक्यांत जवळच पर्वताच्या आंत गाई व गोपाळ हीं होतीं, त्या सर्वांच्या दीनवाणी आरोळ्या कृष्णकर्णीं आल्या. तेव्हां कृष्णानें एका पायाखालीं त्या असुरास दाबून आपल्या सुंदर मुर-लीचा ध्वनि केला; आणि सुदर्शनास प्रेरणा करून तो पर्वत दुभंग केला. तेव्हां त्यांतून गाई व गोपाळ सर्व आनंदानें येऊन रामकृष्णांस भेटले. मग त्या दाबलेल्या असुरास सर्वांनीं एक एक लाथ व एक एक बुक्की देऊन ठार मारिलें.

या राक्षसाच्या मरणानंतर एकदां दोन प्रतापी असुर, ज्यांच्या लोखंडासारख्या भुजा, मोठे पराक्रमी व त्या-समागमें अक्रा हजार राक्षस देऊन, कृष्णवधार्थ कंसानें पाठविले. ते सर्व गोपाळांसह रामकृष्ण ज्या ठिकाणीं क्रीडा करीत होते, त्या ठिकाणीं जाऊन कृष्णास कंसाचा एक निरोप सांगितला. कृष्णानें तो निरोप मान्य करून दोघां मुख्यांस सांगितलें कीं, तुह्मी दोघे आह्मांजवळ रक्ष-णार्थ राहून एके गंधर्वगृहांत तुह्मांकरितां भोजनसामग्री त-यार करून ठेविली आहे त्या ठिकाणीं सर्वांस भोजन कर-ण्यास पाठवावें! आणि तुह्मांकरितांही येथें भोजन आणून तें

तुह्मीं यथेच्छ भक्षण केल्यानंतर मग तुह्मीं आह्मीं मिळून मथुरेस जाऊं!! हें गर्भित भाषण त्या मूर्ख असुरांस खरें वाटून, ते दोन राक्षस कृष्णाजवळ राहून बरकड सर्व त्या गंधर्वस्थानास गेले. तेथें पूर्वीच कृष्णानें तयारी करून ठेविली होती, त्याप्रमाणें त्या गंधर्वांनीं राक्षस पोचतांच एकेकास दोन दोन असामींनीं असा मार दिला कीं, त्यांच्या शरिरांत एकही हाड मोडल्याशिवाय राहिलें नाहीं. असे चांगलें बडवून नंतर त्यांना बांधून कृष्णा जवळ उचलून आणिलें. त्यांत जे मोठे दोन प्रबळ राक्षस होते, त्यांच्या मस्तकांवरही दोघांनीं दोन मुष्टीटोले मारून ठार मारिलें. बाकीच्यांस अभय देऊन कृष्णानें सोडतांच त्यांणीं शंखध्वनि करीतच मथुरेस जाऊन झालेलें वर्तमान कंसास सांगितलें. तें ऐकून कंसास फारच भीति वाटूं लागली.

# अध्याय १३ वा.

## देवांतक, पितृद्रोही, जळासुर व असुरासुर वध.

एके दिवशीं सकल गोपाळांसह कृष्ण वनांत धेनु चारीत असतां, सर्व गोष्टीनें निर्धास्त जे गोप ते रानांत विश्रांतिस्थानीं सुस्त निजले; अशी संधि पाहून कृष्णानें मायापाश योगानें सर्व गाई व वांसरें नाहींशीं केलीं. गोप उठून तीं नाहींशीं पाहून हें संकटनिरसनार्थ त्या सर्वांनीं कृष्णस्तुति केली. तेव्हां कृष्णानें आपल्या वेणूंतून मंजूळ ध्वनि काढून सर्व गाईंस बोलाविलें; त्याबरोबर सर्व गाई व वांसरें येऊन कृष्णाकडे लक्ष लावून तीं ध्याने ऐकत स्तब्ध उभीं राहिलीं. तें पाहून सर्वांस आनंद झाला.

एके वेळीं कोणीच गोकुळांत विष्णुपूजा करीत नाहीं, व उपदेश केला असतां नाना कुतर्क घेऊन मोड करितात ह्मणून मायालाघवयोगानें कृष्णानें नंद, रोहिणी, यशोदा व बळराम यांशिवाय करून एकंदर गोकुळवासी जनांस वेड लाविलें. हा चमत्कार पाहून नंदयशोदेनें कृष्णस्तुति केली; तेव्हां तें वेड नाहींसें झालें व क्षुद्र दैवतांची पूजा करावयाची सोडून सर्व विष्णुपूजा करूं लागले.

अकरा सहस्र राक्षसांस यथेच्छ मुष्टिमोदकांची मेजवानी देऊन कृष्णानें वाटेस लाविल्यावरून, अति कोपायमान होऊन कृष्णवधार्थ देवांतक व पितृद्रोही दैत्यांस कंसानें पाठविलें. त्या उभयतांनीं भयंकर व्याघ्रांचीं रूपें घेऊन बळराम, कृष्ण व त्यांचे संवगडी यांच्या अंगावर आले; व भयंकर गर्जना करून गोकुळांतील सर्व जनाला फार भेडसावलें. त्या वेळीं कृष्णानें व बळरामानें जाऊन त्या दोनही व्याघ्रांचा एकएका मुष्टीप्रहारेंकरून संहार केला व सर्व गोपजनांस भयमुक्त केलें. लोकांनीं हा प्रकार नंदयशोदेस सांगून उभयतांस आईजवळ नेल्यानंतर, त्या दोघांवरून यशोदेनें मीठमोहऱ्या ओंवाळून त्यांस देवाजवळ नेलें; आणि वाघांच्या हस्तें मुलें सोडवून आणिल्याबद्दल त्याची स्तुति केली.

यानंतर कंसानें एक जळासुर नामक दैत्य कृष्णवधार्थ पाठविला. त्याणें यमुनेंत आपलें ठाणें दिलें. हें कृष्णानें जाणून, त्याच तटाकीं खेळ खेळण्यास सर्व गोपाळांस आणून डाव आरंभिला. कांहीं वेळानें कित्येक गोपाळ तृषित होत्साते पाणी पिण्यास त्या स्थळीं जाऊन, जलास स्पर्श करतांच त्या जळासुरानें बहुतेकांस आंत

ओढून नेलें. कृष्णानें हें पाहून आपला हात लांब करून त्या असुरास पाण्याबाहेर ओढून काढून मारिलें. व त्याचें विशाळ प्रेत सर्वांकडून ओढवून नंद यशोदेस दाखविण्यास गोकुळांत नेलें.

जळासुर निमाल्यानंतर, कंसाकडून असुरासुर नामें एक महा प्रबळ राक्षस कृष्णावधार्थ आला. तो कृष्णाजवळ येऊन फारच बरळूं लागला, व इतके राक्षस मारल्याबद्दल मीच सूड घेईन अशी प्रतिज्ञा करूं लागला. त्या वेळीं त्याचें कांहींसें अंगमर्दन मात्र कृष्णानें केलें; परंतु त्याचें मरण हनुमंताच्या हस्तानें होतें ह्मणून त्याचें स्मरण करून तो आल्यानंतर त्याच्या हातानें त्या राक्षसाचा वध करविला.

एके वेळीं कृष्ण संवगड्यांसह खेळत असतां, कंसाकडील कित्येक रंगारी उत्तम वस्त्रें रंगवून व कित्येक माळी सुवासिक पुष्पमाळा व गुच्छ असा सरंजाम तयार करून मथुरेस नेत होते. तें पाहून कृष्णानें त्यांस प्रथम समजून सांगितलें कीं, या माळा व तुरे या गोपाळांस देऊन व हीं उत्तम वस्त्रें त्यांच्या अंगावर घालून त्यांचा आशिर्वाद जर तुह्मीं घेतलात तर तो तुह्मांस मोठा श्रेयस्कर होईल. हें ऐकून ते या भाषणाची फार निर्भर्त्सना करून, कृष्णास व रामास वाईट शब्द बोलून पुढें चालूं लागले. त्या वेळीं कृष्णानें गोपाळांकडून त्यांस खूप ठोकवून त्यांनीं आणलेलीं फुलें, हार, तुरे व वस्त्रप्रावर्णें सर्व गोपाळांस पांघरविलीं. हा प्रकार माळी व रंगारी यांनीं जाऊन कंसास सांगितल्यावरून त्याचें भय दुणावलें व त्याची झोंपही कृष्णानें नेल्यासारखी झाली.

इकडे कृष्णास यशोदेनें असे वेडे चाळे केले असतां कंसास फार राग येईल, व त्याचा दुस्तर परिणाम आपल्यास भोगावा लागेल असें सांगितलें. कृष्ण ह्मणाला, आई, त्याजविषयीं तूं अगदीं काळजी बाळगूं नको. कंसास राग तर काय परंतु संताप असल्यासही भीति नाहीं!

---

# अध्याय १४ वा.

## अघासुर, धेनुकासुर इत्यादि वध.

एकदां कंसाकडून मोठ्या कठीण प्रतिज्ञेनें कृष्णवध करण्याकरितां अघासुर या नांवाचा एक भयानक राक्षस आला. तो कृष्ण, गोपाळ व गाई रानांत ज्या मार्गानें जावयाच्या, त्याच मार्गावर भयंकर अजगररूप धरून तोंड पसरून बसला. त्याच्या तोंडांत कृष्णासह सर्व गेले. ज्या वेळीं त्यानें तोंड मिटलें, त्या वेळीं गोपाळांस वाटलें कीं, आपण सर्व राक्षसमुखांत आहों. त्या वेळीं सर्वांनीं कृष्णस्तुति केली. कृष्णानें आपलें मोठें विराट रूप प्रगट केलें, तेणेंकरून त्या अजगराचा फक्त जबडाच उघडला असें नाहीं, परंतु सर्व अंग दुभांग होऊन तो उलथून पडल्यानंतर गाई व गोप सर्व मोकळीं झालीं.

यानंतर कंसानें धेनुकासुर नांवाचा दैत्य पाठविला. तो एका सुंदर बैलाचें रूप घेऊन एका आडरस्त्यावर बसला. त्याचा बेत असा होता कीं, आपली गाई चुकली असें कृष्णास वाटून तो जवळ येईल व येतांच त्यास एकाएकीं शिंगें मारून ठार करावा! परंतु तो प्रकार विपरीत होऊन त्याच्याच प्राणावर प्रसंग आला. तो असा

कीं, त्या वृषभरूपी असुराला कृष्णानें पूर्ण ओळखून आपल्या वेणूच्या मंजुळ ध्वनीनें मोहित केलें. तें इतकें कीं, मी कोण व कृष्ण कोण याचें त्यास अगदीं विस्मरण झालें. अशा संधींत कृष्णानें त्याजवळ जाऊन त्याचीं शिंगें धरिलीं व त्याच क्षणीं त्यास गतप्राण केला.

कृष्णानें धेनुकासुरास ठार केला असें समजतांच कंसास भय वाटूं लागलें. तेव्हां केशी या नांवाचा राक्षस कंसासमोर येऊन मोठ्या प्रतिज्ञेनें ह्मणाला, दैत्यराज, मी एका क्षणांत गोकुळाचा संहार करीन. माझा प्रताप पाहून देवादिकांनाही पळ काढावा लागतो. चंद्र, सूर्य थरथरां कांपतात. मजपुढें कृष्ण व बळराम क्षणभर देखील टिकणार नाहींत. त्यांचा हां हां ह्मणतां प्राण घेईन. असें ऐकतांच कंस परम संतोष पावला. त्यानें त्यास वस्त्रेंभूषणें देऊन गौरविलें. नंतर तो पर्वतप्राय अश्वरूप धारण करून गोकुलासभोंवतीं दणाणत चालूं लागला. तेणेंकरून सर्व नगरवासी जनांस आज गोकुळ रसातळास जातें असा भास झाला. सर्व भयानें थरथर कांपूं लागलीं. असें पाहून कृष्णानें त्यांस अभय दिलें. पुढें जसा हत्तीवर सिंह चालून जातो, तसा कृष्ण अश्वरूपी केशी राक्षसावर धांवत गेला व त्यानें त्याचा प्राण घेतला.

पुढें प्रलंबासुर नांवाचा दैत्य कंसानें पाठविला. त्यानें समोर लढण्याचें न करितां युक्तीनें कार्य साधण्याचा निश्चय करून एका पाड्याचें रूप धरिलें; आणि नित्य यथेच्छ गोभोजन करूं लागला. ती बातमी कांहीं दिवस कोणास कळली नाहीं; परंतु कृष्णानें एके दिवशीं त्यास ओळखून आपटून मारिलें व सर्व मृत गाई जिवंत केल्या.

यानंतर एके चांदण्या रात्रीं बळीराम व कृष्ण गोपींसह आनंदानें खेळत असतां, शंखचूड नामक दैत्य तेथें आला. बरोबर एक यक्ष होता. असे ते दोघे गाईचा वेष धारण करून दूर हंबरत राहिले. तें त्यांचें हंबरणें ऐकून कृष्ण बळीरामास ह्मणाला, या वेळीं गाईंना वाघ धरून नेत आहे ह्मणून त्या दुःखानें हंबरत आहेत; त्यांना सोडविलें पाहिजे. असें बोलून कृष्णानें एक मोठा ताडवृक्ष उपटून हातीं घेतला, व जिकडून आवाज ऐकू येत होता तिकडे चालला. मागून बळीरामही एक प्रचंड वृक्ष उपटून निघाला. ते उभयतां जवळ येत आहेत असें पाहून, त्या दैत्यांनीं गाईचें रूप टाकून वाघ बनल्यावर त्वरेनें पळ काढला. त्यांचा पाठलाग करीत कृष्ण व बळीराम चालले. शेवटीं दैत्यांनीं व्याघ्ररूप साडून ते भयंकर असुररूपानें समोर युद्धास उभे ठाकले. इतक्यांत रामकृष्णांनीं आपल्या हातांतील प्रचंड वृक्षांचे प्रहार करून त्यांचा चुराडा केला.

कोणे एके वेळीं, कृष्ण हा पूर्णावतारी आहे किंवा कसें, ही प्रतीति पाहण्याकरितां नंदास वरुणानें पाताळीं नेऊन ठेविलें. नंदाचा सर्वत्र शोध चालला. सर्व शोकसागरांत बुडाले. इतक्यांत, 'नंद यमुनेंत बुडाला' अशी हांक सगळ्या गोकुळभर झाली; ती यशोदेच्या कानीं आली. तेव्हां ती अपार शोक करूं लागली. असें पाहून कृष्ण यशोदेला ह्मणाला, माते, तूं शोक करूं नको; मी पित्याला पहा कसा लवकर घेऊन येतों. नंतर त्यानें यमुनातीरीं येऊन लागलीच पाण्यांत उडी टाकिली. त्या वेळीं यशोदेला वाटलें कीं, कृष्णानें गोवर्धनपर्वत उचलला; बारा

गांवें अग्नि गिळिला; अघासुर, केशी इत्यादि महाप्रबल दैत्यांस ठार केलें; यावरून हा नंदास खचित घेऊन येईल.

कृष्ण यमुनाजलांतून वरुणलोकीं गेला. त्याला दुतांनीं पहातांच धांवत येऊन वरुणास सांगितलें, श्रीकृष्ण भगवान् क्रोधाविष्ट होऊन आपल्याकडे येत आहे. तो काळाचाही महाकाळ व सर्वांस शासन करणारा आहे. आपल्या सामर्थ्यानें तो एका क्षणांत सर्व ब्रह्मांड जाळून टाकील. तेव्हां, कृष्णास कोप येण्यासारखें कृत्य आपल्याकडून घडलें ह्मणून वरुणास वाईट वाटलें; व तो भयाभित होत्साता कृष्णास शरण गेला व नम्रतेनें ह्मणाला, हे प्रभो, दीनानाथा, मी नेणतपणें तुझा अंत पाहिला; हा जो मजकडून अपराध घडला त्याची कृपा करून मला क्षमा कर. हे पुराणपुरुषा, तूं ब्रह्मादिकांनाही दिसत नाहींस; पण मला साक्षात् दर्शन देऊन पावन केलेंस. असें बोलून वरुणानें श्रीकृष्णाची षोडशोपचारें पूजा केली. तेव्हां श्रीपति त्यास ह्मणाला, अविद्येच्या योगानें मोहित होत्साता तूं निजस्वरूपास विसरलास; आतां देहाभिमान टाकून निरंतर स्मरणीं दक्ष ऐस. अशी भगवंताची आज्ञा त्यानें शिरसावंद्य करून नंदास हरीजवळ आणून दिला. नंतर नंदासह कृष्ण यमुनेबाहेर आला. त्यांना पाहून सर्व गोकुळवासी जनांस अत्यानंद झाला. यशोदेनें धांवून कृष्णाला आलिंगन दिलें. सर्व गौळी नंदास भेटले; आणि त्यांना वाजतगाजत घरीं पोंचविलें. त्या वेळीं नंदानें पुष्कळ दानधर्म केला व याचकजन सुखी केले. नंतर कृष्णासह भोजन केलें; या वेळचा आनंद अवर्णनीय होय.

एके वेळीं देवीच्या पुजनाकरितां नंद, गोपाळ, कृष्ण व बळराम हे वनांत गेले होते. तेथें सर्वांनीं देवीची पूजा केली व भोजनोत्तर कोणी निजले व कोणी खेळत बसले; अशा संधीस नंदास एका अजगरानें निजल्या ठिकाणींच गिळण्यास प्रारंभ केला. त्या वेळीं नंद मोठ्यानें ओरडूं लागला. तेव्हां सर्व सावध होऊन त्या अजगरास कोणी काठ्या व कोणी धोंडे मारूं लागले; परंतु त्यानें नंदास न सोडितां गळ्यापर्यंत ग्रासिलें. कृष्ण मुळींच न भितां हा चमत्कार पाहत उगीच होता. नंदानें त्यास करुणस्वरानें हांक मारितांच धांवत जाऊन त्या अजगराचे चिरून दोन तुकडे केले आणि नंदास बाहेर काढिलें. इकडे नंद उठून बसला, तों त्या अजगरदेहांतून एक सुदर्शन नांवाचा गंधर्व निघून पुढें हात जोडून उभा राहिला व कृष्णस्तुति करून नंतर आपला शापग्रस्त झाल्याचा व अशी अपराधाची गोष्ट करण्याची संधि साधण्याचा व त्याच प्रकारें उःशाप मिळाल्याचा वृत्तांत कृष्णास कळविला तो असा:—मी सुदर्शन नांवाचा गंधर्व; पण महाउन्मत्त होतों. एकदां मी स्त्रियांसह जलक्रीडा करीत असतां कांहीं ऋषि त्या वाटेनें चालले होते. त्यांना नमस्कार केला नाहींच; पण उलट त्यांची मी निंदा करूं लागलों. तेव्हां त्यांनीं मला शाप दिला कीं, 'तूं सर्प होऊन वनांत पडशील.' हें ऐकून मीं त्यांस साष्टांग नमस्कार केला व हात जोडून पुढें उभा राहिलों. तेव्हां त्यांनीं कृपा करून मला उःशाप दिला कीं, 'श्रीकृष्ण शक्तिवनांत येईल व त्याच्या चरणाचा तुला स्पर्श होतांच तूं मुक्त होशील.' हें आज घडून आलें. देवा, माझें पूर्व पुण्य उदयास आलें; ह्मणून तुझीं पावलें

आज माझ्या दृष्टीस पडली. असें सांगितल्यावर तो सुदर्शन कृष्णास वंदन करून स्वस्थानीं गेला. नंतर सर्व मंडळी वाजतगाजत आपापल्या घरीं आली. यशोदेनें घरीं आल्यावर कृष्णास ह्मटलें, बाळा, आमच्या सर्व संकटांचा नाश करणारा असा तूं पूर्णपरब्रह्म, आमचा देव आहेस; हें आतां आह्मांस समजलें. असें ऐकतांच कृष्ण गडबडां लोळूं लागला व कांहीं केल्या रडतांना थांबेना. तो इतकेंच ह्मणे कीं, तुह्मीं मला देव ह्मणूं नका. शेवटीं यशोदेनें आम्हीं, तूं देव आहेस असें ह्मणणार नाहीं; असें कळवून त्यास प्रेमानें आलिंगन दिलें.

एके वेळीं नारदस्वामी कंसाकडे गेले. कंसानें पूजन केल्यानंतर त्यास सांगितलें कीं, प्रसंगोप्रसंगीं यशास प्राप्त करणारीं कृत्यें मी तुला सुचवित गेलों व त्याप्रमाणें तूंही बहुत प्रयत्न केलेस; परंतु दुर्दैवयोगानें सर्व गोष्टी अजून विपरीतच घडत आहेत. ह्मणून तूं आतां असें न करितां तुझ्या वैऱ्यास फारच दीर्घ उपायानें मारण्याचें करावें. तुला वाटत असेल कीं, तो यःकश्चित् गवळ्याचा पोर, पण त्यानेंच तुझे महा पराक्रमी राक्षस मारिले. तेव्हां, अग्नीच्या ठिणगीस लहान ह्मणून उपेक्षा करून जर गवतांतच ठेविली, तर तिजपासून मोठा प्रळयाग्नि उत्पन्न होण्यास विलंब लागेल काय? इतकें बोलून नारद स्वस्थानीं गेले.

नारदस्वामी गेल्यानंतर, बाणासुर, वज्रासुर, भौमासुर शिशुपाळ, काळयवन व वक्रदंत इत्यादिकांसमागमें बहुत सैन्य देऊन कंसानें पृथ्वीवरील ब्रह्मस्थलभंग, तपविध्वंस, धर्मनाश, इत्यादि घोर पातकें करण्याची धुमाळी माजविली.

इकडे नारदानें या वर्त्तमानाचा खुलासा कृष्णास कळ-

विला. त्यावरून एके वेळीं सर्व लोकांस गोकुळ सोडून वृंदावनांत वस्ती करण्याचें कृष्णानें सांगितलें; परंतु तें कोणीच ऐकेनात. तेव्हां गीर्वाणभाषेंत रामकृष्णांनीं कांहीं भाषणें केलीं. मग कृष्णानें आपले पांचचार केंस तोडले; त्यासरसे सर्व शहरांत लांडगे उत्पन्न होऊन लोकांस फार त्रास देऊं लागल्यामुळें शेवटीं त्या सर्वांस गोकुळ सोडून वृंदावनास कांहीं दिवस जावें लागलें.

एकदां कंसाकडून प्रलंबासुर या नांवाचा दैत्य एका गोपाळाचा वेष धारण करून आला. तो सर्वांसमागमें खेळूं लागला. ज्याचा आपल्यावर डाव येई, त्यास तो खांद्यावर बसवून गरगरां फिरवीत असे. असे सर्व गोपाळ त्रासले; परंतु उपाय चालेना. कोणास त्याची ओळखही पटली नाहीं. त्याणें आपला मतलब साधण्याची संधि पाहून एके दिवशीं बळरामाशीं डाव खेळत असतां आपल्यावर डाव घेतला. तेव्हां बळराम लागलाच त्याच्या खांद्यावर बसला. त्यास घेऊन त्या असुरानें कांहीं लांब जाऊन मागें परतावें तें न करतां एकदम मथुरेची वाट धरिली. हें पाहून बळरामानें त्याच्या मस्तकावर एक वज्रमुष्टीचा प्रहार करून त्यास तात्काळ यमलोकीं धाडलें.

नंतर कंसानें बकासुर दैत्य पाठविला. त्याणें बगळ्याच्या रूपानें जाऊन यमुनेंत वस्ती करून पक्षी व जलचरें यांचा बराच संहार केला. हे जाणून कृष्ण यमुनातटीं गेला. दैत्यानें त्यास पहातांच सगळा गिळला. सर्व संवगडी यांणीं हें पाहून कृष्णासाठीं फारच आक्रोश मांडला. इतक्यांत कृष्णानें आपलें अंग फुगविलें; त्यायोगानें व्याकुळ होऊन तो बकासुर प्राणास मुकला. मग

कृष्ण सर्वांस भेटून गोकुळांत गेला. याचप्रमाणें कृष्णानें अरिष्टासुर दैत्याचाही प्राण वज्रमुष्टीनें घेतला. नंतर कंसानें कागासुरास पाठविलें. त्याशीं बळरामानें व कृष्णानें कांहीं वेळ मल्लयुद्ध केलें. परंतु त्याचें मरण वीरभद्राच्या हातून होतें ह्मणून त्याचें स्मरण केलें. स्मरण करितांच तो कृष्णासमोर येऊन उभा राहिला. तेव्हां त्याकडून त्या दैत्यास मारून टाकविलें. याच रीतीनें खगासुर व विव्यासुर यांचाही संहार केला. नंतर वृंदावनांत गेलेली सर्व मंडळी परत गोकुळांत येऊन राहिली.

कंसानें कृष्णाचा घात करण्यास एकामागें एक मोठमोठे प्रबल दैत्य पाठविले; परंतु त्या सर्वांस मृत्युद्वारीं जावें लागलें. कांहीं केल्यानें शत्रूचा नाश होत नाहीं; ह्मणून कांहीं तरी युक्ति योजून रामकृष्णांस मारावें; असें कंसाच्या मनांत येऊन, त्याणें सर्व प्रबल व प्रळयी दैत्यांची एक सभा करून त्यांत याविषयीं फारच भवति नभवति केली. तेव्हां कित्येक शहाण्या असुरांनीं असें ठरविलें कीं, कांहींतरी एक मोठें अवघड कोडें नंदाकडे पाठवावें; ह्मणजे त्यास तें उलगडणार नाहीं. नंतर त्याबद्दल नंदाकडून राम व कृष्ण घ्यावे. मूर्ख मंडळीस ही युक्ति मान्य झाली. आणि त्याप्रमाणें लहान तोंडाच्या चार मोठ्या घागरी आणवून, तसेच मोठे चार कोहळे आणवून व त्या घागरींत कांहीं वाळू भरून दैत्यांसमागमें त्या गोकुळास नंदाच्या घरीं पाठविल्या. आणि असें सांगून पाठविलें कीं, कंसासुरानें हे कोहळे ह्या घागरींत घालून, व वाळूच्या दोऱ्यांचीं शिकीं वळून त्यांत ह्या घालून मथुरेंत फार जल्द मागितल्या आहेत. आणि जर

हें तुमच्यानें न होईल, तर तुमचे बळराम व कृष्ण दोघे मुलगे मथुरेस पाठवून द्यावे. असो. मथुरेहून कोणीच दैत्य गोकुळांत फार दिवसांत आला नाहीं, यामुळें कंसानें कृष्णाकडे लक्ष कमी केलें; असे विचार इकडे चालले होते; इतक्यांत या घागरी व निरोप श्रवण करितांच सर्व चिंतासमुद्रांत पडले.

नंद, यशोदा व कित्येक नागरिकजन अशा चिंतेंत असतां, नंदानें धीट मन करून हें कोडें चार दिवसांच्या आंत उलगडून पाठवितों असा परत निरोप तर कळविला; व त्या सेवकांनीं नंदयशोदेस ह्या कोड्याच्या भरीस न पडतां तुह्मीं आपलीं मुलें कंसाच्या हस्तगत करावीं, त्यांस कंसराजा मोठ्या उत्सहानें ठेवील, असें कळवून ते मथुरेस जाण्याच्या बेतांत होते; इतक्यांत राम व कृष्ण तेथें खेळत खेळत आले. त्यांणी हें पहातांच नंदास सांगितलें कीं, या कोड्यास चार दिवस कशाला पाहिजेत? आतांच आह्मीं उलगडून देतों. असें बोलून त्या कंससेवकांच्या समक्ष कृष्णानें एकेक कोहळा एकेका घागरीच्या तोंडावर ठेवितांच ते चारही कोहळे घागरींत गेले व त्याच रीतीनें वाळूच्या दोऱ्या वळून त्यांचीं शिकीं केलीं व त्यांत त्या घागरी ठेवून त्या सेवकांच्या हस्तें त्या घागरी लागल्याच मथुरेस पाठविल्या. आणि नंदाच्या नांवानें कंसास सांगून पाठविलें कीं, हें कोडें तर कांहींच नाहीं; परंतु आणखीं जितकीं असतील तितकीं पाठवून द्यावीं! सेवकांनीं हें पाहून मनांत निश्चय केला कीं, आतां मात्र कंसाचा आयुष्यसमुद्र निःसंशय आटला व मथुरेचें राज्य खचित रसातळास जाणार. मग असा त्या उभय मुलांचा प्रताप

पाहून सेवकांनीं त्यांस वंदन करून मथुरेस प्रयाण केलें. हें कोडें उलगडणार नाहीं व निदान आठ दिवसांनीं तरी आपण सुखी होऊं, अशा स्वस्थ मनानें कंस बसला होता; इतक्यांत वाळूच्या शिक्यांत त्या घागरी आणल्याचें वर्त्तमान त्यास कळलें. व हजारों लोक राजवाड्यासमोर तो चमत्कार पहाण्यास सेवकांच्या मागें जमले आहेत असेंही कळलें. कंसानें तो प्रकार प्रत्यक्ष पाहून तर त्याचें सर्वांग भयानें थरथरां कापूं लागलें.

एके वेळीं कृष्णासह गोपमंडळी गोवर्धनपर्वतावर खेळत असतां, कंसानें असुरांकडून त्या पर्वतास चहूंकडून अग्नि लाविला. तेथील शुष्क गवत लागलेंच पेटून अग्नीचा एकच भडका झाला. तेव्हां सर्व घाबरल्यानंतर कृष्णानें सर्वांस डोळे मिटण्यास सांगितलें. त्याप्रमाणें करितांच एकंदर मंडळी त्या संकटस्थानांतून आपोआप निर्भयस्थानीं आली व सर्वांस आनंद झाला.

---

## अध्याय १५ वा.

### देवकीस कृष्णभेट व गोपीवस्त्रहरण.

कंसाचा तर कृष्णवधाविषयीं कांहींच उपाय चालेनासा झाला. रात्रंदिवस तो चिंतातुर असतां, त्याचे अनुयायी इतर राक्षस हे सर्व भूमंडळावरील जनांस त्रास देत होतेच. बंदिशाळेंतील वसुदेव देवकीचे तर फारच हाल होऊं लागले. एके वेळीं देवकी सचिंत असतां तिच्या मनांत असें आलें कीं, कृष्ण आपल्या उदरीं येऊन गोकुळांत नानाप्रकारें खेळ करितो आणि आपल्यास त्या सुखाचा

लेशही नाहीं ह्मणून एक वेळ तरी त्याची भेट व्हावी. कारण, आतां लवकरच मरण येणार; ह्मणून मरणकाळीं जर पुत्रदर्शन होईल तर दःखांत कांहीं सुख तरी होईल. तशांत आज श्रावणमासीं रविवारीं अमवास्या आली आहे. या दिवशीं सर्व मातांनीं आपल्या पुत्राची पूजा करून त्यांना वाणें द्यावीं असें आहे; पण मी कोणाला वाण देऊं ? मीं पूर्वजन्मीं अशीं कोणतीं महान पातकें केलीं होतीं ह्मणून कंसानें माझे सहा पुत्र मारले ? सातवा उदरांतच जिराला व आठवा तर मला अंतरला. आतां कृष्णा, मी कोठवर दुःख सहन करूं ? तुझी भेट कधीं होईल ? याप्रमाणें देवकी बंदिशाळेंत शोक करीत होती, हें सर्वसाक्षी कृष्णाला समजलें व लागलाच तो तेथें प्रकट झाला. त्याचें देवकीनें मोठ्या प्रेमानें चुंबन घेतलें व वसुदेवानें आनंदानें आपल्या मांडीवर घेतला. एक प्रहरपर्यंत त्यांचीं प्रेमाचीं भाषणें चालली होतीं. माझ्या पोटीं येऊन यशोदेजवळ तूं गेलास आणि मला तुझा लाभच नाहीं; असें देवकीच्या भाषणांत आल्यावरून कृष्णानें आईस विनंती केली कीं, ज्या कारणाकरितां मी जन्मास आलों आहे, त्या कृत्यासाठीं मला गोकुळांतच असण्याची अवश्यकता आहे. आपल्यास सुख जर माझ्याकडून न मिळालें तर मग मिळावें कोणापासून ? आपण स्वस्थ असावें. मी थोड्याच दिवसांत येथें येऊन कंसास मारीन व तुमची सुटका करून सर्व प्रकारें तुह्मांस सुख देईन. तोंपर्यंत ज्या ज्या वेळीं आपण माझी आठवण कराल, त्या त्या वेळीं मी एथें येऊन तुह्मांस भेटेन. आपण मजविषयीं काडीमात्र काळजी बाळगूं नये. अशा प्रकारें एक प्रहरपर्यंत बंदिशाळेंत कृष्ण वसु-

देव देवकीशीं बोलून त्यांचें समाधान करून निघून गेला. हें वर्त्तमान नारदमुखें कंसास कळतांच, त्यानें वसुदेव देवकीस श्रृंखलांसह आपल्याजवळ सेवकांकडून आणविलीं. तीं येतांच मोठ्या रागानें तो त्यांच्या अंगावर धांवून गेला; आणि शस्त्र वर उचलिलें, तों त्या दोघाभोंवतीं सुदर्शन असें फिरत आहे कीं, ज्यांत मुंगीलाही शिरकण्यास वाट नाहीं; मग शस्त्र कोठून चालणार, असें पाहिलें. तेव्हां आपण मागें सरून आपल्या सरदारांस आज्ञा केली कीं, तुह्मीं यांस ठार मारा. परंतु त्या सर्वांचीं शस्त्रें हस्तासुद्धां गळून जमिनीवर पडलीं व एका क्षणांत हजारों शस्त्रासह वीर त्या स्थळीं पडले. हें पाहून कंसास अशी भीति पडली कीं, न जाणो आपलीही तीच दशा होईल; ह्मणून त्या क्षणींच तो सभेंतून पळून जाऊन वसुदेव देवकीस परत बंदिखान्यांत पाठविलीं.

पुढें एके दिवशीं हरि आपल्या सोबत्यांसह वृंदावनांत खेळ खेळत असतां, कांहीं गौळणी त्याच वाटेनें गोरस विकावयाकरितां मथुरेस जात होत्या. त्यांत अति रूपवान व गोविंदाला अत्यंत प्रिय जी राधा, ती मध्य भागीं होती. ती हावभाव दाखवीत वारंवार कृष्णाकडे पाही. तेव्हां कृष्णानें आपल्या एका सोबत्यास सांगितलें, अरे गड्या, तूं झाडावर चढ व कोण कोणत्या गौळणी जात आहेत त्या पहा. हें ऐकून तो झाडावर चढला व हरीस ह्मणाला, कांहीं गौळणी मथुरेस जात आहेत; त्यांत जी एक सुंदर स्त्री आहे, ती घडोघडीं तुजकडे पहात आहे. तर तूं लवकर जाऊन तिला धर व आतांच दान माग. असें ऐकतांच कृष्ण आपल्या सोबत्यांसह धांवत गेला व

त्यानें राधेचा पदर धरला. तेव्हां तिनें भलतें सलतें कांहीं हरीनें बोलूं नये ह्मणून नेत्रसंकेतानें खुणाविलें. तें पाहून तो ह्मणाला, आमचें दान न देतां तुह्मी आडमार्गानें कां चालल्यात? तेव्हां राधा ह्मणाली, कृष्णा, जसा जसा वाढतोस तसा तसा तूं मोठा शहाणा होतोस! कारें उगाच वाटेनें अडवितोस? चावडीवर चल, ह्मणजे दिवाणासमक्ष विचारीन कसलें दान मागतोस तें. हें ऐकून तो ह्मणाला, तूं बायको असून चावडीची आवड धरतेस; पण मी दान घेतल्यावांचून कधींही राहणार नाहीं. यावर ती ह्मणाली, आतां जसें काय दान घेशीलच? कृष्ण ह्मणाला, अग नाचत देशील! नाहीं तर हा आड मार्ग सोडून कुंजवनांत चल. हें ऐकून ती ह्मणाली, कृष्णा, तूं फारसा बरळतोस? पण तुला ठकवून जाईन बरें? त्यावर तो ह्मणाला, जर मासा गळीं गुंतला आहे, तर तो कसा जाईल? त्याचप्रमाणें तूं. तेव्हां ती ह्मणाली, कृष्णा, तूं आह्मांस असा अडवून धरतोस व गोकुळांत अनेक खोड्या करतोस, हें बरें नाहीं. हें वर्त्तमान जर कंसाला समजलें, तर तो तुला गोकुळांतून घालवून देईल. असें ऐकतांच तो ह्मणाला, कंसाला तर क्षणांत मारीन; चाणूर, मुष्टिक यांचीही आपटून तीच वाट लावीन. इतकें केल्यावर तूं माझी नोवरी होशील ना? असें तो बोलत असतांना सर्व गौळणी हंसत होत्या. तेव्हां राधा ह्मणाली, कृष्णा, तुझा पुरुषार्थ मला ठाऊक आहे. तुला बायकांनीं उखळास बांधिलें.! त्वां खांद्यावर घोंगडी घेऊन वृंदावनांत गाई चाराव्या; पांवा वाजवावा; गोपाळांबरोबर हमामा घालावा; असें असतां कंसास मारीन ह्म..

णतोस, हें कोण खरें मानील? हें ऐकून पेंद्याला राग आला व तो तिला ह्मणाला, कृष्ण तर पूर्णब्रह्मसनातन आहे; याचा महिमा तुला ठाऊक नाहीं. यानें पुतनेचा संहार केला; तृणावर्त, अघ, बक इत्यादि राक्षसांचा वध केला; कालियाचें यमुनाडोहांत मर्दन केलें; बारा गांवें अग्नि गिळिला; ब्रह्मा, इंद्र, वरुण यांचा गर्व हरण केला; असा सर्वसमर्थ कृष्ण असतां, त्यास उगाच दूषण कां लावितां? असें ऐकून राधेची सखी चंद्रकला कृष्णाला ह्मणाली, गोपाळा, आमचें सर्व अन्याय क्षमा कर. जर गोकुळांत चोरी करून तुझें पोट भरत नसेल, तर आह्मांजवळ गोरस मागून घे; पण असा वाटेंत अडवूं नको व नसतेंच दान मागूं नको. आतां राधेला कां धरली आहेस? सोड, जाऊं दे तिला. नंतर राधा ह्मणाली, अगे चंद्रकले, हा हरी भलत्याच वेळीं पीडा देतो. यानें माझ्या संसारावर पाणी ओतलें! हा माझ्या गाई राखतो ह्मणून मी कांहीं बोलत नाहीं; नाहींतर याचे कान उपटून याच्या हातावर केव्हांच दिले असते!! हें ऐकून कृष्ण राधेला ह्मणाला, तुझ्या बापाचें मीं काय खाल्लें ह्मणून असें बोलतेस? आजपासून तुझ्या गाई मी खचित राखावयाचा नाहीं. असें कृष्णानें सांगितल्यावर राधा सद्गदित होऊन त्यास ह्मणाली, हे परमात्मा, जगदोद्धारा, मायानियंता, निर्विकारा, तूं गोकुळांत अवतार घेऊन आमचा उद्धार करतोस; तूं आमचा प्राण आहेस; आह्मीं तुझ्या वचनाधीन आहों; तुजवांचून एक क्षणभर देखील आह्मांला गोड वाटत नाहीं. तुझें नामस्मरण व गुण वर्णन न करतां जें प्रपंचभाषण आह्मीं करतों, तेणेंकरून जि-

व्हेला व्यर्थ श्रम मात्र होतात. या प्रमाणें राधेचें प्रेमयुक्त भापण ऐकून कृष्णाला दया आली व तो ह्मणाला, तुह्मीं नित्य 'भाव' हाच गोरस मला समर्पण करा. असें कृष्णवचन ऐकून सर्व गोपींनीं तें मान्य केलें; व त्या श्रीरंगाचे गुण गात मथुरेस गेल्या आणि सर्व गोरस विकून गोकुळांत परत आल्या.

एके वेळीं कित्येक गोपींनीं कात्यायनव्रत आचरण करून तत्सांगताप्रीत्यर्थ यमुनास्नानास आल्या होत्या. आणि आपल्या चोळ्या व लुगडीं तीरावर ठेवून आपण जलक्रीडा करीत होत्या. ही संधि कृष्णसंवगड्यांनीं साधून कृष्णास त्या स्थळीं आणिलें. कृष्णानें सर्व वस्त्रें गुंडाळून एका कदंबवृक्षावर नीट दिसतीं ठेवून आपणही तेथें स्वस्थ बसला. इकडे गोपी स्नानें करून वर आल्या आणि लुगडीं नाहींत असें पाहून, खिन्न होत्सात्या चहूंकडे नग्नच फिरूं लागल्या; तों त्यांच्या दृष्टीस लुगडीं घेऊन कृष्ण झाडावर बसला आहे असें पडलें. त्या वेळीं दीन वाणीनें त्यांनीं कृष्णाची प्रार्थना केली कीं, आपण व आह्मीं कोण याचा विचार करून आह्मांस अपराधाची क्षमा करावी. कृष्ण बोलला, आतां मी तुह्मांस वर्मीं धरून बसलों आहे. आणि जसा माझ्या खोट्या चहाड्या सांगतेवेळीं तुह्मीं विचार केला नाहीं, तशी प्रस्तुत मलाही तुमची करुणा येत नाहीं. तुह्मीं येथून चालत्या व्हा. तुह्मांवर आज हा प्रसंग आला; आतां तुह्मी लाज कां धरितां? आणि लज्जास्थळावर तरी एक हात कशाकरितां ठेविला आहे? गोपींनीं विनंती केली कीं, ज्यांचीं वस्त्रें तूं हरण केलींस त्यांची लाज तुझ्याशिवाय कोण राखील? कृष्ण

ह्मणाला, जर तुह्मांला आपलें कार्य करून घेण्याचें असेल तर आतां दोन्ही हातांनीं सूर्यास नमस्कार करा; ह्मणजे तो तुह्मांस ह्या संकटापासून सोडवील! नंतर गोपींनीं सूर्यास दोन्ही हात जोडले व त्या कृष्णास ह्मणाल्या कीं, महाराज, आतां आपण आमच्या मनांतील हेतु पुरवावा; आणि आमचे इच्छेप्रमाणें आमची कामशांति करून आह्मांस आमचीं वस्त्रें द्यावीं. नंतर कृष्णानें त्यांचीं ठेविलेलीं वस्त्रें त्यांस परत देऊन आपण खालीं उतरला. आणि त्यांस वचन दिलें कीं, शरदऋतूच्या आनंदकारक चांदण्यांत मी येऊन नियमित स्थळीं आपली मुरली मंजुळ स्वरानें वाजवीन; त्या खुणेवर विलंब न लावितां तुह्मीं सर्व गोपींनीं मजजवळ यावें, ह्मणजे मी तुमचे मनोरथ पूर्ण करीन. त्या सर्व गवळणींत राधा प्रमुख होती. तिजसुद्धां ही गोष्ट मान्य केल्यावर सर्वांनीं कृष्णाचा निरोप घेतला. आणि कृष्णही संवगड्यासहवर्त्तमान खेळण्यास दुसरीकडे गेला.

---

# अध्याय १६ वा.

## गोकुळवासी ब्राह्मणगर्वहरण.

श्रीकृष्ण परमात्म्याचें पूर्ण स्वरूप न ओळखतां अविचारानें गोकुळांतील सर्व ब्राह्मणांस एकदां असें वाटलें कीं, कृष्ण हा हलकट जातीचा असून सर्व गोकुळांत भ्रष्टाचार करितो; व आपणासही त्याचा स्पर्श झाल्याच्या योगानें आपल्या सर्व ब्रह्मकर्मास भ्रष्टपणा येतो; ह्मणून आपण गोकुळ सोडून रानांत जावें आणि तेथें निर्विघ्नपणें स्नान संध्यादि कर्में करावीं. त्याप्रमाणें सर्व ब्राह्मण आ-

पल्या कुटुंबासहवर्त्तमान वनांत झोंपड्या बांधून राहिले. असे कित्येक दिवस लोटल्यानंतर, एके दिवशीं ज्या रानांत हे ब्राह्मण होते, तेथें कृष्ण संवगड्यांसह खेळण्यास गेला व दोन प्रहरीं भुकेचें निमित्त करून त्या ब्राह्मणांच्या यज्ञशाळेंत जाऊन क्षुधाशमनार्थ त्यांजवळ कांहीं अन्न मागूं लागला. त्यांनीं हवन करण्यापूर्वीं तें अन्न गवळ्यांस देणें युक्त नाहीं असें निक्षूण सांगितलें. कृष्णानें सर्वांचा जीव मिळून एकच आहे, त्यास भेदाभेद नाहीं, इत्यादि नीति सांगूं लागतांच ब्राह्मणांनीं कृष्णास ताडण करून तेथून परत लाविलें. यानंतर कृष्णानें कित्येक संवगड्यांस आपला निरोप देऊन त्यांच्या स्त्रियांकडे मागील दारानें पाठविलें. तो निरोप कळतांच त्यांणीं उत्तर पाठविलें कीं, आपण स्वस्थ बसावें; आह्मीं आपणांस अन्न आणून पोंचवितों. कृष्ण संवगड्यांसह वनांत खेळत आहे, इतक्यांत इकडे ब्राह्मणस्त्रियांनीं नानाप्रकारचीं षड्रस पक्वान्नें तयार केलीं आणि त्यांच्या परातीं भरून व त्या आपल्या मस्तकावर घेऊन मागील वाटेनें त्या रानांत चालत्या झाल्या. त्यांनीं वाटेनें जातांना नीतिपर व वेदांतपर संवाद चालविले. इकडे मागें हवनसमयीं अन्न सिद्धता नाहीं ह्मणून, जो तो ब्राह्मण आपापल्या स्थळीं गेला आणि पाहतो तों घरांत बायको नाहीं. अन्न मात्र कित्येक स्थळीं तयार आहे. इतक्यांत त्यांच्यांतील एक स्त्री चुकल्यामुळें मागून जात होती. ती कांहीं लांब गेली नाहीं, इतक्यांत तिच्या नवऱ्यानें तिला धरून आणून ताडण केलें; तों ती लागलीच गतप्राण पडली. इकडे या सर्व स्त्रिया कृष्णाजवळ पोंचून पहातात तों, जी स्त्री मागें राहिली होती व जिच्याविषयीं वाटेंत

भाषणें चाललीं होतीं, ती कृष्णाजवळ परातीसुद्धां सर्वांच्या पहाण्यांत आली. याचें सर्वांस परमाश्चर्य वाटून त्यानीं एकचित्तें ईश्वरस्तुति केली. कृष्णानें तें अन्न सर्व गोपांस विभागून देऊन आपणही भक्षण केलें. आणि ब्राह्मणस्त्रियांस आशीर्वाद देऊन जाण्याची आज्ञा दिली. घरची जाचणी होईल ह्मणून स्त्रियांनीं प्रार्थना केल्यावर, त्यांस कृष्णानें अभय देऊन, 'तुह्मांस काळाचीही भीति नाहीं' असें सांगून लावून दिल्या. परंतु प्रथम आलेली स्त्री मात्र गुप्तरूपें तेथेंच होती. इतक्यांत ब्राह्मणमंडळी क्रोधयुक्त होत्साती आपल्या बायकांस ताडण करण्यासाठीं तेथें धांवत आली. व कृष्ण व गोपाळ जेवीतच आहेत असें पाहून तर त्यांस फारच संताप आला. जे दांडगे दांडगे होते ते पुढें येऊन ह्मणाले, कृष्णा, आमच्या बायका मोठ्याच नशीबवान कीं, त्या आह्मांस वाटेंत न आढळतां आडमार्गानें घराकडे गेल्या. असो. त्यांचा सूड घरीं गेल्यावर घेतां येईल. परंतु तूं मोठाच भ्रष्टपणा करतोस ह्मणून त्या त्रासानें आह्मीं घर सोडून रानांत आलों ; तेथेंही तुझे ढंग आहेतच ! कंसाकडे जावें तर त्याणें पृथ्वीवर प्रळय मांडला आहे. आतां करावें तरी काय? कृष्ण बोलला कीं, कृष्ण हा परमात्मा परमेश्वर जाणून तुमच्या स्त्रियांनीं त्याजवर भक्ति ठेविली हें पातकाचरण झालें नाहीं. मनांत कांहीं विचार करा. ज्या ब्राह्मणानें आपल्या स्त्रियेस बांधून ठेविलें होतें तो बोलला, कृष्णा, हें तूंच वेड लाविलेंस. कसला परमात्मा व त्या खुळ्या बायकांस कळलें तें काय? उगाच तुझ्या भरीं पडल्या आणि अन्न घेऊन आल्या. माझ्या बायकोस मीं ताडण करून बांधून ठेविली, तेंव्हां

तो परमात्मा कोठें गेला? कृष्ण बोलला, जर तिचें ध्यान मी परमात्माच आणि माझ्या ठिकाणीं खरेंच लागलें असेल तर तिला बंधन बाधेल कसें? तो बोलला कीं, मी पंचवीस जणा देखत तिला बांधून ठेविली आहे. तुझा एवढा दिमाख कशास पाहिजे? हें ऐकून कृष्णानें त्या ब्राह्मणाचे बायकोस पुढें बोलावितांच तिनें येऊन प्रथम कृष्णचरणीं मस्तक ठेवून नंतर सर्व ब्राह्मणांसह पतीस वंदन केलें! तिला पहातांच सर्वांचा गर्व हरण झाला. इतक्यांत आकाशवाणीही झाली कीं, 'कृष्ण हा सर्वकर्त्ता, हर्त्ता व पूर्णावतारी आहे. याजविषयीं भ्रांति असल्यास सोडावी. तुमच्या बायका पवित्र आहेत.' नंतर कृष्णचरणीं सर्वांनीं मस्तकें ठेविलीं आणि ह्मटलें कीं, बायकांमुळें आमचा भ्रम गेला; नाहींतर संशयांत व्यर्थ गुंतलों असतों. कृष्णानें सांगितलें कीं, तुमच्या स्त्रिया पवित्र आहेत; त्यांस वाईट शब्द बोलूं नका. व त्या स्त्रिच्या पतीस सांगितलें कीं, तुझ्या स्त्रिच्या देहास मात्र बंधन आहे. त्या निर्जीव देहास तूं नीट समजावून तुझा राग नाहीं, असें सांगून येथील कांहीं खुणा सांग; ह्मणजे लागलीच ती उठेल. हें ऐकून ते सर्व आपापल्या घरीं गेले.

मार्गानें ते सर्व कृष्णस्तुति करीतच चालले होते, आणि आजपासून नित्यशः श्रीकृष्णासह गोपाळांस प्रथम अन्न देऊन नंतर आपण देवास अर्पून गृहण करावें असा सर्वांनीं निश्चय केला. कृष्णवचनाची प्रतीति पहाण्याकरितां सर्व ब्राह्मण, ज्याची बायको बांधून ठेविली होती त्याकडे गेले; आणि पहातात तों ती स्त्री अन्नाच्या परातीकडे लक्ष लावून गतप्राण पडली आहे. सर्वांनीं

नानाप्रकारें तिची स्तुति केली, व पतीनेंही काकुळती करून तिला कृष्णाकडील सर्व हकीकत सांगितली; परंतु तो उठेना असें पाहून सर्व निराश झाले. परंतु तिच्या नवऱ्याचा पूर्ण विश्वास होता. त्यामुळें तो तिला ह्मणाला कीं, माझे सर्व उपाय राहिले व कृष्णाकडील सर्व वर्त्तमानही सांगितलें; आतां तूं सिद्ध असें जाणून पायां पडणें मात्र राहिलें आहे. असें ह्मणून तिच्या पायांवर मस्तक जों ठेवणार, तों ती खडबडून उठून पतिचरणीं मस्तक ठेवून पूर्ववत् अन्न कृष्णाकडे घेऊन जाण्याची तिनें परवानगी मागितली. त्यावरून सर्व चकित झाले. नंतर सर्वांनीं आपल्या बायकांस शाबासकी दिली व नित्यशः कृष्णास अन्न पोंचविण्यास आज्ञा केली.

---

# अध्याय १७ वा.

## रासक्रीडा.

वाचकांस आठवतच असेल कीं, गोपींजवळ क्रीडा करण्याविषयींचा संकेत कृष्णानें केल्याचें मागें लेखन केलें आहे. त्याप्रमाणें शरदृतूंतील निर्मळ व आल्हादकारक चांदण्यांत त्यानें एकदां संकेतस्थानीं जाऊन मध्यरात्रींच्या समयास आपल्या मुरलीचा मधुर ध्वनि केला. त्या वेळीं कित्येक गोपी नवऱ्यांजवळ बोलत होत्या; कांहीं घरकामें करीत होत्या; कित्येक जणीं निजल्याही होत्या; परंतु त्या सर्वांच्या कानांत तो ध्वनि गेल्याबरोबर सर्व सावध झाल्या. व मागील संकेतित गोष्टीचें स्मरण होऊन त्यांस कामोद्दीपन झालें. मग

सर्व गोपी मोठ्या त्वरेनें कृष्णाजवळ आल्या. त्यांस कृष्ण ह्मणाला, तुह्मीं गृहधर्म व आपापले पति सोडून येथें मजजवळ कशाला आल्यात? आपला पति तोच ईश्वर, असें मानून त्याचें निरंतर भजन करावें; हें तुह्मांला कसें ठाऊक नाहीं? याप्रमाणें कृष्णाचें भाषण ऐकून गोपी सद्गदित होत्सात्या ह्मणाल्या, हे मंगलधामा श्रीकृष्णा, आह्मीं सर्व संसारतृष्णा सोडून तुझ्या चरणाजवळ शरण आलों आहों; असें असतां तूं असें कसें बरें बोलतोस? जर एकदृष्टीनें पाहिलें तर, आमच्या पतींच्या अंतरीं तूंच आहेस व आमच्यासमोर येथेंही तूंच! असें ऐकतांच कृष्ण हंसला व त्यांच्या मनांतील भाव जाणून त्यांस वश झाला. प्रत्येक गोपीजवळ एक एक कृष्ण असे हजारों कृष्ण झाले. नंतर रासमंडळ रचून खेळ खेळूं लागला. ज्या प्रमाणें इंद्रनीळ व सुवर्ण मण्यांची माळ दिसावी, त्याप्रमाणें घननीळ कृष्ण व सुवर्णवर्ण गोपी हीं एकमेकांचे हात धरून चक्राकार उभीं राहिलीं असून फारच शोभूं लागलीं. ह्यांचें सुस्वर गायन ऐकून व मनोहर नृत्य पाहून देव, गंधर्व, किन्नर अगदीं तल्लीन झाले. त्या वेळीं चंद्राच्या प्रकाशांत गोपींचे व कृष्णांचे अलंकार झळकत होते. नृत्य करीत असतांना गोपी विजेप्रमाणें चमकत होत्या, व ज्या त्या गोपीला कृष्ण माझ्याच जवळ आहे असें वाटत होतें. सूर्याभोंवतीं किरणें किंवा चंद्राभोंवतीं नक्षत्रें त्याप्रमाणें गोपी कृष्णाला वेष्टून असल्यामुळें शोभूं लागल्या. रासमंडळांत नाचत असतांना वनमाळी आपल्या मुखांतील तांबूल गोपींच्या मुखांत घाली; तेव्हां त्यांना फारच आनंद

होई. ज्या ज्या गोपींच्या मनांत जसजसें येई तसतसें वागून कृष्ण त्यांना सुख देऊं लागला. याप्रमाणें नाना प्रकारच्या क्रीडा करीत असतां, गोपी घामाघूम झाल्या. तेव्हां सर्वांनीं यमुनानदींत शिरून विचित्र क्रीडा केली. इतक्यांत एक गोपी ह्मणाली, चला पुन्हा वनांत जाऊन क्रीडा करूं. हें वचन कृष्णानें मान्य केलें व तो पुन्हा गोपींसह वनांत जाऊन क्रीडा करूं लागला.

नंतर भगवान् पुन्हा रासमंडळ रचून क्रीडा करूं लागला. तो गोपींच्या मनाप्रमाणें वागून त्यांची इच्छा पूर्ण करूं लागला असतां, त्यानें एकीला कडेवर घेऊन दूर एकांतस्थानीं न्यावें; एकीनें थकल्यामुळें कृष्णाच्या मांडीवर शीर ठेवून निजावें; श्रीहरीनें रुसली ह्मणून, एकीचें वदन कुरवाळावें व तुला पळभरही विसंबणार नाहीं, अशी तिची समजूत करावी; एकीच्या अंगावर अंग टाकून श्रीहरीनें निजावें; व आपल्या पितांबरानें एकीच्या नेत्रांतील अश्रु आलेले पुसावे. याप्रमाणें असंख्य रूपें धारण करून श्रीहरि गोपींची मनकामना पूर्ण करीत असतां त्यांना असा अभिमान झाला कीं, कृष्ण आह्मांआधिन झाला. जो ब्रह्मादिकांनाही दिसत नाहीं तो आह्मीं वश केला. श्रीशंकर ज्याचें ध्यान करितात तो प्रेमानें आमच्या गळां मिठी मारतो. आह्मीं सर्वांहून थोर. असा त्यांना अभिमान होतांच भगवान् आपल्या असंख्य रूपांसह गुप्त झाला.

कृष्ण गुप्त झाला असें पाहून, सर्व गोपी त्याच्या विरहानें दुःखित होत्साल्या शोक करूं लागल्या. अरण्यांत जिकडे तिकडे फिरून त्याला शोधीत असतां, त्याचीं अनंत नांवें घेऊन, तूं आह्मांस सोडून गेलास काय? असें ह्मणूं

लागल्या. चंपक, वट, पिंपळ इत्यादि वृक्षांना, तसेंच कस्तुरीमृग, बक, मयुर, कोकिळा इत्यादि पशुपक्षांना, 'तुह्मीं कोणीं कृष्णाला पाहिलें काय'? असें विचारूं लागल्या. याप्रमाणें गोपी शोक करीत सगळ्या वनांत हिंडत असतां, एके ठिकाणीं भगवंताच्या पदमुद्रा उमटलेल्या त्यांच्या दृष्टीस पडल्या. पुढें त्यांनीं दुसऱ्या चिन्हांवरून असें अनुमान केलें कीं, कृष्णानें एका गोपीची स्वहस्तें वेणी घातली व तिजसह पुष्पशय्येवर शयन करून यथेच्छ क्रीडा केली. नंतर तो तिला खांद्यावर घेऊन चालला; पण तिच्याही अंतःकरणांत गर्वसंचार झाल्यामुळें तो गुप्त झाला. इकडे त्या सर्व गोपी इकडे तिकडे शोक करीत फिरत आहेत तों, त्यांनीं अनुमान केल्या प्रमाणें खरोखर एक गोपी कृष्णविरहानें दुःख करीत आहे असें पाहिलें. तेव्हां त्या तिला ह्मणाल्या, एकांतीं हरीला भोगून शेवटीं वनांत रडत राहिलीस! मग सर्व गोपी दुराभिमानानें हरिचरणास दुरावल्या. कृष्ण अंतरीं असतां व्यर्थ गिरिकंदरीं शोधित होत्या. जन्मांधाजवळ रत्न असलेलें दिसत नाहीं, किंवा मृगाच्या बेंबींत कस्तुरी असते पण तिला शोधीत उगाच वनांतरीं हिंडत असतो; तद्वत् या गोपींची स्थिति झाली. चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें इत्यादिकांना ज्या भगवंताचा शोध लागला नाहीं, तो या गोपींना कोठून सांपडायाला? आतां कृष्ण सांपडत नाहीं अशी त्यांची खात्री झाली. मग त्यानें आठ वर्षांचा होईपर्यंत ज्या लीला केल्या, तशा त्या स्वतः करूं लागल्या. त्या वेळीं एक गोपी कृष्ण झाली, दुसरी यशोदा बनली, तिसरी नंद, आणि कोणी कोणी पेंद्या, सु-

दामा, वांकड्या इत्यादिकांचीं रूपें घेतलीं. जी गोपी कृष्ण झाली होती, ती चोरी करीत आहे, पर्वत उचलीत आहे, तसेंच अग्नि भक्षण करीत आहे असें दाखवूं लागली. कांहीं गोपी त्या कल्पित यशोदेकडे जाऊन गाऱ्हाणीं सांगूं लागल्या. अशा अनेक कृष्णलीला दाखविल्यावर पुन्हा शोक करीत ह्मणाल्या, हे कृष्णा, तुझा शोध करीत असतांना आम्हांस पुष्कळ श्रम झाले; हें तुला कसें कळत नाहीं? तूं गोकुळवासी जनांचें अनेक संकटांपासून रक्षण केलेंस व आज आह्मां गोपींवरच कां रागावलास? ही आजची रात्र सुखाची पण तुझ्या वियोगानें ती दुःखप्रद भासत आहे. ज्याप्रमाणें जलावांचून मासे वांचत नाहींत; त्याप्रमाणें तुजवांचून आमचे प्राण रहाणार नाहींत. देवा, आतां सर्व अपराध क्षमा करून आम्हांस भेट दे. अशी दीनवाणी ऐकून श्रीहरि तेथें प्रगट झाला. त्यास पहातांच सर्व गोपी धांवत येऊन मोठ्या प्रेमानें भगवंताला भेटल्या. नंतर कृष्णानें पुन्हा रासमंडळ रचून सर्वांच्या इच्छा पूर्ण केल्या व सूर्योदय होतांच सर्व गोपी आपापल्या घरीं गेल्या.

---

## अध्याय १८ वा.

### अक्रुरागमन व गोपीविलाप.

ज्या वेळीं कंसासुरानें पाहिलें कीं, पदरच्या मोठमोठ्या बलवान दैत्यांचा नाश झाला व असेच बाकी राहिलेलेही नाश पावतील, आणि शेवटीं रणांगणीं आपणास एकट्यास बाहेर पडावें लागेल; त्या वेळीं त्यानें मोठमोठ्या प्रबल व चतुर दैत्यांस जवळ बोलावून त्या सर्वांचीं मनें मिळवून

एक अशी युक्ति काढली कीं, मथुरेंत एक मोठा धनुर्याग करावा. आणि नवखंडांतील राजे, ऋषि, ब्राह्मण इत्यादिकांस तो चमत्कार पहाण्यास बोलवावें, व त्याच वेळीं रामकृष्णांस बोलावून आणून मोठ्या कपटानें त्यांस ठार मारावें. ही युक्ति सर्वांस मान्य होऊन आपला कार्यभाग आतां सफळ होईल असें कंसास वाटलें. मग त्याणें दुसऱ्या दिवशींच त्या यागाची तयारी केली. सर्वांस सन्मानानें बोलावणीं पाठवून राजे, संस्थानीक इत्यादिकांस मोठ्या थाटानें आणल्यानंतर अक्रुरास गोकुळांत जाऊन रामकृष्णांसही घेऊन येण्यास आज्ञा केली. त्या वेळीं अक्रुरानें कंसास नानाप्रकारें बोध करून चाललेले व पुढें होणारे प्रकार त्यास समजाविले; परंतु उपड्या घड्यावर जसें पाणी ठरत नाहीं, तसा कंसास मृत्युसमय जवळ आल्यामुळें कांहींच बोध होईना. ह्मणून रथ घेऊन कंसाज्ञेनें अक्रूर गोकुळास गेला.

अक्रुराचा रथ नंदाच्या घराजवळ येतांच, हजारों लोक तेथें जमून नानाप्रकारचे तर्क करूं लागले. अक्रुराचा नंदानें उत्तम सन्मान केला. त्यानें नंदास कंसाचा निरोप कळविल्यानंतर या सर्वांस मोठा विचार पडला. नंदानें अक्रुरास व आणखी कित्येक सुज्ञांस बोलावून एकांतीं त्यांचा या गोष्टीविषयीं विचार घेतला व शेवटीं असा विचार ठरविला कीं, अक्रूर हा मायबापासारिखा आहे. जरी कंसाचा सेवक आहे, तथापि त्याची भक्ति आपणांवर विशेष आहे; याकरितां त्याच्या विचारास जी गोष्ट येईल ती करावी. अक्रुरानें नंदास एकच गोष्ट कळविली कीं, कृष्ण हा परब्रह्मअवतार व दुष्टसंहारार्थ अवतरला आहे.

मथुरेंतून जे जे राक्षस आले त्यांची व्यवस्था काय झाली तो प्रकार तुह्मांस ठाऊकच असून तुह्मीं एवढे संशयांत कां आहांत? तीच अवस्था कंसाची होणार. त्याच्या मृत्यूनेंच कृष्णास हें पाचारण केलें आहे. तुह्मीं निःसंदेह या उभयतांस मजसमागमें मथुरेस पाठवावें. यांस मीच परत आणून पोंचविण्याचें पतकरितों. यावरून नंदानें कंसाकडे रामकृष्णांस अक्रुरासमागमें प्रातःकाळीं पाठविण्याचें ठरविलें. त्या वेळीं नंद अक्रुरास ह्मणाला कीं, ज्या वेळीं राम वनास जावयास निघाला, अथवा यागरक्षणार्थ विश्वामित्राकडे जावयाची तयारी झाली, त्या वेळीं विश्वामित्रास, राजास व सर्वांस राम हा कोण व याचा पराक्रम काय हें कळत होतें; परंतु मायाजाळामुळें जसें त्यांचें अंतःकरण खिन्न झाल्याशिवाय राहिलें नाहीं, त्याचप्रमाणें रामकृष्णांसाठीं आज आम्हांस वाईट वाटत आहे. नंतर अक्रुरानें यशोदेचीही समजूत केली.

पहाटेस उठून यशोदेनें रामकृष्णांस न्हाऊंमाखूं घातलें व खावयास पक्वान्न देऊन त्यांच्या अंगावर वस्त्रेंभूषणें घालून अक्रुरासमागमें त्यांस रथांत बसविलें. कांहीं अंतरांपर्यंत आपण नंदासह त्यांस पोंचविण्यास गेली व मोठ्या खिन्नतेनें अक्रुराची आज्ञा घेऊन परत आली. त्या वेळीं अक्रुरानें तिची समजूत चांगल्या प्रकारें केली व आपण रथ पुढें चालविला

इकडे सर्व गवळणींनीं, उद्यां पहाटेस रामकृष्णांस मथुरेस पाठविणार असें रात्रीं ऐकलेंच होतें; त्यावरून त्या सर्व रथ येण्याच्या रस्त्यावर चातकाप्रमाणें वाट पहातच उभ्या होत्या. त्यांनीं तो रथ त्या स्थळीं येतांच चहूंकडून एक

दांच येऊन रथाभोंवतीं वेढा घातला. आणि कृष्णास न नेण्याविषयीं अक्रुरास विनंती केली; आणि असें सुचविलें कीं, कृष्ण हा आमचें जीवन व प्राण आहे. हा गेला ह्मणजे आह्मी व्यर्थ व दीन होऊं. अक्रुरानें त्या गोपींस ज्ञानोपदेश करून त्यांची संमती मिळविली; परंतु ज्या वेळीं अक्रुरानें रथ हांकला, त्या वेळीं त्या वाटेवर मोठ्या दीनपणें पडून ह्मणाल्या कीं, जर तूं आमचा भाऊ व कृष्णाचा आप्त ह्मणवितोस, तर कृपा करून हा रथ आतां आह्मां सर्वांच्या अंगांवरून घेऊन जा; ह्मणजे आमचे देह तरी पावन होतील. कृष्ण या गोपींची अशी अवस्था पाहून अक्रुरास ह्मणाला कीं, अशानें ह्या कधींही समजणार नाहींत. कांहीं निर्दयपणा करावा तर तीही गोष्ट नीट नाहीं; म्हणून आज येथेंच कपटानें रहाणें करून पहाटेस यांस निद्रिस्त टाकून आपण चालते व्हावें, या शिवाय दुसरा इलाजच नाहीं. अक्रुरास ती गोष्ट मानवली. मग तो गोपींस म्हणाला कीं, तुमच्या कृष्णास मी नेत नाहीं; आज येथेंच राहून उदयीक गोकुळास परत जाऊं. गोपींस हें ऐकून फारच आनंद वाटला, आणि सर्वांनीं तेथेंच रानांत वस्ती केली. इतक्यांत गोकुळांतील बहुतेक लोक कृष्णविरहानें वेडे होऊन गोकुळ सोडून धांवत धांवत त्या स्थळीं आले, आणि रामकृष्ण व अक्रूर यांस भेटून कृष्णास गोपींनीं राहविला; असें कळल्यानंतर सर्वांनीं गोपींचे आभार मानिले. नंतर सर्व लोक रात्रीं गोष्टी सांगत सांगत आनंदांत निमग्न होऊन झोंपीं गेले; परंतु गोपी तशाच जागत बसल्या होत्या, असें पाहून तीन प्रहर रात्रपर्यंत त्यांशीं आनंदानें रामकृष्णांनीं भाषणें करून

नंतर त्यांवर मायापाश योजून त्यांस निद्रिस्त केलें आणि आपण अक्रुरासमागमें मथुरेस चालते झाले. जाते वेळीं गोकुळांत परत गेले असें सर्वांस वाटण्याकरितां, रथाचा मार्ग पहिल्यानें गोकुळाकडे दाखवून नंतर मथुरेकडे फिरविला. सूर्योदयापर्यंत सर्व मंडळी निद्रिस्त होती. ती एकदांच जागृत होऊन पाहते तों राम, कृष्ण, अक्रूर, आणि रथ कोठें दिसेना. लोक अति चिंताग्रस्त होऊन इकडे तिकडे फिरूं लागले. आणि गवळणीं तर ज्या ठिकाणीं रामकृष्ण बसले होते त्या ठिकाणची माती तोंडांत घालघालून रडूं लागल्या. व त्या रथचक्राचा मार्ग गोकुळाकडे पाहून त्याही गोकुळास चालल्या. आणि लोकांसही वाटलें कीं, रथ गोकुळांत गेला. परंतु बऱ्याच अंतरावर जाऊन पुढें रथचक्रें मथुरामार्गाकडे वळलीं असें पाहून, राम व कृष्ण मथुरेस गेले अशी त्यांची खात्री झाली व ते तर निराश होऊन गोकुळांत गेले. गवळणीं तर त्याच ठिकाणीं सायंकाळपर्यंत रडत बसून अस्तमानीं शहरांत गेल्या. व तेथें हें वर्त्तमान नंद यशोदेस कळविलें; तेव्हां त्यांसही फार दुःख झालें.

इकडे कृष्ण, बळराम व अक्रूर हे त्रिवर्ग बोलत असतां, कृष्णानें आपलें मन गोपींविषयीं फारच विव्हळ झाल्याचें कळविल्यावरून, अक्रूर कृष्णास ह्मणाला कीं, आपण कोण अहां व पराक्रम कसकसा केला तो सर्व मीं डोळ्यांनीं पाहिला ; व पुढें काय होणार हें देखील मी पूर्णपणें जाणतों; परंतु मायाजालरूपानें मथुरेंतील भय माझ्या मनांत येऊन मी आपणांस अशा प्रसंगांत नेऊन टाकण्याकरितां मुद्दाम घेऊन चाललों आहे; ह्मणून माझ्या मनास फारच दिलगिरी वाटते. याकरितां जर माझीही भ्रांति फेडाल तर माझें अंतःकरण या-

विषयीं निर्भय होईल. अक्रूराचें हें सर्व भाषण मनांत ठेवून कांहींसे पुढें गेल्यावर एक रमणीय सरोवर पाहून कृष्णानें अक्रूरास सांगितलें कीं, आपण येथें स्नानसंध्यादि कर्मे उरकून नंतर पुढें जाऊं. यावरून अक्रूरानें रथ खोळंबवून त्रिवर्ग तेथें स्नानास उतरले. स्नान करीत असतां अक्रूरानें पाण्यांत बुडी मारिली आहे अशी संधि पाहून कृष्णानें आपली माया अक्रूरास दाखविली कीं, तेहतीस कोटि देव कृष्णाला हात जोडतात; ब्रह्मा, विष्णु, महेश हे जवळ उभे आहेत; देव, गाई, ब्राह्मण व ऋषिमंडळ कृष्णास राक्षसांचा संहार करण्याविषयीं विनंती करीत आहेत; कृष्ण त्यांस आश्वासन देत आहे; गोपींची समजूत कृष्ण वरचेवर करीतच आहे; आणि कोट्यावधि राक्षसास तळहातानें कृष्ण रगडीतच आहे; असें त्यानें पाण्यांत असतां पाहिलें. आणि दुसरा चमत्कार असा पाहिला कीं, कंस सिंहासनावर बसला असतां कृष्णानें त्यास खालीं ओढून त्याच्या केंसच्या धरून मारला; बळरामानें चाणुरास मारला; आणि उग्रसेनास राज्यावर स्थापून वसुदेव देवकीस बंदींतून सोडविलें. इतका चमत्कार पाहिल्यानंतर कृष्णावर पुष्पवृष्टि होत आहे अशा समयास एकाएकीं अक्रूर सावध होऊन पाण्याबाहेर आला आणि बळराम व कृष्ण जवळ उभेच आहेत असें त्यानें पाहिलें. त्या वेळीं अक्रूरानें कृष्णचरणीं मस्तक ठेवून विनंती केली कीं, आतां मात्र महाराज मी या मायापटलांतून अगदीं वेगळा झालों; आणि सर्व गोष्टीविषयीं निर्भय आहें. मजसमागमें आपलें येणें, अगर धनुर्यागाचें कारण, हीं सर्व केवळ निमित्तें आहेत. काळाचेंही शासन करणारा असा तूं, त्या तुला कंस ह्मणजे कःपदार्थ आहे? व्यर्थ

हे चमत्कारिक खटाटोप लोकांस दाखविण्याचे मात्र आहेत. अशी प्रार्थना करून त्या ठिकाणीं स्नानसंध्यादि कर्मे उरकून मथुरेस आले. आणि जें योग्य व सुशोभित स्थळ कंसानें त्यांच्यासाठीं तयार करून ठेविलें होतें, त्या स्थळीं अक्रुरानें त्या उभयतांस ठेवून आपण कंसास हें वर्त्तमान सांगण्याकरितां सभेमध्यें गेला.

---

## अध्याय १९ वा.

### कंसवध.

कंसानें कृष्णास राहण्यास स्थळ मात्र करून ठेविलें होतें, परंतु तो येईल असें त्यास वाटलें नव्हतें; ह्मणून कृष्णवधार्थ जे दीर्घ प्रयत्न ते चालूच होते. इतक्यांत अक्रुरानें रामकृष्णांस मोठ्या भुलथापीनें आणल्याची वर्दी दिली. त्या वेळीं कंसास प्रथम आनंद तर झाला, परंतु मागाहून त्याचें मन फारच भीतिग्रस्त झालें. आणि सभास्थानांतुन एकटाच मोठ्या त्वरेनें एकांतस्थळीं जाऊन विचार करीत बसला. तात्पर्य, मथुरावासी सकल जनांस कृष्ण आगमनाचें संतोषजन्य दुःख; वसुदेव, देवकी, देव, ऋषि इत्यादिकांस वेळ फार जवळ आल्यामुळें महदानंद; आणि कंसासुरास भयप्रद दुःख असें प्राप्त झालें. प्रातःकाळीं ज्या वेळीं उभयतां रामकृष्ण राजवाड्याकडे चालले, त्या वेळीं त्यांचीं स्वरूपें पाहून नागारिक स्त्रिया केवळ गर्क होऊन, अगदीं शोक करत्या झाल्या आणि ह्मणूं लागल्या, देवा, अशीं मदनासारखीं रूपें आमच्या दृष्टीस आतां पुनः कोठून पडतील? त्या चांडाळाच्या हातून हे वांचतील तरी कसे?

आमची विनंती या वेळीं देवानेंच ऐकिली तर सुख. असें स्त्रिया बोलत आहेत, व सर्व जनही भयाभित होऊन कंसास शिव्या देत आहेत, हें जाणून त्या उभयतांनीं आपलें धैर्य आपल्या विनधास्त चालण्यांतच विशेष दाखवून त्यांचीं मनें शांत केलीं. त्यामुळें सर्वांस असेंही वाटूं लागलें कीं, अशांच्याच हातानें दुष्टसंहार करविण्याचा हेतु देवाचा नसेल तरी कशावरून? ज्या मार्गानें ते गेले, तेथील स्त्रिया आरत्या घेऊन कृष्ण व बळराम यांस ओंवाळीत होत्या. त्यांच्या मुद्रा म्लान पाहून कृष्णानें त्यांस आश्वासन दिलें.

पुढें चालूं लागले तों, एक धोबी वस्त्रें धुऊन राजमंदिराकडे जात होता; त्याच्याजवळ कृष्णानें वस्त्रें मागितलीं. परंतु त्याला मृत्यूनेंच बोलाविलें ह्मणून विपरित बुद्धि आठवली व तो कृष्णास ह्मणाला, अरे गवळटा, तूं काय ह्मणून वस्त्रें मागतोस? तूं वनांत गवळ्यांबरोबर झोंबी घेतोस व त्यांना हरवितोस; पण तें मजपाशीं चालावयाचें नाहीं. मी एका क्षणांत तुला जीवें मारीन. तूं बहुत अन्याय केले आहेस, ह्मणून कंसराजानें तुला येथें आणविलें आहे; तो तुला आतां जिवंत ठेवणार नाहीं. असें धोब्याचें भाषण ऐकतांच, कृष्णानें त्याला मिठी मारून गळा धरलें; व ज्याप्रमाणें नखानें कमल खुडावें त्याप्रमाणें त्याचें शिर छेदून टाकलें. नंतर सर्व वस्त्रें गोपाळांना वांटून पुढें चालला; तों वाटेंत एक तंतुवाय नांवाचा शिंपी भेटला. त्यानें कृष्णास वस्त्रें देऊन त्याची मनोभावानें पूजा केली व ह्मटलें, हे ब्रह्मानंदा, दीनदयाळा कृष्णा, तूं मजवर कृपा कर. अशी तो प्रार्थना करीत आहे, इतक्यांत कंसाची कुब्जा नामक एक दासी चंदनानें भरलेलें दिव्यपात्र घेऊन जात होती, तिनें कृष्णाला

पाहिलें. ती अगदीं कुरूप व सर्वांगीं वांकडी असे; पण श्रीहरीवर तिनें आपला पूर्ण भाव धरला होता. हीच कैकयीची मंथरा दासी व श्रीरामाचा द्वेष करणारी होती. तिला रामानें असा शाप दिला होता कीं, तूं सर्वांगीं वांकडी होशील. असें शापवचन ऐकतांच तिनें श्रीरामाचे पाय धरले व जेव्हां ती उःशाप मागूं लागली, तेव्हां त्यानें तिला सांगितलें होतें कीं, 'तूं कंसाच्या घरीं दासी होशील व जेव्हां मी कंसवधार्थ मथुरेस येईन तेव्हां तुझा वाटेंत उद्धार करीन.' असो. कुब्जेनें कृष्णाला पाहिलें व स्वहस्तें चंदन त्याच्या अंगास लाविलें. असें पाहून भगवंतानें दयाळु होऊन तिला हातीं धरलें व आपल्या चरणस्पर्शानें तिचें दिव्य शरीर केलें. मग ती, कृष्णानें आपल्या घरीं यावें ह्मणून, आग्रह करूं लागली. तेव्हां त्यानें 'कंसाचा वध करून तुझ्या सदनीं येईन' असें सांगितलें. तें ऐकून तिनें कृष्णास साष्टांग नमन केलें व आनंदानें स्वगृहीं गमन केलें. इतक्यांत तेथें एक फुलारी आला. त्यानें सुवासिक पुष्पांच्या माळा हरिकंठीं प्रेमानें घातल्या व चरणावर लोटांगण घातलें. असो.

पुढें राम व कृष्ण हे जेथें धनुर्याग होत होता तेथें गेले. तेथें कंसानें एक प्रचंड धनुष्य आणून ठेविलें होतें, तें मोडून त्या उभयतांनीं त्याचीं दोन खंडें आपल्या हातांत घेतलीं; आणि त्यांनीं कित्येक राक्षस त्याच स्थळीं मारिले. ही बातमी कंसास पोंचली. त्याणें एक हजार बळवान दैत्य तें स्थान संरक्षणार्थ पाठविले. ते येतांच रामकृष्णांनीं त्या सर्वांसही यमसदनास पाठविलें. ही बातमी कंसास कळतांच तो भयानें मूर्च्छित होऊन धरणीवर पडला. प्रधानानें त्या-

ची समजूत करून अंतर्गृहांत नेला व सावध केला. इकडे रामकृष्ण यांणीं कित्येक असुर मर्दन करून पुढें न जातां आपल्या स्थळास परत गेले. तेथें देव, ऋषि व गंधर्व कृष्णास भेटले; व उदयीक तुमचा कार्यभाग करितों असें कृष्णानें कबूल केलें. कंसानें त्या रात्रीं झोंप न घेतां दहा सहस्र वीर यागकुंडाजवळ आणि कोठ्यावधि राजवाड्याच्या आसपास रक्षणार्थ ठेविले. आणि एका रणतुंबल अशा दैत्याच्या हाताखालीं कांहीं प्रबल राक्षस सैन्य देऊन कृष्णाच्या राहण्याच्या स्थलावर चाल करण्यास सांगितलें. इतकें करूनही त्यास झोंप लागलीच नाहीं. इकडे प्रातःकाळीं धनुष्यखंडें हातांत घेऊन उभय बंधु राजवाड्याकडे जात असतां, भयंकर सैन्य जवळच आपल्या अंगावर चालून येत आहे असें पाहिलें. तेव्हां लागलाच त्या सैन्याचा संहार त्या धनुष्यखंडांनीं केला; आणि पुढें यागस्थळींही तेथील प्रबळ सैन्यास मारून राजवाड्याजवळ पोंचले व तेथीलही सैन्य मारिलें. ही बातमी ऐकून कंसानें आपला एक मोठा बलाढ्य व भयंकर हत्ती त्या दोघांच्या अंगावर घालण्यास आज्ञा केली. तो येतो असें पाहून त्याची कृष्णानें शेंपटी धरून त्यास दहावीस वेळां गरगरां भोंवडून जमिनीवर आपटून मारलें. नंतर दुसरा हत्ती सोडविला, परंतु तो कृष्णाच्या अंगावर जाईचना; ही बातमी कंसानें ऐकल्यानंतर त्यावरील महाताची लबाडी असेल असें जाणून पुष्कळ महात बदलले. शेवटीं त्या हत्तीसही मारल्यानंतर ते उभयतां निःशंकपणें राजवाड्यांत शिरले. तेथें चाणूर व मुष्टिक मल्लयुद्ध करण्यास रामकृष्णांसमोर उभे राहिले; त्या वेळीं चाणुरास ओढून त्याच्या मस्तकीं

मुष्टी मारून त्यास कृष्णानें ऐहिकदुःखांतून सोडविलें आणि बळरामानें मुष्टिकास मारलें. यानंतर शल, तोशल इत्यादि शतशः मल्ल होते त्यांसही मारून टाकिलें. ज्या वेळीं कुवलय हत्ती मारला, त्या वेळीं त्या उभयतांनीं घनुखंडें टाकून त्या हत्तीचे दांतच हातीं घेतले; व त्यांनीं बहुत सैन्य व मल्ल मारले. याच वेळीं कृष्णानें कंसास सिंहासनावरून ओढून त्याचा प्राण घेतला. कंसास मारिला हें पाहून सर्व राहिलेले दैत्य पळाले व कित्येक कृष्णास शरण येऊन त्याजवळ क्षमा मागूं लागले. त्या सर्वांस त्यानें क्षमा करून राजसेवेंत ठेविलें. व तत्क्षणींच कृष्णानें वसुदेव देवकीस वस्त्रंभूषणें देऊन समक्ष आणविलीं. तीं उभयतां प्रथम अगदीं निस्तेज सर्वांस दिसलीं; परंतु ज्या वेळीं कृष्णाचा हस्तस्पर्श झाला त्या समयीं तीं तेजस्वी झालीं. कृष्णानें त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून त्यांचें हाल झाल्याविषयीं क्षमा मागितली. आणि उग्रसेनास राज्यासनीं स्थापन करून मथुरेचा सर्व बंदोबस्त केला. त्या वेळीं आकाशवाणी निघाली कीं, 'आतां सर्वांचें कार्य झालें.' या वेळीं वाद्यांचा मोठाच गजर व उल्हाटयंत्रांचा भडिमार अस्तमानपर्यंत चालून, सुस्वर मंगलवाद्यें वाजत असून नृत्य गायन इत्यादि शुभसूचक समारंभ सर्व रात्रभर होत होता. सर्व मथुरेंतील लोकांस अति आनंद झाला. या वेळीं गोपी, गोप, नंद, यशोदा यांच्या मोठ्या समारंभानें त्याच ठिकाणीं भेटी झाल्या. कृष्णानें वसुदेव देवकीस नंद यशोदेला भेटवून, त्या उभयतांचें सख्य करून दिलें.

या वेळीं अशी शंका साहजिक उत्पन्न होणार कीं, या

सर्वांच्या याच ठिकाणीं भेटी कां झाल्या? आणि नंद यशोदा, गोप गोपी, मथुरेंत याच वेळीं कोठून आलीं? त्यांतील प्रथम शंकेचें समाधान इतकेंच कीं, ज्या स्थानीं कंसादि दुष्टांचा संहार, देव गंधर्व दर्शन व शुभसूचक आकाशवाणी झाली, त्याच ठिकाणीं या भेटीस स्थान योग्य; ह्मणून कृष्णानें ही योजना केली. आतां दुसऱ्या शंकेचें समाधान असें कीं, ज्या वेळीं त्या रानांत रामकृष्णांचा शोध लागेना ह्मणून गोप गोपी गोकुळांत जाऊन त्यांनीं नंद यशोदेस तें वर्त्तमान सांगितलें, त्याच वेळीं सर्वांचा मथुरेस जाण्याचा निश्चय झाला; व गोप गोपी समागमें यशोदा नंद मथुरेस जाण्यास निघालीं. व तीं कंसाचा प्राण घेण्याच्या संधीसच मथुरेस पोंचून निर्भयपणें त्या स्थानीं येऊन कृष्णास भेटलीं.

या दिवशीं घरोघर मथुरेंत गुढ्या उभारल्या. कंसानें जे राजे कारागृहांत ठेविले होते, ते सोडून त्यांस वस्त्रेंभूषणें देऊन जेव्हां आणिलें, तेव्हां सर्वांनीं कृष्णचरणीं मस्तक ठेविलें. त्या वेळीं राजांच्या मुकुटास मुकुट थडकून जे अमूल्य हिरे जमिनीवर पडत, त्यायोगें पहाणारांचे नेत्र दिपत होते. असो.

पुढें वसुदेव देवकी यांणीं नंद यशोदादि सर्वांस तसेंच सर्व राजांस मोठ्या सन्मानानें कांहीं दिवस राहवून, गर्गमुनिकडून रामकृष्णांचें सुमुहूर्त्त पाहवून मौंजीबंधन केलें. नंतर नंद, यशोदा, गोप, गोपी मोठ्या आनंदानें गोकुळांत परत गेलीं. तीं सर्व गोकुळांत पोंचल्यानंतर येथील सर्व वर्त्तमान तेथें राहिलेल्या लोकांस कळतांच, मोठाच आनंद होऊन गुढ्या तोरणें उभारून मोठाच मंगलोत्साह गोकुळांतही झाला.

---

# अध्याय २० वा.

## कृष्ण, बळराम व सुदाम विद्याभ्यास.

श्रीकृष्ण, बळराम व सुदाम हे अंवती नगरींतील एका सांदीपन नांवाच्या ब्राह्मणाकडे विद्या शिकण्यास राहिले. तो ब्राह्मण महा विद्वान् व ज्याची कीर्त्ति फारच प्रख्यात असून तो शिक्षण देण्याच्या कर्मांत फार निष्णात होता. त्याणें फारच प्रीतीनें त्या त्रिवर्गांस विद्या शिकविली. हे त्रिवर्ग असे बुद्धिमान् होते कीं, गुरुमुखांतून निघतांच त्यांणीं शद्ब गृहण करावे; व त्यांचें त्यांना कधींच विस्मरण होऊं नये. त्यांणीं अल्प काळांतच सर्व विद्या अवगत करून घेतल्या. सांदीपनानें त्या त्रिवर्गांवर शिष्याप्रमाणें नव्हे परंतु पुत्रापेक्षांही अत्यंत लोभ ठेविला होता. याविषयीं एक उदाहरण असें आहे कीं, एके दिवशीं गुरुपत्नीनें 'घरां लांकडें नाहींत; काय करावें?' असें सहज ह्मटलें. त्या स रसेंच ते त्रिवर्ग लांकडें आणावयास अरण्यांत गेले; परं हें सांदीपन गुरूस कळतांच त्यांणीं रानांत धांवत जाऊ त्यांस परत आणलें. आणि बायकोस सांगितलें कीं, बळराम व कृष्ण हे साक्षात शेष व नारायण यांचे अवतार आहेत; ह्मणून आपण यांवर अतिशय लोभ ठेवला पाहिजे.

त्या त्रिवर्गांची विद्या पूर्ण होऊन त्यांची गुरूनें परीक्षा घेतल्यानंतर त्यांस घरीं जाण्यास आज्ञा दिली. परं कांहीं तरी गुरुदक्षिणा मागण्याविषयीं त्रिवर्गांनीं विनंती के ल्यावरून, सांदीपनानें कृष्णास सांगितलें कीं, तुझ्याकडी दक्षिणेची मला गरज नाहीं. कृष्ण हात जोडून बोल ला कीं, महाराज, आपलें तर ठीकच आहे; परंतु मला मा

कर्त्तव्यकर्म केलें पाहिजे. ह्मणून आपण मला कांहीं तरी आज्ञा करावी, हीच आपणास माझी विनंती आहे. हें ऐकून सांदीपनाची स्त्री बोलली कीं, जर तूं मला दक्षिणा देणारच तर एकुलता माझा एक मुलगा मृत्यु पावला आहे तो मला आणून दे. कृष्ण गुरूचे चरण वंदन करून ह्मणाला कीं, हें कार्य मला कठीण नाहीं; त्यास आतांच मी एका क्षणांत आणून देतों. असें ह्मणून आज्ञा घेऊन निघाला. व त्रैलोक्यांत त्या पुत्राचा शोध करीत असतां, तो मुलगा समुद्रांत आहे असें कळल्यावरून एका मत्स्यास विचारलें. त्यानें तो पुत्र शंखदैत्यानें खाल्ला असें कळवितांच कृष्णानें शंखास धरून विचारतांच, त्याणें तो वर स्वर्गीं गेला आहे असें कळविलें. तें ऐकून त्याचा देह हातांत घेऊन कृष्ण यमधर्माकडे गेला. आणि त्याजकडून तो पुत्र घेऊन मथुरेस आपल्या गुरूस आणून दिला आणि त्याचें मन सुप्रसन्न केलें. नंतर ते त्रिवर्ग गुरूची आज्ञा घेऊन मथुरेस आले. कृष्ण व बळराम महा विद्वान् होऊन आले व लोकांस भेटले या योगानें तेथील सर्वत्रांस हर्ष झाला.

---

# अध्याय २१ वा.

## उद्धवाचें गोकुळीं प्रयाण व शांतवन.

कृष्ण व बळराम विद्या शिकून आल्यानंतर, आह्मीं गोकुळ सोडल्यास फार दिवस झाले; आपलीं मातापितरें, गोप गोपी इत्यादि आपल्या विरहानें त्रस्त असतील; त्यांचें जर आपण समाधान न केलें तर कदाचित् प्राणत्यागही करतील; यासाठीं कांहींतरी युक्ति योजावी असा बेत

करून महा विद्वान् व पूर्ण भक्त उद्धव यास बोलावून कृष्णानें आज्ञा केली कीं, त्वां गोकुळांत जाऊन नंद यशोदा जीं मजकरितां अति क्षीण व दीन झालीं असतील त्यांस भेटावें. नंतर सकळ गोपाळ व गोपींस भेटावें. मातापितरांस तत्वज्ञानामृत प्राशन करवून त्यांचीं मनें शांत करावीं. नंतर ज्या गोपी मजकारितां प्राणत्याग करण्यास तयार झाल्या असतील त्यांचें समाधान करावें. नंतर सर्व गोपाळांचेंही शांतवन करावें. मजवर कृपा करून एवढें कार्य त्वां करून यावें, ह्मणजे माझें अंतःकरण स्थिर होईल. हें ऐकून उद्धवानें कृष्णास वंदन करून गोकुळास प्रयाण केलें.

प्रथम उद्धव नंदयशोदेस भेटला, आणि पहातो तों त्यांचे अस्थिपंजर मात्र राहिले आहेत. त्या उभयतांचें उद्धवानें बहुत प्रकारानें शांतवन केलें, परंतु कोणत्याही प्रकारें त्यांची खात्री होईना; तेव्हां त्यांस उद्धवानें वेदांतज्ञानोपदेश केला. त्या वेळीं त्यांस उत्तम ज्ञान प्राप्त होऊन चित्तवृत्ति संतुष्ट होऊन कृष्णास लवकर पाठवावें असें सांगून उद्धवास निरोप दिला. यानंतर कित्येक विप्रमंडळी व त्यांच्या स्त्रिया यांच्याही अनेक प्रकारें समजुती केल्या. त्याचप्रमाणें गोपांस भेटून त्यांसही नानाप्रकारच्या गोड गोड गोष्टी सांगून त्यांचें शांतवन केलें पुढें सर्व गवळणींची समजूत करण्यास तर उद्धवाचें सर्व चातुर्य खर्च झालें; तेव्हां कांहींशी समजूत झाली. परंतु ज्या वेळीं रथावर बसून उद्धव मथुरेस चालला, त्या वेळीं सर्व गोपी अति दुःखित होऊन विगलित मनानें त्या रथामागून धांवूं लागल्या; व उपवनांत त्याच्या रथापुढें पडल्या. मागें

कृष्ण मथुरेस जातेवेळीं जसें झालें, त्याच प्रमाणें आतांही त्यांची अवस्था झाली. त्या वेळीं उद्धव अगदीं विस्मित झाला. व रथाखालीं उतरून गोपींस त्याणें फारच उपदेश केला; परंतु त्या गोपी कृष्णासाठीं फारच वेड्या झाल्या आहेत असें पाहून त्यानें त्या उपवनांत चार महिने वस्ती केली. तेथें तो नित्य त्या गवळणींस ज्ञानोपदेश करी; तथापि त्यांचीं मनें श्रीकृष्णचरणीं दृढ लपेटलीं होतीं. त्या केवळ भ्रमिष्टच झाल्या असें नाहीं; परंतु पूर्णतत्वीं मिळाल्या आहेत अशी त्याच्या मनाची खात्री झाली. शेवटीं त्यानें वरदहस्त त्यांच्या मस्तकीं ठेवून जेव्हां त्या सर्वांस ब्रह्मोपदेश केला, त्या वेळीं सर्वांची समजूत होऊन उद्धवास मथुरेस जाण्यास संमती मिळाली.

---

# अध्याय २२ वा.

## जरासंधपराभव व कालयवनवध.

कृष्णानें मथुरेचें राज्य उग्रसेनास दिलें, आणि तें संरक्षण करण्याकरितां मोठमोठे बंदोबस्त केले. कंसासुराच्या वेळचें जें सैन्य व जे कित्येक शरण आलेले सरदार होते त्या सर्वांस रक्षक ठेविले. वसुदेवासही एक मुख्य सेनापति करून ठेविला. कंसाचे जे कोणी आप्त व सरदार होते, त्यांचा मानमरातब कायम राखून कंसाच्या स्त्रियांचा बंदोबस्त उत्तम ठेविला. परंतु अस्ति व प्राप्ति नामक कंसस्त्रियांच्या अंतःकरणांत रात्रंदिवस दुःखाग्नि पेटून कृष्णास मारण्याविषयीं त्यांचेही प्रयत्न चालू होतेच. त्या स्त्रियांचा पिता जरासंध, जो महा बलाढ्य होता, त्याकडे त्यांणीं जाऊन

सांगितलें कीं, तुझ्यासारखा पराक्रमी पिता असतां आह्मीं आमच्या पतीच्या वैऱ्याचें मेलेलें अन्न खाऊन असावें, त्यापेक्षां आमचा शिरच्छेद तूं आपल्या हातानेंच कां करीनास? गवळटाच्या धर्माचें अन्न खाण्यापेक्षां मृत्यु फारच चांगला! जरासंध हे शब्द ऐकतांच प्रळयसागरासारखा खवळून प्रतिज्ञेनें बोलला कीं, ह्मीं आतां मथुरेस जा. तेथें तुह्मीं पोचत आहां तोंच मी मथुरेवर सदळ येऊन त्या दोघांही पोरांस मारून त्या उग्रसेनास राज्यभ्रष्ट करितों. तुमचा सूड उगविण्यास क्षणएक मी विलंब करणार नाहीं.

त्या कंसाच्या स्त्रिया गेल्यावर जरासंधानें आपल्या प्रचंड वीरांस बोलावून आज्ञा केली कीं, निवडक सैन्य घेऊन लवकर मथुरेवर गेलें पाहिजे. त्यांनीं अक्षौहिणी सैन्य तयार करून लागलेंच ध्वजारोपण केलें. अशा अफाट स्वारीनिशीं जरासंध मथुरेवर येऊन त्यानें सर्व शहराभोंवतीं वेढा दिला. हें वर्तमान उग्रसेनास कळतांच तो भयाभित झाला. इकडे कृष्णानें जितकें सैन्य होतें तितकें कडेकोट तयार करून शहराबाहेर काढिलें. आणि कित्येक पदाति, रथी व महारथी, रथ, हत्ती, घोडे वसुदेवासमागमें देऊन त्यासही शहराबाहेर युद्धास पाठविलें. इकडे आपण उभय बंधु चरणचालीनें बाहेर आले व आकाशाकडे पाहूं लागले तों, आकाशमार्गानें दोन सशस्त्र तेजस्वी रथ खालीं उतरले; त्यांत बसून त्यांनीं शत्रुसैन्याचा वध आरंभिला.

ज्या वेळीं राम व कृष्ण हातांत लहान गोजीरवाणीं शस्त्रें ह्मणजे चक्रें व सुदर्शनें घेऊन असंख्य दळ संहार करीत आहेत असें वसुदेवानें पाहिलें, त्या वेळीं त्यानेंही

त्या स्थानीं मोठ्या शौर्यानें लढून शत्रूकडील प्रबळ योद्धे व बहुत सैन्य मारिलें. कृष्णानें असंख्य वीरांचा संहार केला. आणि बळरामानें तर त्या युद्धांत सरसावून सर्वांच्या पुढें जाऊन जरासंधाच्या रथावर आरोहण करून त्यास धरिलें, व त्याचा संहार करण्याकरितां शस्त्र उचलणार, इतक्यांत त्यानें कृष्णसंकेतावरून त्यास सोडलें. तो पळून स्वदेशीं गेल्यावर त्याचे मित्र शिशुपाळ, वक्रदंत यांणीं त्यास चढी-वर देऊन सतरा वेळ मोठ्या प्रचंड सैन्यानिशीं मथुरेवर पाठविलें. तितक्याही वेळीं कृष्णानें वरचेवर त्याच्या सर्व सैन्याचा वध करून त्याला पळविलें. शेवटचे वेळीं बळरामानें त्याचा वध करण्याकारितां सुचविलें होतें, परंतु कृष्णानें त्यास जिवंत सोडला. तो त्या वेळीं जीवच दे-णार होता; परंतु त्याचे मित्र शिशुपाळ, वक्रदंत यांणीं आत्महत्या न करण्याविषयीं बोध केल्यावरून तो स्वराज्य सोडून वनांत भ्रमिष्टासारखा हिंडूं लागला. तो असा भ-टकत असतां एके दिवशीं त्याच मार्गानें नारदमुनीही तेथें आले. त्यांस पाहून जरासंधानें म्लान मुखानें नमस्कार केला. व पुढें हात जोडून उभा राहतांच नारदानें स-चिंत होण्याचें कारण विचारतांच त्याणें सविस्तर वर्त्तमान सांगितलें. तें ऐकून नारदानें सांगितलें कीं, काळयव-नास जर तूं साह्यास आणशील तर तुझा कार्यभाग होईल. त्या काळयवनाचा जन्मवृत्तांत असा आहे:—गर्गाचार्य या नांवाचा एक महाऋषि यादवांचा कुलगुरु होता. तो सर्व विद्येंत निपुण होता. त्यास एका विनोदी यादवानें आपली कन्या दिली होती. पुढें पुष्कळ वर्षें लोटलीं तरी संतान झालें नाहीं असें पाहून, तो विनोदी यादव 'तूं पंढ

आहेस' असें गर्गमुनीस बोलला. तें ऐकतांच मुनीस अतिशय क्रोध आला व 'तुह्मीं यादव फारच उन्मत्त झालां आहां; ह्मणून तुह्मां सर्वांचा पराभव करील असा एक पुरुषार्थी पुत्र मी उत्पन्न करतों;' असें ह्मणून लागलाच तेथून निघाला. पुढें त्यानें हिमाचळावर येऊन घोर अनुष्ठान करून शिवास प्रसन्न केलें व सकल यादवांचा पराभव करील असा एक पुत्र द्यावा असा वर मागितला. तेव्हां शंकर ह्मणाले, तूं येथें अनुष्ठान करीत असतांना एक म्लेंच्छस्त्री येऊन तुजजवळ रतीदान मागेल, तिच्या पोटीं एक महादुष्ट व सकल यादवांचा पराभव करणारा पुत्र तुजपासून होईल. असें सांगून शंकर गुप्त झाले. पुढें एका म्लेंच्छपतीनें पुष्कळ दिवस झाले तरी पुत्रसंतान होत नाहीं असें पाहून आपली स्त्री शृंगारून गर्गमुनीकडे पाठविली. तिला मुनिपासून जो पुत्र झाला तोच काळयवन. जर त्याचें साह्य घेशील तर तो मात्र कृष्णासह सर्व यादवांचा पराभव करील. हें भाषण हितकर मानून लागलेंच त्याणें काळयवनास गांठून आपलें दैन्य त्यास सांगितलें. त्यानें तीन कोटि सैन्यासह जरासंधासमागमें मथुरेवर येऊन शहरास वेढा दिला. कृष्णानें पुढें घडणारा कार्यभाग ध्यानांत आणून आपलें सैन्य व सर्वत्र मंडळी गुप्तरूपें योगमायेनें द्वारकेस नेली. आणि बळरामासही सुचना करून तेथेंच पाठविला. नंतर आपण एकटा शहराबाहेर त्या काळयवनासमोर आला.

सर्व मथुरा ओस पडली आणि एकटा कृष्ण समोर आला, हें काळयवनानें पाहून ह्मटलें कीं, अरे काक्या, त्वां कपटानें सर्वांस अदृश्य करून कोठें लपविलें

आहे तें मी जाणतों. परंतु तें तूर्त मी कांहीं मनांत न आणतां प्रथम तुला मारीन. नंतर तुझें लपविलेलें मंडळ बाहेर काढून त्यासही मारून मी जरासंधास राज्यावर बसवितों! असें ह्मणून कृष्णास धरावयास धांवला. काळयवन आपल्या अंगावर लोटला असें पाहून कृष्णानें तेथून पळ काढला. अशा रीतीनें वनोवनीं कृष्ण पळतो आहे व तो त्यास धरण्यास धांवतो असा क्रम चालला. पुढें मथुरेपासून पुष्कळ लांबीवर पश्चिमेकडील एका पर्वताच्या गुहेंत कृष्ण शिरतांच काळयवनही आंत शिरला. जो कृष्ण कोणासच धरिला जाणार नाहीं व दिसणार नाहीं तो काळयवनाच्यानें कसा धरवेल? शेवटीं त्याप्रमाणेंच झालें. तें असें कीं, त्या गुहेंत मांधाता राजाचा पुत्र मुचकुंद हा झोंपीं गेला होता. त्यास इंद्राचा असा वर होता कीं, 'जो कोणी त्याची निद्रा भंग करील तो भस्म होईल.' हें कृष्णास मात्र ठाऊक होतें. तेथें एकाएकीं कृष्ण येऊन आपला पितांबर त्यावर घालून आपण गुप्तरूपें जवळच लपून राहिला.

काळयवन, कृष्ण पळाला, कोठें दिसत नाहीं असें पाहून इकडे तिकडे पहात फिरूं लागला. इतक्यांत, पितांबर पांघरून कोणी एक मनुष्य गुहेंत गाढ निद्रेचें मिष करून घोरत पडला आहे असें त्यानें पाहिलें. व हा कृष्ण एकाएकीं कपटानें गुप्त होऊन आणि अशा बिकट स्थलांत आपल्यास शोधावयास कोण येतो असें याच्या मनांत येऊन हा निर्भय पडला आहे असें त्यास वाटलें. नंतर तो जवळ जाऊन ह्मणाला, अरे चोरा, मला चुकवून तूं येथें निर्भयपणें निजलास काय? आतां तुला मारून टाकितों.

असें ह्मणून त्यानें मुचकुंदराजाच्या अंगावर लत्ताप्रहार केला, तोंच काळयवनाची राख होऊन एक लहानसा डोंगर होऊन त्या स्थळीं पडला. मुचकुंद राजाही खडबडून उठून बसला; परंतु जवळ कोणीच नाहीं असें पाहून चकित झाला, तों कृष्णदर्शन झालें. मुचकुंद राजास कृष्णदर्शन होण्याचाही वर होता.

या मुचकुंदराजाच्या निद्रेविषयीं अशी कथा आहे कीं, एकदां ज्या वेळीं देवदैत्यांचा युद्धप्रसंग चालला होता, त्या वेळीं मुचकुंदानें आपल्या पराक्रमानें देवांचें रक्षण केलें होतें. त्या वेळेस त्याला फार श्रम झाले, ते जाण्याकरितां निद्रा घेण्यास इंद्राजवळ त्याणें विनंती केली. तेव्हां इंद्रानें त्यास त्या गुहेंत निजावयास सांगितलें; आणि 'जो त्याची निद्रा भंग करील, तो तेथेंच भस्म होईल;' असा वर देऊन अंतीं कृष्णदर्शनही होईल असें सांगितलें होतें. त्याप्रमाणें काळयवनाचा बळी तेथें पडून कृष्णाचें दर्शन झाल्यावर मुचकुंदराजा बदरिकाश्रमीं गेला.

कृष्ण हा कार्यभाग उरकून विवराबाहेर आला तों, बळीरामही त्यास शोधीत त्याच ठिकाणीं आलेला भेटला. ते उभयतां कांहीं गोष्टी बोलत आहेत, तों जरासंधाचें प्रबळ सैन्य कृष्णशोधार्थ आलें. त्यांतील कित्येक वीरांनीं रामकृष्णांस पहातांच जरासंधास सुचविलें कीं, अशा प्रतापी मुलांशीं समोर लढून कांहीं होणें नाहीं. त्यावरून त्या पर्वतास चहूंकडून अग्नि लाविला. चहूंकडून पर्वत एकदम पेटला, आतां दुसरा कांहींच इलाज न करितां सर्वांदेखत या अग्नींतून उडून जावें हेंच कृष्णास चांगलें वाटून त्याणें त्या स्थानीं गरुडाचें स्मरण केलें; तों तो हात जोडून पुढें

उभा राहिला. त्यावर बसून उभयतांही सर्वांदेखत उडून गेले. अशी स्कंधपुराणांत कथा आहे. आणि कोठें असेंही लेखन आढळतें कीं, कृष्ण व बळीराम जरासंधाच्या मनांत दुष्टकामना उत्पन्न होण्याकरितां तेथेंच गुप्त झाले. कोठें असाही लेख सांपडतो कीं, ते उभय बंधु भीमकाच्या रथांतून निघून गेले. परंतु एकंदरीनें पहातां मतलब हाच कीं, पर्वतास अग्नि लागतांच कृष्ण व बळीराम तेथून निघून गेले.

श्रीकृष्णनाथानें त्या गुहेबाहेर पडतांच सुदर्शनानें जरासंधाचें व 'काळयवनाचें सकळ सैन्य संहारिलें, नंतर कंसाचें भांडार फोडून सर्व द्रव्य द्वारकेस नेण्याचीं तयारी केली. त्या कृत्यास जरासंध आडवा आला. त्या वेळीं बळरामास त्या द्रव्यासोबत पाठवून आपण जरासंधाशीं युद्ध करून त्याचा पुन्हा पराभव केला. पुढें आनर्तदेशाधिपती रेवतराजा याणें आपली कन्या रेवती बळिरामास देऊन मोठ्या उत्साहानें लग्न केलें. त्या मंगलोत्साहानंतर श्रीकृष्णनाथ व बळराम हे रेवतीसहवर्तमान द्वारकेस गेले.

---

# अध्याय २३ वा.

## रुक्मिणीहरण.

विदर्भदेशाचा भीमक नामें राजा जो महासमर्थ त्याची एक अत्यंत सुरूप भीमकी या नांवाची कन्या लग्न करण्यालायक झाली होती. ती कन्या कोणास द्यावी याविषयीं राजाचें मन रात्रंदिवस सचिंत होतें. एके दिवशीं राजा आपल्या सभेंत विराजमान असून भीमकीही आपल्या

दासींसह सभास्थानच्या एकांतस्थानीं सभाचमत्कार पहात बसली असतां, अकस्मात कीर्तिमुख या नांवाच्या एका ब्राह्मणानें त्या सभेंत राजास विनंती केली कीं, महाराज, मी एक गोष्ट आपणास सांगतों, ती जरी माझ्या मुखानें ऐकण्यास योग्य नाहीं, तथापि आज्ञा असल्यास कळवितों. राजानें आज्ञा दिल्यावर त्याणें सांगितलें कीं, महाराजा, आपल्या कन्येस तिच्या लावण्यास शोभणारा असा एक श्रीकृष्ण नांवाचा वर माझ्या पहाण्यांत आला आहे. त्याचें रूप, गुण, कीर्ति आणि पराक्रम वर्णन करण्यास माझी तर कथा काय, परंतु सहस्र मुखांचा जो शेष त्याच्यानेंही होणार नाहीं. मी एवढेंच मात्र सांगतों कीं, जर तो नवरा आमच्या बाईसाहेबास मिळेल, तर द्वारकावासी श्रीकृष्णनाथ आणि विदर्भनृपकन्या भीमकी हीं उभयतां उत्तम प्रकारें वधुवरें शोभतील; व आपली कन्या त्रिभुवनांत धन्य होईल. यानंतर त्या ब्राह्मणानें श्रीकृष्णरूपाचें एकंदर यथार्थ वर्णन केलें. तें ऐकतांच राजा व सर्व सभासद तटस्थ झाले. भीमकी तर कृष्णमय होऊन देहभान विसरली; व धाडकन जमिनीवर पडली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. अंगावर कांटा उभा राहिला. अशी रुक्मिणीची अवस्था पाहून तिच्या उपमाता लगबगीनें धांवून आल्या. त्यांणीं तिला उचलून पोटाशीं धरिलें; व अनेक प्रकारच्या कल्पना मनांत आणूं लागल्या. कोणी असेंही ह्मणूं लागल्या कीं, हिला भूताची बाधा झाली. परंतु, तिला महद्भुताची बाधा झाली असल्याचें भीमक राजावांचून कोणाच्या लक्षांत येईना. मग राजानें तिला कृष्णालाच देण्याचा आपल्या मनाचा

पक्का धडा केला व हा आपला मनोदय शुद्धमतीराणीलाही कळविला. तेव्हां अत्यंत हर्षानें तिनें ह्या गोष्टीस आपला रुकार देऊन आपलाही हाच हेतु होता हेंही कळविलें.

भीमकाचा पुत्र रुक्मया हा कृष्णाचा पूर्ण द्वेष करीत असल्यामुळें, बापानें कृष्णास रुक्मिणीस देण्याचा केलेला विचार त्यास रुचेना. त्याणें एकीकडे गणिती बोलावून त्यांस सांगितलें कीं, 'कृष्णाशीं रुक्मिणीचें जमत नाहीं; शिशुपाळाशीं उत्तम जुळतें ; असें तुह्मीं राजास खरमरीत सांगा.' मग कृष्णाची रुक्मयानें राजासमक्ष भरसभेंत निंदा आरंभिली. तो ह्मणाला, रुक्मिणीला नवरा तर फार चांगला शोधून काढिला! ह्या सर्व पृथ्वीवर पुरुषार्थ दाखविणारा धुंडून धुंडून हाच कायतो एवढा आढळला! केवढा त्याचा पुरुषार्थ!! एक तर पुरा कपटी; गोरस चोरण्यांत पटाईत; अवघें गोकुळ भ्रष्ट करून सोडलें; त्याच्यासारखा शिंदळ त्रिभुवनांत मिळावयाची मारामार; चोरी करतांना धरून गौळणींनीं उखळाशीं बांधून तर ठेविला; गरीब बिचारीं किरडें काळया, अघासुर, यांस मारून त्यानें कोणता पुरुषार्थ दाखविला? वारुळाप्रमाणें गोवर्धनपर्वत, तो उचलण्यांत कोणता प्रताप मिळविला? अग्निस्तंभन करण्याचें कपट त्यास पुरें ठाऊक; ह्मणून वणवा गिळिला. काळयवनाच्या भयानें पर्वताच्या दरींत शिरला व त्याला याणें कपटानें मारविला. जरासंध सत्रा वेळां जेरीस आणिला कपटानेंच. त्याला काय सिंहासन आहे कीं छत्र आहे? थोडेंबहुत द्रव्य तरी जवळ आहे का? बरें नांवलौकिक तरी कोठें आहे? अशाला कोण थोर ह्मणणार आहे? भक्तांच्या दारोदार हिंडतो व कीर्त्तनांत बेधडक नाचतो.

लहानपणींच पुतनेला मारून स्त्रीहत्या केली. कंसाच्या अन्नावर वाढून शेवटीं त्याचाच कपटानें घात केला. आम्हीं जिवंत असतां अशाशीं रुक्मिणीचें लग्न! मग तर आम्हीं मेल्यादाखल झालों. जर रुक्मिणीचें कृष्णाशीं लग्न लागेले तर मिशी उतरून देईन. अशी बरीच निंदा केल्यावर तो दांत ओंठ चावून मोठ्या क्रोधानें ह्मणाला, मी रुक्मिणीचें लग्न शिशुपाळाशींच लावीन.

भीमकीचा ह्मणजे रुक्मिणीचा बंधु रुक्मया याचें मन श्रीकृष्णवैभवावर, रूपावर तसेंच गुणावर मोहित न होतां शिशुपाळास ती आपली बहीण अर्पण करण्याचा त्याचा फार दिवसांचाच हा निश्चय होता. त्याप्रमाणें त्यानें शिशुपाळास या लग्ननिश्चयाचें पत्र लिहिलें. व वक्रदंत, जरासंध इत्यादि शिशुपाळाचे मित्र यांसही तो लग्नसमारंभ सुशोभित करावा आणि प्रसंग पडल्यास कृष्णाशीं सामना करण्याची शिशुपाळास मदतही करावी असेंही कळविलें होतें. त्यावरून तो शिशुपाळ आपल्या मंडळीसह मोठ्या थाटानें लग्नाकरितां विदर्भनगरीं आला. त्या सर्वांचा आदर रुक्मयानें उत्तम प्रकारें करून त्यांस मोठ्या तत्परतेनें एका उत्तम स्थळीं ठेविलें.

त्या चांडाळ रुक्मयापुढें राजाचें कांहीं चालेना, त्याणें नगर श्रृंगारिलें, लग्न तीथ नक्की केली, व शिशुपाळास आणविलें. हा सर्व झालेला मजकूर दासीनें रुक्मिणीस कळविला; त्या वेळेस ती चिंतासागरांत बुडून गेली. डोळ्यांतून आसवें गळूं लागलीं. अन्न उदक गोड लागेना. कृष्णास जाऊन कोण घेऊन येईल ह्याविषयीं ती योजना करीत असतां एकाएकीं सुदेव नांवाचा ब्राह्मण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

तिच्या मंदिरांत आला. नंतर तिनें त्याचे हातीं श्रीकृष्णास देण्याकरितां सात श्लोकांचें एक पत्र दिलें. त्या पत्रांत 'आपलें मन तुझ्या चरणीं लीन आहे व तुजवांचून मला दुसरा पति वरणें नाहीं,' असें श्रीकृष्णास स्पष्ट दर्शविलें. त्यावरून श्रीकृष्णही आपलें सैन्य घेऊन विदर्भनगरी शेजारील अंबिकापुरीं येऊन राहिला.

ज्या वेळेस रुक्मिणीस हळद लागली व कृष्णही आला नाहीं असें पाहून, शिशुपाळ आतां आपला खास पति होतो असें तिला मोठें भय पडलें. व तिला अन्नपाणीही गोड न लागून ती रात्रंदिवस कृष्णाचें चिंतन करूं लागली. इतक्यांत कुलधर्माप्रमाणें लग्न लागण्याचे पूर्वी रुक्मिणीस गांवच्या सिमेबाहेरील अंबिकेच्या देवळांत देवीच्या पाया पडविण्यास नेलें. तिजबरोबर पुष्कळ सैन्य होतें. कृष्णही तेथें आसपास तयारच होता. ती दीनपणें देवीच्या चरणांवर मस्तक ठेवून तिला प्रदक्षणा करीत आहे व कृष्णाचा स्मुखानें धांवा करीत आहे तों, कृष्णानें एकदम तिला आपल्या रथांत उचलून घेतली; व तिनेंही देवीनें दिलेली निलोत्पलमाला आनंदानें कृष्णाच्या गळ्यांत घालून चरणांवर मस्तक ठेविलें. त्या वेळेस सकल देवांनीं स्वर्गींहून पुष्पवृष्टि केली. सकल सैन्यावर कृष्णानें मोहिनीअस्त्र घातल्यामुळें, त्यांचीं शस्त्रें हातांतून गळून ते अगदीं मूर्च्छित पडले होते.

# अध्याय २४ वा.

## रुक्मिणीविवाह.

मागील अध्यायांत कृष्णानें रुक्मिणीस हरण केल्याची कथा झाली. आतां पुढें असा वृत्तांत झाला कीं, ज्या वेळीं रुक्मिणीस हरण करून नेली असें सर्व वीरांनीं ऐकलें, त्या वेळीं एकच कल्होळ झाला. आणि एकंदर सरदार रुक्मिणी कोठें आहे याचा शोध करूं लागले. तें पाहून रुक्मिणीच्या सख्या असें ह्मणूं लागल्या कीं, मूर्खांनों, तुह्मीं एवढे दिग्विजयी वीर जागृत व हुशार असून, तुह्मांदेखत कृष्णानें रुक्मिणीस हरण करून नेली, हें तुह्मांस दिसलें नाहीं काय? त्या वेळेस तुमचे पराक्रम कोठें गेले होते? असें ऐकून रथारूढ होऊन बहुत वीर दशदिशा तिच्या शोधार्थ धांवूं लागले.

इकडे श्रीकृष्ण, बळिभद्र आदिकरून एकंदर यादववीर युद्धास उठावले. त्या वेळेस त्या उभय सेनेचा मोठा संग्राम झाला; आणि त्यांत बळिभद्रास फार कोप येऊन तो आपल्या नांगरानें असंख्या वीरांचा संहार करीत चालला. जरासंध, वक्रदंत आदिकरून मोठमोठाले राजे आपल्या असंख्य सैन्यानिशीं कृष्णावर चाल करून गेले. तसेच अंग, वंग, कलिंग देशीचे नृपति शाल्व, पौंड्रक व कैशिक हेही आपल्या सैन्यानिशीं निकरानें लढूं लागले. परंतु तितक्याही सर्व लष्कराचा संहार एकट्या बळिरामानें केला. आणि रणांत शत्रुसैन्यास जणू कृतांतासारखा दिसूं लागला. असें पाहून जरासंध फारच भयाभित झाला आणि ह्मणूं लागला कीं, आतां समय बरा दिसत

नाहीं. ज्या वेळीं रुक्मयाच्या अगणित सैन्याचा संहार होऊं लागला, त्या वेळीं रुक्मिणीनें असें मनांत आणिलें कीं, दोन्ही दळांचा जरी संहार झाला तथापि एकीकडे सासर व दुसरीकडे माहेर मिळून दुःख आपल्यासच. अशा विचारानें तिनें कृष्णाकडे दीन वदनानें पाहिलें. त्यावरून कृष्णानें तिला पोटाशीं धरून तिची समजूत केली.

इतक्यांत शिशुपाळ लग्नाचे तयारीनें बाहेर निघाला. त्यास वाटेंत नानाप्रकारचे अपशकुन झाले. त्यांवरून तो काळजी करीत आहे, इतक्यांत जरासंधानें निरोप आणला कीं, कृष्णानें रुक्मिणी नेली व दुर्दैवानुसार आपल्या सर्व सैन्याचा पराभव झाला. हें ऐकतांच सर्व राजे आपापल्या स्थानीं पळून गेले. रुक्मिणीचा बंधु रुक्मया, ज्याची पूर्ण प्रीति शिशुपाळावर, त्या वराचा कार्यभंग झाला आणि आपल्या सर्व वीरांचा संहार झाला असें ऐकून, भयंकर आरोळी देऊन आपल्या सेनेसहवर्त्तमान कृष्णाशीं युद्ध करण्यास गेला त्याणें बाणांची वृष्टि अशी चालविली कीं, आपल्या शौर्यानें यादवांस दशदिशा पळविलें. हें पाहून कृष्णानें एक तीव्र बाण मारून रुक्मयाचे घोडे व सारथी मारले. आणि दुसऱ्या बाणानें त्याचा मुकुट खालीं पाडिला. नंतर हातांत गदा घेऊन आपल्यावर धांवत आला असें कृष्णानें पाहून धनुष्यकोटीनें रुक्मयास आपल्या रथाशीं ओढला, आणि त्याचा शिरच्छेद करणार तों रुक्मिणीनें म्लान वदन केलें. त्यावरून त्याचा वध न करितां त्याचे पांच पाट काढून रुक्मिणीस सांगितलें कीं, आतां आपल्या विजयी बंधूस आरती ओंवाळ! इतक्यांत बळरामही सेना संहार करीत तेथें आला. त्याच्या

शिफारशीवरून रुक्मयास कृष्णानें सोडलें. तेव्हां त्यानें जाऊन एक नवीन भोजकट या नांवाचें नगर वसवून तेथें राहिला. कृष्ण पुढें मूळमाधवास येऊन राहिला. तेथें भीमकानें येऊन कृष्णास लग्नाकरितां वैदर्भनगरीं येण्याचा आग्रह केला. परंतु उभयतांच्या संमतानें तेथेंच विवाह करण्याचें ठरल्यावरून कृष्णानें वसुदेव, देवकी, उग्रसेन, सुभद्रा आणि रेवती इत्यादि सर्व वऱ्हाडी द्वारकेहून आणविले.

रुक्मिणीस भीमकानें आपल्या रथांतून घरीं नेली, व तिला कृष्णाकडील आलेली उष्टी हळद लाविली. कृष्णानें दानधर्म फार केला. रुखवत येऊन श्रीकृष्ण भोजनास बसले. नंतर शुद्धमतीनें तें उच्छिष्ट ताट आपल्या मंडपीं नेलें. तेथें भीमकीच्या हातीं कृष्णाची मुद्रिका घातली. त्यानंतर श्रीकृष्ण घोड्यावर बसून लग्नास चालले. उग्रसेन, वसुदेव आणि बळराम मागाहून थाटानें येत होते. असे सर्व वधूच्या मंडपांत आले. तेथें श्रीकृष्णचरण भीमकानें प्रक्षालन केले व त्यास वस्त्रालंकार दिले. नंतर दहीं, मध व तूप एकत्र करून श्रीकृष्णाच्या हातावर दिलें. भक्षण करतेवेळीं कांहीं थट्टेचीं भाषणें झालीं. इतक्यांत शेवटची लग्नघटका भरत आहे तों अंतरपाट धरिला, व मोठ्या समारंभानें लग्न झालें. नंतर कृष्णानें नवरी कडेवर घेऊन बहुल्यावर ठेविल्यानंतर देवकी सूनमुख पहावयास आली. या वेळींही थट्टा फार झाली. नांवें वगैरे एकमेकांचीं एकमेकांनीं घेतलीं. यादवांनीं कृष्णास ह्मटलें कीं, जसा आपण रुक्मयाचा सन्मान केलात तसा आपला होत नाहीं ह्मणून इतर मेहुणे आपल्यावर रुसले आहेत. या थट्टेवरून

सर्व शालक-मंडळीस वस्त्रालंकार कृष्णानें दिले. यानंतर हळद घेऊन रुक्मिणीच्या अंगास कृष्णानें मर्दन केली; त्या वेळीं रेवतीनें कृष्णास थट्टेनें म्हटलें कीं, ज्या हस्तानें आपण 'तिकडे' मर्दन केलें तसें येथें न करितां किंचित् हलका हात असावा! अशा रीतीनें चार दिवस लग्न-सोहळा झाल्यानंतर, शुद्धमती रुक्मिणीची आई इनें भीमकीला देवकीच्या पदरांत घातली. यानंतर सर्व यादवांस शेले, पागोटीं व उत्तम भूषणें देऊन षड्रसान्नांची टोलेजंग समाराधना झाल्यानंतर भीमकानें जे कोणी देव, ऋषि व मोठमोठे राजे लग्नाकरितां आले होते, त्या सर्वांचा गौरव करून त्यांस सन्मानानें स्वस्थानीं लावून दिलें. यानंतर सैन्य व वऱ्हाडी या सहवर्त्तमान भीमक राजा आपल्या नगरांत परत आला. आणि श्रीकृष्णभगवान रुक्मिणीसह-वर्त्तमान सर्वांस घेऊन द्वारकेस आले. त्या ठिकाणीं येतांच उग्रसेनानें द्रव्यभांडार फोडून अमित धन याचकांस दिलें. त्यानंतर द्वारकेंतील महान शिष्ट शिष्ट मंडळी-करितां एक जेवणावळ घातली व सर्वांस वस्त्रेंभूषणें कृष्णानें दिलीं. या वेळीं देव, गंधर्व, सहस्रावधि ऋषि व ऋषि-पत्न्या आपापले सुखासनीं व विमानारूढ होऊन द्वारकेस श्री-कृष्ण व रुक्मिणी यांच्या दर्शनास आल्या. त्या वेळीं रु-क्मिणीनें लक्ष्मीपूजन केलें. कृष्णानें सर्वांच्या आग्रहावरून वधुनामोच्चारण व आणखीं कांहीं थट्टासूचक समारंभ करून सर्वांस लावून दिलें.

---

# अध्याय २५ वा.

## स्यमंतकमणी व नारदगर्वपरिहार इ०

मागील अध्यायांत रुक्मिणीसह कृष्ण द्वारकेस गेल्याची कथा झाली. आतां पुढें कथा अशी कीं, मागधदेशी-च्या सत्राजित राजानें सूर्यास प्रसन्न करून त्यापासून नित्य अष्टभार सुवर्ण उत्पन्न होईल असा एक दैदीप्यमान स्यमंतकमणी मिळविला. तो मणी राजा नित्य आपल्या गळ्यांत घालीत असे. एके दिवशीं सत्राजित राजा कृ-ष्णाच्या भेटीस आला असतां, कृष्णानें त्याचा बहुमान केला. व त्याच्या गळ्यांत दैदीप्यमान मणी पाहून कृष्णास फारच आनंद झाला. इतक्यांत तेथें असलेल्या नारदानें कृष्णास सांगितलें कीं, तो मणी तुलासच योग्य. परंतु कृष्ण बोलला, तो मिळेल कसा? मग नारदानें राजा-जवळ जाऊन कृष्णास तो मणी देण्याविषयीं सांगतांच त्यास मोठा राग येऊन त्याणें ह्मटलें कीं, तो गवळी नीच जातीचा; त्यास हा मणी योग्य नसून मिळणारही नाहीं. नंतर नारदानें कृष्णाची कीर्ति फारच वाखाणून त्यास उपदे-शही केला; परंतु सत्राजितास तें न मानवून तो मणी त्याणें स्वनगरास आल्यानंतर देव्हाऱ्यांत ठेविला व नित्य त्याची पूजा करूं लागला.

एके दिवशीं सत्राजिताचा बंधु प्रसेनवीर अरण्यांत शि-कारीस जातांना, त्याणें तो मणी आपल्या गळ्यांत घातला. त्याणें बहुत दळभार आपल्या समागमें नेला होता. तो त्या घोर रानांत जाऊन एका मोठ्या भयंकर सिंहामागें लागला असतां, त्यावर भाला मारलेला चुकून अकस्मात तो

सिंह मागें फिरून त्याणें लागलाच राजपुत्रास फाडून खाल्ला. अशा रीतीनें राजपुत्राचा नाश होऊन तो मणी सिंहाजवळ गेला. पुढें त्या सिंहाची व जांबुवंताची ज्या वेळीं गांठ पडली, त्या वेळीं त्यानें त्या सिंहास मारून तो मणी काढून घेतला.

ज्या वेळीं कृष्णावर तो स्यमंतक मणी नेल्याचा व प्रसेनवीर यास मारल्याचा व्यर्थ दोषारोप आला, त्या वेळीं कृष्णानें हें अपेश आपणावर न यावें असें मनांत आणून, तो त्या मण्याच्या शोधास्तव अरण्यांत गेला. तेथें त्यानें जांबुवंतास गांठून त्याशीं मोठें युद्ध करून त्याचा पराभव केला. आणि तो मणी त्याजवळून घेऊन सत्राजितास परत नेऊन दिला; आणि सांगितलें कीं, राजा, मजसाठींच हा मणी त्वां भीतीनें देव्हाऱ्यांत ठेविल्यानें असा अनर्थ होऊन त्यांत व्यर्थ तुझा बंधु मात्र मृत्यु पावला. परंतु ज्या मण्याकरितां हें दुःख तुला झालें, तो मणी मी जांबुवंताशीं युद्ध करून त्याजवळून आणून दिला आहे. हा घेऊन आतां स्वस्थ रहावें. राजानें त्याच वेळीं कृष्णचरणीं मस्तक ठेवून विनंती केली कीं, हे देवाधिदेवा, तूं फारच श्रम यःकश्चित् मण्याकरितां घेऊन मला माझा मणी परत आणून दिला आहेस, त्या अर्थीं तुझे उपकार माझ्यानें कधींच फिटणार नाहींत. माझा बंधु मेला हें दुःख तुझ्या चरणांच्या दर्शनानें तत्काळ परिहार झालें. आणि आतां माझी विनंती एवढीच आहे कीं, माझी सत्यभामा नांवाची सुलक्षणी कन्या मी अत्यादरपूर्वक आपल्या चरणीं अर्पण करितों; इचा आपण कृपाळू होऊन अंगीकार करावा. कृष्णानें लागलेंच सत्राजिताचें भाषण मान्य करून सुल-

भामेशीं मोठ्या उत्साहानें लग्न केलें. तो मंगलोत्सव चार दिवस झाल्यानंतर तोच स्यमंतकमणी सत्राजितानें कृष्णास अहेरादाखल अर्पण केला. पण कृष्णानें तो मणी त्याचा त्यास परत केला आणि त्यास सांगितलें कीं, आपण मला सत्यभामेसारखें दिव्य रत्न दिलेंत, तेणेंकरूनच मला फार आनंद झाला आहे.

जांबुवंताशीं कृष्णाचें तुंबल युद्ध झालें असें वर लिहिलें आहे. त्या विषयींची पूर्व कथा अशी आहे कीं, रामावतारीं ऋक्षसैन्यांत जांबुवंत या नांवाचा एक मोठा सरदार होता. तो रामाच्याच पक्षाचा असल्यानें त्याशीं रामाचें युद्ध न होतां, आणि दंडकंडूही शमन न झाल्यामुळें, शेवटीं आपल्याच स्वामीजवळ त्यानें युद्धाभिक्षा मागितली होती. त्या वेळीं रामचंद्रानें त्यास असें सांगितलें होतें कीं, या वेळीं तर युद्ध करवत नाहीं; तथापि तूं खिन्न न होतां स्वस्थ असावें. कृष्णावतारीं तुझ्याशीं मी युद्ध करून तुझी इच्छा तृप्त करीन. त्याप्रमाणें कृष्णानें मण्याचें निमित्त करून मल्लयुद्धांत त्यास जिंकिलें व त्याचा पराभव केला. अशा रीतीनें पराभव झाल्यावर जेव्हां जांबुवंतास मागील अवतारांतील रामचंद्रानेंच कृष्णावतार धारण केला आहे असें समजलें, तेव्हां त्यानें अति आनंदित होऊन आपली प्रियकर व सुलक्षणी कन्या जांबुवंती जी उपवर झाली होती, ती कृष्णचरणीं अर्पण करण्याचा आपला मनःपूर्वक हेतु कृष्णास दर्शविला. या कृत्यास रुकार देण्यापूर्वीं कृष्णानें याविषयीं सर्वांस विचारिलें, त्या वेळीं जनावराशीं लग्न करण्यास सर्वांनीं आपली नाखुषी दर्शविली; तथापि कृष्णानें सर्वांची समजूत करून तिशीं लग्न करण्याचा निश्चय केला. त्यावरून

जांबुवंतास फारच हर्ष होऊन त्यानें लग्नाची तयारी करविली. तो लग्नाचा थाट तर मागील सर्व मंगलकृत्यांपेक्षांही अधिक चांगला झाला. या वेळीं बहुत जांबुवंत स्त्रिया व पुरुष हेच प्रमुख वऱ्हाडी व व्याही असल्यामुळें, तो समारंभ फारच स्तुत्य झाला. व सर्वांस फारच हर्ष झाला. अशा संधींत कृष्णानें नारदास सांगितलें कीं, या समारंभांत मिरवणूक, शोभा, नकला व जेवणखाण इत्यादि प्रकार फारच चांगले झाले असून, फक्त एक गायनप्रकार या मंगलोत्साहांत नसल्यामुळें किंचित उणेपणा वाटतो. ह्मणून, आपण कृपा करून ती इच्छा परिपूर्ण करावी. नारदानें विनंती केली कीं, देवा, या अस्वलमंडळीस रुचेल असें गाणें मला येत नाहीं; ह्मणून माझ्या गाण्याचा येथें उपहास मात्र होईल. कृष्णानें सांगितलें कीं, नारदा, ही मंडळी गायनकलेंत फारच निष्णात व चतुर आहे; असें मला ठाऊक आहे. यापुढें सामान्याचा टिकाव लागणार नाहीं; परंतु आपलेंच गाणें पसंत पडेल! नारदानें विनंती केली कीं, देवा, असें जर आहे तर त्यांच्या तोंडचींच दोन अक्षरें ऐकण्याचा माझा हेतु आहे; व त्यांचें झाल्यावर मग मीही वेडेवांकडे दोन शब्द गाईन.

नारदास काय तो सुस्वर गाणारा मीच, असा फारच गर्व झाला होता, तो त्याचा गर्व परिहार करावा असें कृष्णाच्या मनांत येऊन जिकडे दृष्टि गेली तेथील एका अस्वलास सांगितलें कीं, उठा, आणि नारदाचाच विणा घेऊन कांहीं मधुर गायन ऐकवा. इतकें कृष्णाच्या मुखांतून निघतांच एक अस्वल नाचत नाचत कृष्णासमोर येऊन साष्टांग नमस्कार घालून पुढें उभें राहिलें. त्यास

नारदाचा विणा घेण्याची आज्ञा होतांच, तसेंच नाचत तें नारदाजवळ जाऊन उभें राहिलें. नारद ह्मणाला, देवा, आतां मला विणा तर देणें अवश्य आहे, व तो मी देतों; परंतु तो चांगल्या रीतीनें पुन्हा परत येईल किंवा कसें याविषयीं मला मोठाच संशय आहे. ह्मणून तुझी कृपा त्या विण्यावर तरी या प्रसंगीं मुख्यत्वें असूं दे. असें ह्मणून त्या अस्वलाच्या हातीं तो वीणा दिला. तो घेऊन एका उडीनें तो आस्वल कृष्णासमोर गाण्याच्या थाटानें जाऊन बसला. इतक्यांत दुसरा एक मोठा रीस जवळच एक मृदंग होता तो घेऊन त्याच्याजवळ उडी मारून बसला; आणि गाण्यास प्रारंभ केला. त्या वेळीं प्रातःकाळचा समय असल्यामुळें त्या रीसानें त्याच वेळचे उत्तम राग ह्मटले. तें गाणें ऐकून नारद तर काय, परंतु त्या प्रसंगीं चमत्कार पहाण्यास जे देव, यक्ष व गंधर्व स्वर्गींहून या महान अरण्यांत आले होते, ते देखील अगदीं तल्लीन होऊन सर्वांस मूर्च्छना आल्यासारखी होऊन त्यांची मति गुंग झाली. नारद तर ब्रह्मानंदांत सर्पासारखा डोलूं लागला. तें गाणें ऐकण्यास सर्प इत्यादि रानांतील एकंदर लहान थोर घातक जनावरें तेथें येऊन आपला वैरभाव सोडून आनंदानें डुलत होतीं. कृष्णानें ज्या वेळीं पाहिलें कीं, सर्वांचीं चित्तें लुब्ध झालीं व नारद डोलूं लागला, त्या वेळीं आपल्या चमत्कारिक कर्तृत्वानें असें घडविलें कीं, ज्या भुमीवर तो रीस गावयास बसला होता, ती जमीन त्या गायनरागानें मेणासारखी मृदु होऊन शिथिल झाल्यानें त्या रीसाच्या हातीं जो विणा होता तो त्या जमिनींत अर्धा पुरल्यासारखा झाला,

कृष्णानें पहातांच लागलेंच गाणें पुरे करण्यास सांगि-
तलें. हें ऐकतांच तो रीस लागलाच उठून एकीकडे
जाऊन बसला. व दुसरा रीस येऊन तो विणा काढून
नारदास देऊं लागला; तों तो विणा जमिनींत रुतून ज-
मीन पूर्ववत झाली. कृष्णानें नारदास त्या जाग्यावर
जाऊन गावयास सांगितलें. नारदानें विनंती केली कीं,
माझ्यानें एक अक्षरही या अशा उत्तम गाण्यावर काढवत
नाहीं. कृष्ण बोलला कीं, महाराज, बरें तर आपला
वेणा तरी आणावा! नंतर नारदानें तेथें जाऊन अनेक
प्रयत्न केले; परंतु तो तंबुरा वर येईना. तेव्हां कृष्णासमोर सा-
ष्टांग नमस्कार घालून विनंती केली कीं, देवा, मी हुशार
गाणारा असा जो मला गर्व होता तो आतां गेला; आणि
"सानुकूलो जगन्नाथो विपरीतः सुपरीतो भवेत्" हें वचन
अक्षरशः खरें वाटलें. रीस हा तर जीव आहे, परंतु नि-
र्जीवांकडूनही सजीव कृति घडवून मोठ्यांचा गर्व परिहार
करविशील; तर आतां दया करून माझा हा वीणा मला
देववावा. हें ऐकून कृष्णास दया आली; आणि दुसऱ्या एका
रीसास तेथें जाऊन गाण्यास आज्ञा केली. ती होतांच त्याणें
जाऊन गाण्यास आरंभ केला आणि कांहीं वेळानें पुनः ती
जमीन पातळ झाली. तेव्हां नारद तसें होण्याची वाट पहा-
तच होता. त्याणें तत्क्षणींच जाऊन तो वीणा वर उपटला.
इतक्यांत कृष्णानें गाणेंही आटोपण्यास आज्ञा दिली. गाणें
आटोपतांच लागलीच जमीन पूर्ववत झाली. या वेळीं
कृष्णावर देवांनीं पुष्पवृष्टि केली, व ते सर्व यक्षकिन्नरांसह
स्वस्थानीं गेले. नारदही आज्ञा मागून गेला. नंतर सत्राजित
राजास कृष्णानें बोलावून तो मणी त्यास परत दिला.

या अध्यायांत दुसरें असें निरूपण आहे कीं, आपण गणेशचतुर्थीच्या दिवशीं चंद्र पाहिला ह्मणून आपल्यावर कित्येक वेळां गोकुळ, वृंदावन इत्यादि स्थानीं चोरीचे व दुसऱ्याही कित्येक अपराधांविषयीं नसते आळ आले; ह्मणून कृष्णानें सर्वांस श्रीगणपतीची फारच चमत्कारिक कथा सांगितली. ती अशी कीं, :—एकदां प्रदोषकाळीं इंद्र, चंद्र, वरुण, कुबेर, अष्टवसु, गंधर्व, किन्नर, हे आपापल्या वाहनावर आरूढ होऊन कैलासीं श्रीशंकराच्या दर्शनाकरितां जात होते. त्यांजबरोबर गणपतीही उंदरावर बसून चालला होता. सर्वजण कैलासपर्वत चढूं लागले, इतक्यांत गणपति उंदरावरून पडला; पण लागलाच तो पुन्हा आरूढ झाला. हें पाहून चंद्र हंसला ह्मणून गणपतीनें त्याला शाप दिला कीं, 'जो कोणीं तुझें मुख अवलोकन करील, त्यावर भलभलते आळ येतील.' असें ऐकतांच चंद्रानें आपलें तोंड झांकलें. तेव्हां सर्व देवांनीं गणपतीचें स्तवन केलें व चंद्रास शापापासून मुक्त करावा ह्मणून प्रार्थना केली. शेवटीं चंद्रास त्याच्या पायांवर घातला. तेव्हां तो ह्मणाला, 'माझ्या वरदचतुर्थी रोजीं (गणेशचतुर्थीस) मात्र या चंद्राचें मुख कोणीं पाहूं नये; पाहिल्यास आळ येतील. एऱ्हवीं केव्हांही पाहिल्यास हरकत नाहीं.'

कोणी एक शतधन्वा नांवाचा यादव ज्यास सत्राजित राजानें पूर्वीं आपली कन्या सत्यभामा द्यावयाचें केली होती, परंतु ती नंतर कृष्णास दिली; यावरून त्याणें मनांत कोपायमान होऊन, चालेल त्या वेळीं आपला सूड उगवून तो मणी सत्राजिताकडून आपण हिसकावून घेण्याविषयीं प्रयत्न करीत

होता. पुढें कृष्णाकडून तो राजा आज्ञा मागून स्वनगरीं परत गेल्यानंतर, एके दिवशीं निद्रिस्थ असतां, शतधन्व्यानें त्यास ठार मारून तो मणी घेऊन तो गेला. त्या वेळीं सत्यभामा माहेरीं होती; तिला हें दुःख फारच दुःसह होऊन ती लागलीच कृष्णदर्शनास निघाली. त्या वेळीं श्रीकृष्णनाथ हस्तनापुरास पांडवांच्या समाचारास आले होते. त्या स्थळीं ती येऊन हा वृत्तांत सांगतांच तेथून कृष्ण निघाले, व तिला द्वारकेस पाठवून आपण त्या शतधन्व्यास वाटेंत गांठून त्याचें मस्तक सुदर्शनानें उडविलें. शोधाअंतीं त्याजवळ तो मणी नाहीं असें पाहून श्रीकृष्ण द्वारकेस परत आले, व असा डांगोरा पिटविला कीं, तो मणी कोणाजवळ असेल त्याणें आणून द्यावा. शतधन्व्यानें अक्रुराजवळ तो मणी दिला होता. तो घेऊन वाराणशीस तो पळून गेला. अक्रुरानें मणी नेला व तो पळाला असें हेरांच्या मुखानें ऐकून त्याच्या भेटीविषयीं कृष्ण अगदीं आसक्त झाला. नित्य आठ भार सोनें तो मणी जें प्रसवे, तें घेऊन अक्रूर दानधर्म करून वाराणशीस सुखरूप आहे असें ऐकलें. द्वारकेंतून अक्रूर गेल्यापासून बारा वर्षें दुष्काळ पडला. पुढें आकाशवाणी झाली कीं, अक्रुरास येथें आणावा ह्मणजे हा सर्व अनर्थ टळेल. त्याप्रमाणें कृष्णानें वाराणशीहून त्यास द्वारकेस आणून मोठ्या प्रीतीनें व सन्मानानें त्याची भेट घेतली. त्याच वेळीं त्याणें तो मणी कृष्णास दिला. कृष्णानें उत्तम वस्तूच्या योगें केव्हां केव्हां अनर्थ होतात असें दर्शवून व सत्राजिताचा संहार या मण्यानें केला, याविषयीं सर्वांस सुचना करून तो श्रीकृष्णानें आपल्याच गळ्यांत अक्षयीं घातला.

---

# अध्याय २६ वा.

## मित्रवृंदादि विवाह व पारिजातकाख्यान.

पंचविसावे अध्यायापर्यंत श्रीकृष्णाचें बालचरित्र वर्णन झालें. येथपर्यंत बाललीला, साहस कृत्यें, आणि अचाट कर्मै हीं वाचणारांच्या लक्षांत आलींच असतील. आतां या अध्यायापासून भारतीकथा ह्मणजे कौरवपांडव यांचा वृतांत व कृष्णाच्या प्रौढपणाच्या कथा निरूपण करण्यांत येतील.

कंसासुराचा दंगा मोडल्यावर कांहीं काळानें पृथ्वीवर पुन्हा दैत्य उत्पन्न होऊन साधुजनांस त्रास होऊं लागला. त्या वेळीं कृष्णनाथास तिकडे लक्ष द्यावेंसें वाटलें. या वेळीं पृथ्वीवर चांडाळ प्राण्यांपैकीं धृतराष्ट्राचे दुर्योधनादि शंभर पुत्र होते. धृतराष्ट्रराजा हा वार्ष्णेय नामक उन्मत्त गंधर्वाचा अवतार असतां हे त्यास पुत्र झाले; ते राक्षसाचे अंश. जशी पौलस्ती ऋषीपासून दशाननादि दुष्टांची उत्पत्ति त्याच प्रमाणें हे कौरव समजले पाहिजेत. रावण, कुंभकर्ण इत्यादि जयविजयांचे अवतार जसे शापयोगानें या योनींत आले, तसेच शिशुपाळ, वक्रदंत, जरासंध, काळयवनादि करून कित्येक दुष्ट दैत्यांचे अंश घेऊन जन्मास आले. आतां, त्या दुष्टांतच परंतु उत्तम अवतार भीष्म, जो गंगेच्या पोटीं वसुवीर्यानें झाला. तसाच गुरु द्रोण, हा बृहस्पतीचा अवतार. कृपाचार्य हा रुद्रगणांचा अंश व याचा जन्म गौतमवीर्यैंकरून झाला. अश्वत्थामा हा शिवाच्या कोपाचा मूर्त्तिमंत अवतार होता.

वरील दुष्ट राक्षसांशांचे जे अवतार सांगितले, ते केवळ पृथ्वीच्या नाशास्तव झाले. परंतु कर्ण, द्रोण, भीष्म

इत्यादि सौम्यावतार, ज्यांनीं वरील दुष्टांच्याच संगतींत असून साधूंचें कल्याण केलें; ह्मणून ते दुष्टवधार्थच अवतार ह्मटले पाहिजेत. यम, वायु, इंद्र व अश्विनौदेव यांचे पूर्ण अवतार धर्म, भीम, अर्जुन, नकुळ व सहदेव मिळून पांडव होत. पृथ्वीवरील भार उतरण्याच्या हेतूनें या वेळीं श्रीकृष्णनाथानें पांडव नांवाच्या पांच दिवट्या हातीं धरून उत्तम प्रकारचा गोंधळ घातला; आणि त्या गोंधळांत दुर्योधनादि दुष्टांच्या रणयज्ञांत आहुति दिल्या. अथवा यादव व पांडवसैन्य यांच्या हातांत कृष्णानें कुऱ्हाडी देऊन राक्षसवनाचा संहार करविला. असो.

कोणे एके वेळीं अर्जुन सहजगत्या श्रीकृष्णाच्या भेटीकरितां द्वारावतीस गेला. पुढें ते उभयतां शिकारीच्या हेतूनें वनांत गेले. तेथून विश्रांतीकरितां कालिंदीतटीं गेले असतां, तेथें एक सुंदर स्त्री ( कालिंदी ) तप करीत असलेली पाहिली. तिचें मन आपल्याबरोबर लग्न करण्याचें जाणून, कृष्णानें अर्जुनाच्या मध्यस्थीनें त्या स्त्रिशीं द्वारकेंत जातांच लग्न केलें.

अवंती नगरीचा राजा मित्रविंद याला एक मित्रविंदा नांवाची उपवर कन्या होती. या मित्रविंदेचें लग्न करण्याचा ज्या वेळीं निश्चय झाला, त्या वेळेस तिचें मन कृष्णचरणीं आहे असें पूर्णपणें माहीत असतांही तिच्या हेतुप्रमाणें तिच्या चौघां बंधूंनीं लग्न न करितां स्वयंवर करण्याचा ठराव केला. परंतु यांतही कांहीं मतें भिन्न पडल्यामुळें शेवटीं असा निश्चय झाला कीं, हत्तिणीच्या सोंडेंत माळ देऊन ती ज्यास घालील त्या पुरुषाशीं इचें लग्न करावें. याप्रमाणें ठराव झाल्यावर पृथ्वींतील सर्व राजे बोलावून

मोठा मंडप सिद्ध केला. त्यांत सर्वांस बसवून हत्तीणीच्या सोंडेंत माळ देऊन तिला सभेंत मोकळी सोडली. हें वर्तमान पूर्वींच कृष्णास कळून तोही यादवसैन्यानिशीं त्याच वेळीं तेथें आला; आणि सर्व राजे जेथें बसले होते त्या मंडपांत धिटाईनें जाऊन उभा राहिला. इतक्यांत हत्तिणीची नजर कृष्णावर पडतांच तिणें लागलीच श्रीकृष्णाच्या गळ्यांत ती माळ घातली. त्याच वेळीं त्या स्त्रियेस जोरावारीनें कृष्णानें स्वरथीं नेली आणि चौघां मेहुण्यांबरोबर युद्ध करून त्यांचें सर्व लष्कर मारून टाकलें. ही दुर्दशा पाहून, ते विचारे चौघेही पराङ्मुख होऊन पळून गेले.

यज्ञजित राजाची याज्ञजिति या नांवाची एक कन्या होती. तिच्या लग्नसमयीं बापानें असा निश्चय केला होता कीं, जो कोणी सात वृषभांस आकळून वेसण घालील अशा साहसकर्त्यासच मी ही कन्या देणार. यासाठीं त्याणें सर्व राजांस निमंत्रणें करून त्यांचें आदरातिथ्यही फारच चांगलें केलें. त्या वेळीं दुर्योधन, कर्ण वगैरे बहुत कौरवांनीं तेथें येऊन तो पण सिद्धीस नेण्यास बहुत खटपटी केल्या; परंतु त्या सर्व व्यर्थ गेल्या. असें पाहून तो पण श्रीकृष्णानें सिद्धीस नेला, व त्या स्त्रिशीं लग्न केलें.

या नंतर कोणीएक लक्ष्मणसेन नामक राजाची लक्ष्मणा नामें कन्या होती. तिच्या लग्नाविषयीं तिच्या बापानें मत्स्ययंत्र भेदण्याचा पण केला होता. त्या वेळीं तेथें त्याच्या आमंत्रणावरून कीर्त्तिमान व शूर राजे पुष्कळ जमले होते. त्यांत दुर्योधनादि कौरव असून, पांडवांकडील अर्जुनही आला होता. तो पण पाहून सर्व राजांच्या मनांत निराशा

उत्पन्न झाली. परंतु, कर्णाच्या मनांत आवेश चढून तो पुढें आला व तें धनुष्य तर उचलिलें; परंतु मत्स्ययंत्राचा भेद आपणास होणार नाहीं असें मनांत आणून, तें धनुष्य तसेंच टाकून तेथून गेला. तेंच धनुष्य उचलून अर्जुनानें शरसंधानही केलें; परंतु नेम चुकल्यामुळें तोही निराश झाला. तें पाहून श्रीकृष्णानें शरसंधान करून मत्स्ययंत्रभेद केला. त्या वेळीं एकच जयजयकार होऊन मोठ्या समारंभानें या स्त्रिशीं कृष्णाचें लग्न झालें. यापूर्वींच भद्रराजाची कन्या भद्रावती इशीं कृष्णानें लग्न केलें होतें. श्रीकृष्णाच्या लग्नाच्या अष्टनायका झाल्या; त्यांचीं नांवें:—रुक्मिणी, सत्यभामा, जांबुवंती, कालिंदी, मित्रविंदा, याज्ञजिति, भद्रावती आणि लक्ष्मणा. असो. लक्ष्मणा इशीं विवाह झाल्यानंतर श्रीकृष्ण द्वारकेस गेले.

एके दिवशीं कृष्णनाथ सभेंत बसले असतां, अकस्मात् नारदऋषि तेथें आले. त्यांचें आगतस्वागत करून, वृत्तांत विचारल्यावर ऋषीनें इंद्रलोकचा वृत्तांत सांगून, एक पारिजातकाचें पुष्प कृष्णाच्या हातीं देऊन त्याची फार तारीफ केली. नारद गेल्यानंतर तें फूल कृष्णानें रुक्मिणीजवळ दिलें. तें वर्तमान सत्यभामेस कळून तिला फारच राग आला. कृष्णानें तिची समजूत पुष्कळ रीतीनें केली, तथापि तिचा राग जाईना; शेवटीं, 'तुझ्या दाराशीं तो पारिजातक वृक्षच आणून लावितों' असें जेव्हां कबूल केलें, तेव्हां तिचा राग शांत झाला.

कांहीं काळानें इंद्र अकस्मात कृष्णसभेस येऊन त्यानें विनंती केली कीं, नरकासुर नांवाच्या दैत्यानें फारच उन्मत्त होऊन स्वराज्य विस्तार करण्याच्या हेतूनें सर्व देवांस त्रास

दिला आहे व आमचीं कुंडलें व मुकुट हिरावून नेलीं. आतां आमचा अधिकार आह्मांस चालविण्याची शक्ति नाहीं; ह्मणून त्वां तो आपल्या स्वाधीन घ्यावा. यावरून कृष्णानें लागलाच इंद्रलोकीं युद्धास जाण्याचा निश्चय केला. त्या वेळीं सत्यभामाही आग्रहानें कृष्णासमागमें गेली. कृष्णानें त्या दैत्याशीं मोठाच युद्धप्रसंग केला व त्यास मारून त्याच्या भगदत्त नामें पुत्रास राज्य दिलें; व कुंडलें आणि मुकुट इंद्रास परत देवविलीं. या प्रसंगीं सत्यभामेनेंही कित्येक वेळां कौतुकानें युद्ध केलें.

या नरकासुरानें आपलें लग्न करण्याकरितां मोठमोठ्या प्रचंड राजांच्या लहान लहान सोळा हजार मुली आणून आपल्या कारागृहांत ठेविल्या होत्या. त्या सर्व मोकळ्या करून नरकपुत्रानें कृष्णास अर्पण केल्या. त्या सर्वांशीं विवाह करण्याचा निश्चय करून त्यांना कृष्णानें द्वारावतीस पाठवून दिल्या. आणि सत्यभामेनिशीं आपण द्वारकेस येत असतां वाटेवर पारिजातक पुष्पाचें झाड आढळलें तें गरुडावर घेतलें. आणि द्वारकेस आल्यानंतर तो वृक्ष सत्यभामेच्या गृहांगणांत लाविला. त्या वेळीं 'वृक्ष सत्यभामेच्या आंगणांत परंतु पुष्पें रुक्मिणीच्या आंगणांत पडतात' अशी चहाडी सांगून नारदानें रुक्मिणी व सत्यभामा यांत द्वैत करून कलह लावून दिला. परंतु कृष्णानें दोघींस समजावून ती गोष्ट दोघींसही आवडती केली. आणि नारदास कांहीं दिवस तेथेंच ठेवून घेऊन सोळा हजार स्त्रियांशीं मोठ्या मंगलोत्साहानें लग्नें लाविलीं. त्या वेळीं सोळा हजार मंडप निराळे घालून तितक्याही मंडपांत निरनिराळीं मंगल वाद्यें, व सह-

त्यावधि इष्टमित्र, आप्त, वऱ्हाडीरूपानें आपणच नटला. आणि जागोजाग वसुदेव, देवकी, नारद, देव आणि ऋषि इत्यादि स्वरूपेंही आपणच घेऊन बळिरामासहवर्तमान श्रीकृष्णनाथ हा तितक्याही ठिकाणीं निरंतर होता. अशा सुखानंदांत तो लग्नसोहळा पार पाडल्यानंतर नारदास स्वस्थानीं जाण्यासाठीं परवानगी दिली.

---

# अध्याय २७ वा.

## तारकासुर व शंबरासुर वध.

एके दिवशीं रुक्मिणीच्या घरीं सर्व कृष्णस्त्रिया जमून आपापला वृत्तांत सांगूं लागल्या. त्यांत प्रत्येकीच्या भाषणांत मुख्य भाग इतकाच कीं, मजवर सर्वांपेक्षां कृष्णाची अधिक प्रीति आहे. अशीं भाषणें सर्वांचींच असल्यामुळें, एक नवरा आणि सोळा हजार आठ बायका आणि सर्वांच्या घरीं निरंतर कृष्ण जाईल कसा? असा त्या भांडणामध्यें संशय उत्पन्न होऊन त्या स्थळीं विनोदझगडा झाला. व त्याचा परिणाम असा झाला कीं, सर्व स्त्रिया भ्रमिष्टासारख्या झाल्या. त्या वेळीं रुक्मिणीनें अधिष्ठानीं बसून सर्वांस आत्मज्ञान सांगितलें कीं, श्रीकृष्ण हा अनादिसिद्ध परमेश्वर आहे. जो सर्वव्यापक असण्यास व आह्मां सोळा हजार बायकांचें तर काय, परंतु त्रयजगतींत वास करणारे जन त्या सर्वांचेही आळ पुरविणारा समर्थ आहे; अशी त्यांची खात्री करून दिली. नंतर सर्वांनीं डोळे मिटून स्तब्धपणें श्रीकृष्णध्यान केलें तों, सर्व स्थल कृष्ण-

रूपानें भरलेलें आहे असें सर्वांनीं पाहिलें व सर्वच चकित होऊन साश्चर्यलज्जित झाल्या.

एके दिवशीं श्रीकृष्णनाथानें सर्व स्त्रियांच्या घरोघर हिंडून प्रत्येकीस असें विचारिलें कीं, तुमची इच्छा केव्हां केव्हां पर पुरुषावर जाते किंवा नाहीं? तेव्हां आपापल्या बुद्धीनें कांहींनीं कृष्णास आर्जवाचीं आणि कित्येकींनीं वेडेपणानें तऱ्हतऱ्हेचीं उत्तरें दिलीं. परंतु ज्या वेळीं रुक्मिणीला हा प्रश्न विचारला, त्या वेळीं ती केवळ निरुत्तर होत्साती स्तब्ध राहिली. तिला आणखी चाळवावी ह्मणून श्रीकृष्णानें कौतुकानें ह्मटलें कीं, प्राणप्रिये, तुझी इच्छा अझून दुसऱ्यास वरण्याची असली तर अद्यापि संधि आहे; जाऊं देऊं नको! मजपेक्षां मोठमोठे पराक्रमी राजे आहेत; तुझें कल्याण होईल! मी केवळ गवळट व हलका आहें! हें ऐकतांच एकाएकीं रुक्मिणी गतप्राणवत भुमीवर मूर्च्छित पडली. तें पाहतांच कृष्णानें डोळ्यांस पाणी लावून तिला सावध केली. रुक्मिणीनें तें स्थळ एकांत पाहून उत्तम पुत्रोत्पत्तीची इच्छा दर्शविली. तें ऐकून कृष्णानें एक वर्षपर्यंत सदाशिवाची आराधना केली व 'मदन पोटीं येईल' असा त्याजकडून आशीर्वाद मिळविला. तो वृत्तांत रुक्मिणीस कळतांच ती आनंदांत निमग्न झाली.

या मदनाच्या जन्माचा वृत्तांत सांगण्यापूर्वीं, सदाशिवानें मदन दग्ध केल्याचा वृत्तांत सांगून नंतर पुनरोत्पत्तीचा प्रकार सांगतों. पूर्वीं दक्षाच्या यज्ञांत पार्वतीस कोप येऊन तिणें होमकुंडांत उडी टाकल्याची कथा शिवपुराणान्वयें सर्वांस माहीत आहे. ती पार्वती भस्म हो-

तांच शंकरास फार वाईट वाटून त्याणें हिमपर्वतावर मोठी तपश्चर्या आरंभिली. तेव्हां पार्वती हिमाचलाच्या पोटीं अवतरून तिणें शंकरास वरिलें. असो. नंतर एक महापुरुषार्थी तारकासुर नामें दैत्य उत्पन्न झाला. त्यानें त्रैलोक्यांतील नरवर व सुरवर या उभयतांसही पीडा दिली. ह्मणून सर्व देव संकटांत पडून त्याच्या संहारार्थ युक्ति योजण्याविषयीं त्यांनीं मोठा विचार चालविला. तो दैत्य अनिवार कोणासही ऐकणार नाहीं असें वाटून, बृहस्पतीनें सर्वांस सांगितलें कीं, जर कोणत्याही उपायानें शंकर कामातुर होईल तर त्याचे पोटीं पुत्र उत्पन्न होऊन त्याहस्तें तारकासुराचा संहार होईल. आतां, शंकर कामातुर होण्याचें काम करणार कोण? असा विचार चालला असतां, बहुमतानें तें कार्य मदनास द्यावें असें ठरवून मदनाची सर्वांनीं प्रार्थना केली; व त्याप्रमाणें त्याणेंही सर्वांचें भाषण मान्य केलें. मग पार्वतीसमागमें मदन शिवाजवळ जाऊन पार्वतीच्या मागें उभा राहिला. मदनास हें कृत्य सांगण्याचा मूळ उद्देश एवढाच कीं, तो फारच सुंदर होता; त्याचें रूप पाहतांच शरिरांत कामोद्दीपन व्हावें; परंतु एवढें जरी होतें, तथापि मदनाची शंकरासमोर उभें रहाण्याची शक्ति होईना. त्यांतून शंकर तपश्चर्येस बसलेले. न जाणों, कदाचित् राग आला तर घात होणार आहे हें भय त्यास होतें. तथापि, जगतारणार्थ मदनानें आपला अमोलिक प्राण अर्पण करण्याचा निश्चय करून तो पार्वतीसमागमें गेला. अशा प्रकारानें पार्वतीही मनांत सभय, परंतु त्रैलोक्यताप निवारणार्थ आपल्या जीवास न भितां शंकरापुढें हात जोडून उभी रा-

हिली, व तिच्यामागें मदनही उभा राहिला. तेव्हां पार्वतीनें आपल्या येण्याची कांहीं तरी कल्पना शंकराच्या मनांत यावी या हेतूनें कित्येक चिन्हें सूचित केलीं. त्यावरून शंकरानें आपले नेत्र उघडिले, तों पार्वतीमागें आपल्यास व्यत्यय आणण्याकरितां मदन उभा आहे असें जाणून क्रोधानें आपला तृतीय नेत्र उघाडिला व त्याकडे पाहिलें. ती दृष्टि पोंचतांच नेत्रांतून अग्नीच्या ज्वाळा निघून मदनाच्या अंगावर येऊन त्याचें एका क्षणांत भस्म झालें. मदन भस्म होतांच, हें कृत्य पहाण्याकरितां जे कित्येक देव, मुनि, यक्ष व गंधर्व लपून होते, त्यांणीं तेथून पलायन केलें. पार्वतीनें चरणावर मस्तक ठेवून शंकराची स्तुति केली व कृतकर्माची क्षमा मागून मदनाची स्त्री रती इला पुढें उभी केली. तिचा अलोट शोक व नेत्रांतून अश्रूंचे पूर चाललेले पाहून आणि मदनाच्या रूपाची आठवण करून शंकराचें मन प्रीतीनें व्याप्त होऊन रतीस आश्वासन दिलें कीं, 'तूं स्वस्थ ऐस; तुझा पति रुक्मिणीच्या उदरीं अवतरून पुन्हा तुला मिळेल.' असो. पुढें शिवापासून पार्वतीस पुत्र झाला. त्यानें तारकासुराचा वध करून देवांस भयापासून मुक्त केलें.

नंतर ती रती अरण्यांत एकटी शोक करीत असतां, सहजगत्या एक शंबर नामें दैत्य त्या वनांत विहारार्थ आला असतां, त्यास तिची दया येऊन कन्या ह्मणून त्याणें तिला आपल्या घरीं नेऊन ठेविलें.

इकडे श्रीकृष्ण द्वारकेस मोठ्या आनंदांत असतां, रुक्मिणीच्या उदरीं मदन पुत्र अवतरला. त्याच्या जन्माचा सोहळा कृष्णानें फारच मोठा केला. रुक्मिणी व सत्य-

भामा या दोघींमध्यें वांकडें असल्यामुळें, सत्यभामेनें असा कांहीं पण केला होता कीं, जर रुक्मिणीस पुत्र माझ्या पूर्वीं होईल तर मी अमुक हरेन; आणि ती तर वेळ आली. व रुक्मिणीशीं तर प्रतिज्ञा केलेली, ह्मणून मनांत फारच खिन्न होऊन आतां काय करावें या विचारांत आहे, तों अकस्मात नारद स्वामी तेथें प्रगट झाले. त्यांच्या चरणारविंदीं मस्तक ठेवून तिणें आपल्या मनांतील हेतु त्यास सांगितला; व विनंती केली कीं, महाराज, हा मुलगा जर येथून नाहींसा होईल तरच माझा जीव राहील. नारदानें तिचें शांतवन करून तो लागलाच शंबरासुराजवळ गेला आणि त्यास सांगितलें कीं, तुला मारण्याकरितां श्रीकृष्णाच्या उदरीं मदन अवतरला आहे. तेव्हां, सर्प लहान असला, अगर अग्नीची एक ठिणगी असली तथापि अनर्थास कमी नाहीं, असें जाणून त्याचा बंदोबस्त सुज्ञ त्वरित करितात. तद्वत असुरा, तो पुत्र लहान आहे; त्याच्यानें आपलें काय होणार; असें मनांत न आणितां त्या मदनाचा तूं होईल त्या रीतीनें लवकर संहार कर. दैत्यानें नारदाचा याजबद्दल महदुपकार मानून मोठाच सत्कार केला. नारद गेल्यानंतर आपण गुप्तरूपानें द्वारकेस येऊन मदनास उचलून नेला व महासागरोदरांत त्यास टाकून दिला.

इकडे रुक्मिणीचा पुत्र अकस्मात कोठें गेला, यामुळें तिला फारच वाईट वाटून तिणें अति शोक आरंभिला. परंतु कृष्णानें तिला खात्रीनें सांगितलें कीं, जें होत आहे तें माझ्या आज्ञेनेंच होत आहे; तूं कांहीं काळजी करूं नको. अकरा वर्षांनंतर तुझा पुत्र तुला मोठ्या आनंदानें सुखरूप देईल. त्यावरून ती स्वस्थ बसली.

तो कृष्णपुत्र एका मत्स्यानें भक्षण केला व पुढें होणार भविष्याप्रमाणें तोच मासा एका कोळ्याच्या जाळ्यांत सांपडला. असा मासा दुसऱ्या कोणास द्यावा कीं त्यापासून इच्छित द्रव्यलाभ होईल, असें त्या कोळ्याच्या मनांत येऊन तो त्याच शंबरासुरास दिला. त्यानें घरांत पाठविला. तो मासा पाकनिष्पत्तीसाठीं रतीच्याच हातीं आला. तिणें तो चिरतांच त्यांतून एक दैदीप्यमान पुरुष निघाला. तो तिणें हा आपलाच पति असें ओळखून यास ठेवावा कोठें अशा भ्रांतींत ती पडली. इतक्यांत नारद तेथें येऊन तिला आश्वासन देऊन कांहीं मंत्रोपदेश केला, कीं ज्या योगानें तो मुलगा गुप्तरूपानें वाढत चालला. तो घरांत खेळत असून सदोदीत जरी पाहिजे तेथें घरभर फिरत असे, तरी रतीशिवाय दुसऱ्या कोणाच्याच दृष्टीस तो पडला नाहीं. कांहीं दिवसांनंतर मदन मोठा झाल्यावर रति व मदन या उभयतांचें नारदानें लग्न लाविलें व सकल विद्येंत त्यास निपुण केलें.

इकडे शंबरासुरास असें वर्त्तमान कित्येकांनीं सांगितलें कीं, तुमची मानलेली कन्या रति गुप्तरूपानें पर पुरुष भोगीत असते. त्यास प्रथम हें खरेंच वाटलें नाहीं; परंतु चहुंकडून बोभाट ऐकल्यावर तो रतीचा फारच छळ करूं लागला. एके दिवशीं तर तिजवर मोठा प्रळयच गुदरला. तेव्हां शंबरासुर बोलला कीं, माझ्या कन्येजवळ असा जो कोणी चोर येतो तो जर माझ्या दृष्टीस पडेल, तर त्याचे मोहरी एवढे तुकडे करीन. त्याणें चोराप्रमाणें गुप्त न राहतां माझ्या समोर यावें. त्यानें रतीसही सांगितलें कीं, जर तो चांडाळ दोन तीन दिवसांत माझ्यासमोर न

आला तर मी तुझा शिरच्छेद करीन. यावरून रतीसही मोठें भय पडलें. पुढें तिणें हें वर्त्तमान मदनास निवेदन केलें. त्याणें तिची खात्री करून सांगितलें कीं, शंबरासुरास मारण्याकरितांच माझा अवतार आहे; तूं भिऊं नको. दुसरे दिवशीं शंबरासुर रतीस रागानें बोलत असतां, मदनानें तत्क्षणीं तेथें प्रगट होऊन शंबरासुरास सांगितलें कीं, दुष्टा, तुझ्या आयुष्याचा घडा भरला! आतां तुझी इच्छा असल्यास रणांगणांत येऊन आपल्या दंडाची व शस्त्रांची कंडू निवारण करून घे. त्यासरसेंच शंबरासुरानें आंगणांत उभें राहून मदनास हांक मारिली. ती ऐकून लागलाच मदन रणांगणीं येऊन त्याच्यासमोर उभा राहिला. त्या वेळीं दोघांचें महान युद्ध झालें. त्यांत शंबरासुराचा मदनानें वध केला. ज्या वेळीं शंबरासुराचें मस्तक शरीरापासून भिन्न झालें, त्या वेळीं देवांनीं लागलीच मदनावर पुष्पवृष्टि केली; व सर्वांनीं मिळून मदनाचा स्तव केला; व आपल्यावरील सर्व संकटें परिहार झाल्याचें जाणवून सर्व आनंदानें स्वस्थळास गेले.

शंबरासुराचा वध झाल्यानंतर मदनानें रतीस सांगितलें कीं, आपला कार्यभाग करणें मनांत होतें आणि त्याच्या आयुष्याचे दिवस भरण्याची बाकी होती, यामुळें गुप्तरूपानें आजपर्यंत आपण काळ काढला; परंतु आतां द्वारकेस मातापितरांची भेट घेण्यास विलंब लावावा हें चांगलें नाहीं. मग त्या नगराचा बंदोबस्त करून अफाट सैन्यानिशीं तो द्वारकेस जाण्यास निघाला. मदन ज्या वेळीं द्वारकेस येऊन मोठ्या उत्साहानें गृहांत आला, त्या वेळीं जितक्या स्त्रिया त्या जागीं होत्या तित-

त्याही कृष्णनाथच आले असें जाणून उठून उभ्या राहिल्या. इतकी भूल पडण्याचें कारण एवढेंच कीं, कृष्णासारखेंच अप्रतिम व अवर्णनीय मदनाचें रूप होतें. परंतु, तो आल्याबरोबर त्याणें सर्वांच्या पायांवर मस्तक ठेवून सर्वांच्या भ्रमाचें निरसन केलें. तो मदन ज्या वेळीं रुक्मिणीसमोर आला त्याच वेळीं तिच्या स्तनास पान्हा फुटला. यानंतर कृष्णनाथानें मदन भेटल्याविषयींचा मोठाच उत्साह केला व सर्वांस आनंद झाला. कृष्णानें अनुक्रमानें आपल्या पुत्रास सर्वांस भेटविलें. त्याचप्रमाणें रतीसही रुक्मिणीनें सर्वांस भेटविलें.

श्रीकृष्णाला सोळा हजार स्त्रियांतील प्रत्येक स्त्रीपासून दहा पुत्र व एक कन्या झाली; ह्मणजे एक लक्ष साठ हजार पुत्र व सोळा हजार कन्या होत्या. त्यांच्या जन्मसंबधीं उत्सव द्वारकेंत नित्य होत असे. कृष्णानें आपल्या पुत्रांच्या मौंजीबंधनांनंतर त्यांस सकल विद्येंत निपुण केलें व त्यांचीं देशोदेशींच्या राजकन्यांबरोबर मोठ्या थाटानें लग्नें केलीं. त्याप्रमाणें भगवंतानें आपल्या मुलींचीं लग्नें राजपुत्रांशीं मोठ्या समारंभानें केलीं.

---

# अध्याय २८ वा.

## अनिरुद्ध व उखा विवाह.

मदन व रती द्वारकेस येऊन राहिलीं असतां, पुढें कांहीं काळानंतर, मदनास अनिरुद्ध या नांवाचा एक सुंदर पुत्र झाला. त्या वेळीं तर श्रीकृष्णानें मोठाच मंगलोत्साह

केला. तो अनिरुद्ध वाढत चालला व त्याच्या लग्नावि-षयींचे द्वारकेंत नानाप्रकारचे विचार होऊं लागले. अ-निरुद्धास कोणाची कन्या करावी, याविषयीं कोणाच्या म-तास कोणाचें मत मिळून एक विचार ठरेना.

इकडे शोणितपुर नगरांत एक बाणासुर नामें शिववर-दी दैत्य, जो जगांतील वीरश्रेष्ठांस अनिवार होता, त्यास एक उखा या नांवाची परम लावण्य कन्या झाली. ती चंद्रकलेसारखी दिवसेंदिवस वाढत चालल्यानें ही कोणास द्यावी याविषयीं बाणासुरास मोठी काळजी पडली होती, व तो तिला वर मिळविण्याच्या खटपटींतच होता.

एके दिवशीं उखा आपल्या चित्ररेखा नामें दासीस समा-गमें घेऊन कैलासास शिवदर्शनास गेली. तेथें शिवपार्वती सोंगट्या खेळत आहेत असें पहातांच उखेस असेंच पतिस-मागमें आपण खेळणें फारच बरें असें वाटलें. आणि कि-त्येक थट्टेचा प्रकार पाहिल्यानें उखेस आपणासही पति अ-सण्याविषयींची फारच उत्कंठा झाली. परंतु, लाजल्या-सारखी होऊन ती शंकरापुढें हात जोडून उभी राहिली. शंकरानें तिच्या मुखाकडे पाहून पार्वतीस खुण केल्यामुळें ती बोलली कीं, उखे, आह्मां उभयतांस त्वां खेळतांना पाहून तुझें मन भ्रमित झालें असून, आपल्यासही उत्तम पति असून आपणही असेच विलास करावे ; असा उद्देश तुझ्या मनांत आलेला म्यां जाणला आहे. आणखी शिवपत्नीनें सांगितलें कीं, कन्ये, अशीच जर तुझी इच्छा आहे, तर स्वस्थ ऐस. वैशाख शुद्ध द्वादशीच्या दिवशीं जो पु-रुष तुझ्या स्वप्नांत येईल, त्याच पुरुषाशीं तुझें लग्न हो-ईल. आणि असा सुंदर पति तुला मिळाल्याच्या योगानें

तूं आजन्मपर्यंत सुखी राहशील. उखेस हे शब्द केवळ अमृततुल्य लागले. आणि आपल्या मनांत आनंद मानून तिणें शिवपार्वतीचरणीं मस्तक ठेवून लागलीच घरीं जाण्याची आज्ञा घेतली.

इकडे बाणासुरास आपण प्रतापी असा गर्व होऊन त्यानें शिवस्तवन केलें; तेव्हां शंकरानें प्रसन्न होऊन वर माग ह्मटल्यानंतर प्रार्थना केली कीं, मी अनावर बलवान असल्यामुळें माझ्या सहस्र भुजांस कंडू आली आहे; ती शमविण्याकरितां मजबरोबर कोणी तरी युद्ध करणारा पाहिजे; एवढेंच माझें मागणें आहे. शंकराची बाणासुरावर प्रीति फार, ह्मणून त्यास उपदेश केला कीं, अद्यापि तूं शुद्धीवर येऊन आपली वाचा पालटून दुसरें कांहीं उत्कृष्ट मागणें माग. पण त्या बाणासुरानें ह्मटलें, हत्तीचे दांत एक वेळ बाहेर आले ह्मणजे पुन: आंत जात नाहींत; तद्वत् जें म्यां एकदां मागणें मागितलें तेंच मला पाहिजे. शंकरानें ह्मटलें कीं, फार चांगली गोष्ट. तसाच तुला योद्धा मिळेल, व तुझी युद्धकंडूही शमेल.

इकडे उखा घरीं आल्यावर रात्रंदिवस मोठ्याच चिंतेंत पडली. कांहीं दिवस लोटल्यानंतर वैशाख शुद्ध द्वादशी प्राप्त झाली. त्या दिवशीं तर उखा मोठ्या आनंदानें शृंगार करून रात्रौ आपल्या सभोंवतीं सख्यांस बंदोबस्तानें ठेवून निजली; तों तिला एक स्वप्न पडलें. तें असें कीं, एक पुरुष येऊन तिशीं विलास करीत आहे. इतक्याच संधीस ती जागी झाली. आणि तिची जिवलग सखी चित्ररेखा जी स्वस्थ निजली होती, तिला उठवून तें स्वप्न सांगितलें. स्वप्नाचा वृत्तांत व त्या पुरुषाच्या स्वरूपाचें नि-

रूपण ऐकून चित्ररेखेनें विनंती केली कीं, बाईसाहेब, आपण स्वस्थ असावें. शिववराप्रमाणें तोच पुरुष आपल्यास पति मिळेल. उखा ह्मणाली, सखे, हें ब्रह्मज्ञान त्वांच मला सांगितलें पाहिजे असें नाहीं; मला सर्व समजतें. परंतु स्वप्नांत आलेला पुरुष जर माझ्या दृष्टीस न पडला तर माझा प्राणच राहणार नाहीं. लग्न होणार व तो मिळणार त्या वेळीं मिळो; परंतु, प्रथम माझा प्राण वांचविण्याविषयीं तुला मोठें साहस केलें पाहिजे. चित्ररेखेनें तिची नानाप्रकारें समजूत केली; परंतु कांहीं केल्या तिचें मन राहीना. घरांत बोलण्याचीही चोरी असल्यानें निरुपायो होऊन तिणें अन्नपाणी टाकिलें. बाणासुरानेंही असें होण्याविषयीं फारच शोध केला. व प्रकृति वैद्यांसही दाखविली; परंतु कांहीं केल्या गुण पडेना. चित्ररेखा ही केवळ उखेची दासीच होती असा अर्थ नव्हता, परंतु तिची उखेवर पोटच्या पोरीसारखी प्रीति होती. ह्मणून तिणें तिला शेवटची प्रार्थना केली कीं, तुझ्या स्वप्नांत जो पुरुष आला तो जर माझ्या ओळखीचा असेल, अगर तूं त्याच्या कांहीं खुणा तरी कळविशील, तर माझी शक्ति इतकी आहे कीं, सर्व पृथ्वी धुंडून त्यास मी येथें चित्ररूपानें किंवा प्रत्यक्ष आणीन. परंतु जर त्याविषयीं कांहींच ओळख पटली नाहीं तर, माझा तर काय परंतु कोणाचाच उपाय चालणार नाहीं. उखेनें सांगितलें कीं, प्रियसखे, तुझ्या मनांत खूण पटण्याजोगा उपाय मजजवळ तर नाहीं; परंतु त्रयजगांतील सुंदर व पराक्रमी पुरुष तूं सर्व जाणतेस; आणि लेखन व चित्रविद्येंत तूं फार कुशल आहेस; ह्यास्तव जर त्यांचीं तूं चित्रें काढून दाखविशील, तर लागलाच मी

यांतून आपला प्रियकर ओळखून काढीन. असें ऐकतांच चित्ररेखा हातांत कलम घेऊन भिंतीवर प्रथम स्वर्ग, मृत्यु व पाताळ यांतील प्रसिद्ध शहरें, पट्टणें, अधिष्ठानें यांतील महान् महान् पराक्रमी पुरुषांच्या तसबिरा काढून दाखविल्या. ह्मणजे देव, ऋषि, गंधर्व, दैत्य, राक्षस व मनुष्यें; नंतर इंद्रलोक, ब्रह्मलोक, कैलास, वैकुंठ आदिकरून पाताळांतीलही चित्रें रेखिलीं. तथापि खूण जेव्हां कोठेंच पटेना, तेव्हां चित्ररेखा ह्मणाली कीं, जीं स्थानें मला माहीत आहेत तीं तर सर्व काढून दाखविलीं; परंतु त्यांत तुझा प्रियकर नाहीं हें पाहून जिवास खिन्नता प्राप्त झाली आहे. आणि हें कृत्य चांगल्या रीतीनें माझ्या हातून पल्ल्यास जाईल असेंही वाटत नाहीं. परंतु, आतां फक्त एक द्वारका मात्र तुला काढून दाखविण्याची उरली आहे. तींत जर तुझा प्रियकर आढळला नाहीं, तर मग मात्र माझा निरुपाय आहे. उखेनें ह्मटलें कीं, सखे, तुझा शेवटील उपाय काय असेल तो कर, आणि द्वारका काढून मला दाखीव. माझाही जीव अगदीं घड्यावरच पडला असून माझा मनोरथ पूर्ण होईल न होईल याविषयीं फारच संशय आहे. यासाठीं सखे, तूं आतां विलंब न लावितां जर द्वारका काढून दाखविशील, तर कायतो निवाडा होईल. मग माझ्या दुर्दैवानें जर त्यांतून कांहीं एक निष्पन्न झालें नाहीं, तर माझा प्राण महत् संकटांत पडणार; आणि बहुश: मी व तूं सदोदित दु:खी असणार. असो. चित्ररेखेनें जेव्हां द्वारका चितरून दाखविली, तेव्हां त्यांत वसुदेव, देवकी, रुक्मिणी, सत्यभामा, बळराम इत्यादि चित्रें पाहून उखा थोडीशी विस्मित होऊन सानंदित झाली व ह्म-

णाली कीं, प्रियसखे, या प्रसंगीं माझा कार्यभाग होईल असें मला वाटतें. इतकें बोलत आहे तों श्रीकृष्णमूर्त्ति काढून दाखविली. ती पाहतांच उखेनें चित्ररेखेच्या पाठीशीं लपाल्यासारखें केलें; व ती ह्मणाली कीं, आतां मात्र थोड थोडी ओळख पटत चालली. इतक्यांत मदनमूर्त्ति पाहिली, तेव्हां तिणें लाजून दासीस सांगितलें कीं, ही तसबीर माझ्या मामंजींची असावी. नंतर चित्ररेखेनें रतीची तसवीर रेखून दाखविली. ती पाहून तोंडावरून पदराचा बुरखा ओढला आणि बोलली कीं, ह्या खचित माझ्या सासुबाई. आतां गडे लवकर लवकर राहिलेलीं चित्रें काढून दाखीव. नंतर चित्ररेखेनें अनिरुद्धमूर्त्ति काढून दाखविली. ती पहातांच उखा लागलीच लाजून पळाली. चित्ररेखेनें ह्मटलें, अग बाई, तूं तर शर्थच केलीस! अग, चित्रास पाहून असे वेड्यासारखे चाळे काय करितेस? हेच का तुझे प्राणनाथ? उखेनें 'होय' ह्मटल्यानंतर लागलीच लेखणी खालीं ठेविली आणि उखेस सांगितलें कीं, आज रात्री तुझ्या प्राणप्रियास मी आणून तुला भेटवितें; तूं कांहीं चिंता करूं नको. रात्र होतांच उखा उत्तम प्रकारचा शृंगार करून आपल्या महालांत बसली. आणि चित्ररेखा तिची आज्ञा घेऊन द्वारावतीस आली आणि ती गुप्तरूपानें आंत प्रवेश करणार तों तिणें द्वारकेसभोंवतीं सुदर्शन फिरत आहे असें पाहिलें. तिणें नाना प्रकार केले, परंतु आंत प्रवेशच होईना असें पाहून, मति कुंठित झाल्यासारखी होऊन ती तेथेंच स्तब्ध उभी राहिली.

अशा विचारांत ती कांहीं वेळ असतां, अकस्मात नारदस्वामीची स्वारी तेथें आली. ऋषिदर्शन होतांच वंदन

करून चित्ररेखेनें आपलें हें सर्व वर्तमान त्यास सांगितलें. ऋषीनें पुढील कार्यभाग जाणून तिला सांगितलें कीं, त्या सुदर्शनास माझी शपथ घाल; ह्मणजे तूं आंत निर्विघ्नपणें जाशील. व येतेवेळींही तसेंच कर, ह्मणजे तुझा कार्यभाग सिद्धीस जाईल. मग चित्ररेखेनें तसें केलें व आंत जाऊन मोहिनीमंत्रानें अनिरुद्धास बेशुद्ध करून मंचकासह उखेच्या रंगमहालांत आणलें.

चित्ररेखा येण्याची वाट उखा एकसारखी पाहतच होती. इतक्यांत मंचकासह चित्ररेखा आलेली पाहतांच महदानंदांत व्याप्त होऊन ती सामोरी धांवत आली. तिणें निद्रिस्थ पतीच्या मुखाकडे पाहून, प्रथम उपकारकर्त्री जी चित्ररेखा, तिच्या पायावर मस्तक ठेविलें. चित्ररेखेनें मोठ्या प्रेमानें तिला उचलून आलिंगन दिलें; व महालांत लोटून दार लावून घेतलें. पहाट होतांच तिनें पुनः अनिरुद्धास द्वारकेस नेऊन पोंचविलें. याप्रमाणें तिनें नित्य क्रम चालविला असतां, उखेस नित्य पतिसुख व अनिरुद्धास सुंदर स्त्रीसुख मिळून, उभयतांचा जीव चित्ररेखा प्रसादानें अत्यानंदांत निमग्न असे. ज्या वेळीं प्रथम चित्ररेखेनें अनिरुद्धास उखेचे रंगमहालीं आणिलें, त्याच वेळीं त्याच्यावर टाकलेलें मोहनास्त्र काढून त्या उभयतांचा नारदानें गुप्तपणें विवाह लाविला होता.

एके रात्रीं अनिरुद्ध व उखा आनंदानें विषयोपभोगाच्या गोष्टी निःशंकपणें बोलत असतां त्यांचे कांहीं शब्द बाहेर सेवकांस ऐकूं आल्यावरून, दुसऱ्या दिवशीं पहारेकऱ्यांनीं बाणासुरास कळविलें कीं, नित्य रात्रौ कोणी एक पुरुष उखेच्या महालांत येत असतो; व तीं उभयतां बोलत

असतांना त्यांचे कांहीं शब्दही बाहेर ऐकूं येतात. बाणासुरानें ह्या गोष्टीचा शोध करून पाहिला; तों कोणत्याच प्रकारें त्याची खात्री होईना. त्यास आपल्या बळाची मोठी घमंडी असल्यामुळें, त्रैलोक्यांत कोणताच पुरुष अशा कर्मास प्रवृत्त होईल असें त्यास वाटेना. तशांत उखेविषयींही त्याच्या मनांत दृढ विश्वास असल्यामुळें, आपल्या कन्येस निरर्थक गोष्टीविषयीं बोलून तिचें मन दुखवावें हेंही त्यास न आवडून ती गोष्ट मनांत तशीच ठेविली. एके रात्रीस 'मला गर्भ राहिला' असे उखेच्या तोंडचे अनिरुद्धाजवळ बोललेले शब्द बाहेरील रक्षकांच्या कर्णीं आल्यावरून, त्यांणीं पुढील कर्मास भिऊन पुनः बाणासुराजवळ ऐकलेल्या गोष्टीची सुनावणी केली. त्यावरून, आणि उखा 'गरोदर' आहे हा एक जड शब्द असल्यामुळें, बाणासुरानें आपल्या जवळील एका परम विश्वासू दासीस युक्तीनें चौकशी करण्याविषयीं सांगून तें वर्त्तमान खरें असल्यास कळविण्याविषयीं, अगर खोटें असल्यास ती गोष्ट गुप्त ठेवण्याविषयीं आज्ञा केली.

नंतर, त्या दासीकडून उखा खरोखर गरोदर आहे असें समजल्यामुळें, बाणासुरानें कन्येच्या महालामध्यें जाऊन तिला कठोर शब्दांनीं ताडण केलें. आणि असा कोण दुष्ट येथें येतो त्यास व तुला एकदम मारून टाकीन असें त्यानें तिला भय घातलें. आणि उखेच्या मंदिरासभोंवतीं मोठा कडक पहारा ठेविला. परंतु चित्ररेखा शक्तिमान असल्यामुळें सर्वांस मोहनास्त्रानें मोहून नित्य अनिरुद्धास आणीत असे. जरी बाणासुर रात्रंदिवस टपत होता, तथापि त्याचीही दृष्टि चुकवीत असे.

एके रात्रीं कोणी बाणासुरास असें कळविलें कीं, चित्ररेखा आपल्या मंत्रविद्येनें नित्य त्या पुरुषास रात्रौ आणून प्रात:काळीं परत पोंचविते. हा मजकूर बाणासुरास संयित वाटून त्याणें पाळत ठेवून आंतून कांहीं शब्द उभयतांचें येत आहेत असें ऐकतांच चित्ररेखेस प्रतिबंधांत ठेविलें व महालाच्या दरवाजाचा सैन्याकडून चांगला बंदोबस्त केला. आपल्या घरांत शिरणारा चोर हा कोणीतरी मोठाच पराक्रमी असेल, सामान्याचें एवढें धारिष्ट होणार नाहीं, असें मनांत आणून बाणासुर सशस्त्र दरवाजाबाहेर उभा राहून बोलला कीं, चोरा, तुझ्या आयुष्याचे दिवस आज भरले. सिंहाच्या घरांत कोल्हा शिरण्यासारखी गोष्ट त्वां केलीस; ह्मणून मी तुला सांगतों कीं, तूं जर खरा वीर असलास तर बाहेर पडून युद्ध कर. नाहींपेक्षां दरवाजा फोडून तुला आतांच त्या दुष्ट कन्येसह ठार मारितों. हे शब्द ऐकतांच उखा घाबरून तिणें पतीच्या गळ्यास मिठी मारली व रडूं लागली. अनिरुद्धानें तिची समजूत करून तिला स्वस्थ रहावयास सांगितलें; व मोठ्यानें गर्जून उत्तर दिलें कीं, बाणासुरा, तुझा गर्व हरण होण्याची हीच वेळ आहे; व आजच समरंगणीं काय होईल तें दिसेल; ह्मणून आतां घरांत न राहतां जर तूं वीर ह्मणवीत असशील तर बाहेर दंड ठोकून उभा रहा.

बाणासुर अगोदर रागानें संतप्त होताच; त्यांत हे मार्मिक शद्ब काळजास झोंबून दंड ठोकून बाहेर उभा राहिला आणि हांक मारिली. तेव्हां अनिरुद्ध विद्युल्लतेसारखा बाहेर येऊन बाणासुराशीं युद्ध करूं लागला. अनिरुद्धानें फारच युद्ध केलें व दैत्याची अगणित सेना मारिली; परंतु

तो महा प्रबळ, त्यापुढें उपाय चालेना. त्याणें लागलेंच अनिरुद्धास कैद करून प्रतिबंधांत ठेविलें. आणि अनिरुद्ध व उखा या उभयतांस मारण्याविषयींची तयारी केली.

नारदस्वामी हें वर्त्तमान जाणून लगबगीनें द्वारकेस गेले. आणि कृष्णास सांगितलें कीं, यःकश्चित बाणासुर, त्याणें तुझा नातु अनिरुद्ध यास प्रतिबंधांत टाकलें, व कांहीं वेळानें त्याचा शिरच्छेद करणार ; ही गोष्ट तुह्मांस मोठी लांछनीय आहे! हें सर्व वर्त्तमान ऐकून कृष्णानें अगणित सैन्य व प्रचंड वीर समागमें घेऊन मदनासह शोणीतपुरास जाण्याची तयारी केली. हें प्रचंड दळ शोणीतपुरास उतरत आहे असें पाहून बाणासुरानेंही युद्धाची तयारी केली. इतक्यांत सकळ सैन्यासह कृष्ण रणभुमीवर आला. त्यास पाहून असुर ह्मणाला कीं, अरे काळ्या, तूं कपटानें काळीं कृत्यें काय काय केलीं आहेस, तीं सर्व मला माहीत झालीं; तर आतां तुला समरभुमीवर कोणीं युद्ध करण्यास शिकविलें असेल तर त्याचा मजपाशीं झाडा दे. अरे, तुझें कुळच व्यभिचारी, तूं बहुत निंद्य कर्में आचरलास. आतां तुझा पुत्र मदन तर व्यभिचाराचें झाडच अवतरलें. आणि, 'यथा बीजं तथांकुरः' याप्रमाणें पहातां, जो चोर कन्येच्या महालांत आज धरला आहे तो त्या मदनाचाच पुत्र. अरे गवळटा, मी त्यास व्यभिचारकर्मांत धरिला असतां त्याच्या कैवारानें तूं मजबरोबर युद्ध करण्यासाठीं आला आहेस; पण या रणांगणांत कांहीं भलताच परिणाम होणार आहे. कृष्ण ह्मणाला, असुरा, मृत्यूच्या तोंडांत सांपडणाऱ्या मनुष्यास वायू होऊन तो अंतसमयीं ज्याप्रमाणें बडबडत असतो, त्याप्रमाणें तुझी

सर्व तयारी होऊन राहिली आहे! अनिरुद्ध आणि उखा कोण, हें ज्या वेळीं तुझे डोळे पुरते उघडतील, त्या वेळीं तुला दिसेल. त्यांचें लग्न झालें आहे किंवा तीं त्याशिवाय रममाण होत आहेत, तोही तुला विचार शेवटीं समजून येईल. आणि तूं जो शंकराजवळ वर मागितलास, तो परिपूर्ण होण्याची वेळही नजीक आली असेंही तुला वाटेल. याप्रमाणें ते उभयतां युद्धांत मिसळले. मदन आदिकरून वीरांनीं युद्ध करून असुराचें बहुत सैन्य मारिलें; परंतु तो काळासारखा प्रचंड असुर आटोपेना; त्या वेळीं श्रीकृष्ण सशस्त्र पुढें आला.

आतां, कृष्णाची व बाणासुराची मोठी लढाई होणार, तथापि परिणाम चांगला व्हावा या हेतूनें नारद लागलाच कैलासास गेला. त्यानें शंकरास विनंती केली कीं, अनिरुद्धास बाणासुरानें प्रत्यक्ष उखेच्या महालांत पाहिल्यावरून युद्ध करून त्यास प्रतिबंधांत ठेविलें. अशा वाईट कर्मांत सांपडलेल्या अनिरुद्धाच्या कैवारार्थ यादवसैन्यासह श्रीकृष्ण तुझ्या प्रिय भक्त बाणासुराशीं लढाई करून त्यास शासन करण्यास आला आहे. यास्तव या वेळीं त्यास आपण जर साह्य न केलें तर मोठेंच दुःख त्यावर पडणार! नारदाच्या मुखांतून हीं भाषणें पुरतीं निघालींही नाहींत, तों कोट्यावधि गणांसहित शंकरानें शोणितपुरास जाण्याची सिद्धता केली.

नारद आपला कार्यभाग झाला असें जाणून कृष्णाकडे धांवत आला; आणि त्यास सांगितलें कीं, येथील बातमी शंकरास पोंचून शंकर गणसैन्यासह बाणासुराच्या कैवारार्थ निघाले आहेत. मी हें तुला कळविण्याकरितां मुद्दाम आलों! असें सांगून नारदस्वामी बाणासुराकडेही गेले आणि त्यास

कळविलें कीं, तूं कृष्णास भिऊं नको. शंकरमहाराज तुझ्याच कैवाराकरितां गणसैन्यासह यावयास निघाले आहेत! इतकीं भाषणें होत आहेत तों रणभुमीवर शंकर ससैन्य आले आणि युद्धांत मिसळले. शंकर व कृष्ण यांचीं रणसंबंधीं कांहीं भाषणें झालीं. त्यांतच कृष्णानें शंकरास कळविलें कीं, आपण जो दैत्यास भुजाकंडूशमनार्थ वर दिला आहे, त्याच्या परिपूर्णार्थच मी येथें आलों आहे. असो. कृष्णाबरोबर युद्ध करीत असतांना शिवानें जे जे तीव्र बाण सोडले ते ते कृष्णानें तोडून टाकले. पुढें ते शस्त्रास्त्रांनीं युद्ध करूं लागले. शेवटीं कृष्णानें निद्रास्त्र सोडलें; तेव्हां शिव जांभया देऊन नंदीवर निजूं लागला. तशीच अवस्था सर्व गणादि शिवसैन्याचीही झाली. या वेळीं शिवपुत्र कार्त्तिकस्वामी व कृष्णपुत्र मदन यांचेंही मोठ्या निकरानें द्वंद्वयुद्ध झालें. जीं जीं अस्त्रें शिवपुत्रानें सोडावीं तींतीं मदनानें जाळून टाकावीं. शेवटीं कृष्णपुत्र मदनानें, याला आतां रणांतून पळवून लावितों, असें बोलून स्त्रियास्त्र सोडलें. तेव्हां स्वर्गांतून सात हजार दिव्य स्त्रिया उतरल्या; व त्यांनीं कार्त्तिकस्वामीचा रथ वेढिला. कोणी त्याच्यापुढें गायन करूं लागल्या; कोणी त्याला आलिंगन व कोणी चुंबन देऊं लागल्या; कोणी त्याच्या अंगाला चंदन लावूं लागल्या; कोणी विडा घेण्याविषयीं आग्रह करूं लागल्या. असें पाहून कार्त्तिकस्वामी ह्मणाला, मी आजन्मपर्यंत ब्रह्मचारी असतां हा काय अनर्थ मांडला आहे? त्या वेळीं तो अगदींच भांबावून गेला. त्यानें रथांतून उडी टाकली व शस्त्रेंही फेंकून दिलीं; व भस्माचा बटवा कांखेंत मारून धूम पळत सुटला. तो डोंगराच्या

कपाटीं जाऊन लपून राहिला; पण त्या स्त्रिया येथेंही येतील असें वाटून स्वामीनें असा शाप दिला कीं, 'ज्या स्त्रिया येथें येऊन माझें दर्शन घेतील त्या सप्तजन्म विधवा होतील.' असो. जेव्हां शिवकुमार पळाला तेव्हां सर्व यादववीर गदगदां हंसूं लागले. असें पाहून कुंभक प्रधान पुढें सरसावला. इतक्यांत बळरामानें त्यास आपल्या नांगरानें ओढला व मुसळाचा एकच प्रहार करून त्याचा चुराडा केला.

इकडे बाणासुर चवताळून युद्ध करतां करतां एकाएकीं कृष्णाच्या अंगावर कोसळला; त्यास कृष्णानें पुष्पासारिखा वर उडवून खालीं आल्यावर एकदम सुदर्शनानें त्याच्या दोन भुजा राखून बाकीच्या सर्व छेदून टाकिल्या. परंतु दीनासारखा तो पुढें उभा आहे असें पाहून शंकर तेथें धांवत आले, आणि बाणासुरास कृष्णचरणावर घालून सांगितलें कीं, शिव व कृष्ण हे दोन नव्हत आणि झालें तें कृत्य तुझ्या इच्छेप्रमाणें ठीकच झालें; कां कीं, तुलाही ह्या भुजांचा व्यर्थ भार होता.

नंतर शंकर, कृष्ण आणि बाणासुर यांच्या प्रेमपूर्वक भेटी होऊन एकमेकांस सन्मानीत आहेत, इतक्यांत नारदस्वामी तेथें आले; व त्यांणीं आपण दोघांचें लग्न पूर्वी लाविल्याचेंही कळविलें. आणि शंकरानेंही अनिरुद्ध व उखेचें लग्न मोठ्या डामडौलानें पुनः करण्याविषयीं बाणासुरास आज्ञा केली. त्याप्रमाणें उभयतांस मुक्त करून मोठ्या समारंभानें चार दिवस त्यांचा लग्नसोहळा केला. व जांवयास आंदण कित्येक राज्यें, व विपुल द्रव्य देऊन मोठ्या उत्साहानें सर्वांस द्वारकेस पाठविलें.

# अध्याय २१ वा.

## सुदामचरित्र.

सुदाम या नांवाचा एक अत्यंत दरिद्री ब्राह्मण कपिला नामें प्रसिद्ध नगरींत रहात होता. त्याचें कुटुंब मुलांबाळांनीं अगदीं भरलेलें व खाण्याचे घरांत हाल असल्यामुळें तो फारच त्रासला होता. अशा दरिद्रांत तो एक एक दिवस ढकलीत असतां, एके दिवशीं त्याच्या बायकोनें त्यास एक अशी युक्ति सांगितली कीं, तुमचा परम प्रिय मित्र श्रीकृष्ण द्वारकेंत मोठ्या वैभवानें नांदत आहे, त्याजवळ जर तुह्मीं गेलां तर तुमचें हें दरिद्र दूर होईल. कृष्णानें, बळरामानें व तुह्मीं सांदीपन ऋषीचें घरीं एकत्र वेदाध्ययन केलें आहे. सबब तुह्मीं एकमेकांचे गुरुबंधु आहांत. असें असून तुह्मीं ही डोळेझांक कां आरंभिली आहे? सुदाम ह्मणाला, स्त्रिये, ही गोष्ट खरी आहे; परंतु रिकाम्या हातानें राजा, देव, गुरु आणि वैद्य यांच्या भेटीस जाऊं नये. तेव्हां जर कृष्णाच्या भेटीस म्यां जाण्याविषयीं योजना केली, तर त्यास भेट तरी काय न्यावी? असें ऐकतांच तिनें शेजारणीपासून मूठभर पोहे उसणे आणले; परंतु ते बांधण्यास फडकें नाहीं. कां कीं, सोंवळें, भांडें व दुसऱ्या वस्तू तर राहूं द्या, परंतु मडक्याविषयींही घरांत खडखडाट. एखादें फडकें असलें तर फाटकें. शेवटीं एका वीतभर फडक्यांत ते पोहे बांधून तयार केले. व सर्व घरांतील वस्त्रें जमा करून सर्वांच्या धडक्या चिंध्या एके ठिकाणीं शिवून सुदाम्यास दोन हात नेसण्यास आणि एक हात पांघरण्यास अशीं दोन वस्त्रें दिलीं. नंतर एक चांगला दिवस पाहून सुदाम सर्वांस विचारून द्वारकेस जावयास निघाला.

वाटेनें दारिद्र्यतापाच्या योगानें सुदाम्यास फारच त्रास सोसावे लागले. अशा संकटानें व्याप्त होत्साता तो द्वारकेजवळ गेला. तेव्हां द्वारकेंतील कित्येक देवळांचे व राजवाड्यांचे सुवर्णकळस त्याच्या दृष्टीस पडूं लागले. त्या वेळीं सुदाम्यास आपल्या येण्याविषयीं फारच पश्चात्ताप झाला. आणि त्याच्या मनांत असें आलें कीं, अशा सुंदर नगरींत वैभवानें जो राहणारा श्रीकृष्ण, त्यास आपण दरिद्री मनुष्यानें भेटण्यास कसें जावें? आणि कदाचित् गेलों तरी तेथें आपली दाद लावील कोण? असा विचार करीत तो अगदीं द्वारकेजवळ जवळ आला. आणि कसेंही असो, दरिद्रानें मरावें त्यापेक्षां हिंमत धरून आंत जावें, व मित्रास भेटून कांहीं न साधल्यास मग जीव द्यावा हेंच चांगलें; असा पूर्ण विचार करून तो शहरच्या दरवाजाजवळ आला. तेथील पहारेकऱ्यांनीं त्यास विचारितांच, मी अनाथ ब्राह्मण कृष्णदर्शनास जात आहें, असें सांगितल्यावरून त्यांनीं त्यास आंत जाऊं दिलें.

इकडे श्रीकृष्ण रुक्मिणी आदिकरून कित्येक स्त्रियांसह भोजनोत्तर आनंदानें गोष्टी बोलत सुवर्णमंचकावर पडले असतां, एकाएकीं कृष्णानें गडबडीनें उठून पलंगाखालीं उडी टाकिली; आणि रुक्मिणीस सांगितलें कीं, माझा परमप्रिय गुरुबंधु सुदाम नांवाचा ब्राह्मण कपिला नगरीहून माझ्या भेटीस येत आहे. तो क्षुधेनें व तृषेनें व्याप्त असा या राजवाड्याजवळ जवळ आला आहे. तो माझा प्रिय मित्र ह्मणून तुह्मीं त्यावर सर्वांनीं प्रीति केली पाहिजे. त्याच्याकरितां लवकर उत्कृष्ट षड्रसान्नें सिद्ध करावीं व प्रथम त्याच्या स्नानाची तजवीज राखावी. का-

रण तो अगदीं भुकेलेला आहे. हें वचन कृष्णमुखानें ऐकतांच रुक्मिणी, सत्यभामा इत्यादि अष्टनायका यांणीं सर्व सिद्धता करविली ; व कृष्णानें तर सामोरें जाऊन त्या ब्राह्मणास आपल्या समागमें राजवाड्यांत आणिलें. एक तर श्रीकृष्णाची आज्ञा, आणि त्यांतून पतीचे गुरुबंधु येतात; मग त्या मानास काय विचारावें? त्या सर्व वाट पहातच बसल्या. इतक्यांत त्या वृद्ध ब्राह्मणाची स्वारी आली. ती पहातांच त्या एकमेकींच्या कानाशीं लागून सर्व कुजबुजूं लागल्या ! तो येतांच त्याच्या अंगावर मळकट चिंध्या पाहून कृष्णास फारच वाईट वाटलें. आणि लागलेंच एक उत्तम वस्त्र आणवून त्यास दिलें. त्याणें तें परिधान करून लागलेंच पूर्वीचें फेंकून द्यावें असें कल्पून तें टाकून दिलें. तें वस्त्र रुक्मिणी आदिकरून स्त्रिया आटोपून ठेवण्यास धांवल्या; परंतु श्रीकृष्णानें सर्वांपूर्वी तें उचलून आपल्या उराशीं धरून नंतर नीट ठेवण्यास रुक्मिणीस सांगितलें. या नंतर अष्टनायकांनीं सुदाम्यास सुवर्णपाटावर बसवून नाना प्रकारच्या सुगंधी तैलांनीं स्वहस्तें त्याचें अंग मर्दन केलें ; व त्यास मंगलस्नान घातलें. इतक्याच अवकाशांत 'वहिनीनें मला कांहीं भेट दिली कीं नाहीं ?' असें कृष्णानें विचारल्यावरून, त्याणें त्या पोह्यांचें फडकें दाखविलें. तें कृष्णानें लागलेंच आणून त्यांतील पोहे घेतले व सर्व खाणार तोंच रुक्मिणीनें विनंती केल्यावरून सर्वांस थोडथोडे देऊन आपणही आनंदानें भक्षण केले. इकडे सुदाम्याचें मंगलस्नान व संध्यादि कर्में आटोपल्यावर त्यास मिष्टान्नभोजन अत्याग्रहानें दिलें. त्या वेळीं मोठा पितांबर सत्यभामेनें त्यास नेसावयास दिला. सुवर्णताट

जेवणाकरितां ठेविलें होतें. सुदाम्यानें स्वस्थपणानें यथेच्छ भोजन केलें. मधून मधून आग्रह चालला होताच. नंतर रुक्मिणीनें स्वहस्तें तांबूल दिला. तांबुलानंतर कृष्ण व सुदाम हे उभयतां पलंगावर बोलत बसले. व अष्टनायकादि सर्व स्त्रिया खालीं बसल्या असून, कित्येक कृष्णस्त्रिया सुदामजीचे पादसेवन करीत होत्या. याप्रमाणें वडील बंधुपेक्षांही अधिक सुदामजीस मान मिळाला. एक महिनापर्यंत त्यास कृष्णानें आपल्याजवळ ठेवून घेतलें. तेथील वैभव व कित्येक सुंदर वस्तू पाहून, आपणास त्यांतून कांहीं असाव्या अशी इच्छा सुदाम्यास पुष्कळ वेळां झाली. व कांहीं तरी आपल्याकरितां कृष्णाजवळून मागून घ्यावें, असाही त्याणें निश्चय केला; परंतु त्याच्यानें एकही शब्द बोलवेना. शेवटीं आतां जाण्याची आज्ञा तरी मागावी ह्मणजे आपोआप आपले मनोरथ पूर्ण होतील, असा तर्क केला. सुदाम्यास वस्त्रप्रावर्णें व अलंकार कृष्णानें इतके अमोलिक दिले होते कीं, एकादे वेळीं त्याच्या मनांत असें येई कीं, कांहीं दुसरें न देतां अंगावरील दागिने जरी राहिले, तरी आपलें हजारों जन्मांचें दरिद्र नष्ट होईल.

सुमारें महिना भरत आल्यावर एके दिवशीं सुदाम्यानें जाण्याची गोष्ट काढली; त्या वेळीं कृष्णानें पट्टराण्यांकडे त्यास नित्यश: मेजवानीचा समारंभ चालविला. आणि मोठ्या आग्रहानें त्यास आणखी कित्येक दिवस राहविलें. परंतु एकांत पाहून एके दिवशीं सुदाम्यानें मुलांबाळांस भेटण्याची इच्छा झाली आहे असें सांगितल्यावर त्यास कृष्णानें घरीं जाण्यास आज्ञा दिली. त्या दिवशीं सर्व इष्ट मित्रांसह त्याच्या पंक्तीस बसण्याकरितां मोठाच समारंभ

करविला. व सर्वांस सुदाम्याची ओळख करून दिली. रात्रीं भोजनानंतर सर्व रात्रभर त्याच्या सेवेंत राहून प्रातःकाळीं त्यास स्वनगरीस जाण्याकारितां आज्ञा दिली. जाते वेळीं, मार्गांत कदाचित् चोरांची गांठ पडल्यास तुह्मांस लुटतील, याकरितां तुह्मीं आपल्या अंगावरील नूतन दिलेले अलंकार व वस्त्रप्रावर्णें परत देऊन आपल्या प्रथमच्याच वेषानें घरीं जावें; असें कृष्णानें सांगून सर्व वस्त्रंभूषणें परत घेऊन त्यास लावून दिलें! जातेवेळीं आपण दोन कोश शहराबाहेर त्यास पोंचवायास गेला. घरांतून निघतेवेळीं सर्व कृष्णास्त्रियांनीं व सर्वत्रांनीं आदरातिथ्याची पराकाष्ठाच केली. परंतु, सुदाम्यास तर असें झालें कीं, मी जर आलों नसतों तर फारच चांगलें झालें असतें. चालत जाण्यायेण्याचे श्रम तरी चुकले असते. कृष्णाची आज्ञा घेण्यापूर्वीं सुदाम्यास असें वाटत होतें कीं, कृष्ण परत जातेवेळीं तरी कांहीं वस्तु मला देईल; व त्या योगें माझें दरिद्र नाश पावेल; परंतु त्या बिचाऱ्याची तीही आशा नष्ट झाली. आणि कृष्णानें एक कवडीही न देतां त्यास तसाच त्याच्या पूर्वींच्या फाटक्या वस्त्रानिशीं वाटेस लावून आपण परत आला.

याप्रमाणें सुदाम सर्व प्रकारें निराश होत्साता द्वारकेंतील भोगलेलें सुख व स्वगृहांत होणारें दुःख आठवीत आपल्या कपिला नगरीस चालला. तो कृष्णास शिव्या देत व आपल्या दुर्दैवास दोष लावीत मोठ्या दिलगिरीनें मार्ग क्रमीत होता. तो ज्या वेळीं गांवाजवळ जवळ आला, त्या वेळीं समोरून सोन्या रुप्याचे कळस दिसूं लागले. व मोठमोठ्या इमारतीही सुवर्णाच्या दिसल्या. त्या पाहून

त्यास मनांत वाटलें कीं, पुनः आपण द्वारकेंतच आलों. व फिरून मागें जाऊं लागला, पण लक्षपूर्वक पहातो ता आपण खचित मार्ग चुकलों नाहीं; परंतु दुसरें एखादें नवीन शहर निर्माण झालें असावें असें त्यास वाटून पुन्हा आपल्या नगरीकडे चालला. आणि ग्रामदुर्गाजवळ जाऊन पहातो तों, त्यावरील पहारेकऱ्यांनीं त्यास लवून रामराम करून मोठ्या सन्मानानें आंत घेतलें. पुढें किंचितही वेळ गेला नाहीं, तोंच हत्ती घोडे व पालख्या इत्यादि वहनें घेऊन कारभारी व मुत्सद्दी आले आणि सुदामदेवास आरूढ होण्याविषयीं विनंती करूं लागले. तेव्हां सुदाम्यानें त्यास म्हटलें, अरे, तुम्हीं चुकलां. तुमचा धनी दुसरा कोणी असेल, तो पहा. मला उगीच नेऊन पंचायतींत घालूं नका. त्यांणीं त्याचें कांहींच न ऐकतां त्यास पालखींत बसविलें आणि घरीं नेलें. वाटेंत सुदाम्याच्या मनांत नाना प्रकारच्या गोष्टी आल्या. त्यास असेंही वाटलें कीं, ज्या कृष्णानें मला सुखांत निमग्न करून या पंचायतींत टाकिलें त्याणेंच कांहीं तरी हा नूतन विभू रचिला आहे; व मला पुढें पूर्ण पश्चात्तापांत पाडणार! अरे चांडाळा कृष्णा, मी कायरे तुझा असा मोठा अपराध केला? कोणत्याच कृत्याविषयीं मी तुझ्या टवाळ्या ढवाळ्यांच्या आड आलों नसतां, व्यर्थ रे कां मला तूं छळतोस? असो; प्रारब्ध! असें दुःख करीत असतां घराजवळ येतांच आनंदवाद्यांची एकच ध्वनि ऐकिली. उल्हाटयंत्रांचे भडिमार ग्रामदुर्गावरून होऊं लागले. अशा मोठ्या सन्मानानें, सुदाम्यास खालीं उतरल्यावर, त्याची पत्नी चरणांगुष्ठापासून तों मस्तकापर्यंत रत्नजडित अलं-

कार अंगावर घालून, भरजरी पैठणी नेसून व हातांत पंचारती घेऊन पतीस ओंवाळण्याकरितां पुढें आली. तिलाही न ओळखून आणि मी तुमची पत्नी आहे असें ती सांगत असतांही तो व्यर्थ भ्रमांत पडला. शेवटीं तिणें हात्त धरून त्यास आदरपूर्वक महालांत नेल्यावर त्याचीं मुलें ज्या वेळीं मांडोवर बसून खेळूं लागलीं, त्या वेळां त्यास तें सर्व खरें वाटलें. आणि आपण कृष्णाची निंदा केली व त्यास व्यर्थ शिव्या दिल्या, ह्मणून पश्चात्ताप पावून आपल्या तोंडांत फडाफड मारून घेतलें.

सुदाम्यास त्याच्या कृतीचा खरोखर पश्चात्ताप होऊन तो एकसारखा कृष्णध्यानांत निमग्न झाला; व कृष्णदर्शनाशिवाय हा प्राण कधींही ठेवणार नाहीं अशी निश्चयपूर्वक प्रतिज्ञा केली. तेव्हां कृष्ण कृपाळू होऊन तेथें प्रकट झाला व सर्वांस दर्शन दिलें. सुदाम्यास आपलें सर्व कपटकृत्य करण्याचा हेतु सांगून त्यास श्रम दिल्याची उलट त्याजवळ क्षमा मागितली. नंतर सर्वांस विचारून कृष्ण द्वारकेस गेले.

---

# अध्याय ३० वा.

## कृष्णदान.

एके दिवशीं मित्रविंदेच्या घरीं कृष्णाची जाण्याची पाळी असून तो साहजिक सत्यभामेच्या घरीं आला. त्या वेळीं आपल्याच स्वरूपास कृष्ण लुब्ध आहे असें तिला वाटून मोठा गर्व झाला; आणि बोलली कीं, आजचा दिवस दुसरीकडे जाण्याचा असून इकडे येणें कसें झालें? कृष्ण ह्मणाला कीं, ज्या स्थळीं मजवर जसजशी भक्ति

तसतसें माझें चित्त त्या ठिकाणीं अधिकाधिक रममाण होतें! भामेनें विनंती केली, देवा, माझें रूप, तेज व माझी तुजवर प्रीति जी आहे तो प्रकार कांहीं विलक्षण आहे; ह्मणून दुसरीकडचा एकंदर नाद सोडून तुमचें मजकडे निरंतर ध्यान असावें. सोळा सहस्र स्त्रिया तर केवळ तुमच्या चरणीं लीन आहेत. आणि आह्मी अष्टनायका ज्या आहों, त्या सर्वांचीही भक्ति तुमच्या चरणीं आहे ; व निरंतर त्या चरणरजाची धूळ आपल्या अंगावर पडण्याचीच सर्व इच्छा बाळगून आहोंत. परंतु, रुक्मिणीस मात्र किंचित् गर्व झाला आहे तिला असें वाटतें कीं, आपण वडील; आपण सर्वांत श्रेष्ठ; आपण कृष्णाचें चित्त हरून घेतलें आहे ; आणि इतर सात नायका या केवळ आपल्या दासी आहेत. ह्मणून देवा, इतःपर ते सर्व नाद सोडून मजवर तुह्मीं विशेष प्रेम ठेवावें, अशी माझी निरंतर आशा आहे. कृष्ण ह्मणाला, भामे, तूं रुक्मिणीची एवढी स्पर्धा कां बरें करतेस? माझी दोन्ही ठिकाणीं किंबहुना सर्वत्र सारखी प्रीति आहे. तुह्मी व्यर्थ स्पर्धा आपापसांत करून आपापल्या मनास दुःख करून घ्यावें हा अप्रशस्त मार्ग. भामा ह्मणाली, देवा, कसेंही तुह्मांस वाटलें, तथापि रुक्मिणीची आपणावर खास कपटभक्ति आहे. हें भाषण जरी कृष्णास रुचलें नाहीं, तथापि सत्यभामेच्या मनाप्रमाणें तिचा गौरव केला व कांहीं वेळ बोलून निद्रा येण्याचें निमित्त करून पलंगावर शयन केलें. इतक्यांत नारदाची स्वारी तेथें आली.

नारदास पाहून भामेनें मंचकाखालीं उडी टाकिली, आणि ऋषीचे पाय धरिले; व त्याचें भक्तीनें पूजन करून

चरणावर मस्तक ठेवून सन्मुख उभी राहिली. नारद ह्मणाले कीं, आज मला मोठाच आनंद झाला आहे, कीं तुझ्या घरीं अवेळीं श्रीकृष्णचरण लागले. भामा ह्मणाली, महाराज, आपल्या चरणाजवळ एवढीच विनंती आहे कीं, जरी कृष्णाची प्रीति मजवर परिपूर्ण आहे; तथापि त्यांचें मन सदोदित सारखें नसल्यामुळें कधीं कधीं चलनवलन कांहीं निराळ्याच प्रकारचें होतें. तसें न होतां सदां मजवरच त्यांची प्रीति असावी, असा कांहीं तरी उपाय सांगून तो सिद्धीस जाण्याविषयींचा मला आपला पूर्ण आशीर्वाद असावा. मीच ह्मणून या कृष्णास आपल्या कबजांत ठेविला आहे; नाहींपेक्षां या कृष्णास थाऱ्यावर आणण्यास दुसऱ्याची शक्ति नाहीं. स्वामीमहाराज, दुसरें तर काय सांगूं, पण यास मी आपल्या मायापाशानें बांधून ठेविलें आहे. नारद बोलला, बाई, तुमचें सामर्थ्य विलक्षणच दिसतें! कांकीं, कृष्णास आपलेसें करून घ्यावें, याबद्दल आह्मांसारख्यांचाही उपाय हरला; त्या देवास तूं आकलन करून ठेविलास हें पाहून नवल वाटतें. आणि असें जर खरेंच असेल, तर तुजजवळ कृष्ण निरंतर राहण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं! भामा ह्मणाली कीं, महाराज, या कृत्यास कांहीं तरी दैविक इलाज सांगावा, ह्मणजे त्याप्रमाणें मी करीन. नारदानें सांगितलें कीं, ज्या वस्तूवर आपली विशेष भक्ति असून ती आपणास निरंतर असावी अशी इच्छा ज्याची असेल, त्याणें अगर तिणें ती वस्तु दान केली पाहिजे. त्याप्रमाणें जर त्वां एकदां कृष्णाचें दान केलेंस, तर ह्याचा तुला निरंतर लाभ घडेल. भामा ह्मणाली, ती गोष्ट खरी; परंतु या

कृष्णास दान घेणारा समर्थ कोण आणि त्यास विचारिल्याशिवाय देणार तरी कोण? नारद बोलले कीं, घेणारा मी आहें; आतां देण्याविषयीं त्वां पाहिजे तो यत्न करावा.

भामेनें कृष्णास उठवून मोठ्या लाघवीपणानें तें वर्त्तमान सांगून विनंती केली कीं, मी आपल्यास नारदस्वामींस दान देणार; ह्मणजे निरंतर मला आपल्या चरणाचा लाभ घडेल. कृष्णानें सांगितलें कीं, प्रिये, तुह्मां स्त्रियांमध्यें कांहीं कलह होत नसला ह्मणजे मला याविषयीं कांहींच अडचण नाहीं. भामा ह्मणाली, प्राणनाथ, त्या गोष्टीचा विचार मला आहे. मी तुह्मास दान देतें. नंतर नारदाचें पूजन करून त्याच्या हातावर कृष्णाचें दानाविषयीं उदक सोडिलें. तें उदक हातावर पडतांच नारदऋषि कृष्णास आपल्या समागमें घेऊन बाहेर चालले. त्या वेळीं भामेनें जरी म्लान मुख केलें, तथापि 'आतां या कृष्णावर तुझी सत्ता नाहीं' असें ह्मणून कृष्णासह पुढें चालले. कृष्णानेंही भामेस सांगितलें कीं, आतां नारदस्वामीच्या आज्ञेशिवाय एक पाऊलही मला मागेंपुढें टाकवत नाहीं. भामेनें नारदाची बहुत प्रकारें विनवणी केली; तथापि तें कांहींच न ऐकतां ते कृष्णास रुक्मिणीच्या मंदिरांत घेऊन गेले. नारद आल्याचें वर्त्तमान रुक्मिणीनें ऐकतांच पुढें धांवत येऊन पाय धरले. आणि त्यास श्रेष्ठासनीं बसविल्यावर, श्रीकृष्णास पलंगावर बसण्याची विनंती केली. कृष्णानें सांगितलें कीं, भामेनें मला नारदास दान केलें आहे; ह्मणून आतां तुमची कोणाचीच मजवर सत्ता नाहीं. हें वर्त्तमान ऐकतांच रुक्मीण बेशुद्ध होऊन पडली. इतक्यांत त्या स्थळीं सर्व स्त्रिया जमल्या व सर्वांस हें वर्त्तमान कळतांच त्यांनीं एकच आकांत केला.

अशा समयीं मित्रविंदा पुढें येऊन तिनें नारदाच्या चरणीं मस्तक ठेवून विनंती केली कीं, जें भामेनें दान केलें तें आह्मींच केल्यासारखें आहे; कारण कीं कृष्णानें तो पूर्वीच आपल्या शब्दांत उलगडा केला आहे; परंतु या सर्वांच्या तर्फेनें मी आपणास विनंती करितें कीं, जर कृपा करून आपण आह्मांस दयादृष्टीनें अवलोकन कराल आणि कृष्णनाथास परत द्याल तरच आह्मीं सुखी होणार. व हीं सर्व आमची लाज राखणें आपल्या हातीं आहे. यावर नारद ह्मणाले कीं, कांहीं जरी करणें झालें तथापि त्यांत मला लाभ पाहिला पाहिजे; ह्मणून कृष्णास नुसत्या तुमच्या शब्दावर परत देणें हें मला अमान्य आहे. हें ऐकून भामा पुढें आली आणि लोटांगण घालून बोलली कीं, महाराज, ज्या पक्षीं हा अपराध माझा आहे, त्यापक्षीं आपली मीच ऋणी आहें. नारदानें सर्वांचा आकांत पाहून भामेस सांगितलें कीं, कृष्णाच्या भारंभार सोनें मला द्यावें ह्मणजे मी यास तुह्मांस परत देतों. भामा ह्मणाली कीं, ज्यापेक्षां मूर्खपणा मीच करून सर्व स्त्रियांमध्यें मी आपल्या वदनास कलंक लावून घेतला आहे, त्यापेक्षां हें सुवर्ण मी स्वताचेंच देतें. असें ह्मणून तिनें तराजू आणविला आणि एका पारड्यांत कृष्णास घालून दुसऱ्या पारड्यांत सुवर्ण आणून घातलें. तथापि कृष्णाचें पारडें जमिनीवरून हाललें नाहीं. हें पाहून तर तिणें आपल्याजवळ जितकें होतें तितकें सोनें आणलें व पारड्यांत घातलें. शेवटीं आपल्या अंगावरील सर्व अलंकार भरीस घातले, तथापि कृष्ण सम तोलेना. हें पाहून सर्व स्त्रियांनींही आपापले अलंकार आणून घातले; तथापि कांहीं होईना. त्या वेळीं

नागरीक नरनारी यांसही फारच वाईट वाटून नगरांत एकही गुंज सुवर्ण न ठेवितां सर्व कृष्णनाथाच्या प्राप्तीकरितां भरीस घातलें; तथापि नारदाच्या द्रव्याची भर होईना. तेव्हां रुक्मीण पुढें आली व साष्टांग नमस्कार घालून बोलली कीं, ज्या कृष्णाच्या प्रत्येक रोमरंध्राच्या ठायीं अनंत कोटि ब्रह्मांडांची घडामोड होते, त्या देवाची आह्मांस तुळा कशी होईल? ब्रह्मा, विष्णु, हर, ऋषि, देव, गण, गंधर्व यांच्यानें ज्या कृष्णास पूर्णपणें ध्यानांतही आणविलें नाहीं, त्या कृष्णास आह्मीं तोलणार हा सर्व व्यर्थ श्रम आहे. जगदिश्वराचीच जर इच्छा असेल तर ही गोष्ट होणें आहे; ह्मणून मी हें एक तुलसीपत्र सद्भक्तीनें या पारड्यांत टाकतें. जर सर्वांच्या पुण्याईनें श्रीकृष्ण तुळा झाली तर चांगलें; नाहींपेक्षां परमेश्वराची इच्छा. इतकें बोलून पुनः ईश्वरास साष्टांग नमस्कार घालून सर्व सुवर्ण परत काढवून त्या जागीं आपल्या हातांतील फक्त एक तुळसीपत्र टाकिलें. तें टाकतांच कृष्णाचें पारडें वर उचलून दोन्हीं समान झालीं. हा चमत्कार पाहून नागरीक जनास तर अत्यानंद, कृष्णस्त्रियांस ब्रह्मानंद व रुक्मिणीस तर आनंदानें मूर्च्छितच पाडलें. सत्यभामेनें मात्र खालीं मान घातली, आणि कृष्णाच्या चरणीं मस्तक ठेविलें. मग ती ह्मणाली, माझ्या मनांत जो गर्व होता तो सर्व हरण झाला; आतां कृपा करून मला कृतापराधाची माफी असावी, असें ह्मणून रुक्मिणीच्याही चरणावर मस्तक ठेविलें. हें पाहून भामेस कृष्णानें जवळ घेऊन तिची समजूत केली. तेव्हां नारदानें रुक्मिणीची प्रशंसा करून सर्व स्त्रियांस तिच्या आज्ञेत रहाण्यास आज्ञा केली.

---

# अध्याय ३१ वा.

## गरुड व भामा गर्वहरण.

रुक्मिणी ही पूर्णावतारी आहे असें नारदानें भामेस सांगितलें. त्याप्रमाणें तिणें कृष्णमुखेंही ऐकून तिच्या अंतःकरणाचीही खात्री झाली होती. परंतु, तिच्या मनांतील स्पर्धा व स्वरूपाभिमान हा कधींही नष्ट झाला नव्हता. कारण, ती वारंवार कृष्णाजवळ याच गोष्टीविषयीं विनोद करीत असे. आणि कोणत्या तरी वेळीं तिची पुर्तेपणीं भ्रांति फेडावी असा कृष्णाचा हेतु होता.

एके वेळीं नारदस्वामी स्वेच्छेनें दक्षिण तीर्थें करीत करीत श्रीरामेश्वरीं आले. तेथें मारुती त्यास भेटला. परस्परांचीं क्षेमालिंगनें व वंदनें झाल्यावर नारदानें त्यास कित्येक तीर्थें करण्याची व साधूंच्या भेटी घेण्याची सुचना करून आपण श्रीद्वारकेस आले. तेथें क्षेमकुशल व पूजन झाल्यानंतर हनुमंतभेटीचा वृत्तांत नारदानें कृष्णास सांगितला. व हनुमंताची फारच प्रशंसा केली. त्या वेळीं रामावतारांतील हनुमंत ह्मणजे माकड अजून वांचलें कसें या गोष्टीचा कित्येक बायकांनीं उपहास केला. त्यावर कृष्णानें त्याच्या रामभक्तिविषयींच्या व सामर्थ्याच्या बहुत गोष्टीही त्यांस सांगितल्या; पण त्या बायकांच्या मनाची कोणत्याही रीतीनें खात्री होईना. ह्मणून मारुती ह्मणजे अकरावा रुद्र व तो सदाशिवाचा अवतार आहे, असें सांगून ती गोष्ट तशीच ठेविली.

इकडे तीर्थें करावीं व साधूंचीं दर्शनें घ्यावीं अशी जी बुद्धि हनुमंतास नारदानें सांगितली, ती त्याच्या हृदयांत

पुर्ती ठसून, त्याप्रमाणें तो तीर्थें करीत व महान् साधूंचीं दर्शनें घेत घेत द्वारावतीस आला. तेथें उपवनांत क्रीडत असतां, कित्येकांस या नगरीच्या राजाचें नांव काय ह्मणून विचारितां, लोकांनीं येथें 'बळराम' राजा राज्य करीत आहे असें सांगितलें. तें ऐकण्याबरोबर हनुमंतास क्रोध येऊन त्यास असें वाटलें कीं, एक सीतापति 'राम' होऊन गेला. त्याणें एका सीतेसाठीं दशकंठादि दुष्टांचा संहार करून भूभार हरण केला; व आपणही त्याच रामाचे चिरंजीव सेवक आहों. या लोकांत हा दुसरा 'राम' कोठून आला? यास नाहींसा करावा, असा त्याणें मनांत विचार आणून कित्येकांस सांगितलें कीं, पाहिजे त्या राजाचें दुसरें नांव त्यास द्या ; पण 'राम' व 'बळीराम' असे शब्द उच्चारण्याचें सोडा. जर न सोडाल तर तुह्मांस मारून या नगरीचें स्वप्रतापें निर्दाळण करीन. तें ऐकतांच बिचारे लोक पळाले व त्यांणीं हें वर्तमान कृष्णास सांगितलें.

इकडे मी वळवान व प्रतापसूर्य असा अहंकार गरुडास झाला होता, तो काढून टाकण्याची संधि रामकृष्ण पहातच होते. इतक्यांत ही वेळ बरी आली असें पाहून उभयतां बंधूंनीं विचार करून भामेचा व गरुडाचा गर्व परिहार करण्याचा निश्चय केला. त्यांणीं कित्येक लोकांस सभेंत बोलावून त्यांस हें वर्तमान विचारिल्यानंतर, लागलेंच गरुडास बोलावून आज्ञा केली कीं, त्या वानरास येथें बोलावून आण. गरुडानें विनंती केली, महाराज, धन्यानें चाकराची सेवा जाणावी व योग्य बक्षीस द्यावें; अगर त्यास हिंमत नसल्यास त्याचा उपहास करावा. तसा प्रकार न होतां, मजसारख्या प्रतापवंत व साहसी अशा विश्वासू व

प्रिय सेवकास ही असली हलकी कामगिरी देतां हें काय ? कृष्णानें आज्ञा केली कीं, एक वेळ तूं जा, आणि त्यास बळराम तुला बोलावितो ह्मणून सांग ; आणि जर तें ऐकून तो न आला तर तूं परत ये. असें सांगतांच गरुड एकाच भरारीनें जेथें हनुमंत होता त्या उपवनांत गेला.

हनुमंत रामनामस्मरण करीत ध्यानस्थ बसला आहे व डोळे मिटले आहेत, अशा संधीस गरुडानें त्याजवळ येऊन मोठ्यानें ओरडून सांगितलें कीं, 'अरे माकडा, तुला बळराम बोलावित आहे.' तेव्हां हनुमंत ध्यानस्थ आहे असें पाहून, गरुड त्याच्यासमोर उभा राहून पुन्हा एकदां मोठ्यानें ओरडला. शेवटीं त्याच्या कानाजवळ येऊन ओरडून पुन्हा तींच अक्षरें सांगितलीं. तें ऐकतांच कानाशीं कोणीतरी कटकट करीत आहे असें त्या मारुतीस वाटून त्यानें रागानें एक चपराक मारिली ; ती गरुडाच्या श्रीमुखांत बसतांच व्याकूळ होऊन जो आपोआप उडाला, तो घायाळ होत्साता गतप्राण होऊन राजवाड्यासन्मुख राजांगणांत येऊन पडला. त्या वेळीं मोठा ध्वनि झाला त्याच्या योगानें कित्येक स्त्रिया, जन आणि बळराम व कृष्ण हेही त्या ठिकाणीं आले व पहातात तों गरुड घायाळ होऊन मुखांतून भडभडां रक्त वाहून विगलितदंत होत्साता अरबळत पडला आहे असें पाहिलें. तेव्हां गरुड ह्मणाला, देवा, जर तुला माझा राग आला होता, तर तूंच मला ताडण करावयाचें होतें ; त्या माकडाकडून मला मार कां बरें देवविलास ? असें ऐकिल्यानंतर कृष्णानें ह्मटलें, गरुडा, तूं खोटें बोलतोस व ढोंग करतोस. गरुडानें आपलें तोंड दाखवून गालावर चपेटा

लागलेला वळही दाखविला. तेव्हां पुन्हा त्याच्या कानांत बळरामानें सांगितलें कीं, तूं आतां त्याजवळ जा व त्याला सांग कीं, 'सीतापति राम' तुला बोलावीत आहे. हे शब्द ऐकल्यावर तो तुला अगदीं मारणार नाहीं. मग गरुडानें देवाच्या पायांवर मस्तक ठेवून विनंती केली कीं, महाराज, जर प्राण घेणें असेल तर आपणच घ्यावा; परंतु मला तेथें पुन्हा पाठवून त्या माकडाच्या हातून मारवूं नका. श्रीकृष्णानें गरुडाची पाठ थोपटली व त्यास निर्भय केलें. मग गरुड लागलाच श्रीकृष्णास वंदन करून निघाला. तो भरारी मारीत मारुतीपासून बऱ्याच अंतरावर त्याचा हात न पोंचे अशा बेतानें उभा राहून, तेथून बोलला कीं, 'हे महासमर्था, तुला सीतापति राम भेट घ्यावयाकरितां बोलावित आहे.' इतके शब्द गरुडानें उच्चारिले, आणि जरी निर्भय होता तथापि त्यानें एकदम मागें द्वारकेकडे भरारी मारिली.

इकडे प्रथमच्या त्रासानें मारुती क्रोधयुक्त होऊन आपल्या शेपुटाकडून वनविध्वंस करीत असून, शहरांत घरोघर पुच्छ शिरवून जे जे कोणी अभिमानी होते त्यांस बंधन करीत होता. त्या दुःखापासून मुक्त व्हावें ह्मणून, कृष्णपुत्र व पौत्र इत्यादिकांनीं मोठ्या शूरत्वाचे नाना यत्न केले; परंतु ते सर्व निरर्थक झाले. मारुती रामस्मरणांत निमग्न असतां, अकस्मात 'सीतापति' हे शब्द त्याच्या कर्णीं आले; ते ऐकतांच त्यानें डोळे उघडिले. तथापि जवळ कोणी दिसेना, परंतु एक पक्षी पळत पळत द्वारकेकडे जात आहे असें पाहिलें; तेव्हां हात किंचित् लांबवून त्या गरुडास जवळ आणून पोटाशीं धरिलें. आणि त्याचें

मुख कुरवाळून विचारिलें, सख्या, तूं माझा प्राणप्रिय व सुख उत्पन्नकर्ता आहेस. मित्रा, भिऊं नको; माझा राम कोठें आहे तो मला दाखीव. गरुड बोलला, महाराज, एक वेळ आपण मला जिवदान द्यावें; ह्मणजे हा मार्गच मी सोडतों. पुनः स्वर्गप्राप्ति असली, तथापि मला येथें येणें नाहीं! मारुती ह्मणाला, सख्या, भिऊं नको. त्वां माझें मन आनंदित केलें व कर्णेंद्रियें रघुनाथनामश्रवणें करून पावन केलीं; तेव्हां असा जो प्राणी त्यास माझ्यापासून भय कल्पांतींही होणार नाहीं. आतां कृपा करून मला रघुवीरचरण दाखवावे; असें ह्मणून गरुडास पोटाशीं धरून नगराकडे चालला.

इकडे मारुती गरुडास घेऊन राजवाड्यांत येत आहे अशी बातमी छडीदाराकडून कृष्णास पोंचतांच त्यास महदानंद झाला. भामा आदिकरून स्त्रियांस मारुतीदर्शनाची मोठी उत्कंठा लागली. सर्व नागरीक नरनारी यांचे समुदाय मारुतीदर्शनार्थ जमूं लागले; परंतु त्या बिचाऱ्या गरुडाचा जीव मात्र मोठ्या यातनेंत पडला. कारण, त्यास असें वाटलें कीं, मारुतीनें मोठ्या लोभानें मला हृदयाशीं धरिलें आहे; परंतु आतां जर त्या हनुमंताच्या दृष्टीस सीतापति न पडले तर माझा जीव जाणार. असो. अशा प्रकारें मारुती अगदीं निकट येत आहे व गरुड तर धाकानें गतप्राणासारखा झाला आहे असें जाणून, कृष्णानें रामाचें रूप धारण केलें व आज्ञा होतांच बळराम लक्ष्मणाचें रूप घेऊन जवळ बसला. त्याचप्रमाणें शंखचक्रांनीं भरतशत्रुघ्नांचे अवतार घेऊन चामरें वारण्याचा क्रम चालविला. सिंहासनावर राम, त्याच्या पायांजवळ लक्ष्मण, व दोहों

बाजूस भरत व शत्रुघ्न उभे राहिले. इतका प्रकार झाल्यानंतर श्रीकृष्णानें भामेस सीता होऊन येण्यास आज्ञा केली. तें ऐकतांच ती नवीन वस्त्रालंकार धारण करून जवळ आली. तें पाहून कृष्ण हास्यवदन करून ह्मणाला कीं, तूं आपणाकडून तर फार नटलीस; परंतु सीतेचें खरें रूप दिसत नाहीं. कदाचित् आह्मीं जरी तुझ्या इच्छेस्तव ह्मटलें तथापि मारुतीला भ्रम पडेल. तेव्हां भामेनें नानाप्रकारें थाट करून वरचेवर आपलीं रूपें पालटून दाखविलीं. परंतु कृष्ण व भरतशत्रुघ्नांनीं ह्मटलें कीं, सीतेच्या व तुमच्या रूपांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. शेवटीं निरुपाय होऊन भामा ह्मणाली, फार चांगलें; आतां कोणती राणी हुबेहूब सीता होऊन येते तें तरी मी पाहीन! मी आपली वाईट. तेव्हां कृष्णानें रुक्मिणीस सीता होऊन येण्यास सांगितलें. तें ऐकतांच ती आंत जाऊन अंगावरील पदर मात्र किंचित फिरविल्यासारखा करून लागलीच सीतारूप घेऊन आली व रामासन्निध बसली. तें रूप पहातांच भामेचें वदन म्लान झालें. आणि तिणें साष्टांग नमस्कार सर्वांस घालून रामास विनंती केली कीं, आजपासून अभिमान हा दुर्गुण मी आपल्या हृदयांतून काढून टाकला. रुक्मीण ही आदिमाया आहे, असें मी आतां पूर्णपणें जाणलें.

अशा प्रकारें भामेचा गर्व हरण होऊन त्या सर्व स्त्रिया अंतरगृहांत गेल्यावर, कृष्णानें आपल्या योगमायेनें असा कांहीं चमत्कार केला कीं, जितके सभासद होते, तितक्यांस नळ, नीळ, जांबुवंत, सुग्रीव, सुषेण व बिभीषण इत्यादि वीरांचीं रूपें दिलीं. इतक्यांत गरुडानें हनुमंतास हातीं धरून

तेथें आणिलें. नगराचा थाट अयोध्यावत् झाला; सर्व लोकही तद्वतच झाले; व आसमंतात् वानरसैन्यांचे पाळे-च्या पाळे दिसूं लागले. हें पहातांच प्रथम गरुडास असें वाटलें कीं, आपण नगराची वाट चुकून भलत्याच मार्गानें दुसऱ्या नगरास आलों. दुसरा प्रकार असा झाला कीं, जे जे कोणी गरुडास भेटत, ते ते वानररूपी अगर राक्षस-रूपी रामसेवकच आहेत; असें त्यास वाटे. हें पाहून त्याचें तर मन भयग्रस्त झालें; परंतु मारुतीनें ह्मटलें कीं, मित्रा, तुझी मुद्रा भ्रमित कां झाली आहे? मला तर येथें सर्व ओळखीचा प्रकार दिसतो. प्रिया, आतां मला एक वेळ रामदर्शन करीव. गरुड जरी मनांत खिन्न होता तरी, धीटपणानें तसाच मारुतीसहवर्त्तमान राजद्वारासमीप आला. तेथें पहातो तों नित्याचे द्वारपाळ नसून कित्येक राक्षस व वानर आणि कित्येक देवांसारखे सुंदर दिसले. त्यांणीं मारुतीस पहातांच वंदन केलें व चोपदारांनीं येऊन मारुतीस गरुडासुद्धां आंत नेलें. मारुतीनें राम सिंहासनारूढ असून लक्ष्मण, सीता, भरत व शत्रुघ्न जवळ आहेत असें पाहून 'जयरघुवीर' ह्मणून साष्टांग प्रणिपात केला. तदनंतर बिभीषणास क्षेमालिंगन दिलें व नळनीळादिकांच्या भेटी घेतल्या. हा सर्व प्रकार गरुड खालच्या मानेनें पहात असून मनांत भीतियुक्त आश्चर्य पावला. त्याणेंही रामचंद्रास साष्टांग नमस्कार घातला; परंतु ही रचना येथें अशी कशी झाली, व या पुढें आपणास श्रीकृष्ण परमात्मा भेटेल किंवा नाहीं अशी त्यास मोठी भीति पडली. रामचंद्रानें मारु-तीस कुशल वृत्त विचारून त्यास जवळ बसविलें. मारु-तीनें विनंती केली कीं, आपण मला मागील रामावतारीं

एक वेळ भेट देण्याचा संकेत केल्याप्रमाणें आज मला दर्शन देऊन पावन केलें; त्या योगें मला फार आनंद झाला आहे. याप्रमाणें कांहीं वेळ मारुतीशीं श्रीरामचंद्र लंकेंतील गोष्टी बोलत बसले असतां, अंतर्गृहांत पूर्वरूपें पालटल्याशिवाय ज्या सर्व स्त्रिया होत्या, त्यांस कांहींसें आश्चर्य वाटलें कीं, कृष्ण व बळीराम गेले कोठें व हें झालें काय? व पुढें आपणांस परिणाम काय पहावा लागेल? इतक्यांत अशी गोष्ट घडली कीं, सर्वांस पूर्वरूपें येऊन रुक्मिणी अंतर्गृहांत बसली आहे व सर्व स्त्रियाही आपापल्यांत संवाद करीत आहेत, ह्मणजे सर्वत्र पूर्व स्थिति झाली; आणि हनुमंतास निरोप दिला. त्यानें, स्मरण कराल त्या वेळीं मी प्रगट होऊन साह्य करण्यास येईन, असें कबूल केलें. तेव्हां राम आणि कृष्ण हे एकच आहेत, अशी मारुतीची खात्री झाली व तो अंतर्धान पावला. मग नारदस्वामींनीं भामेस असा उपदेश केला कीं, रुमिक्णी ही आदिमायेचा अवतार आहे; याकरितां सर्व स्त्रियांनीं तिच्या मनास किंचितही उद्विग्न करूं नये. असें ऐकून नारदाची आज्ञा सर्वांनीं मान्य केली व रुक्मिणीच्या चरणावर सर्वांनीं मस्तकें टेविलीं. हें पाहून नारदास मोठा संतोष झाला. नंतर त्याणें गरुडासही चांगला उपदेश करून सांगितलें कीं, तुमच्या बलाबलाचा विचार जो आहे तो सर्व देवाधीन आहे. तुला मीच कायतो बळवान असा अभिमान झाला आणि त्या करितांच हें सर्व कृत्य घडून आलें. हें वचन ऐकतांच गरुडानें म्लान मुख करून अश्रुभरित नयनानें श्रीकृष्णाकडे पाहून विनंती केली कीं, देवा, मी आपल्या अभिमानानें फुगलों होतों;

परंतु त्याचें मला यथायोग्य शासन झाल्यामुळें मी आतां आपणांस शरण आलों आहें. कृतापराधाची क्षमा करणें आपल्या स्वाधीन आहे. नंतर कृष्णानें गरूडास पोटाशीं धरून त्याचें शांतवन केलें.

---

# अध्याय ३२ वा.

## सुभद्राविवाह व नारदगर्वहरण इ०

लावण्यवल्ली नांवाची रुक्मयाची कन्या त्याणें प्रद्युम्नास दिली; त्या वेळीं श्रीकृष्णासह सर्वांनीं भोजकोट नगरांत जाऊन चार दिवस मोठ्याच समारंभानें तो उत्साह केला. त्याचप्रमाणें रुक्मयाचा पुत्र रुक्मध्वज याणेंही आपली कन्या पद्माक्षी जी रूपानें रतीसारखी होती ती अनिरुद्धास दिली. त्या लग्नाचा समारंभही मोठ्या थाटानें झाला. या वेळीं रुक्मध्वजाच्या आग्रहानें श्रीकृष्णासह सर्व मंडळी त्याच्या नगरास गेली होती. व त्या समारंभास शाण्णव कुळांचे मोठमोठे राजे बोलाविले होते.

एके वेळीं रुक्मया व बळिराम हे उभयतां पण लावून द्यूत खेळण्यास प्रवृत्त झाले. त्या वेळीं कृष्णानें कित्येक अन्य प्रकारच्या गोष्टींनें द्युताचा निषेध केला; परंतु बळरामदादास तो उपदेश न आवडून त्यानें खेळास आरंभ केला. त्यांत प्रथमचा डाव रुक्मया जिंकला, व दुसरा डाव बळिराम जिंकला; त्यामुळें भाषणावरून भाषण होतां होतां शुरत्वावर गोष्ट येऊन त्यापासून युद्ध निर्माण झालें. तेव्हां एकाच प्रहारानें बळिरामानें रुक्मयास ठार मारिलें. त्या वेळीं मोठीच गडबड होऊन रुक्मिणीसही फार वाईट वा-

टलें. तें पाहून कृष्णानें तिचें शांतवन केलें व त्याचा पुत्र रुक्मध्वज यास राजासनीं स्थापन करून आपण द्वारकेस निघून आले.

दुर्योधनानें आपली कन्या लक्ष्मणा उपवर झाली ह्मणून मोठमोठे क्षात्रिय राजे बोलावून तिचें स्वयंवर आरंभिलें. व त्या ठिकाणीं कांहीं कलह उत्पन्न न व्हावा याकरितां सैन्याचा कडेकोट बंदोबस्त ठेविला होता. तथापि कांहीं स्वल्प कारणानें त्या जमलेल्या राजांत युद्ध उत्पन्न झालें. ते सर्व राजे आपापसांत लढत असतां, कृष्णपुत्र सांब याणें त्या चक्रांत जाऊन एकट्यानें पराक्रम करून ती कन्या हरण केली ; परंतु सर्वांनीं त्या प्रसंगीं एकोपा करून सांबास धरून कारागृहांत ठेविलें. ही बातमी द्वारकेस नारदाकडून कळतांच बळिरामास राग येऊन लागलाच तो हस्तनापुरास आला, आणि नांगर भुमींत रोवून हस्तनापुर पालथें घालूं लागला. तें पहातांच आतां आक्रांत होईल असें सर्वांस वाटून ते भयभित होत्साते बळिरामास शरण आले व दुर्योधनानें क्षमा मागून त्या सांबाचा आपल्या कन्येशीं मोठ्या समारंभानें लग्नसोहळा केला. आणि जांवयास कित्येक दासदासी, हत्तीघोडे व नाना प्रकारचीं अमूल्य रत्नें आंदण देऊन मोठ्या आनंदोत्साहानें द्वारकेस पाठविलें.

पांच पांडवांची एक स्त्री द्रौपदी, हिला पतिसान्निध्य करण्यास नारदानें दिवस वांटून दिले त्या अन्वयें, प्रत्येक वर्षी दोन मास आणि बारा दिवस प्रत्येकाच्या वांटणीस येत. असा एक पतीचा नियमित वेळ सरल्यावर तिनें अग्निकुंडांत पडून शुचिर्भूत होऊन दुसऱ्या पतीची

संगत धरावी. आणि धर्माचे दिवस ज्या वेळीं येतील त्या वेळीं चौघां बंधूनीं तिला मातोश्रीप्रमाणें मानावी. असा नियम नारदानें घालून दिला होता. एके दिवशीं धर्म व द्रौपदी एकांतांत असतां एक ब्राह्मण अर्जुनाजवळ धांवत आला; त्यानें त्याला सांगितलें कीं, माझ्या गाई चोरांनीं पळवून नेल्या. या वेळीं आपण जर धांवाल तर माझें कार्य होईल. तें ऐकून पार्थ आपलीं शस्त्रें ठेवण्याच्या खोलींत गेला. तेथें त्यानें धर्म व द्रौपदीस एकांतांत क्रीडत असतां पाहिलें. पुढें अर्जुन धनुष्यबाण घेऊन त्या ब्राह्मणाचें कार्य करून आल्यावर, गुरूस हा वृत्तांत सांगून ह्या कर्मास दोष काय असें विचारलें. मग गुरूनें सांगितलेल्या आज्ञेप्रमाणें तीर्थें करीत हिंडूं लागला. तो केदार, हरिद्वार, ज्योतिर्लिंगें इत्यादि पाहून काम्यक अरण्यांत आला. तेथें तो एका शिवाच्या स्थानांत शिव नसतां बसला. अर्जुन ध्यानस्थ आहे तों तेथें शंकर आला. त्यानें तूं येथें माझ्या स्थानांत कां बसला आहेस असें विचारल्यानंतर अर्जुन बोलला कीं, तुझें स्थान ह्मणजे कांहीं आंखलेलें नव्हे. यावरून शिवास राग आला आणि उभयतांचें मोठें युद्ध होऊन व अर्जुनाचें अनिवार्य शौर्य पाहून शंकर प्रसन्न झाला. आणि हा अर्जुन आहे असें शंकरास समजल्यावर त्यास त्याणें किरीट, कुंडलें व कवच दिलें. मग तेथून फिरत फिरत अर्जुन रामेश्वरीं आला. तेथें सेतु पाहून जवळच मारुती होता त्यास विचारिलें कीं, हा सेतु कोणीं बांधिला? मारुतीनें सांगितलें कीं, या मार्गानें राम लंकेस गेला त्या वेळेस त्याणें हा बांधिला. यावरून अर्जुन बोलला कीं, बाणानें सेतु बांधणें सोडून राम पराक्रमी असतां समुद्रांत

शिळासेतू कां बांधला ? मारुतीनें उत्तर केलें कीं, एकएक वानर पर्वताएवढा धिप्पाड, तो जर त्या बाणसेतूवर पडला तर भंगेल; ह्या विचारानें रामानें हा भक्कम व टिकाऊ असा बांधिला. याजवर अर्जुन बोलला कीं, मजसारखा असता तर बाणांचाच सेतु बांधिला असता. यावरून हनुमंतास राग येऊन तो ह्मणाला, तूं पाहिजे त्या रीतीनें बळकट सेतु बांध व मी तो लागलाच मोडतों. असें त्यानें अर्जुनास सांगितलें. तेव्हां अर्जुनानें तत्क्षणीं एक योजन बाणांचा सेतु बांधून पाहिजे तितकें बळ खर्च करून तो मोडण्याविषयीं मारुतीस सांगितलें व प्रतिज्ञा केली कीं, जर हा सेतु मोडला तर मी अग्निकाष्ठें भक्षण करीन. हनुमंतानेंही अशी प्रतिज्ञा केली कीं, जर मीं न मोडला तर मी तुझ्या ध्वजस्तंभावर बसेन. इतकें होतांच अर्जुनानें एक प्रज्वलित बाण सोडून तो सेतु मजबूत केला. मग हनुमंतानें गगनांत जाऊन त्या सेतूवर अशी एक उडी मारिली कीं, तत्काळ त्या सेतूचें चूर्ण झालें, यानंतर प्रतिज्ञेप्रमाणें अर्जुन अग्नींत उडी घालण्याकारितां तयार होत आहे, इतक्यांत ब्राह्मणरूपानें श्रीकृष्ण त्या ठिकाणीं येऊन सहजावृत्या अर्जुनास विचारिलें कीं, बाबा, अग्निकुंडांत प्रवेश करण्याचें कारण तरी काय ? तेव्हां अर्जुनानें झालेलें सर्व वर्त्तमान सांगितलें. तें ऐकून ब्राह्मण बोलला कीं, कोणताही पण साक्षीशिवाय पुरा होत नाहीं. मजदेखतां जर अशी गोष्ट होईल, तर मी ही गोष्ट खरी मानीन. मग अर्जुनानें पुनः सेतु बांधिला. तेव्हां त्याखालीं श्रीकृष्णानें आपलें सुदर्शन गुप्तरूपानें स्थापन केलें. नंतर, जेव्हां हनुमंतानें उडी मारिली त्या वेळीं सेतूवर आदळून तो एकीकडे पडला, पण सेतु मोडला नाहीं.

तेंव्हां अर्जुनानें कृष्ण ओळखिला. कृष्णानें रामरूप दाखवून मग हनुमंतास सांगितलें कीं, रामावतारीं तूं बहुत सेवा करून मला सुख दिलेंस; आतां तूं, मी आणि अर्जुन हे एकत्र मिळून दुष्टांचा संहार करूं. हा अर्जुन तुझा आहे; याचें तूं साह्य कर. इतकें बोलून कृष्ण द्वारकेस गेला.

बळरामाची बहीण सुभद्रा ही प्रथम अर्जुनास देऊं केली होती; परंतु अर्जुन संन्यास घेऊन फार दिवस तीर्थयात्रेस गेला असें पाहून, तो बेत फिरवून ती दुर्योधनास देण्याचा निश्चय बळरामानें केला. परंतु अर्जुनाकडे कृष्णाचें पूर्ण मन असल्यामुळें, हा बेत त्याच्या मनास आला नाहीं. ह्मणून बळिरामानें असा निश्चय केला कीं, अर्जुन जों आला नाहीं तों ही दुर्योधनास द्यावी. कृष्णास असें वाटलें कीं, अशा प्रसंगीं अर्जुन येथें येऊन पोंचावा. ही सर्व हरीचीच लीला; त्याप्रमाणें अर्जुन तीर्थें करीत करीत द्वारावतीस आला. इतक्यांत कोणी तापसी शहरांत आल्याची श्रीकृष्णास हेरांनीं वातमी दिली. श्रीकृष्ण ज्या देवळांत तपस्वी उतरला होता तेथें जाऊन त्यास भेटले; आणि ते एकमेकांस मनांत ओळखून आनंद पावले. श्रीकृष्णानें घरीं येऊन सर्वांस वृत्तांत सांगितल्यावरून बळिरामानें त्या संन्याशाची प्रार्थना करून त्यास आपल्या घरीं बोलावून आणलें. एकदां अर्जुन व कृष्ण एकत्र असतां व सुभद्रा महाशक्तीचे यात्रेस जातांना अकस्मात् पार्थाची दृष्टि तिजकडे जाऊन त्यानें हास्यवदन केलें; त्यावरून कृष्णानें थट्टेनें अर्जुनास विचारिलें, आपण तापसी असून असें भलतीकडे आपलें चित्त कां गुंततें? अर्जुनानें ह्मटलें कीं, दृष्टीचें काम दृष्टि करिते! नंतर कृष्णानें पार्थास सुचना

केली कीं, यात्रेहून परत येतांना माझ्या रथावर वसून हें दिव्य रत्न ( सुभद्रा ) हरण करावें.

रेवताचलावर सर्व पोंचल्यावर देवीचें पूजन झालें व तेथें सर्वांचीं भोजनें झालीं. समय पाहून श्रीकृष्णानें खूण करतांच अर्जुनानें सुभद्रेस आपल्या रथांत वसवून तो रथ इंद्रप्रस्थाकडे त्वरेनें चालविला. मागें हांकाहांक होऊन यादववीर पाठीमागें लढाईस आलेले पाहून अर्जुनानें रथ मागें फिरविला. त्या वेळीं ध्वजस्तंभीं हनुमंत आहे असें सर्वांनीं पाहिलें. यानंतर अर्जुनानें मोठी बाणवृष्टि चालविली व सैन्याची वाताहात केली. हें पाहून बळरामास क्रोध येऊन तो युद्धास सरसावला व श्रीकृष्णास फार लावून बोलला. परंतु त्यानें सांगितलें कीं, अर्जुनापेक्षां दुसरा चांगला वर कोणता? आतां याशीं युद्ध करतां, पण हा प्रळय करील. बळिभद्रानें हें ऐकून आपला कोपाग्नि शांत केला. इतक्यांत वसुदेव, देवकी यांनींही येऊन बळिभद्राचें समाधान केलें. त्यावरून त्यानें सर्वांसमक्ष सांगितलें कीं, सुभद्रा मी पार्थास दिली. आतां पाहिजे त्या रीतीनें यथाविधि लग्न करावें. यानंतर पार्थास मोठ्या सन्मानानें बोलावून आणून त्याचा सुभद्रेशीं मोठ्या समारंभानें विवाह लाविला. उग्रसेनानें भांडारें फोडून याचक सुखी केले; आणि अर्जुनास पुष्कळ आंदण देऊन एक वर्ष सुभद्रेसहवर्त्तमान पुष्करक्षेत्रीं श्रीकृष्णाज्ञेनें ठेविलें. आणि या मागें तीर्थयात्रेचीं बारा वर्षें तेथें पुरीं झाल्यावर तीं उभयतां धर्मास भेटून त्यास झालेलें सर्व वर्त्तमान सांगितलें. नंतर अर्जुन सुभद्रेस हातीं धरून द्रौपदीच्या महाळांत गेला, तेव्हां तिच्या अंतरीं जरी फार संतोष झाला

होता तरी बाह्यात्कारें रुसून विनोदानें बोलली कीं, आतां इकडे येण्याचा तुमचा कांहींच कार्यार्थ नाहीं! कारण, नूतन वस्त्र सांपडल्यावर जुन्यास कोण विचारितो!! नंतर द्रौपदीनें सुभद्रेस क्षेमालिंगन दिलें.

एके दिवशीं नारदऋषि सहज फिरत असतां एक मत्स्य व मत्स्यीण रतिसंग करतांना त्याच्या दृष्टीस पडलीं. त्या वेळीं त्यास असें वाटलें कीं, या संसारसुखांत व विषयोपभोगांत जी मजा आहे, ती विणा घेऊन भजन करण्यांत नाहीं; ह्मणून आपणही स्त्री करून संसार करावा. आपल्यास स्त्री पाहिजे तर ती आपल्या कृष्णाजवळ पुष्कळ आहेत त्यांतून एखादी मिळेल. अशा विचारानें नारद कृष्णाजवळ आला आणि त्यास हें आपलें मनांतलें कळवून ह्मटलें कीं, देवा, हजारों स्त्रिया तुला आहेत; त्यांतून या आपल्या नारदास एक द्या ह्मणजे त्याची संसारेच्छा तृप्त होईल. रुक्मिणी आदिकरून सर्वांनीं त्याचें तारतम्य फारच राखून पूजा केली; परंतु त्यास आतां वेड लागलें, असें त्यांनीं ठरविलें. कृष्णानें नारदास सांगितलें कीं, स्वामीमहाराज, आपलें मागणें मी मोठ्या प्रीतीनें कबूल करतों; परंतु असें करा कीं, ज्या घरीं मी नसेन ती स्त्री आपली. नारदानें विचार पाहिला कीं, हरि जरी लाघवी आहे तथापि इतक्या बायकांच्या घरीं तो कुठें जाणार आहे? कोणतें तरी घर हरीवांचून सांपडेल. अशा विचारानें हातांत विणा घेऊन फिरण्यास निघाला.

नंतर एका स्त्रियेचें घरीं गेला, तों तेथें कृष्ण लग्नाच्या खटपटींत आहे; कोठें दानें देत आहे; कोठें भोजन; कोठें मुलांचे व्रतबंध; कोठें गाणें; कोठें नाचणें; कोठें सोहळे;

कोठें जप, तप, व्रतें व अनुष्ठानें; कोठें सोंगट्या खेळत असून कोठें निजले आहेत. याप्रमाणें जेथें नारद गेला तेथें त्याचा सन्मान झाला. परंतु मनांतील इच्छा तृप्त होत नाहीं असें पाहून नारदास फारच दुःख झालें; आणि तो गंगेंत स्नानास गेला. तेथें स्नान करून पाण्याबाहेर निघत आहे तों नारदाची स्त्रीआकृति झाली. इतक्यांत तेथें एक देदिप्यमान पुरुष आला. त्यास पाहून नारदी मोहित झाली. पुढें रतिसंग होतांच ती गरोदर झाली. गृहस्थाश्रम केला व पोटीं साठ पुत्र झाले. तेव्हां पश्चात्ताप पावून हरिस्मरणानंतर सर्व नष्ट होऊन सर्व अरिष्ट शांततेस पावलें; आणि श्रीकृष्ण-दर्शनानें तो नारद पावन झाला.

---

# अध्याय ३३ वा.

## जरासंधवध, भीमगर्वहरण इत्यादि.

मागील अध्यायीं सुभद्राहरण इत्यादि कथा झाल्या. त्या पुढील वर्त्तमान असें झालें कीं, एके वेळीं नारदाची स्वारी सहज फिरत फिरत यमलोकास गेली; तेथें त्याचें आगतस्वागत यमानें फारच चांगलें केलें. त्या स्थळीं ऋषीस पंडूराजा भेटला. त्याणें त्यास सांगितलें कीं, महाराज, आपण इंद्रप्रस्थास जाऊन माझ्या पुत्रांस राजसूययज्ञ करण्याविषयीं माझी आज्ञा सांगाल, तर मजवर आपले फार उपकार होतील. कारण, येथें यमधर्म माझा पुष्कळ सन्मान करितो, परंतु दुसऱ्यांना येथें होत असलेली यमपीडा व कुंभपाकादि यातना पाहून जें मला दुःख होतें, तें

राजसूययज्ञाच्या योगानें जेव्हां इंद्र मला आपल्या शेजारीं जागा देईल तेव्हां टळेल. पंडुराजाचें असें भाषण ऐकून तसें करण्याचें कबूल केलें. नंतर नारदानें इंद्रप्रस्थास येऊन तें वर्तमान धर्मराजास कळविलें. त्यानें ऋषीचें आदरातिथ्य करून षोडशोपचारें पूजन केलें. नंतर पांचही बंधूंनीं एकत्र बसून विचार केला कीं, पित्याची आज्ञा वंदन करावी व त्यास सुख द्यावें हा पुत्रधर्म होय. कारण, मातापित्यांस परलोकीं सुख होण्याबद्दल पुत्रांनीं हीं शास्त्रोक्त कर्में करावीं व त्यांस मोक्षप्राप्ति करवावी; असें सर्वानुमतें ठरल्यानंतर राजसूययज्ञ करण्याचें ठरविलें. परंतु श्रीकृष्णभगवानाच्या इच्छेखेरीज कोणतेंच कर्म सिद्धीस पावणार नाहीं, ह्मणून पूर्वीं त्यास बोलवावें, अशा विचारानें श्रीकृष्णास एक पत्र लिहिलें. नंतर तें पत्र धर्ममुद्रांकित करून द्वारकेस दूतांकरवीं पाठविलें.

इकडे बावीस सहस्र राजे जरासंधाच्या बंदींत पडले होते. त्यांणींही कृष्णास आपल्या मुक्ततेविषयीं विनंतीपत्र पाठविलें होतें. व त्या अन्वयें कृष्णानें धर्माकडे जाऊन हा कार्यभाग साधण्याचें ठरविलेंच होतें.

यानंतर मोठें सैन्य सिद्ध करून चौघां बंधूंस समागमें देऊन धर्मानें त्यांस चार दिशेस रवाना केलें. पूर्वेस भीमास पाठविलें; त्याणें त्या दिशेकडील राजे जिंकून अपार द्रव्य आणिलें. उत्तरेस अर्जुन गेला; त्याणें तिकडील राजांकडून करभार आणिला. दक्षिणेस सहदेवास पाठविलें; त्याणेंही तिकडील करभार आणिला. पश्चिमेस नकुळ गेला; त्याणें सकळ राजे जिंकून, पुढें द्वारकेस जाऊन श्रीकृष्णास पत्र नगराबाहेरून पाठविलें. कृष्णानें तें पहा-

तांच शिरसावंद्य करून व बाहेर येऊन नकुळास भेटून अपार द्रव्य दिलें; व त्यास धर्माकडे रवाना केलें. आणि मीही लवकरच येतों ह्मणून निरोप पाठविला. नकुळ येऊन धर्मराजास तें वर्त्तमान सांगत आहे तों भगवानही येऊन दाखल झाले. इंद्रप्रस्थास कृष्ण आल्यावर त्याची पूजा करून त्यास धर्मराजानें सर्व वर्त्तमान कळवून सांगितलें कीं, एका जरासंधाशिवाय नव खंडांतील सर्व राजे जिंकून इतकें द्रव्य आणिलें आहे कीं, सहस्र वर्षें नित्यशः सहस्रावधि हत्ती भरून नेले तथापि तें संपणार नाहीं. परंतु कृष्ण बोलला कीं, जर जरासंधास जिंकून त्याच्या बंदींत असलेले राजे मुक्त केले नाहींत, तर मग सर्व जिंकून उपयोग काय? ह्यास्तव पाहिजे तसें करून त्यांची होईल तितक्या त्वरेनें सुटका केली पाहिजे. मग जरासंधावर स्वारी करण्याचा बेत ठरला. या प्रमाणें विचार झाल्यानंतर पार्थ व भीम यांस समागमें घेऊन श्रीकृष्ण मागधपुरास जावयास निघाला.

ज्या वेळीं त्रिवर्ग मागधपुराजवळ आले, त्या वेळीं सर्वांनीं ब्राह्मणवेष घेऊन ग्रामदुर्ग फोडून ते मधूनच शहरांत शिरले. पुढें मोठमोठे नगारे भेरी लागल्या होत्या, त्या भीमानें फोडून टाकिल्या व राजद्वारीं यज्ञशाळेंत जाऊन ते बसले. जरासंध त्या वेळीं काकबळी टाकण्यासाठीं बाहेर आला होता. त्यानें त्यांस पाहून नमन केलें. परंतु ते कोण व कोठून आले, किंवा काय पाहिजे, हें जेव्हां कांहींच बोलेनात, तेव्हां जरासंधानें प्रार्थना केली कीं, महाराज, तुह्मीं जर कांहींच बोललां नाहीं, तर म्यां तरी काय जाणावें? तर कृपा करून आपली इच्छा काय आहे तें सांगितल्यास मी तें शक्तिनुसार अनुकूल असेल तर पुरवीन. कृष्णानें

उत्तर दिलें कीं, आह्मां तिघांतून एका समागमें तूं युद्ध करावेंस; हीच युद्धभिक्षा तुजजवळ मागणें आहे. जरासंधानें प्रथम न्याहाळून पाहून, हे ब्राह्मण नव्हत असें जाणून त्यांस ह्मटलें कीं, मी तुह्मांस तुमचें इच्छित दिलें. आतां तुम्हीं कोण आहां तें मला सांगावें. असें बोलतांच तिघांनींही आपलीं रूपें प्रकट केलीं. तीं पाहून जरासंधानें मनांत ह्मटलें कीं, कृष्ण तर कपटी व गवळी, तो युद्ध करण्याच्या उपयोगी नाहीं; दुसरा अर्जुन, तो पातळांगी; मजबरोबर टिकणार नाहीं; राहिला तिसरा, तो मात्र मजबरोबर कांहीं वेळ लढेल असा वीर दिसतो. त्याशीं मी युद्ध करीन.

यानंतर भीम व जरासंध हे समरंगणांत येऊन प्रळयी मल्लयुद्धास मिसळले. अर्जुन व श्रीकृष्ण जवळ उभे राहिले. एकमेकांस नानाप्रकारें डाव करून ते पृथ्वीतलवार पाडीत व मूर्च्छित करीत; व वर्म पाहून एकमेकांस हाणीत. या युद्धांगणीं तर कोणाची उभें राहण्याची शक्तिच नव्हती. सर्व भुगोलावर थरथराट होऊन दणदणाट झाला. असें श्रीकृष्णानें पाहून हातांत एक गवताची काडी घेतली व चिरून भीमास संकेत दाखविला कीं, या जरासंधास पिंजून टाक. त्याप्रमाणें भीमानें दोन चार वेळां केलें; परंतु पुनः तो एकत्र होऊन भीमाशीं युद्धास येई. असें पाहून पुनः श्रीकृष्णानें एक काडी चिरून दोहों हातांत घेतली व उजवी डावीकडे आणि डावी उजवीकडे फेंकून अशाच रीतीनें जरासंधास द्विधा करून टाकण्यास दर्शविलें. त्याप्रमाणें भीमानें करतांच जरासंध गतप्राण झाला. नंतर सर्व बंदींतील राजे सोडवून, तेथील सर्व भांडारांतील द्रव्य इंद्रप्रस्थास पाठवून सहदेवनामें जरासंधाचे पुत्रास राज्यावर स्थापन केला; व

मागाहून आपण सर्व निघून आले. तदनंतर श्रीकृष्ण द्वारकेस गेला.

धर्मराजानें राजसूययज्ञ कोणत्या रीतीनें करावयाचा, तो निश्चय करून सर्व नृपतींस बोलावण्याकरितां पत्रें तयार केलीं. हस्तनापुरांतील द्रोणाचार्य, भीष्माचार्य, धृतराष्ट्र, कृपाचार्य, आदिकरून महान वीरश्रेष्ठ व प्रतापसूर्य, तसेच दुर्योधानादि सर्व बंधु ; त्याचप्रमाणें विदुर इत्यादि महाज्ञानी यांसही पत्रें तयार केलीं. प्रथमारंभीं द्वारकेस पाठवि-ण्यासाठीं श्रीकृष्णास पत्रिका लिहिली. ती पत्रिका घेऊन सेवक जात आहेत तों त्या पूर्वींच श्रीकृष्णपरमात्मा नगराजवळ येऊन पोंचला. हें धर्मास कळल्यानंतर बंधु-समवेत ससैन्य धर्मराजा कृष्णास सामोरा जाऊन, त्यास व त्या समागमें छपन्न कोटी यादव, तितक्याच बायका व मुलें, त्याचप्रमाणें कृष्णाचे साठ हजार मुलगे, कन्या व सुना इत्यादि जो समुदाय आला होता, त्या सर्वांस बहुमा-नानें आपल्या नगरींत आणून त्यांचा धर्मराजानें मोठाच सत्कार केला. पुढें धर्मराज आणि कृष्ण परस्पर भेटले. त्या वेळीं कृष्णानें ह्मटलें कीं, आज तूं दीक्षित ; आज आह्मीं तुझी अवश्य पूजा करावी. असें ह्मणून बंधुसहव-र्त्तमान धर्मराजाची यथासांग पूजा केली. आणि द्वारकें-तून जे चवदा हजार हत्ती, द्रव्य व अलंकारानें भरून आ-णिले होते, ते त्यास अर्पण केले. मग जरासंधाच्या बंदींतून मुक्त केलेले जे बावीस हजार राजे, त्यांणींही धर्मराजास करभार अर्पण केला. हा सर्व चमत्कार स्वर्गाहून देव विमानारूढ होऊन पहात होते. कुबेरानेंसुद्धां या समयीं बहुत धन धर्मास पाठविलें. इतकें झाल्यानंतर धर्मानें

अठ्यांयशीं सहस्र ऋषींची पूजा केली. लंकाधीश बिभीषण आणि हस्तनापुराहून कौरव हेही सर्व तेथें आले होते. या सर्व मंडळीस नाना रत्नजडित शिबिरें उभारून त्यांची मोठी बरदास्त ठेविली होती.

कृष्ण व भीष्म एकासनीं बसवून धर्मानें त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून विनंती केली कीं, या कार्यास सामुग्री मनासारखी आहे; परंतु कोणास कोणतें काम सोंपावें याविषयींचा विचार आह्मीं लेंकरें अज्ञ ह्मणून आपणच सांगावा. कृष्ण बोलला कीं, मी गुरेंराख्या; आमचा धर्म दुसऱ्याची सेवा करावयाचा; ह्याप्रमाणें पहातां ऋषींस इच्छिलेले पदार्थ पुरवून सर्वांचीं उष्टीं काढण्याचें काम मी पतकरितों. आणखी ऋषींची बरदास्त अश्वत्थाम्यानें ठेवावी; द्रव्य विदुरानें पुरवावें; राजांची पूजा संजयानें करावी; राजांच्या अपार सैन्यांच्या भोजनाची व इतर बरदास्त दुःशासनानें ठेवावी; दक्षिणा देण्याचें काम द्रोणाचार्यांनीं ढिल्याहातानें करावें; व सर्व राजे अलंकार, धन व रत्नें जीं आणतील, तीं घेऊन भांडारांत ठेवणें हें काम दुर्योधनानें करावें. अर्जुनानें या यज्ञास जीं विघ्नें येतील तीं दूर करावीं; ब्राह्मणांची भोजनसमयीं सावकाश जेवण्याची व न लाजतां लागेल तो पदार्थ मागून घेण्याविषयींची प्रार्थना भीमानें करावी; गंध, फुलें, अक्षता व धूपदीपादि परिमळ द्रव्यें नकुळानें पुरवावीं; तूप, दूध, दहीं इत्यादि सहदेवानें पुरवावें; पंक्तींत द्रौपदीनें वाढावें; सुगंध जल पांडवपुत्रांनीं पुरवावें; विडे धृष्टद्युम्नानें द्यावे; आणि धर्मराजानें ब्रह्मदेव, व्यास, वसिष्ठ, आणि याज्ञवल्क्य यांस मुख्य ऋत्विज नेमून सकल ऋषिसमुदायाच्या साह्यानें यज्ञकर्म करावें.

याप्रमाणें कृष्ण परमात्म्यानें सर्व कामांची यथायोग्य रीतीनें मिसळ लावून दिल्यावर धर्मराज ही आज्ञा शीरसावंद्य करून ऋषिमंडळीसहवर्त्तमान यज्ञशाळेंत हवन करण्यास बसला. एक संवत्सरपर्यंत हा यज्ञ चालला होता. तेणेंकरून अग्निनारायण तृप्त झाला. ह्या यज्ञांत एकही पदार्थ न्यून न पडतां सर्वांचे इच्छित हेतु पूर्ण होत होते. घृतधारांचा तर यज्ञकुंडांत पर्जन्यच पडत होता. सर्व देवांनीं पुष्पवृष्टि केली. लहान मोठ्या राजांस भोजनाकरितां रत्नांचीं ताटें त्या यज्ञसमारंभांत होतीं. ब्राह्मण जेवीत असतां भीमानें अति आग्रह करून अन्न वाढावें; आणि अन्न टाकल्यास माझा स्वभाव तुह्मांस ठाऊकच आहे असा दम द्यावा. अशा धाकानें बहुत अन्न ब्राह्मण नित्यश: भक्षण करीत असतांही कृश्य होत कां चालले, हें कृष्णानें जाणून एके दिवशीं भीमास बोलावून सांगितलें कीं, एक महान् तपस्वी गंधमाधन या नांवाचा गंधमाधन पर्वतावर रहात असतो; त्यास येथें आणण्याचें फार अगत्य आहे. त्यास आणण्याकरितां जर दुसऱ्या कोणाची योजना करावी, तर तें काम त्यास होणार नाहीं; ह्मणून तूंच जाऊन त्यास घेऊन ये. भीमाच्या मनांत असें आलें कीं, अशा बिकट स्थळीं जाण्यास काय तो मीच पराक्रमी ह्मणून तें काम श्रीकृष्णानें मजकडे सोंपलें; अशा अभिमानानें भीमसेन निघाला. तो जात असतां एका मोठ्या पर्वताच्या मध्यभागीं वाटेंतच मारुती एका वृद्धाचा वेष धरून आपलें शेंपूट आडवें टाकून भीमसेनाचा मार्ग रोधून बसला होता. इतक्यांत त्या वाटेनें येतांना भीमानें तें शेंपूट पाहून त्या वृद्ध कपीस ह्मटलें कीं, अरे

माकडा, मला महत्वाच्या कार्याकारितां गंधमाधन पर्वतीं जाणें आहे; तर तूं आपलें शेंपूट काढून मला मार्ग दे. मारुतीनें ह्मटलें कीं, बाबा, मी आतां वृद्ध झालों, यासाठीं माझ्यानें तें उचलवत नाहीं; तर कृपा करून तूंच एवढें कार्य करशील तर मजवर फार उपकार होतील. तूं भीमसेन मोठा बलसागर आहेस असें माझ्या ऐकण्यांत आहे !

भीमसेनास हें वचन मानून त्यानें तें पुच्छ उचलून एकीकडे ठेवण्याविषयीं नाना यत्न केले व शेवटीं नव सहस्र नागांचें बळही खर्च केलें; परंतु तें जड शेंपूट त्यास उचलेना. असें पाहून, मारुती गदगदां हंसून बोलला कीं, भीमसेना, तुला बळाचा गर्व झाला हें नीट नाहीं. तूं जगदात्मा जो श्रीकृष्ण त्यास निरहंकार शरण जा. तेव्हां भीम गर्वरहित होऊन हनुमंताची आज्ञा घेऊन, गंधमाधन पर्वतावर गेला. तेथें पाहतो तों तो ऋषि दुर्गंधीनें व्याप्त आणि कांती सुवर्णाची असा त्या पर्वतावर आहे. त्यास दूर उभें राहून भीमानें कृष्णाचा निरोप सांगितला. त्याणें सांगितलें कीं, भीमसेना, कृष्णाचा निरोप मला मान्य आहे व मीं यावें खरें; परंतु हें डुकरासारखें तोंड व असा दुर्गंधीनें व्याप्त मीं तेथें यावें हें मला वाईट दिसतें. भीमानें विचारिलें, महाराज, आपली ही अशी अवस्था होण्याचें कारण काय? तेव्हां त्या ऋषीनें ह्मटलें कीं, मी महान सधन असतां आपल्या हयातींत मोठीं दानें व धर्म केला; परंतु ब्राह्मणांस कठोर वचनानें फारच बोललों, त्या योगानें माझी ही दशा झाली. भीमसेना, या यज्ञसमारंभांत जर तुझ्या स्वाधीन ब्राह्मणांचा परामर्ष घेण्याचा कार-

भार असेल, तर ब्राह्मणसेवेंत किमपिही तूं न्यून न पडूं दे-
तां त्यांस कठोर भाषणांनीं ताडण करूं नको.

भीमसेनास मोठा पश्चात्ताप होऊन खालच्या मानेनें हें सर्व कृत्य जाणून कृष्णाजवळ आला. कृष्णानें त्यास कांहींच विचारिलें नाहीं; निरोप मात्र ऐकून घेतला. दुसरे दिवशीं ज्या वेळीं भीम ब्राह्मणांची प्रार्थना करूं लागला, त्या वेळीं त्याचा नम्रपणा पाहून ब्राह्मणांनींच त्यास ह्मटलें कीं, महाराज, आज आपली बुद्धि अशी प्रसन्न कां बरें झाली? असो.

त्या राजसूययज्ञांत धर्माचें ऐश्वर्य पाहून दुर्योधनास फारच वाईट वाटून हें कृष्णकृपेनें सर्व होतें अशी त्याची खात्री झाली. एके वेळीं हा संताप त्यास दुःसह होऊन त्यानें कृष्णास विचारिलें कीं, कृष्णा, तूं परब्रह्मरूपी देव आणि निःपक्षपाती, ह्मणवितोस; मग मी आणि धर्म या उभयतांमध्यें कपटभाव ठेवून एकाचेंच साह्य कां करितोस? कृष्णानें उत्तर केलें कीं, दुर्योधना, मी सर्वांस समान आहें. मात्र सर्वांची समान दृष्टि मजवर पाहिजे. याबद्दल प्रचिती पहाणें असल्यास तुला कळेल. परंतु पूर्वीं दोघेही मिळून माझा एक कार्यभाग करा; असें ह्मणून दोघांसही एक महा योग्य ब्राह्मण दान देण्यासाठीं निवडून काढण्यास सांगितलें. दोघेही सर्व ऋषि पाहून परत आले. दुर्योधनानें हात जोडून विनंती केली कीं, कृष्णा, दान देण्यासारखा एकही ब्राह्मण मला या मंडळींत दिसत नाहीं. सर्व मूढ दिसतात. मागाहून धर्मराजानें येऊन विनंती केली कीं, देवा, एकही ब्राह्मण मला वाईट न दिसतां सर्वच सुज्ञ दिसतात. हें धर्माचें भाषण कृष्णानें दुर्योधनास सांगितल्यावरून त्यानें खालीं मान घातली.

त्याच वेळीं अशी एक चमत्कारिक गोष्ट घडली कीं, जान्हवीतीरीं कोणी एक तपस्वी अरण्यांत गुंफा तयार करून स्त्रीसह तेथें राहून तप करीत होता. त्या पुण्यामुळें नित्य कैलासाहून त्यास विमान येई व तो तेथें स्त्रीसह जाऊन परत गुंफेंत येई. एके दिवशीं कैलासाहून विमान येण्याची वेळ झाली असतां, एक सुंदर वन पाहून माध्यान्हसमयीं स्त्रीस भोग देण्याची त्यास इच्छा झाली. स्त्रियेनें कितीही प्रतिबंध केला, तथापि तिचें कांहीं न ऐकतां त्या वनांत येऊन त्यानें आपली मनकामना पूर्ण करून घेतली. इतक्यांत एका सर्पानें दंश करून त्या ऋषीचा प्राण घेतला. त्या दुःखानें ती रडत असतां अकस्मात् तेथें नारदऋषि आले. त्या जवळ तें दुःख सांगतांच तो तें प्रेत व ती स्त्री समागमें घेऊन इंद्रप्रस्थास आला व तिजकडून तें प्रेत धर्मराजाच्या मंडपांत टाकविलें आणि आपण निघून गेला. त्या ब्राह्मणस्त्रीनें तें प्रेत टाकून दुःखानें हांक मारली कीं, मोठमोठे समर्थ ऋषि या स्थानीं आहेत; तर सर्वांनीं कृपा करून माझ्या पतीचें प्रेत उठविलें पाहिजे. त्या समयीं सर्व चिंताग्रस्त झाले. शेवटीं धर्मराजानें दीन वदन करून कृष्णास विनंती केली कीं, या यज्ञाचा कर्त्ता हा अधिकार मजकडे बिलकूल नाहीं. हा सर्व विचार आपल्यास आहे; ह्मणून आपण पाहिजे तसें करून हें प्रेत सजीव करावें. कौरवादि सर्व दुर्जन त्या स्थळीं बसले होते. त्यांस यज्ञांत विघ्न झालेलें पाहून परमानंद होऊन ते आपापसांत ह्मणूं लागले कीं, मेलेल्या मनुष्यास प्राण आणणें हें कोणाच्या हातीं नाहीं; ह्मणून या कार्यांत हें मोठेंच विघ्न आलें आहे, असें ह्मणण्यास चिंता नाहीं.

याचें निवारण आतां कसें होतें तें पाहूं या! असें ह्मणून एकमेकांच्या हातावर हात देऊन टाळ्या मारीत आहेत, तों श्रीकृष्ण आपल्या हातांत पाण्याची झारी घेऊन त्या प्रेताजवळ आले; आणि हातांत उदक घेऊन ह्मणाले कीं, जर मी जन्मापासून बाळब्रह्मचारी असेन तर हें प्रेत आतां उठेल. 'बाळब्रह्मचारी' असें ह्मणतांच सर्व कौरव बोलूं लागले कीं, गोकुळांतील गवळ्यांच्या बायका याणें सोडल्या नाहींत! त्याशिवाय याला सोळा हजार स्त्रिया आहेतच!! तेव्हां हा कोणत्या रीतीचा ब्रह्मचारी? याच्या पुण्याचें पाणी प्रेताच्या तोंडांत जाऊन त्या प्रेतानें उठावें तरी कसें? असें एकमेकांजवळ ते कुजबुजत आहेत, तों अकस्मात् तें प्रेत खडबडून उठलें. तें पहातांच देव, ऋषि, आणि सर्व राजे व इतर जन या सर्वांस अत्यानंद होऊन त्यांणीं एकच जयजयकार केला.

यानंतर धर्मानें श्रीकृष्णाच्या आज्ञेवरून त्या विप्रास पुष्कळ धन देऊन स्त्रीसह विमानांत बसवून स्वस्थानीं पाठविलें. इतक्यांत त्या यज्ञकुंडांतून एक कोल्हा बाहेर पडून कुंडवेदिकेवर बसून मनुष्यवाणीनें असें बोलला कीं, 'या सभेंत एकाचा शिरच्छेद होईल; व पुढें चौदाव्या वर्षाच्या आरंभीं कौरवपांडवांत इतका विरोध माजेल कीं, येथें जितके राजे जमले आहेत त्या सर्वांचा नाश होईल.' इतकें बोलून तो अदृश्य झाला.

# अध्याय ३४ वा.

## द्रौपदीलज्जारक्षण व शुकमुनिभेट.

मागील अध्यायांत जंबुकानें भाकीत केल्याचा कथाभाग झाला. पुढें कथा अशी झाली कीं, या यज्ञांत नित्य ऋषि, ब्राह्मण, राजे आदिकरून सर्वांस मिष्टान्न मिळे; तें अन्न इतकें रुचकर असे कीं, त्यांचा स्वाद इंद्रादि देवांस दुर्लभ. अशा मोठ्या पंक्तींत द्रौपदी एकटी वाढणारी होती; व ती सर्वांस अन्न पुरवीत असे. तो चमत्कार धर्मराज व श्रीकृष्ण हे उभयतां पहात असत. द्रौपदी ज्या वेळेस पंक्तींत भोजन वाढून श्रमित होई, त्या वेळीं कृष्णाचें रूप मात्र तिनें पहावें ह्मणजे तिचा सर्व श्रम परिहार होई.

एके वेळीं ती कौरवपंक्तींत वाढीत असतां, अकस्मात तिच्या चोळीचें बिरडें सुटलें. त्या वेळीं सर्व कौरव आपसांत हंसून तिची थट्टा करूं लागले; आणि ह्मणूं लागले कीं, आतां ही फजिती कोणत्या रीतीनें सांवरेल ती पाहूं. इतक्यांत कित्येक थट्टेनें ह्मणाले, वहिनी, आह्मांस जिलबी वाढा. कित्येक ह्मणाले, लाडू आणा. अशीं नाना प्रकारचीं थट्टासूचक भाषणें ऐकून द्रौपदीच्या अंगावर तर दुःखाचे शहारे उभे राहिले. अशा संकटसमयांत तिणें श्रीकृष्णमुख पाहिलें आणि ह्मटलें कीं, भगवंता, या समयीं जर तुझी सत्ता अमलांत न येतां अपेशाची यत्ता झाली, मग काय इलाज? असें ह्मणतांच श्रीकृष्णाच्या कृपेनें असा चमत्कार झाला कीं, अकस्मात् द्रौपदीला चार हात झाले. त्या दोहों हातांनीं चोळीचें बिरडें घालून दोहों हातांनीं ती वाढूं लागली.

ज्याप्रमाणें शुंभ, निशुंभ दैत्यांस मारून भवानी विजयी झाली, त्याप्रमाणें द्रौपदीला आनंद होऊन इच्छिलेला पदार्थ तिणें सर्वांस आग्रहानें वाढिला. भीमास तर त्या वेळीं असा क्रोध आला होता कीं, तो उघडपणें कौरवांस बोलला, अरे, जर तुह्मी एक पदार्थ पानावर टाकला तर तुमच्या शेंड्याच उपटून टाकीन. तेव्हां कौरव भयानें खालीं पाहूं लागले. भीमानें कौरवांस असेंही सांगितलें कीं, ही भवानी तुमचा कुलक्षय करणार आहे. द्रौपदी घरांत आल्यावर तिणें कृष्णचरणीं मिठी घातली व धर्मानें श्रीकृष्णाची फार स्तुति केली. याप्रमाणें एक संवत्सरपर्यंत नित्य किती पात्रें होत होतीं याची गणती करवत नाहीं. नित्य रात्रौ सर्वांचीं जेवणें झाल्यावर श्रीकृष्ण, कुंती, पांच पांडव व द्रौपदी अशीं आठ जणें जेवीत. नित्य ब्राह्मणांचीं उष्टीं कृष्ण काढीत असे. एके पंक्तीस लक्ष ब्राह्मण, अशा अमित पंक्ती नित्य होत. कोट संख्या झाली ह्मणजे एक घंटेचा नाद स्वर्गीं होई. हा चमत्कार पहाण्यासाठीं शुक ऋषि तेथें आला. त्यानें मनांत असें आणिलें कीं, धर्माच्या यज्ञांतील उच्छिष्ट अन्न आपण एक वेळां तरी सेवन करावें. परंतु मंडपांत येण्यास कोठूनच रिघाव होईना. तेव्हां, शुकाचें रूप धरून तो एका उष्ट्या पत्रावळीवर बसला; व अन्न भक्षण करूं लागला. त्या वेळीं स्वर्गी घंटेचा एकसारखा नाद होऊं लागला. तो ऐकून धर्मानें कृष्णास असें होण्याचें कारण विचारितां त्यानें सांगितलें कीं, धर्मराजा, कोणी तरी महान् ब्रह्मवेत्ता येथें येऊन जेवला; त्यामुळें असें होत आहे. शंभर सामान्य ब्राह्मणांपेक्षां एक वेदवेत्ता श्रेष्ठ; शंभर वेदवेत्यांपेक्षां

एक वेदार्थवेत्ता ; त्याहून अनुष्ठानी श्रेष्ठ; त्याहून इंद्रियजित; त्यापेक्षां सत्यार्थी विष्णुभक्त श्रेष्ठ; व त्यापेक्षां शतपटीनें ब्रह्मवेत्ता श्रेष्ठ होय. असे ब्रह्मवेत्ते या पृथ्वीवर चार आहेत. कपिल, याज्ञवल्क्य, शुक व चौथा दत्तात्रय. धर्मानें मोठा आग्रह धरिला कीं, असा जो ब्रह्मवेत्ता या मंडपामध्यें येऊन जेवला तो मला दाखवावा. कृष्णानें धर्मास बाहेर आणून दाखविलें, तों शुकाच्या रूपानें व्याससुत उच्छिष्ट भक्षण करीत आहे; तें दाखवितांच धर्मानें लागलेच त्याचे चरण धरिले. मग शुकानें कृष्णास पाहून रूप पालटून धर्मास आलिंगन दिलें. कृष्णानें त्यास हातांत धरून व्यासाजवळ यज्ञमंडपांत बसवून षोडशोपचारें त्याचें धर्माकडून पूजन करविलें. हा समारंभ एक संवत्सर होऊन यागाची समाप्ति झाली. नंतर मयासुरानें जी अवर्णनीय सभा केली होती, ती धर्मानें सर्वांस दाखविली.

पुढें धर्मराजानें ऋषि, राजे इत्यादिकांस मयसभेंत योग्य स्थानीं बसविलें. नंतर धर्मानें, या सर्वांत अग्रपुजेचा अधिकारी कोण आहे, असें विचारल्यावरून भीष्म ह्मणाला, धर्मा, कृष्णावांचून सर्व ब्रह्मांडांत कोणीही श्रेष्ठ नाहीं. हा ब्रह्मदेवाचा पिता; याचेंच शंकर निरंतर ध्यान करतात; व याच्याच कृपेनें इंद्राला इंद्रपद मिळालें. हा ब्रह्मांडाचा कर्त्ता व शास्ता होय. यानेंच भक्तांसाठीं सगुण अवतार धारण केले. सकल वेद, शास्त्रें, पुराणें याचेंच स्तवन करतात. यालाच शैव 'शिव,' वैष्णव 'विष्णु' सूर्योपासक 'सूर्य,' गाणपत्य 'गणपति,' आणि शाक्त 'शक्ति,' असें ह्मणतात. हा जगद्भुषण कृष्ण संतांचें हृदयजीवन, पण तुह्मांस सोयरा आहेसा वाटतो. याच्यावां-

चून अग्रपुजेस योग्य असा दुसरा कोणीच नाहीं. या प्रमाणें भीष्माचें भाषण ऐकून धर्मराजानें श्रीकृष्णाची स्तुति केली; व त्यास रत्नखचित चौरंगावर बसवून मोठ्या समारंभानें अग्रपूजेचा मान दिला. त्या वेळीं एकच जयजयकारच झाला. मंगलवाद्यें वाजूं लागलीं; भीष्म, विदुरादि भक्तजनांस आनंद झाला; बंदीजन कृष्णचरित्र वर्णन करूं लागले; व देवांनीं पुष्पवृष्टि केली.

---

# अध्याय ३५ वा.

## शिशुपाळ व वक्रदंत वध.

पुढें कथा अशी झाली कीं, श्रीकृष्णास अग्रपूजा समर्पण केल्याचा विधि पाहून दुर्जन कौरवांस तर राग आला; परंतु शिशुपाळास फारच संताप येऊन तो मध्येंच उठला व बोलला कीं, मूर्खा धर्मराजा, तुला कांहींच ज्ञान नाहीं. त्वां भलत्यास भलतेंच दान द्यावें तद्वत केलेंस. हा चोर, जार, लबाड, तसाच कपटी, विश्वासघातकी, अहंकारी व अविचारी असें असूनही जातीचा गवळी; असें असतां तूं मोठमोठे शिष्ट सोडून, या चोरास पूजादान प्रथम केलेंस. हें कर्म अगदींच अयोग्य केलेंस. आतां तुह्मां पांडवांचीं शिरें मी छेदितों. त्या समयीं कौरवांतीलच कित्येक सूज्ञ पुढें येऊन बोलले कीं, कोणाची पूजा कोणीं केली ह्याचा राग आह्मांस आला नाहीं; मग तुलाच कां यावा? यावर शिशुपाळानें फारच कोपयुक्त होऊन निरर्थक सर्वांची निर्भर्त्सना केली; व द्रोण, भीष्म, कर्ण इत्यादिकांसही ह्मणाला कीं, तुह्मीं सभेंत असतां या मूर्खांनीं हा अनर्थ केला,

ही तुह्मांस लाज कशी वाटत नाहीं? भीष्म बोलला कीं, अरे राजा, तूं व्यर्थ वल्गना कां करितोस? स्वस्थ रहा. या कृष्णाची बरोबरी करणारा या ब्रह्मांडांत दुसरा कोणी नाहीं. अग्रपुजेस सत्पात्र तरी कोण, हें येथें सर्व ऋषि, राजे इत्यादि तुजपुढें जे बसले आहेत त्यांस तरी विचार. शिशुपाळ बोलला कीं, वृद्धा षंढा, अरे हे सगळे षंढच आहेत; ह्मणून यांस अग्रपूजा घेण्याचा अभिमान नाहीं. हें अभिमानाचें काम आहे. भीष्म बोलला कीं, तूं मूर्खासारखा बोलतोस; कारण, तुझा अंतःकाळ जवळ आला आहे. शिशुपाळानें गर्जून सांगितलें कीं, अरे कौरवांनों, सर्व उठा आणि या ह्मातान्यास जिवंत तळून काढा. तेव्हां भीष्मानें उत्तर केलें कीं, असें जर केलेंस तरच तूं खरा वीर; नाहींपेक्षां तूं नरकांत महायातना पितरांसह भोगशील.

नंतर भीष्मानें शिशुपाळाचें जन्मकथन सांगितलें तें असें कीं, वसुदेवाची बहीण व दमघोषाची स्त्री सात्वती हिच्या उदरीं हा जन्मला त्या वेळीं यास चार हात व तीन डोळे ह्मणजे कपाळावर तिसरा डोळा होता. त्या वेळीं मातेस फारच वाईट वाटूं लागलें. सर्व लोक हें दुश्चिन्ह अवतरलें असें ह्मणत. तें ऐकून त्याची आई, याला बाहेर नेऊन टाका, असें सांगूं लागली असतां आकाशवाणी झाली कीं, 'या बालकाला टाकूं नको. हा पुढें महाभुपति होईल.' असें ऐकतांच ती आकाशाकडे पाहून ह्मणाली, 'या बालकाचा मृत्यु कोणाच्या हातीं आहे हें कृपा करून सांगावें.' तेव्हां पुन्हा आकाशवाणी झाली कीं 'हें पोर तूं सर्वांस दाखवित जा, आणि ज्याच्या दृष्टीनें याच्या दोन भुजा व एक डोळा गळेल, त्याच्याच हातानें यास मृत्यु. दुसऱ्यां-

करून याला अगदीं भय नाहीं.' यानंतर ती तो मुलगा सर्वांस दाखवीत असतां, ज्या वेळीं श्रीकृष्णदर्शन झालें, त्या वेळीं त्याचे दोन हात व एक डोळा गळाला. त्याच वेळीं मातोश्रीनें कृष्णास नमन करून विनंती केली कीं, तूं याचें रक्षण कर. हें तुमचें लेंकरूं आहे. कृष्णानें तें कबूल केलें; पण अशी अट केली कीं, शंभर शिव्या मला हा देईल तोंपर्यंत, यास याच्या अन्यायांची मी क्षमा करीन; नंतर मारीन. ही कथा भीष्मानें सर्वांस सांगून ह्मटलें कीं, हाच दुराचारी मागील अवतारीं रावण होऊन जनकसभेंत सीता हरण करावयास आला होता. आतां याचा मरणकाळ भरत आला आहे.

हें ऐकून शिशुपाळास राग येऊन तो भलतेंसलतें बरळूं लागला. सहदेव बोलला कीं, आह्मीं श्रीकृष्णास अग्रपूजा दिली. व येथें जो कोणी आड येईल त्याचा संहार केला जाईल. हें ऐकतांच शिशुपाळास अधिकच राग येऊन कृष्णास बोलला कीं, अरे चोरा, रुक्मिणी ही अगोदर मला देऊं केली होती; व तिला मीं मनांतच भोगिली; आणि तूं आतां माझें उच्छिष्ट भोगतोस. याचप्रमाणें तुझ्या अनेक उखाळ्या पाखाळ्या आहेत, त्या मी काढीत नाहीं; परंतु जर तूं मूर्खा आतां गडबड करशील, तर येथें तुझा वध करीन. मी धर्मास करभार उगीच भिक्षेदाखल दिला. हें ऐकतांच कृष्णास कोप आला व शंभर शिव्या होतांच सुदर्शनानें त्याचा शिरच्छेद केला. नंतर श्रीकृष्ण सहपरिवार द्वारकेस गेले. असा प्रकार झाल्यानंतर येथून वक्रदंत जो पळाला, त्याणें शिवविमानारूढ होऊन, पौंड्रकासह अफाट सैन्यानिशीं चाल करून द्वारकापट्टण घेरलें.

इतक्यांत श्रीकृष्णही तेथें आला. त्यानें लागलाच सुदर्शनानें वक्रदंताचा त्या ठिकाणीं वध केला; व पौंड्रकाचाही सैन्यासह नाश केला. इतकें झाल्यानंतर कृष्णानें ह्मटलें कीं, आपलें बहुतेक अवतारकृत्य समाप्त झालें. आतां पुढें पार्थाच्या रथीं सारथ्य करून सर्व दुष्टांचा संहार करावयाचा भाग शिल्लक राहिला आहे. सवडीनुसार तोही उरकून घेतां येईल.

---

# अध्याय ३६ वा.

## ग्रहणयात्रा, गोकुळजनभेट व ग्रंथसमाप्ति.

मागील अध्यायांत शिशुपाळ व वक्रदंत वध झाल्याची कथा झाली. त्या पुढें असा कथाभाग आहे कीं, श्रीकृष्णानें आपलें अवतारकृत्य संपविल्यावर गोकुळवासी जनांवर कृपा करून असें मनांत आणिलें कीं, गोकुळांतील सर्व गोपी आपल्या विरहांत असतील; व गोपांस फारच वाईट वाटलें असेल; कां कीं, गोकुळाहून मी एथें येऊन बरेच दिवस झाले असून येथील वर्त्तमान तेथें अगदींच कळविलें नाहीं. मी मथुरेस येते वेळीं गोपींनीं फारच अनर्थ केला होता. ह्या सर्व गोष्टी मनांत आणून गोकुळवासी जनांस मथुरेंतील सर्व वर्त्तमान कळविण्यासाठीं श्रीकृष्णानें बळिरामास पाठविलें. त्यानें तेथें जाऊन सर्वांचें समाधान केलें. अंग, केशी, प्रलंब इत्यादि दैत्य कसे मारिले, तें वृत्त त्यांना सांगितलें. नंतर अष्टनायका कृष्णानें कशा मिळविल्या त्या लग्नाचें वृत्त आणि राजसूययज्ञाचा थाट सांगितला, व मयसभेचें वर्णन केलें. शिशुपाळवध

झाल्याचें वृत्त तसेंच वक्रदंताचें शीर उडविण्याचाही मजकूर निवेदन केला. हें वर्त्तमान ऐकतांच गोपींस व गोपांस इतका संतोष झाला कीं, त्या सर्वांची वृत्तीच कृष्णस्वरूपीं तल्लीन झाली. व श्रीकृष्ण केव्हां भेटेल याविषयीं त्या सर्वांस एकसारखा ध्यास लागला.

कित्येक गवळी समागमें घेऊन कुंजवनास बळराम कृष्णाच्या क्रीडास्थानीं गेले; व तेथील बहुत स्थानें पाहिलीं. त्या वेळीं माध्यान्हीं सूर्य आला असून, यमुनेंत कांहीं वेळ जलक्रीडा करण्याचें बळरामाच्या मनांत आल्यावरून, यमुना दूर वहात होती तिला जवळ येण्याची विनंती केली. परंतु ती यमुना आली नाहीं असें पाहून, बळरामास राग येऊन, त्याणें आपल्या नांगरमुसळांनीं तिला बळजोरीनें आपल्याजवळ ओढिली; व प्रवाह जवळ आणून यथेच्छ जलक्रीडा केली व सर्व परत गोकुळास आले. नंतर बळरामानें चार महिने तेथें राहिल्यावर, पुढें द्वारकेस जाऊन श्रीकृष्णास गोकुळांतील सर्व वर्त्तमान निवेदन केलें.

पुढें सूर्यग्रहणपर्व आलें. त्या समयीं ग्रहणयात्रेस कुरुक्षेत्रीं जाण्याचा कृष्णानें निश्चय केला. आणि छपन्न कोटि यादवांनिशीं वसुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध, अक्रूर, उद्धव, सांब, भानुवंत, उग्रसेन यांस बरोबर घेतले. देवकी, रोहिणी, रेवती; व रुक्मिणी, सत्यभामा, कालिंदी इत्यादि अष्टनायका व सोळा सहस्त्र बायका याही समागमें निघण्यास तयार झाल्या. कोट्यावधि वाहनें, त्यांत हत्ती, घोडे, उंट, रथ तयार केले; व स्वारीचा थाट तयार झाला. पुढें पायदळ, मागें घोडेस्वार, त्यामागें हत्तीघोडे, त्या मागें पालख्या, त्या मागें रथ वगैरे वाहनें; अशा

थाटानें बहुत नृपांसहवर्त्तमान निघाले. ज्याप्रमाणें ओळीनें पर्वत असतात, त्याप्रमाणें ती अफाट सेना चालली. ही सर्व मंडळी कुरुक्षेत्रीं पोंचत आहे तों तेथें शिबिरें सर्वांस निरनिराळीं केलींच होतीं. त्या ठिकाणीं सर्व उतरले व गंगातीर पाहून तिकडे कृष्णासमागमें जे राजे आले होते त्यांणींही आपापली छावणी दिली.

त्या ठिकाणीं पांडव, भीष्माचार्य, कृपाचार्य, द्रोणाचार्य, विदुर, कर्ण इत्यादि श्रीहरीच्या दर्शनार्थ येऊन मोठ्या प्रीतीनें त्यास भेटले. इंद्रादि देवही तेथें आले होते. कृष्णानें पूर्वींच दूत गोकुळास पाठविले होते. त्याप्रमाणें नंदयशोदा, गोपगोपी व कृष्णाचे प्राणप्रिय सखे गवळी यांनीं तर बरोबर टाळ, मृदंग, विणे इत्यादि सरंजामानिशीं हरिलीला गात गात श्रीकृष्णदर्शनास येऊन लोटांगणें घातलीं. ज्या वेळीं गोकुळची सर्व मंडळी आल्याचें वर्त्तमान कृष्णास कळलें, त्या वेळीं कृष्णानें रुक्मिणी इत्यादिकांस कळविलें कीं, माझीं दोन्हीं मातापितरें आणि गोकुळांतील मित्रमंडळी आली आहे, त्यांच्या भेटीस मला गेलें पाहिजे. त्या सर्वांस कोणत्या रीतीनें श्रीकृष्ण भेटतात, हा चमत्कार पाहण्याकरितां सर्व कृष्णस्त्रियाही निघाल्या. इतक्यांत प्रथम नंद, यशोदा वगैरे मंडळी पुढें आली; त्यांस कृष्ण पुढें जाऊन भेटला. नंतर तसाच चालत पुढें गोपाळांस भेटण्यास गेला, त्या वेळीं सर्वांनीं कृष्णचरणीं मस्तक ठेवून त्याच्या गळ्यास प्रेमानें मिठ्या मारल्या; व ते बोलूं लागले कीं, कृष्णा, तूं मोठा चोर व नाटकी आहेस! तूं आमचीं सर्वांचीं मनें चोरून येथें आणलींस. तुझी गरिबी जाऊन आतां तुला श्रीमंती

आल्यामुळें तूं आमची ओळख देखील सोडलीस काय? अरे, आमच्यासमागमें तूं गाई राखीत होतास, त्या वेळीं तूं आ-ह्मांबरोबर जेवीत होतास व आमच्या शिदोऱ्या आह्मांस ठक-वून खात होतास; आणि आतां तूं मोठा झालास काय? 'हमामा, हुंबरी, हुतुतू', आह्मांसंगें तूं खेळलास. व प्रसंगीं तुझ्या पाठीवर आह्मीं बुक्या देखील मारीत होतों. अरे, घरोघरचें गोरस चोरून आह्मांबरोबर तूं खात होतास. एकही घर असें राहिलें नाहीं कीं, ज्या घरीं तूं गेला नाहींस. अरे, तूं आतां मोठा, पण आमच्या यशोदेचा तूं कारटा! तुला लोक काय पाहिजे तें ह्मणोत, परंतु आह्मीं तुला कान्हा ह्मणत असूं. अरे, तुला उखळास बांधलें होतें ती, व तुला आह्मीं मारीत होतों ती आठवण आतां आहे काय? अरे, तूं व आह्मीं शिदोऱ्यांचा काला करून एकत्र खात असूं; आणि आतां तूं फारच सकुमार झाला आहेस. त्या वेळीं तुझ्या अंगास शेण माखत होतें; व आतां कस्तुरी, अत्तर, अर्गजा इत्यादि सुवासिक द्रव्यें लागतात. त्या वेळीं तुझ्या अंगावर घोंगडी; पण आतां भरजरी पिंवळा पितांबर. त्या वेळीं मस्तकावर नुसतीं मोरपिसें असत; या वेळीं तर रत्नजडित मुकुट घालतोस, ह्मणून कायरे आमची तुला आठवण नसावी? निलाजऱ्या, त्या वेळीं तुझ्या गळ्यांत गुंजफुलें अथवा तुळशीचे हार; आणि आतां दिव्य मुक्तमाला व मोठमोठे रत्नजडित अलंकार आहेत! तूं एकदां यमुनेंत बुडाला होतास; परंतु काळियानें तुला आमच्या हांकामुळें सोडिलें! तसेंच गोवर्धनपर्वतीं सर्वांवर संकट पडलें होतें, त्या वेळीं आह्मीं तो गोवर्धन उचलला; आणि तूं लटकें ढोंग करून एक

गोठ लावलेंस ही आठवण तुला आहे काय ? या प्रकारच्या आपल्या सवंगड्यांच्या गोष्टी कृष्णानें ऐकून सर्वांस ह्मटलें कीं, गड्यांनों, मला सर्व आठवण आहे. मी विसरेन अशी गोष्ट मनांतही आणूं नका. माझ्या सर्व भक्तांपेक्षां तुह्मीं मला अधिक प्रिय आहां. मी तुमच्या भक्तिकरितां गोकुळांत येऊन खेळ केले. गरिबी श्रीमंती यांत कांहीं भेद न धरितां मी तुमचा दास आहें असें समजा. हें ऐकून सर्व राजे, कौरव, पांडव, अष्टनायकादि सर्व स्त्रिया व देवकी इत्यादि स्तब्ध झालीं. ज्या वेळीं यशोदेस कृष्णानें प्रेमालिंगन दिलें, त्या वेळीं तिच्या नेत्रांतून अश्रुधारा येऊन स्तनांस पान्हा फुटला. हें पाहून तर सर्व बायकांचीं मनें विरालीं व पुरुषांचीं हळहळलीं. इतक्यांत गोकुळांतील गोपी व इतर बायका कृष्णदर्शनास पुढे आल्या. त्यांचीं रूपें रंभा, देवांगनांसारखीं होतीं. त्यांनीं सप्रेमानें कृष्णचरणीं मस्तक ठेविलें व त्या हात जोडून पुढें उभ्या राहिल्या. आणि विनंति केली कीं, आह्मांस दिव्यसुखाचा अनुभव दाखवून, देवाधिदेवा, त्वां प्रथम गोकुळांत येऊन, नंतर पुढें द्वारका वसविली. परंतु, येथें आपण आह्मांस मुळींच भेट दिली नव्हती. आह्मांवर आपण जी प्रीति केली तो ठसा आमच्या अंतःकरणांत कसा उमटला होता, याविषयींची खात्री ज्या वेळेस आपण मथुरेस आलां त्या वेळेस झालीच असेल. तो प्रकार सामान्य रीतीचा मानावा तर आमचें समाधान करण्याकरितां उद्धवास आपण गोकुळास पाठविलें; व त्यासमागमें जे जे आपण निरोप पाठविलेत त्यावरून आमची भक्ति आपणावर परिपूर्ण आहे असें दिसून आलें. आणि आपली कृपा आह्मांवर

किती आहे याचा तर खुलासा, कृष्णदेवा, उघडच झाला आहे; परंतु, आतां तुह्माला ऐश्वर्य प्राप्त झाल्यानें व आह्मांपेक्षां सुंदर बायका मिळाल्यानें तुमची आह्मांवरून प्रीति उडाली! असे नानाप्रकारचे त्यांणीं विनोदपर संवाद केले. कृष्णानें उत्तर केलें कीं, गोपींनों, तुह्मांवरून दुसरें तर काय सांगावें, परंतु प्राणही ओंवाळून टाकावा, अशी माझी तुह्मांवर भक्ति आहे; मग तुह्मांस अशी हळहळ कां असावी? तुह्मीं कोण; मी कोण; गोप कोण; नंद, यशोदा, देवकी हीं कोण? याचा पूर्णपणें विचार करा.

कृष्णाचा व गोपींचा हा संवाद होत होता, त्या वेळीं बायकांशिवाय दुसरी मंडळी दूर होती. त्या वेळीं सर्व कृष्णाच्या अष्टनायकादि स्त्रियांनीं आपल्या मनांत ह्मटलें कीं, या गोकुळींच्या स्त्रिया धन्य होत. यानंतर यशोदा कृष्णाजवळ येऊन बोलली कीं, अरे कृष्णा, मजवरील माया टाकून तूं अजूनपर्यंत द्वारकेंत कसा राहिलास? तुझी बाळलीला आठवून आमचे पंचप्राण तुझ्याठायीं गुंतून राहिले आहेत. माझ्या ह्या कठोर हातांनीं मीं तुला बहुत वेळां मारिलें व एकदां उखळीशींही बांधिलें; त्यामुळें तूं मला सोडून येथें यावेंस व मजवरील ममता अगदीं सोडावीस हें तुला योग्य नाहीं. कृष्ण ह्मणाला कीं, जननी, ही गोष्ट तूं काय सांगतेस? मी आपली बाळलीला दाखविण्याकरितांच तुझ्या उदरीं आलों; मग त्या शासनासाठीं मला कां बरें राग येईल? असें ह्मणून कृष्णानें यशोदेस हातीं धरून वसुदेव देवकीजवळ आणिलें. यशोदेनें त्यांस प्रेमालिंगन दिलें व त्यांनींही तिची भेट प्रेमानें घेतली. इतक्यांत कृष्णनायका आणि सोळा सहस्र स्त्रिया यांनीं

येऊन यशोदेच्या चरणांवर मस्तकें ठेविलीं. रुक्मिणीनें यशोदेस नमन केलें व तीं परस्परांस भेटलीं. ज्याप्रमाणें कौसल्येनें सीतेस आलिंगन दिलें, त्याचप्रमाणें येथें रुक्मिणीवर यशोदेनें आपली प्रीति दाखविली व सर्वांस आशीर्वाद दिला.

यानंतर ग्रहणपर्वसमयीं सर्वांनीं स्नानें करून कृष्ण, बळिभद्र, रुक्मीण, वसुदेव, देवकी, उग्रसेन आदिकरून सर्वांनीं मोठमोठीं दानें केलीं. कृष्णानें द्रव्यभांडार फोडून याचक जन सुखी केले. व गोकुळच्या सर्व लोकांस जडावाचे अलंकार व भरजरी वस्त्रें देऊन त्यांची चांगली संभावना केली. या समयीं रुक्मीण आदिकरून अष्टनायकांनीं कृष्णास विनंती केली कीं, गोकुळींच्या ज्या गोपी आल्या आहेत, त्यांस चांगल्या रीतीनें मान देऊन त्यांचा उत्तम गौरव करावा. हें ऐकून श्रीकृष्णानें स्वहस्तानें सर्व गोपींस पुन्हा वस्त्रालंकार दिले. हें पाहून सर्व इतर बायका हंसूं लागल्या आणि थट्टेनें ह्मणूं लागल्या कीं, बाळपणीं ज्या लीला त्यांबरोबर केल्या असतील त्या सर्वांची आज आठवण करावी! नंतर कृष्णानें नंदयशोदेचें पूजन केलें. व त्रैलोक्यांतील अमोल्य अलंकार त्या उभयतांस प्रेमानें अर्पण केले. देवकीनें यशोदेस ह्मटलें कीं, तूं धन्य आहेस; कारण कृष्णनाथास बाळपणांत स्तनपान करविलेंस. बाई, माझीं सहा बाळें कंसानें क्रोधेंकरून शिळेवर आपटून मारिलीं. हाय! हाय! तें त्या वेळचें दुःख आठवून नेत्रांस दुःखाश्रु येतात आणि सर्व अंगांवर शहारे उभारतात. मग ती कृष्णास ह्मणाली, अरे, तूं सदय होऊन गुरुपुत्रास यमलोकींहून एकदां आणून

गुरूस दिलेंस आणि तुझे जेष्ठ सहोदर मृत्युसदनीं कसे ठेविलेस? ते जर तूं मला आणून देशील तर माझा आनंद जगत्रयांत मावणार नाहीं.

कृष्णानें मातोश्रीचें हें भाषण ऐकून त्याचें मन स्नेहानें फार द्रवलें. तो देवकीस ह्मणाला कीं, माते, आतांच तुझे सहाही मृत पुत्र तुला भेटवितों. मग लागलीच ते पुत्र आणण्याची यमास आज्ञा केल्यावरून त्यानें तात्काळ साही बाळें आणून कृष्णास दिलीं. त्यानें तीं देवकीजवळ देतांच सर्वांस अत्यानंद झाला. तीं सर्व बालकें देवकीनें मोठ्या प्रेमानें आपल्या हृदयीं धरिलीं; हें पाहून नंद आणि यशोदा यांस मोठाच हर्ष झाला. याप्रमाणें कृष्णानें पांच दिवस तेथें राहून नित्य गोकुळवासी जनासंगातें भोजन केलें व सर्वांस आनंदित करून त्यानें त्या सर्वांची पाठवणी केली. नंद, यशोदा व गौळी यांनीं श्रीकृष्णाची आज्ञा घेऊन ते सर्व गोकुळास गेले आणि श्रीकृष्ण, सहकुटुंब सहसैन्य द्वारकेस आले.

एके दिवशीं यादवांसहित कृष्णाचे मुलगे चेंडूफळी खेळत खेळत एका रानांत गेले. खेळतांना अकस्मात चेंडू उडून एका विहिरींत पडला. तेव्हां कृष्णपुत्र व यादव हे त्या कुपांत पहात असतां चेंडू त्यांस दिसेना, फक्त विहीर कोरडी असून त्या जागीं एक मोठा भयंकर सरडा मात्र त्यांनीं पाहिला. तें वर्त्तमान त्यांणीं कृष्णास कळवितांच कृष्ण, बळराम व दुसरे कितीएक यादव त्या कुपाजवळ धांवत आले. कृष्णाची दृष्टि त्या सरड्यावर पडतांच सरडा आपलें रूप बदलून दिव्य पुरुष बनला; आणि कृष्णापुढें हात जोडून उभा राहिला. कृष्णानें त्यास विचारिलें कीं,

तूं कोण आहेस? त्यावरून त्याणें सांगितलें कीं, मी नृग या नांवाचा राजा. मीं आपल्या हयातींत मोठमोठीं दानें केलीं व परोपकारानें सर्व सृष्टींत कीर्त्ति मिळविली. एके दिवशीं महापर्वकाळ असतां एक सहस्र सवत्स गाईंचीं दानें ब्राह्मणांस दिलीं; परंतु दुर्दैवानें त्या समयीं अशी गोष्ट घडली कीं, एका विप्रास दान दिलेली गाय तेथून पळून आमच्या कळपांत परत आली; आणि दुसरे दिवशीं ज्या गाई दिल्या त्यांत तीही गाय दुसऱ्या ब्राह्मणास दिली. मग ती गाय पहिल्या ब्राह्मणानें ओळखून, ही माझी गाय; ती मला दे ह्मणून तो त्याजवळ भांडूं लागला. आणि दुसरा ह्मणे कीं, ती मला राजानें दान दिली; ती मी देणार नाहीं. याप्रमाणें दोघांचा वाद होऊन तें प्रकरण मजजवळ आलें. मीं त्यांची बहुत प्रकारें समजूत केली. मी दोघांही ब्राह्मणांस एकएक सहस्र दुसऱ्या गाई देण्यास सिद्ध झालों; परंतु दोघेही आपला हट्ट सोडीनात. शेवटीं त्यांचा वाद न तुटल्यामुळें सरडा होण्याविषयींचा मला त्यांनीं शाप दिला. परंतु मी निरपराधी असून मजवर इतकी अवकृपा झाली ह्मणून, कांहीं तरी उःशापाची दया व्हावी; अशी त्या दोघांजवळ मी विनंती केली. तेव्हां मला असा उःशाप दिला कीं, श्रीकृष्ण परमात्मा, पूर्ण अवतार, त्याची दृष्टि तुझ्यावर पडतांच तुझा उद्धार होईल. त्याप्रमाणें कृष्णनाथा, आज मी तुझ्या कृपादृष्टीनें उद्धरलों. असें ह्मणून कृष्णचरणीं मस्तक ठेवून स्वर्गाहून जें विमान आलें त्यांत बसून तो इंद्रभुवनीं गेला.

कोणी एक ब्राह्मण द्वारकेंत राहत होता. त्याच्या बायकोस आठ मुलें झालीं, परंतु तीं सर्व पांचवे पांचवेच

दिवशीं मेली. तिला कांहीं दिवसांनीं एक नववा पुत्र झाला. तेव्हां लागलाच तो ब्राह्मण कृष्णाजवळ आला आणि बोलला कीं, माझें प्रत्येक बालक पांचवे दिवशीं मरतें. आतां कृपा करून हा तरी माझा मुलगा आपण राखावा. हें वर्त्तमान सांगितलें त्या वेळीं कृष्णाजवळ अर्जुन होता. त्यानें परभारें उत्तर केलें कीं, मी हा तुझा मुलगा राखतों. असें ह्मणून तो ब्राह्मणाच्या घरीं गेला, आणि मुलाजवळ बसला. त्यानें सर्वांस सांगितलें कीं, मी येथें असतां बालक नेण्याची यमाची काय पुण्याई आहे? जर या पुत्रास यमानें नेला तर मी अग्निकाष्टें भक्षीन. असें बोलून त्या घराभोंवतीं अर्जुनानें बाणांचा कोट करून मंत्रसामर्थ्यानें दिग्बंधन केलें; आणि हातांत धनुष्यबाण घेऊन तेथें बसला. पांचवा दिवस प्राप्त होतांच त्या मुलाचा प्राण एकाएकीं गेला. तें पाहून मुलाची आई वक्षस्थळ बडवूं लागली, आणि ह्मणूं लागली कीं, अर्जुना, माझा पुत्र गेला. अर्जुनानें तिला आश्वासन देऊन मी तुझा पुत्र तुला परत आणून देतों, असें सांगून आपण यमलोकास गेला; परंतु यमानें सांगितलें कीं, कपिध्वजा, मीं त्या ब्राह्मणाचा मुलगा आणिला नाहीं. त्यावरून चौदा भुवनेंही त्याणें शोधलीं; परंतु तो मुलगा कोठेंही नाहीं असें पाहून पुनः द्वारकेस येऊन अग्निकुंड चेतवून त्यांत उडी टाकणार, इतक्यांत श्रीकृष्णभगवान तेथें प्रगट झाले व विचारितांच पार्थानें सर्व वर्त्तमान त्याजला श्रुत केलें. नंतर श्रीकृष्णानें रथारूढ होऊन मनोवेगानें सप्तसमुद्रांपलीकडे आदिनारायणाचें स्थान आहे त्या स्थानीं अर्जुनास नेऊन उभें केलें; आणि आपण त्या स्वरूपांत मिळाला. इकडे पार्थ,

कृष्ण गेला असें पाहून व आदिनारायणाचें अद्भुत स्थान व कोटि सूर्यतेजापेक्षांही अधिक प्रकाशित कांती पाहून अगदींच घाबरून ह्मणाला कीं, देवाधिदेवा श्रीकृष्णा, आतां यांतून आपला भक्त सांभाळावा. पार्थानें आदिनारायणाचीही फारच स्तुति केली व कृष्णास उद्देशून ह्मणाला कीं, हे सर्वेश्वरा, क्षीराब्धीजावरा, मुनिमानसहंसा, समरधीरा श्रीरंगा, मला असा इकडे एकटा टाकून तूं गेलास हें चांगलें नव्हें. तेव्हां कृष्णानें सदय होऊन आपलें रूप प्रगट करून अर्जुनाच्या मस्तकावर हात ठेवून अगोचर असें आदिनारायण-स्वरूप पहाण्याकरितां त्यास दिव्य नेत्र दिले. पार्थानें तें रूप पाहिलें तों मत्स्य, कच्छादि सर्व अवतार तसेच चंद्र, सूर्य व ब्रह्मा, विष्णु, रुद्र इत्यादि तेहतीस कोटि देवांस त्याच स्वरूपांत मुरलेले दिसून कृष्णस्वरूपही त्यांतच विरून गेल्यासारखें दिसत आहे असें पाहिलें. अर्जुनानें त्या ब्राह्मणाचीं नऊही मुलें त्याच ठिकाणीं खेळत असून पूर्ण तेजस्वी दिसत आहेत अशीं पाहिलीं. मग कृष्णानें नऊही बाळें रथावर घेऊन द्वारकेस आणलीं. अर्जुनानें ब्राह्मणाची व त्याच्या स्त्रिची पूजा करून तीं त्यांच्या स्वाधीन केलीं. मग त्यांच्या संतोषास काय पारावार? हा प्रकार पाहून ब्राह्मणानें व सकल जनांनीं पार्थाची फारच तारीफ केली. परंतु कृष्णाची अर्जुनानें फारच स्तुति केली. तेव्हां कृष्णानें त्यास सांगितलें कीं, सर्व स्वरूपें मीच नटत असतों व कर्ता हर्ता सर्व मीच आहें. अर्जुनानें सर्व अभिमान सोडून निश्चल मन केलें आणि संतोषानें श्रीकृष्णआज्ञा घेऊन इंद्रप्रस्थास येऊन श्रीकृष्णभक्तींत शांतपणें राहिला.

एके वेळीं इंद्राची राणी शची ही वैकुंठभुवनास गेली असतां, तेथें लक्ष्मीसह वैकुंठपति पाहून त्यांसमोर हात जोडून उभी राहिली. मनांत इच्छा हीच कीं, हरीच्या अर्धांगीं बसावें. हें तिचें मन जाणून हरीनें तिजला सांगितलें कीं, तूं ही इच्छा पूर्ण होण्यास्तव हिमाचलावर साठ सहस्र वर्षें तप कर. मग मी पुढें कृष्णअवतार धारण करीन त्या वेळीं तूं राधा होऊन गोकुळीं जन्म घ्यावा. तेथें मी तुझी ही इच्छा तृप्त करीन. जेव्हां मी कंसवधास जाईन तेव्हां तूं गुप्त होऊन द्वारकेस ये. पुढें त्या शचीनें तप करून गोकुळीं राधारूपें अवतरून कुंजवनांत हरीसह रतिसुख अनुभवलें. मग ज्या वेळीं कृष्ण मथुरेस गेले, त्या वेळीं ती तप करून द्वारकेस आली. ती तेथें येऊन कृष्णास भेटल्यावर कृष्णानें तिला प्रेमानें आलिंगन देऊन आपल्या अंकीं बसविलें. अद्यापि द्वारकेस राधाकृष्णांचें एके ठिकाणीं पूजन होतें; तेथें हें सर्वांच्या पाहण्यांत येईल.

एके वेळीं रुक्मीण कृष्णदर्शन घ्यावयास येत असतां तिनें कृष्णाच्या मांडीवर राधा बसली आहे असें पाहिलें. तिच्या देखतां सोळा हजार स्त्रियांपैकीं कोणीही न बसतां ती येतांच सर्वांनीं आदरानें उभें रहावें, असा तिचा दर्प सर्वांना असतां, ही राधा रुक्मिणीची कांहींच भीड न धरितां तशीच कृष्णअंकावर बसलेलीच राहिली. यावरून रुक्मिणीला अंतर्यामीं बहुत कोप आला; परंतु पुढील भविष्यार्थ जाणून निमुटपणें तेथून दिंडीरवनांत ( पंढरपुरांत ) तप करण्यास गेली. रुक्मिणी द्वारकेंतून गेल्यावर तें स्थळ शून्यवत दिसूं लागलें. तिच्या शोधास्तव हरीनें गोकुळांत येऊन बालवेष घेतला. मग पुढें दिंडीरवनांत

येऊन तेथें गाई, गोपी, गोपाळांस ठेवून पहातात तों, तेथें रुक्मीण महान तप करीत बसलेली पाहिली. त्या वेळीं कृष्ण तिजसमोर कमरेवर दोन्ही हात ठेवून तिची नानाप्रकारें समजूत करूं लागला. तेव्हां रुक्मिणीनें कृष्णास सांगितलें कीं, येथें मला उगीच त्रास देण्यास कशास आलास? तूं तर मला व्यभिचारी दिसतोस! दुसऱ्याचे स्त्रियेस आपली बायको ह्मणणारा असा जो, त्याचें मला दर्शन नको!! मग रुक्मिणीचें कृष्णानें ज्ञानोपदेशानें समाधान केलें.

पुढें पुंडलीक मातापित्यांची एकनिष्ठपणें सेवा करीत होता, त्याची भक्ति पाहून 'मी संतुष्ट झालों वर माग;' असें कृष्णानें त्यास ह्मटलें. त्यानें एक वीट टाकली, तिजवर पंढरीनाथ या नांवानें श्रीहरि उभा राहिला. मग पुंडलिकानें असा वर मागितला कीं, देवा, या क्षेत्राचें नांव आजपासून पंढरपूर ( दक्षिण द्वारका ) ठेवावें; व आपण ज्या विटेवर आतां उभे आहां त्याच विटेवर 'पंढरीनाथ' या नांवानें सतत उभें राहून जे सद्भक्त तसेच पातकी येथें येतील त्यांस प्रेमानें दर्शन देऊन मुक्त करावें.

शेवटीं या 'मूरकर मंडळी'चेंही इतकेंच मागणें आहे कीं, पंढरीनाथा, तूं सज्ञान तसेंच अज्ञान गोप, गोपी इत्यादिकांचें निर्मळ प्रेम पाहून त्यांचे आळ पुरवून त्यांस आपल्या चरणीं ठाव दिलास; तर आतां अज्ञ, हीन, दीन, कुमति अशा या आम्हां दासांवरही तुझी कृपा असावी.

समाप्त

# पद.

## श्रीकृष्णास प्रार्थना.

गोविंदा गोपाळा कृष्णा गोपीजननाथा ॥
गोवर्धनधर गोरसरसिका गोड तुझी गाथा ॥ धृ० ॥

अहिपतिशयना[1] अंबुजनयना[2] अपारगुणराशी ॥
अमरोद्धारा[3] असुरविदारा अखिलांतरवासी[4] ॥
अगाधचरिता अखंडभरिता अगणित सुविलासी ॥
अद्भुत तेजोराशी देवा लागों पायांसी ॥
गोविंदा गोपा० ॥ १ ॥

पापविनाशक पावननामा पाळित निज दासा ॥
पामरजन परिपालनचतुरा पांडवकुलवासा ॥
पापमथन वरदायक देवा पंकजनिभहंसा ॥
पाहि महाभवपाश निवारुनी पयोनिधिवासा[5] ॥
गोविंदा गोपा० ॥ २ ॥

बलरामानुज[6] बल्लवरंजित[7] बलिभक्तासुखदा ॥
बलिबंधनकृत बलिद्वाराश्रित बलवंता बलदा ॥
बघतां बंधनभव मुळि नाहीं बहुनामें सुखदा ॥
बहुगुणमंडित बहुरणपंडित बहुरूपी बहुदा[8] ॥
गोविंदा गोपा० ॥ ३ ॥

---

१ शेषावर शयन करणाऱ्या. २ कमलनेत्रा. ३ देवांचा उद्धार करणाऱ्या. ४ सर्वव्यापका. ५ क्षीरसमुद्रांत वास करणाऱ्या. ६ बळरामाचा कनिष्ठ बंधु. ७ गोपांचें रंजन करणाऱ्या. ८ उदारा.

मराठी ग्रंथ संग्रहालय

भक्तकामकल्पद्रुम[9] प्रभुजी भक्तांकित भक्त ॥
भवभयभंजन भवमनरंजन[10] ब्रह्मचि भवमुक्त ॥
भक्तदयाघन भगवज्जनमनरंजन अव्यक्त ॥
भक्तकामदा भक्तभूषणा चिंतिती सद्भक्त ॥
गोविंदा गोपा० ॥ ४ ॥

माधवराया माश्रित[11] काया मुनिमानसहंसा ॥
मायातीता सारमनोज्ञा[12] मारित रिपु कंसा ॥
मुरकर मंडळि प्रार्थितसे तुज हे त्रिजगन्वासा ॥
मन-इच्छित हें पूर्ण करी तूं तोषवि निजदासा ॥
गोविंदा गोपा० ॥ ५ ॥

---

९ भक्तांचे मनोरथ पूर्ण करणाऱ्या कल्पवृक्षा. १० शंकराचें मनरंजन करणाऱ्या. ११ मायेच्या आश्रित. १२ सर्व तत्वांच्या योगानें मनोहर अशा.

# श्रीकृष्णाविषयीं ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या कुतर्कांचें खंडण.

या सृष्टींत जे अनेक धर्म चालू आहेत, त्यांजविषयीं कोणीही विचार केला असतां त्यांची अशी खात्री होईल कीं, मुळारंभीं जगांतील सर्व लोकांचा एकच धर्म होता; आणि तो वेदोक्त. परंतु पुढें कालांतरानें कांहीं लोकांची प्रवृत्तिमार्गाकडे अधिक दृष्टि पोंचूं लागून त्यांनीं धर्मशास्त्र, ज्योतिषशास्त्र, वैद्यशास्त्र, गणितशास्त्र, व्याकरणशास्त्र, शिल्पशास्त्र इत्यादि अनेक ग्रंथांचा अभ्यास करून आपलें व्यवहारीक ज्ञान वाढविलें. आणि त्यांत आपली प्रतिष्ठा वाढविण्याकरितां, अनादिसिद्ध वेदोक्तधर्माची निंदा करून त्या वेळच्या अज्ञानी लोकांस आपली सर्वज्ञता दाखवूं लागले. सर्वच लोक शहाणे नसतात या न्यायानें, त्या ढोंग्यांच्या मताला अनुसरून अनेक लोकसमाज वेगळे पडले. व खऱ्या वेदोक्त धर्माची निंदा करून खोटीं मतें काढणारे असे शेंकडों मतवादी झाले. तीं मतें कोणतीं तर बौद्धमत; ज्याच्या पोटीं जैनमत, चार्वाकमत, स्वभाववादिमत, नास्तिकमत इत्यादि अनेक भेद झाले. त्या बौद्धमताच्या लोकांतून याहुदीमत उत्पन्न झालें. व या याहुदीमताच्या लोकांतूनच ख्रिस्तीमत उत्पन्न झालें आहे. त्याचप्रमाणें महंमदीमत, झोरास्ट्रियनमत व अलीकडे ब्राह्ममत इत्यादि अनेक मतें निघालीं, सध्यां निघत आहेत, व पुढेंही निघतील; परंतु हीं सर्व मतें आमच्या वेदोक्त धर्मांतील

वेदांतशास्त्रापुढें अगदीं बापुडीं होऊन जातात. असें अगदीं परकीय जे अमेरिकन (थिओसोफिस्टस) इत्यादि लोक तेही कबूल करितात. हीं मतें मागाहून निघालीं हें सहज कळतें. कारण, प्रत्येक इतर धर्मांत कांहींना-कांहीं तरी हिंदुधर्माची स्पर्धा केलेली अगर त्या संबंधीं दुसरा कांहीं मजकूर लिहिलेला आढळतो; परंतु हिंदुधर्मशास्त्रांत (वेदांत) दुसऱ्या धर्माचें नांव सुद्धां नाहीं. आमच्या वेदोक्त धर्मावर आजपर्यंत सहस्त्रावधि दुष्टांच्या झडपा पडल्या असतांही तो जसाच्या तसाच कायम रहातो; याचें कारण, तो धर्मच सत्य आणि ईश्वरप्रणित आहे. ह्मणूनच ज्या ज्या वेळीं ह्या मतवादी लोकांनीं हिंदुधर्म बुडविण्याचा प्रयत्न केला, त्या त्या वेळीं अवतारमालिकेंत घालण्यास योग्य अशा आमच्यांतील कांहीं पुरुषांनीं मोठ्या शौर्यानें त्या मतवादी लोकांस पराजित करून वेदोक्त धर्माचें रक्षण केलें. असो. एवढें उपोद्घातादाखल झालें. आतां आपण आपल्या प्रकृत विषयाकडे वळूं. व ज्या गीताशास्त्राकडे पाहून आजकाल सर्व जग मान डोलावीत आहे, त्या गीतोपदेशक श्रीकृष्णभगवानाविषयीं हल्लींचे तुटपुंजे ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोक अज्ञानपणानें जे कुतर्क काढतात त्यांचा विचार करूं.

श्रीकृष्णावर ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांचा प्रथम असा एक मोठा आरोप आहे कीं, जर कृष्ण हा खरोखर ईश्वरावतार होता, तर त्यानें परस्त्रिया ज्या गौळणी, यांच्याशीं जारकर्म कसें केलें? तर आतां यास असें समाधान आहे कीं, श्रीकृष्णानें बाळपणांत त्या गोपिकां-

बरोबर किंवा अन्य कोणत्याही स्त्रीबरोबर संग केलाच नाहीं; असा जो श्रीव्यास महाराजांच्या लिहिण्यांत सिद्धांत आहे, तो हे अज्ञानी लोक मुळींच समजत नाहींत; ही त्यांची मोठी चूक आहे. तो असा कीं, एका प्रसंगीं श्रीकृष्ण कांहीं गौळणींस नौकेंत घेऊन क्रीडा करावयास यमुनेंत फिरत असतां नौका बुडूं लागली. त्या वेळेस सर्व गोपिका बुडणार इतक्यांत त्यांना स्मरण झालें कीं, श्रीकृष्ण हा ईश्वरावतार आहे व यानें गोकुळांत बहुत चमत्कार केले; यास्तव याची प्रार्थना केली असतां हा आपणांला खचित तारील. असा गोपींनीं विचार करून श्रीकृष्णाची प्रार्थना केली कीं, हे श्रीकृष्णा, ह्या वेळेस आह्मीं यमुनेंत बुडत आहोंत; तर आह्मांस तार. त्याजवर तो बोलला कीं, गोपींहो, तुमचा मजवर शुद्धभाव नाहीं, हें तुमच्या मनांतील मी जाणतों; आणि यामुळेंच तुह्मी बुडत अहां! त्याजवर गोपिका ह्मणाल्या, हे गोपालकृष्णा, तुजवर शुद्धभाव कसा ठेवावा हें आह्मांस कळत नाहीं; तर कृपा करून तूंच सांग. त्याजवर तो बोलला कीं, गोपिकांनों, मजवर शुद्धभाव असा ठेवा कीं, "श्रीकृष्ण हा ब्रह्मचारी आहे." या त्याच्या बोलण्यावर सर्व गोपींस नवल वाटून त्या एकमेकींकडे पाहून ह्मणूं लागल्या कीं, हे श्रीकृष्णा, तूं प्रत्यक्ष आमच्याबरोबर रममाण झाला आहेस; असें असून तुला आह्मीं ब्रह्मचारी कसें ह्मणावें? त्याजवर तो बोलला कीं, गोपिकांनों, मी लहान बालक असतां तुमच्याबरोबर रममाण होईन हें तुह्मांस वाटतें काय? त्याजवर गौळणी बोलल्या, हे

देवा, तूं तरुण रूप धरून आह्मांबरोबर रममाण होतोस. याजवर तो बोलला कीं, हे गोपिकांनों, नें तुह्मांस माझ्या देहासारखें तरुण रूप भासलें आणि तुह्मीं ज्याबरोबर रममाण झालांत असें तुह्मांस वाटतें, तें मी लहान असतां तुमच्याच बुद्धीनें माझें जारभावनेनें तुह्मीं ध्यान केलेंत, त्या ध्यानाचें (अति ध्यासाचें) फल तुह्मांस स्वप्नाच्या रीतीप्रमाणें मिळालें. ही माझी माया होय. तर याजवरून मी तुमच्यापाशीं रममाण झालों असें होत नाहीं. मी बालब्रह्मचारी व अद्याप स्त्रीसंगविरहित आहें; तर अशा शुद्धभावनेनें मला पहा, व त्याप्रमाणें मुखानें ह्मणा; ह्मणजे आतां ही यमुना दुभांग होऊन तुह्मांस कोरडी वाट मिळेल. त्याप्रमाणें गोपिका बोलतांच यमुनेचा एकाएकीं प्रवाह स्थिर होऊन गोपिकांसाठीं मध्यभागीं एक मोठा खोल कोरडा रस्ता झाला. हें चरित्र पाहून गोपिका सद्गदित होऊन श्रीकृष्णाची प्रार्थना करून ह्मणूं लागल्या कीं, हे मुकुंदा, तूं साक्षात ईश्वरावतार असून तुजवर आह्मीं व्यर्थ जार इत्यादि कर्मांचा दोष लाविला होता; त्या आमच्या अपराधांची तूं क्षमा कर. आह्मीं स्त्रिया अज्ञान आहों. तूं आमचा त्राता आहेस. त्याजवर तो बोलला कीं, गोपिकांनों, तुह्मीं आतां जा; आजपासून माझी भक्ति शुद्धभाव धरून करा. मी तुमच्यावर कृपा केली आहे. याप्रमाणें श्रीव्यासांच्या लिहिण्यांत श्रीकृष्णानें बाळपणांत स्त्रीसंग केला नाहीं असा निवाडा आहे. त्यानें जीं चरित्रें केलीं तीं मानवी नव्हत. ईश्वरीचरित्रें आहेत. त्यांजवर अक्कलच चालत नाहीं.

पहा, एकदां एका म्हातार्‍या गौळणीनें श्रीकृष्णास आपल्या सुनेजवळ व्यभिचार करितांना धरून सुनेसह त्यास यशोदेजवळ आणिलें. इतक्यांत वाटेंतच त्यानें आपलें रूप बदलून तो तिचा मुलगा बनला. आणि इकडे श्रीकृष्ण यशोदेजवळ तर आहेच; तेव्हां आपलीच सून व आपलाच मुलगा यास चावडीवर आणिल्याबद्दल त्या म्हातारीची उलटी फजिती मात्र झाली! तसेंच राधेच्या घरीं श्रीकृष्णानें जाऊन तिला भोगिली, व नवरा येऊन दार उघडण्यास सांगतांच तो दोन वर्षांचा लहान बालक झाला. असो.

श्रीकृष्णाचें रूप श्यामसुंदर, सकुमार व पहाणारांच्या नेत्रांस आनंद देणारें होतें. अशा त्याच्या त्या मोहक रूपाकडे पाहून स्त्रीपुरुषांच्या मनांत निरनिराळे भाव उत्पन्न होत असत. म्हणजे व्यास, शुक, वसिष्ठ व नारद इत्यादि सकल ऋषींना वाटलें कीं, श्रीकृष्ण हा साक्षात् ईश्वरानें जगदोद्धारार्थ अवतार धारण केला आहे. पांडवांना वाटत असे कीं, श्रीकृष्ण हा आमचा सखा व साह्यकारी आहे. यशोदा, देवकी, नंद, वसुदेव यांना वाटे कीं, कृष्ण आमचा पुत्र आहे. सर्व यादवांस वाटत असे कीं, तो आमचा सर्व प्रकारें रक्षण करणारा बंधु आहे. गोपाळांना वाटे कीं, हा आमचा खेळगडी आहे. राधा आदिकरून गोपिकांना वाटत असे कीं, श्रीकृष्ण आम्हांस पति असावा. कंसाला तर तो प्रत्यक्ष काळच दिसत होता. याप्रमाणें श्रीकृष्णावर लोकांच्या निरनिराळ्या भावना असत. श्रीकृष्णाकडे गोपिकांचें जारभावनेनें मन लागलें, हें अंतरसाक्ष जो

श्रीकृष्णभगवान यास कळतांच, त्यानें आपली योगमाया प्रगट करून हजारों गोपींस एकाच क्षणीं असा चमत्कार दाखविला कीं, श्रीकृष्ण आपणांस पति मिळाला. प्रत्येक गोपीजवळ एक एक कृष्ण असा जेव्हां चमत्कार सर्व ऋषींनीं पाहिला, तेव्हां कंसवधार्थ व भूभारहरणार्थ जो श्रीकृष्णावतार, तो यशोदेजवळ बसलेला असून व गोकुळांतील गोपींशिवायकरून लक्षावधि ईश्वरी मायेच्या नव्याच गोपिका झालेल्या पाहून, ईश्वरीलीला अगाध आहे, असें ते बोलूं लागले. अशी जर अनंतशक्ति श्रीकृष्णाजवळ नसेल, तर तो ईश्वराचा पूर्णावतार हें कसें ह्मणवेल? गवळ्यांना त्यांच्या स्त्रियांचा वियोग एकही दिवस झाला नाहीं; आणि गोपिकांना तर असें वाटत असे कीं, श्रीकृष्णावांचून आह्मांस दुसरा पति ठाऊकच नाहीं! याप्रमाणें सहा महिन्यांची एक रात्र अशी केली कीं, चंद्र, सूर्य इत्यादिकांच्या गति स्थिर करून ते दोन्ही समान दिसावे असें केलें. व योगमायेनें रासक्रीडा व लीला अशी केली कीं, यशोदेजवळून श्रीकृष्ण तर रात्रीं कधींच बाहेर गेला नाहीं. ही अजब ईश्वरीमाया श्रीकृष्णानें दाखवून लहानथोरांचें तारण केलें. या श्रीव्यासानें लिहिलेल्या कथेच्या अभिप्रायाकडे पाहतां असें दिसतें कीं, यांत मानवी कृत्य म्हणजे श्रीकृष्णानें जारकर्म केलें असें मुळींच ह्मणतां येत नाहीं.

आतां, हे मतवादी लोक कदाचित् असें ह्मणतील कीं, जर कृष्णानें अशीं कर्में केलीं तर आह्मींही तसें वागल्यास कोणता दोष आहे? तर याचें निराकरण एवढेंच कीं, जर ह्या कथाच खोट्या असें ते मानतील, तर

कृष्णही कोणी नाहीं, गौळणीही खोट्या, व ते अपराधही लटकेच; तेव्हां त्यांचें समाधान त्यांनींच केल्यासारखें होईल. परंतु श्रीकृष्णाच्या संबधानें त्यानें केलेले अद्भुत प्रकार खोटें मानणें, व व्यभिचार व चौर्यकर्म खरें मानून त्याचें ईश्वरत्व मोडणें ह्मणजे एकाच विषयीं त्याच्या संबधाच्या कांहीं गोष्टी खोट्या मानून सोडणें व कांहीं खऱ्या मानणें ह्मणजे तर अगदींच अश्लाघ्य होय. आतां, श्रीकृष्ण हा परमेश्वर खरा, परंतु त्यानें जीं कर्में केलीं तीं दुराचाराचीं केलीं असा जर ते मतवादी त्यास दोष देऊं लागतील, तर एकही दोष विचाराअंतीं त्यास लागत नाहीं. कारण, त्याची अचाट कृत्यें त्यासच ठाऊक. इतरांस त्यांची कल्पनाही झाली नाहीं, व होणेंही असंभाव्य. दरवाजास कुलुपें असतां आंतील दहीं दूध जातें, व फिर्याद झाल्यावर पहावें तों मडकीं पूर्ववत् भरलेलीं. गणपतीनें लाडू खाल्ले ह्मणून श्रीकृष्णानें आईस खोटें सांगितलें; पण त्याचा प्रत्यय आपलें तोंड उघडून तिला गणपतीसह ब्रह्मांड दाखविलें. तसेंच सोळा हजार स्त्रियांच्या घरीं एकाच वेळीं असणें. ह्या सर्व गोष्टी आह्मां मनुष्यांस असंभाव्य खऱ्या; परंतु ईश्वरास कांहींच कठीण नाहींत. कारण तो सर्वशक्तिमान आहे.

एके वेळीं कांहीं याज्ञिकपत्न्या श्रीकृष्णासाठीं कांहीं खाण्याचे पदार्थ घेऊन येत असतां, यमुनेच्या पुरांतून कसें पार जावें अशी त्यांना चिंता पडली. त्या वेळेस श्रीकृष्णानें त्यांस सांगितलें कीं, स्त्रियांनों, यमुनेपुढें उभ्या राहून बोला कीं, "श्रीकृष्णानें आपल्या योगमायेच्या बळानें गोपिकांस चमत्कार दाखवून श्रीकृष्ण त्यांस पति

मिळाला असें भासविलें; परंतु वास्तविक श्रीकृष्णावतारानें गोकुळीं बाळपणांत स्त्रीसंग केलाच नाहीं. कारण; स्त्रीसंग केलेल्याच्या हातून कंसास मरण नव्हतें. ह्मणून श्रीकृष्ण बाळब्रह्मचारी (स्त्रीसंगविरहित) राहिला आहे; ही गोष्ट जर खरी आहे, तर या यमुनेच्या पुरांतून आह्मांस कोरडी वाट मिळावी." असें त्याच्या सांगण्यावरून सर्व लोकांच्या समक्ष त्या याज्ञिकपत्न्या बोलतांच, यमुनेंत कोरडी जमीन व दोहों बाजूस पाण्याच्या भिंती झाल्या; व त्यांतून त्या स्त्रिया पार गेल्या. हा चमत्कार श्रीव्यासानें लिहिला आहे तो ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांनीं पाहून विचार करावा.

योगमायेनें ज्या गोपिकांस त्यांच्या मनोरथाप्रमाणें भासविलें कीं, श्रीकृष्ण आह्मांस पति मिळाला; आमच्याशीं श्रीकृष्णानें संग केला, आतां कंसाला कोण मारील? असा संशय व भय राहूं नये ह्मणून, श्रीकृष्णानें गोकुळांत अनेक प्रतिज्ञा करून चमत्कार दाखविले. देवकीला तिच्या भक्तिस्तव वरदान दिल्याप्रमाणें एकदम आठ वर्षांचा श्यामसुंदर बालक होऊन, हा आपला पुत्र आहे असें भासविलें. कंसाला मारून उग्रसेनाला राज्यावर स्थापन करून मग अन्य अवतारकृत्यें भूभारहरणार्थ करून भाविक लोकांस तारिलें. ज्या कंसाला स्त्रीसंग झालेल्याच्या हातून मरण नव्हतें, त्या कंसाला त्यानें मारिलें; याजवरून श्रीकृष्णानें व्यभिचार तर राहूं द्या, पण बाळपणांत स्त्रीसंग मुळींच केला नाहीं असें सिद्ध होत नाहीं काय?

श्रीकृष्णावर ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांचा दुसरा

एक मोठा असा आरोप आहे कीं, त्यानें बाळपणीं गोकुळांत दहीं, दूध, लोणी इत्यादि चोरून खाल्लें. जर तो ईश्वरावतार होता, तर हें नीच कर्म त्यानें कसें केलें? तर त्यास असें समाधान आहे कीं, एकदां एका गौळणीच्या घरीं श्रीकृष्ण मायावी बाल्यरूप धरून दहीं, दूध, लोणी खाऊं लागला. आणि दहीं लोण्याची मडकीं फोडून स्वस्थपणानें हातांत फुटकीं मडकीं घेऊन रांगत रांगत चालला. श्यामसुंदर अंगावर दह्यांचे थेंब पडल्यानें व लोण्यानें तें मुख माखल्यानें कृष्णास मोठी शोभा आली होती. ही मौज त्या गोपिकेनें पाहून त्याला वर उचललें व कडेवर घेऊन मोठ्या प्रेमानें त्याचें चुंबन घेतलें; आणि 'अले किस्ना चोला, अले लबाला, दहीं चोलून खातोस ना?' असे बोबडे व लाडके शब्द बोलत बोलत ती त्याला यशोदेजवळ घेऊन आली. आणि ह्मणाली कीं, 'यशोदाबाई, हा तुमचा कृष्ण पहा कसा दहीं लोणी चोरून खातो आहे!' हे शब्द ती मोठ्या आनंदानें व त्याच्या तोंडाकडे पाहून हंसून बोलली. तेव्हां यशोदा तिला ह्मणते, बाई, माझा कृष्ण तर पाळण्यांत खेळत आहे; असें बोलून यशोदेनें श्रीकृष्णाला पाळण्यांतून कडेवर घेऊन बाहेर आणिलें. यामुळें ती गौळण व यशोदा मोठ्या विस्मयांत पडलीं. व मनांत ह्मणतात कीं, आह्मां दोघींजवळ दोन कृष्ण आहेत; हें चरित्र आहे तरी काय? इतका विचार करितात तों तिसरी, चवथी, पांचवी याप्रमाणें हजारों गौळणी हजारों कृष्णाला कडेवर घेऊन यशोदेपाशीं प्रेमानें आल्या; आणि सर्व गोकुळांत व गल्लोगल्लींत लाखो कृष्ण रांगत

आहेत असें पाहिलें. त्या वेळेस सर्व गोकुळांतल्या लहान थोरांची खात्री झाली कीं, श्रीकृष्ण हा साक्षात् ईश्वरावतार आहे. आमचीं मनें वेधून घेण्याकरितां ज्या दहीं दुधावर आमचा लोभ, त्या लोभाचीच वस्तु त्यानें कृपा करून आपल्या हातांत घेतली आणि मुखांत घातली; कीं जेणेंकरून आमचीं मनें त्याच्याकडे लागावीं व आह्मीं तरावें. आह्मीं धन्य आहों, आह्मीं धन्य आहों, असें सर्व गौळणींनीं बोलून, श्रीकृष्णानें श्यामसुंदर कमलनयन अशीं जीं अनेक बालरूपें धरिलीं होतीं, त्यांजकडे पाहून व श्रीकृष्णाचे गुण गाऊन आनंदानें नाचूं लागल्या. त्या वेळेस त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रुधारा चालल्या, व संसारप्रपंच अगदीं विसरून गेल्या. त्यांना प्रेम अनावर होऊन, अहारे बा श्रीकृष्णा, असे शब्द बोलून त्या जमिनीवर लोळूं लागल्या. अशा त्या गौळणी प्रेमाश्रु गाळीत त्यांना दोन हातावर घेऊन मोठ्या प्रेमानें गळ्याशीं धरून नाचत नाचत आपापल्या घराकडे गेल्या. आणि पहातात तों, जीं त्यानें दहीं, दुधाचीं मडकीं फोडलीं, तीं जशींच्या तशींच सबंध दहीं दुधानें भरलेलीं आहेत असें पाहून, ही ईश्वरीमाया त्यानें आमच्या तारणासाठीं प्रगट केली अशी त्यांची खात्री झाली. श्रीकृष्णानें गौळणींच्या घरीं दहीं दुधाची चोरी करून मडकीं फोडलीं; यशोदेपाशीं पाळण्यांत तो आहेच; गोपीही अनेक कृष्ण घेऊन आल्या; आणि असा चमत्कार पाहून आनंदानें घरीं जाऊन पहातात तों, त्यानें कांहीं नेलें नाहीं व नाशही केला नाहीं. असा श्रीव्यासादि ऋषींचा स्पष्ट लेख असतां, कृष्णानें "चोरी केली, चोरी

केली" असा ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोक *कुतर्क काढतात याला काय ह्मणावें? जसें आपण आपल्या एक दोन वर्षांच्या बाळास लाडानें चोरा, लबाडा, इत्यादि बोलतों, तसें ज्या ईश्वरावतार श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठीं महान ऋषि तपश्चर्या करतात त्याला बाळपणीं गोपींनीं "अले चोला किस्ना" असे शब्द लडिवाळपणें बोलून खेळविलें, त्या गौळणींसारख्या भाग्यवान् कोण आहेत?

---

*आमच्या पुराणग्रंथांत कांहीं ठिकाणीं असलेल्या अलंकारिक अर्थाचें मर्म न जाणतां तेंच आमचें ज्ञान असें समजून ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोक आमचे देवधर्म इत्यादिकांविषयीं अनेक कुतर्क काढतात. आमच्या रसिक कवींनीं चांदणी रात्र ही चंद्राची भार्या, किंवा चंद्र हा आकाशरूपी समुद्रांत एक तारूं आहे, अशी कल्पना करून आपल्या कविताशक्तीच्या योगानें मनुष्यास आनंदित केलें; किंवा राहू केतू हे दैत्य कल्पून ते चंद्र, सूर्य यांना ग्रासण्याकरितां ग्रहणरूपानें येतात अशी त्या ग्रहावर पडणाऱ्या छायेवर कल्पना करून कविता केली; ह्मणजे ते लोक ग्रहणादि विषयांसंबंधीं अज्ञानी झाले असें नाहीं. असें असतें तर त्यांनीं वर्त्तविलेलें ग्रहण बिनचूक घडून कसें आलें असतें? या सर्व गोष्टींचे खरे शोध न करितां अज्ञानी व मूर्ख लोकांची भाकडकथा ऐकून किंवा वरील अलंकारिक अर्थाचें मर्म न समजून अलीकडे कांहीं अडाणी ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोक आमचे देव, धर्म इत्यादिकांचीं निंदापर चोपडीं छापून प्रसिद्ध करीत आहेत. त्यांपासून आमच्या धर्माची सत्यता व पूज्यपणा कांहीं कमी तर होत नाहींच, परंतु मोठी ओढाताण करून धेड, महार वगैरे अज्ञानी जातींच्या लोकांस आपल्या पंथांत ओढून घेऊन आर्यधर्मांतील अमुक लोकांस आमचीं मतें ग्राह्य झालीं व आमची लोकसंख्या इतकी मोठी वाढली असें सिद्ध करण्यास पहातात हें अगदीं वेडेपण होय.

कृष्ण हा जर ईश्वरावतार होता, तर त्यानें गोपींचीं वस्त्रें हरण केलीं ही गोष्ट अगदीं अनीतीची केली; हें त्याच्या ईश्वरत्वाला शोभत नाहीं; असें कित्येक अल्प-विचारी बोलतात. परंतु, श्रीकृष्णानें वस्त्रहरण कां केलें असें जर ते खोल विचार करून पहातील, तर त्यांसच खास समजेल कीं, त्यानें जें केलें तें योग्य केलें. कारण, ज्या वेळेस ह्या गौळणी श्रीकृष्ण आपणास पति मिळावा या हेतूनें आपलीं वस्त्रें वाळवंटीवर ठेवून पाण्यांत नग्नव्रत करीत उभ्या होत्या, त्या वेळेस श्रीकृष्णानें हें अंतर्यामीं जाणून त्यांचीं वस्त्रें आपल्या योगमायेनें कळंबाच्या झाडावर लटकावून दिलीं; व आपणही तेथें मुरली वाजवीत बसला. तेव्हां तो मुरलीचा मंजुळ ध्वनि त्या स्त्रियांच्या कानीं पडतांच त्या समजल्या कीं, आह्मीं जो पति मिळावा ह्मणून इच्छित होतों तो श्रीकृ-ष्ण येथें कोठें जवळच आहे; चला आपण त्यास पहाव-यास जाऊं. असा विचार करून त्या पाण्याच्या बाहेर पाहतात तों, त्यांचीं वस्त्रें ठेविलेल्या ठिकाणीं नसून तीं एका झाडावर लोंबत आहेत असें त्यांनीं पा-हिलें. तेव्हां त्या श्रीकृष्णाकडे पाहून ह्मणूं लागल्या कीं, श्रीकृष्णा, आमचीं वस्त्रें आह्मांस दे. त्या वेळेस तो ह्मणाला कीं, तुह्मीं पाण्यांत अशा निर्लज्ज होऊन मनांत काय चिंतन करीत होतां तें मला सांगा; ह्मणजे तुमचीं वस्त्रें आपोआप तुह्मांजवळच आहेत असें पहाल! हें त्याचें भाषण ऐकून त्या गोपी एकमेकींकडे पाहून हास्य वदन करून ह्मणाल्या कीं, देवा, आम्हीं तुजसा-ठींच आज हें व्रत आरंभिलें होतें; आणि तेणेंकरून तुझी

आह्मांस प्राप्तिही झाली. इतकें त्या बोलतांच त्यांचीं वस्त्रें त्यांच्या हातांत आहेत असें त्यानें त्या स्त्रियांना चरित्र दाखविलें. तेव्हां त्या स्त्रिया वस्त्रालंकार परिधान करून श्रीकृष्णावर नेत्राचे कामशर सोडूं लागल्या; आणि त्यानें आपणांस भोग द्यावा म्हणून अनेक प्रकारें त्यांनीं त्यास हावभाव दाखविले; परंतु तो मोहित कोठून होणार? कारण, तो ईश्वरावतार. परंतु शेवटीं त्यानें असा विचार केला कीं, या गोपींनीं मजसाठीं इतका परिश्रम केला असून जर मी यांची इच्छा पूर्ण केली नाहीं, तर ह्या सर्व स्त्रिया प्राणत्याग करतील; मग माझें दयाळूपण तें काय राहिलें? असा विचार करून तो ह्मणाला कीं, स्त्रियांनों, मला कामबाधा होऊन तुमचे मनोरथ पूर्ण व्हावे एतदर्थ तुम्हीं बहुत प्रकारें कामकटाक्ष सोडलेत, परंतु तसें झालें नाहीं म्हणून तुम्हीं फार दुःखी अहांत; परंतु दुःखी होऊं नका. रासक्रीडेंत मी आपली योगमाया प्रगट करून ज्या वेळेस अनेक श्रीकृष्णरूपें तुमच्या भक्तीस्तव तुम्हांसाठींच प्रगट होतील, त्या वेळेस तुमचे मनोरथ पूर्ण होतील. व नंतर ते मनोरथ हळू हळू नाहींसेच होतील. जा, दुःखी होऊं नका. आणि आजपासून अशा निर्लज्जपणानें पाण्यांत नग्न उभ्या राहून मजसाठीं असलीं मूर्खपणाचीं व्रतें करूं नका. मात्र शुद्ध भक्तिभाव असला ह्मणजे माझी प्राप्ति सहज आहे हें ध्यानांत ठेवा. हें ऐकून त्या गोपी आपापल्या घरोघर जाऊन श्रीकृष्णाचें थोरपण व उपकार आठवूं लागल्या. याप्रमाणें वस्त्रहरणाच्या निमित्तानें कामाला जिंकिल्याची, व ज्या स्त्रिया श्रीकृष्णासाठीं प्राणत्याग

करण्यास सिद्ध झाल्या होत्या, त्यांचें ज्ञानोपदेश करून रक्षण केल्याची अमोलीक कथा आहे. अस्तु.

श्रीव्यास, शुक, नारद वगैरे ऋषि ब्रह्मर्षींच्या अंतःकरणांतील तगमग, ज्याची वर सांगितलेली अवतारलीला श्रवण करून नाहींशी झाली, व ज्यांची ब्रह्मानंदीं टाळी लागली, त्या श्रीकृष्णाच्या लीलांविषयीं कुतर्क काढणेंह्मणजे निवळ खोटसाळपणा नव्हे काय? याचा मतवाद्यांनीं विचार करा, आणि या दुर्धर भवसागराचें जर तुमच्या मनाला कांहीं भय वाटत असेल, तर वेदोक्त धर्माची निंदा करण्याचें सोडून आपापल्या स्वधर्मानें वर्त्तन करा; ह्मणजे त्यांत तुमचें कल्याण आहे.

श्रीकृष्णार्पणमस्तु.

# मूरकर मंडळींची जाहिरात.

( विक्रीस तयार )

## पूर्ण हिंदुधर्माभिमानी पुस्तकें.

( गोष्टींच्या रूपानें )

| | किंमत | ट० |
|---|---|---|
| | रु० | आ० |
| श्रीपांडवप्रताप कथारस आणि आमचीं पुराणें शिमगा आहेत कीं काय ? .... | १। | २ |
| श्रीरामविजय कथारस आणि श्रीरामचंद्र ईश्वरावतार आहे .................. | १। | २ |
| श्रीहरिविजय कथारस आणि श्रीकृष्णाविषयीं ख्रिस्ती इत्यादि मतवादी लोकांच्या कुतर्कांचें खंडण .............. | १ | २ |
| श्रीभक्तविजय कथारस आणि मनुष्य जन्माचें सार्थक.............................. | १। | २ |
| श्रीसंतलीलामृत कथारस आणि आमचे अलिकडील सुधारलेले विद्वान्....... | १। | २ |
| श्रीजैमिनिअश्वमेध कथारस आणि हिंदूंचें प्राचीन वैभव ............................. | १॥ | २ |

श्रीशिवलीलामृत कथारस आणि आमच्या
शैववैष्णवांतील बखेडा ................ ·।।।· २

( छापत आहेत )

श्रीभक्तलीलामृत कथारस आणि हिंदु
लोकांचें मूर्त्तिपूजन....................... १।।। २
श्रीनवनाथभक्तिसार कथारस आणि सं-
तांचा संसार ......................... १।। २

---

☞ वरील पुस्तकांसंबंधी किंमत पाठविणें अगर पत्रव्यवहार करणें तो मुंबईत, जी. आय पी. रेलवे, ऑडिट ऑफिस, बोरिबंदर; अथवा मुंबईत, दुर्गादेवीनजीक, कापडगल्ली येथें 'श्रीदत्तमंदिरां'त, **रा. रा. काशिनाथ संभाजी मूरकर** यांच्या नांवें करावा; ह्मणजे पुस्तकें त्वरित पाठविण्यांत येतील.

---